# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०५/२०१९** **दिनांक ०४.०७.२०१९**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०१.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.०४.०७.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी ०१.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/११२९/२०१९, दि.२५.०६.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.०४.०७.२०१९ दुपारी ०१.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०३. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह,सदस्य
०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य
०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०६. मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते, सदस्या

मा.श्री.दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

आजच्या व्यवस्थापन समितीचे सभेस शिर्डी नगरपंचायतीच्या नवनिर्वाचीत नगराध्यक्षा मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते व्यवस्थापन समिती सदस्या म्हणून उपस्थित होत्या. शिर्डी नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले व सत्कार करण्यात आला.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०६.०६.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३१३** **दिनांक ०६.०६.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.१७९-

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आयकर व जीएसटी विषयक संपुर्ण दैनंदिन कामकाज करणे व त्यासंबधीत वेळोवेळी मार्गदर्शन मिळणेकामी विहीत पध्दतीने आयकर व जीएसटी करीता कर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन व साधारणपणे रु.१०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे कर विषयक कामकाज करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून दर मागविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच पात्र लेखापरिक्षण संस्था यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- लेखाशाखा)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे जीएसटी विषयक संपुर्ण दैनंदिन कामकाज करणे व त्यासंबधीत वेळोवेळी मार्गदर्शन मिळणेकामी जीएसटी करीता कर सल्लागार म्हणुन मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांची पुर्वीच्याच अटी शर्तीवर दि.०१.०७.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या कालावधी करीता नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच आयकर करीता कर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेकामी विहीत पध्दतीने संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन व साधारणपणे रु.१०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे कर विषयक कामकाज करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून दर मागवियात येऊन पात्र लेखापरिक्षण संस्थाचे दरांचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले. नविन कर सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांना पुर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**
**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

२. निर्णय क्र.२४३

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करीता नैसर्गिक तुकडी वाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक प्राध्यापकांची भरती ही पुर्वीच्या प्राध्यापक भरती प्रक्रियेनुसार व त्यामधील प्रतिक्षायादी मधुन करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करीता नैसर्गिक तुकडी वाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक प्राध्यापकांची भरती ही सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देऊन विहित पध्दतीने करण्यात यावी. भरती प्रक्रियेकामी आवश्यकतेनुसार विषय तज्ञांना आमंत्रित करण्यास व याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय/सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०२** **साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती कामातील एकुण १२ इमारतीपैकी ०७ इमारतीमधील टॉयलेटची खराब झालेली जुनी कन्सील्ड जी.आय.पाईप लाईन काढून त्याठिकाणी नविन सी.पी.व्ही.पाईपलाईन टाकणेकरीता येणारे अंदाजे रु.२७,६५,०५६/- मात्रचे खर्चास व सदरचे काम ठेकेदार मे.ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१ (१) अन्वये, समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय:- मा. व्यवस्थापन समिती दि.०१/०६/२०१८ निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ १२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८ अन्वये ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांना कार्यादेश देणत आला आहे.

प्रस्तावना:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी निम्नतम निविदाधारक ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांची एकूण रु.४,८२,८९,६५२/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेत येऊन त्यांना जा. क्र. १२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी दि.२७/०६/२०१८ पासून कामास सुरुवात केलेली असून सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे. |
| ठेकेदार | ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई. |
| कार्यादेश | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.४,८२,८९,६५२/-. |
| करारनामा दिनांक | दि.२०/०६/२०१८. |
| काम सुरु करण्याचा दिनांक | दि.२७/०६/२०१८. |
| कामाचा कालावधी | ०८ महिने. |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | दि.२६/०२/२०१९. (मूदतवाढ मिळणेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे येत्या सभेत सादर करणेत येत आहे.) |
| कामाची सद्यस्थिती | ठेकेदार यांचेमार्फत H, I, J, K, L या इमारतींचे तसेच प्रशासकीय इमारत, प्रसादालय कक्षाचे व |

| | |
|---|---|
| | ओ.ए.टी. चे काम पूर्ण करुन साई भक्तांसाठी वापरास देणेत आलेली आहे. तसेच सध्या F-इमारतीचे रंगकाम व अंतर्गत दुरुस्तीचे काम प्रगतीत आहेत. सदर कामांतर्गत साई आश्रम भक्तनिवास येथील एकूण १२ निवासी इमारती (१५३६ खोल्या), प्रशासकीय इमारत, प्रसादालय कक्ष तसेच ओ.ए.टी चे कामाचा समावेश आहे. |

साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे बांधकामाचे वेळी H, I, J, K, L या ०५ इमारतींकरीता सी. पी. व्ही. सी. पाईपलाईन टाकणेत आलेली आहे. तसेच A, B, C, D, E, F व G या ०७ इमारतींकरीता जी. आय. पाईप लाईन टाकणेत आलेली आहे. आता, सध्या सुरु असलेल्या रंगकाम व इतर दुरुस्तीचे कामावेळी फ्लश व्हॉल्व बसविणेकरीता डॅडो टाईल्स काढल्यानंतर असे लक्षात आले की, सदर ०७ इमारतींमधील जी. आय. पाईप लाईन ब-याच ठिकाणी गंजलेली आहे व १ ते २ वर्षांचे काळात ती खराब व लिकेज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ०७ इमारतींचे काम सुरू असल्याने आत्ताच त्याठिकाणी नविन ३२ एम.एम. व्यासाची सी. पी. व्ही. सी. पाईप लाईन टाकणे नजीकच्या भविष्यातील दुरूस्ती कामे टाळण्याचे दृष्टीने आवश्यक आहे.

सध्या सुरु असलेल्या देखभाल-दुरुस्तीचे कामाचे निविदेत सी. पी. व्ही. सी. पाईप लाईन टाकण्याचे काम समाविष्ट नसल्याने ते निविदेतील शर्त क्र.४.९, पृष्ठ क्र.३० नुसार Extra Item म्हणून ठेकेदार यांचेकडून करून घेता येईल. A, B, C, D, E, F व G या ०७ इमारतींचे सदर अतिरिक्त कामासाठी ठेकेदार यांनी दि.०८/०५/२०१९ रोजीचे पत्राने ०१ टॉयलेटकरीता रू.६०००/- प्र. नग खर्च कळविला आहे. त्यावर प्रत्यक्ष लागणारे मटेरीयल, मजूरी व सध्याचा बाजार भाव इ. तपासणी करून सुधारीत दर पृथ्थकरण इकडील विभागामार्फत तयार करणेत आले आहे व त्यानुसार ०१ टॉयलेटकरीता रू.३०८६/- प्र. नग खर्च अपेक्षित आहे. सदर दरामध्ये काम करणेसाठी ठेकेदार यांनी त्यांचे दि.०४/०६/२०१९ रोजी ई-मेलव्दारे तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार या ०७ इमारतींकरीता रू.२७,६५,०५६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच H, I, J, K, L या ०५ इमारतींचे टॉयलेटकरीता जुने फ्लश वॉल काढून नविन फ्लश वॉल टाकलेनंतर फ्लश वॉल ते WC Pan पर्यंत नविन ३२ एम. एम. व्यासाची सी. पी. व्ही. सी पाईपलाईन ठेकेदार यांचेमार्फत टाकलेली आहे. त्यासाठी अंदाजे रु.१,४५,८००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

साई आश्रम येथील A, B, C, D, E, F व G या ०७ इमारतींचे सी. पी. व्ही. सी पाईप टाकणेकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Details of Work | Qty./Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| A) | Removing the existing piping, plaster above the concelled pipe, making of gabadha inside the duct upto downtake line and removing the existing damaged G.I pipes lowering down the same and stacking at ground floor. Providing and laying new concealed 32 mm dia. CPVC pipe with all necessary fittings and connecting to existing downtake line with the help of jhoola including cutting, upliftment, jointing. After completion of plumbing work, revamping the joint finishing, curing, including all transport, taxes, lead, lift etc. complete. (07 Buildings). (Non-SSR Item). | 896 Toilets | 3086/- | 27,65,056/- |
| | TOTAL AMOUNT (A + B) Rs.: | 27,65,056/- | | |

उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास येथिल ८९६ खोल्यांचे टॉयलेटची जुनी जी. आय. पाईपलाईन काढून त्याठिकाणी नविन ३२ एम. एम. व्यासाची सी. पी. व्ही. सी. पाईप लाईन टाकणेचे अतिरिक्त बाबींचे (Extra Item) कामासाठी वर नमूद केलेप्रमाणे एकूण रू.२७,६५,०५६/- मात्र इतका खर्च येईल.

तथापी वरील कामासाठी मंजूरी घेणे, ई-निविदा तयार करणे, जाहिरात देणे, निविदा छाननी करणे, मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निम्नतम निविदा प्रस्ताव मंजूरी देणे, कार्यादेश देणे, करारनामा करणे व कामास सुरूवात करणे व तेथून पुढे ०३ महिने काम चालेल. या सर्व प्रक्रियेसाठी ५ ते ६ महिन्यांचा अवधी लागेल. तसेच यामूळे ह्या निविदेतील इतर बाकीची कामेही वेळेत होणार नाहीत. सदर काम तातडीने व कमी वेळेत पूर्ण करणे

गरजेचे आहे. त्यामूळे नविन ३२ एम. एम. व्यासाची सी. पी. व्ही. सी. पाईपलाईन टाकणेचे अतिरीक्त बाबींचे (Extra Item) काम ठेकेदार मे. ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांचेकडून निविदेतील शर्त क्र.४.९, पृष्ठ क्र.३० मधिल तरतुदीनुसार Extra Item म्हणून करून घेणे उचित होईल असे मत आहे.

साई आश्रम भक्तनिवासस्थान इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीचे कामासाठी ठेकेदार मे. ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांना एकूण रक्कम रू.४,८२,८९,६५२/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांना आतापर्यंत अदा केलेली बीले व उर्वरित कामाचे प्राथमिक अंदाजानूसार अतिरीक्त बाबींचे (Extra Items) चे कामासाठी येणारा अपेक्षित खर्च रू.२७,६५,०५६/- मिळून होणारा एकूण खर्च हा मूळ कार्यादेशातील एकूण रकमेच्या मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही, असा अंदाज आहे.

प्रस्ताव:- तरी साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती कामातील एकूण १२ इमारतींपैकी ०७ इमारतींमधिल टॉयलेटची खराब झालेली जुनी कन्सील्ड जी. आय. पाईपलाईन काढून त्याठिकाणी नविन सी. पी. व्ही. सी. पाईपलाईन टाकणेकरीता येणारे रू.२७,६५,०५६/- मात्रचे खर्चास व सदरचे काम ठेकेदार मे. ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांचेकडून करून घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती कामातील एकुण १२ इमारतीपैकी ०७ इमारतीमधील टॉयलेटची खराब झालेली जुनी कन्सील्ड जी.आय.पाईप लाईन काढून त्याठिकाणी चांगल्या प्रतिचे नविन सी.पी.व्ही.सी.पाईपलाईन टाकणेचे काम सदर कामाचे ठेकेदार मे.ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांचेकडून करुन घेण्यास तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२७,६५,०५६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी मंदिरातील फ्लोअरींग नुतनीकरण करणे (पहिला टप्पा) कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे VAT व GST मधील फरक मागणी पोटी देय होणारी रक्कम रु.५,७४,२९२/-मात्र मंजूर होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अधिनियम कलम २१ (१) अन्वये, समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-

१) दि.२३-२४/०५/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.३६१ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"…यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, श्री समाधी मंदिर परीसरात २९७५ चौ.मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आर. के. सावंत, नाशिक यांचे एकत्रीत रू.७४,८२,०००/- मात्र दर स्विकारणेत येवून, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले".

२) दि.०१/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"…यावर सविस्तर चर्चा होवून, श्री समाधी मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण करणे (पहिला टप्पा) कामाचे अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम रू.६६,८०,३२६/- मात्र मंजूर करण्यात आली. तसेच खराब झालेल्या टाईल्स बदलून घेण्यात याव्यात व त्यानंतर उर्वरीत शिल्लक देय रक्कम रू.३,६७,०३८/- मात्र ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी मंदिर परिसरातील जागोजागी तुटलेले फ्लोअरींग दुरूस्त करून घेतल्यानंतर अंतिम बिल अदा करावे, असे ठरले".

प्रस्तावना:-मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील नि.क्र.९०५ अन्वये, सदरकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर प्रिक्रयेनूसार ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दि.०५/०४/२०१७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. विहीत मुदतीत ०३ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या व त्यानुसार ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत आली व त्यांना इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/११०४/२०१७, दि.०२/०६/२०१७ रोजी सदर कामाचा कार्यादेश देणेत आला. सदर कामाचा थोडक्यात तपिशल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नाव - श्री साईबाबा समाधी मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण करणे (पहिला टप्पा).

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव: | आर. के. सावंत, नाशिक. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक: | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/११०४/२०१७, दि.०२/०६/२०१७. |
| मंजूर निविदा रक्कम: | रु.७४,८२,०००/-. |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत: | चार महिने. (दि.०२/०६/२०१७ ते दि.०२/१०/२०१७). |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक: | दि.२७/०९/२०१७. |
| मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय व दिनांक: | १)निर्णय क्र.३६१, दि.२३-२४/०५/२०१७.<br>२) निर्णय क्र.३५८, दि.०१/०६/२०१८ (अंतिम बिल अदा करणे). |
| ३रे व अंतीम बिलानुसार झालेल्या कामाची किंमत: | रु.६६,८०,३२६/-. |

ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांनी दि.२७/०९/२०१७ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले आहे व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ चे सभेतील निर्णयान्वये ठेकेदार यांचे अंतिम देयक देखील इकडील विभागाचे दि.३१/१०/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीनूसार अदा करणेत आले आहे.

ठेकेदार यांना दि.०२/०६/२०१७ रोजी सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश हा सर्व करांसह होता. ज्यावेळी याकामाची निविदाप्रक्रिया पार पडली त्यावेळी VAT कर अंमलात होता. तदनंतर दि.०१/०७/२०१७ पासुन GST कर लागू झालेला आहे. निविदेतील पृष्ठ क्र.४२, अट क्र.१२.३, Change in Law या शर्तीनुसार VAT व GST मधील फरकाची रक्कम रु.८,६८,४४२/- मात्र मिळणेबाबत ठेकेदार यांनी दि.०३/०१/२०१९, दि.१७/०१/२०१९, दि.२६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.

निविदेतील पृष्ठ क्र.४२ वर अट क्र.१२.३, खालीलप्रमाणे नमूद आहे.

Change in Law- All rates / prices quoted is inclusive of all applicable taxes / duties and levies applicable on the date of issue of LOI. Contractor is supposed to provide full breakup of such taxes and duties and levies as applicable on issue of LOI. Any statutory variation on account of change in applicable taxes / duties levies within the contract period shall be reimbursed by client or refunded by contractor, as the case may be, as approved by client and such changes and effective dates shall be agreed and approved prior in writing.

सदर VAT व GST मधील फरकाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ चे सभेतील अंतिम बिलाचे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे लेखाशाखा विभागामार्फत संस्थानचे कर सल्लागार एस. जी. अंदानी ॲण्ड कंपनी, सी.ए., अहमदनगर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आला होता. संस्थानचे कर सल्लागार यांनी दि.०२/०४/२०१९ रोजीचे पत्रान्वये, सर्व बाबी तपासून VAT व GST मधील फरकापोटी रु.५,७४,२९२/- मात्र इतकी रक्कम ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना देय होत आहे असलेबाबत कळविले आहे. सदरहू देय होणारी रक्कम ही मंजूर निविदा रकमेच्या मर्यादेत आहे. VAT व GST मधील फरकाबाबत संस्थानचे कर सल्लागार एस. जी. अंदानी ॲण्ड कंपनी, सी. ए., अहमदनगर यांचेकडून प्राप्त झालेला अभिप्राय दि.११/०४/२०१९ रोजी मा. मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचे अभिप्रायाकरीता पाठविण्यात आला. मा. मुख्यलेखाधिकारी यांनी त्यांचेकडील दि.१३/०४/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

"…सनदी लेखापाल यांचेकडून दि.०१/०७/२०१७ म्हणजे वस्तु व सेवा कर अमलात येण्यापूर्वी संबंधीत फ्लोअरींगचे कामासाठी लागणारे साहित्याचे बाबनिहाय कर, त्यांचे दर याबाबत माहिती घेण्यात आलेली आहे. त्यासाठीचे दर योग्य असल्याबाबत अभिप्राय देण्यात येत आहेत.

मात्र दि.०१/०७/२०१७ पुर्वीचे कर दायित्व व वस्तु व सेवा कर लागु झाल्यानंतरचे कर दायित्व हे संबधित कामाचे सविस्तर अदाजपत्रकात अतंर्भुत बाबींव अवलंबुन आहे. उपरोकत संदर्भ क्र.०२ वित्त विभागाचे परिपत्रकानुसार बांधकाम विभागाने परिगणना करणे अपेक्षित आहे व सनदी लेखापालांनी धरलेली मजुरी व साहित्य यांचे प्रमाण मार्बल, वाळु, सिमेंट, Consumables, Site expenses तसेच अदांजपत्रकांतील इतर बाबी यांची रक्कम व परिमाण इत्यादि वस्तुस्थिती दर्शक आहे काय? या बाबी अंदाजपत्रकाशी संबधीत असल्याने त्या तपासून अभिप्राय देऊन त्याप्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करावा."

मुख्य लेखाधिकारी यांनी वर नमूद केलेप्रमाणे संबंधीत फ्लोअरींगचे कामासाठी लागणारे साहित्याचे बाबनिहाय कर, त्यासाठीचे दर योग्य असलेबाबत अभिप्राय दिला आहे. मुख्य लेखाधिकारी यांनी वरीलप्रमाणे कळविलेनुसार ठेकेदार यांनी निविदेत दिलेले दर, त्यातील साहित्य व मजुरी यांचे प्रमाण तपासणेत आले असता ते अनुक्रमे ५८.६८ % व ४१.३२ % इतके आढळून येते. संस्थानचे कर सल्लागार यांनी त्यांचे उपरोक्त पत्रात हे प्रमाण ६०% व ४०% इतके नमूद केले आहे. त्यामुळे संस्थानचे कर सल्लागार एस. जी. अंदानी अॅन्ड कंपनी, अहमदनगर यांनी दि.०२/०४/२०१९ रोजीचे पत्रानव्ये कळविलेनुसार VAT व GST चे फरकापोटी रु.५,७४,२९२/- मात्र इतकी रक्कम ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना देय होत आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण करणे (पहिला टप्पा) कामातील VAT व GST चे फरकापोटी देय होणारी रक्कम रू.५,७४,२९२/- मात्र ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना अदा करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिरातील फ्लोअरींग नुतनीकरण करणे (पहिला टप्पा) कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे VAT व GST मधील फरकापोटी देय होणारी रक्कम रु.५,७४,२९२/-मात्र मंजूर करण्यात येऊन सदरची रक्कम ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थानमार्फत सन २०१९-२० या वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी अंदाजे रक्कम रु.५४,२३,५१७/- इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे."

प्रस्तावनाः- संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच दिपावली, नाताळ, उन्हाळा, पावसाळयाचे कालावधीत, तसेच संस्थान मार्फत वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग, स्टेज, कनात, कमानी इ. अनुषंगीक व्यवस्था करणेत येते.

संस्थानमार्फत सन २०१८-१९ या कालावधीत साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ठेकेदार मेहत्रे डेकोरेटर्स,औरंगाबाद यांना इकडील जा.नं.३४७३/२०१८ दि.१३/१०/२०१८ रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आले होते. ठेकेदार यांचा मंडप व्यवस्थेचा कालावधी दि.३०/०९/२०१९ पर्यंत आहे. करीता सन २०१९-२०२० या वर्षभरात संस्थानमार्फत साजरे करणेत येणारे उत्सव, दिपावली, नाताळ तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदर व्यवस्थाकरणेकामी येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१९ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-

०१) एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडपअसलेलेमंडप.

| अ.नं | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | ९११७ चौ. फुट | ०७/१०/२०१९ ते १०/१०/२०१९ अखेर ०४ दिवस | २.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८०,२२९.६० |
| २. | पाईप / बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | ८५१०० चौ. फुट | | २.४२ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८,२३,७६८.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | सभाकुंड येथे कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्थाः- | ३८४ चौ. फुट | | २२.०० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३३,७९२.०० |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणेः | ३००० रनिंग फुट | | ५.५०प्र.र. फुट प्र. दिवस | ६६०००.०० |
| ५. | पुण्यतिथी उत्सवनिमित्त स्वागत कमान उभारणे. | ०२ नग | | २०००प्र. कमान प्र.दिवस | १६०००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **१०,१९,७९०.००** |

०२) दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर २०१९ मधील नाताळ सुट्टी व नववर्षा निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-

अ) दिपावली मंडप

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे | १३,०५५.०० चौ. फुट | दि.२७/१०/२०१९ ते दि.१०/११/२०१९ अखेर १५ दिवस. | ०.५५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,०७,७०३.७५ |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ)** | **१,०७,७०३.७५** |

ब) नाताळ मंडप

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस. पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले ) | १४३४३.०० चौ. फुट | दि.२५/१२/२०१९ ते दि.०२/०१/२०२० अखेर ०९ दिवस. | ०.८५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,०९,७२३.९५ |
| २. | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षण कठडे बांधणे कामी बांबुची ४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे. | ६५१ र. फुट | | ३.३० प्र.र. फुट प्र. दिवस | १९३३४.७० |
| ३. | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे. (१ दिवस) साईज -२० 'x१५ ' | ०१ नग | ०१ दिवस | ३०००/- प्र. नग | ३०००.०० |
| ४. | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे ( १ दिवस)साईज - ३० 'x२० ' | ६००.०० चौ. फुट | ०१ दिवस | ३७.४० प्र.चौ. फुट प्र. दिवस | २२४४०.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (ब) | १,५४,४९८.६५ |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ+ब) | २,६२,२०२.४० |

०३) श्री रामनवमी उत्सव २०२० निमित्त करावयाची व्यवस्थाः-

(अ) मंदिर परिसर, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी करावयाचे मंडप, स्टेज, बॅरेकेडींग इ. व्यवस्था करणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | मंगल कार्यालय,लेंडीबागतसेच पालखी स्वागतासाठी मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे, | ३३९०.०० चौ. फुट | दि.०१/०४/२०२० ते दि.०३/०४/२०२० अखेर ०३ दिवस | १.८३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १८,६११.१० |
| २. | साईनगर मैदानावर कलाकारांचे | ६००.०० | | २२.००प्र.चौ. | ३९,६००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कार्यक्रमासाठी ३०x२० साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | चौ. फुट | | फुट प्र. दिवस | |
| ३. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व्यवस्था. | ११००.०० र. फुट | | ७.७० प्र.र. फुट प्र. दिवस | २५,४१०.०० |
| ४. | स्वागत कमान | ०३ नग | | १५०० प्र. कमान प्र.दिवस | १३,५००.०० |
| ५. | कुस्ती ग्राऊंडवर १ दिवसाकरीता मंडप उभारणे. | ४७२५.०० चौ. फुट | ०१ दिवस | ५.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | २५,९८७.५० |
| ६. | कुस्ती ग्राऊंडवर प्रेक्षकांचे बैठक व्यवस्थेसाठी गॅलरी | ३०० र.फूट | ०१ दिवस | ५०० प्र.र.फू प्र.दिवस | १,५०,०००.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ) | **२,७३,१०८.६०** |

(ब) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.

१) मुंबई ते सिन्नर मार्गावर

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी पोलीसस्टेशन, घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ३१५९०.०० चौ. फुट | दि.२६/०३/२०२० ते दि.३०/०३/२०२० अखेर ०५ दिवस | १.३९ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,१९,५५०.५० |
| २. | सिन्नर ते वावी मार्गावरसिन्नर एमआयडीसी, खोपडी दत्त मंदिराजवळ, पांगरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे जागेत व वावी येथे मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ७६,६४८.०० चौ. फुट | दि.२७/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० अखेर ०५ दिवस | ०.८६ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३,२९,५८६.४० |
| ३. | वावी ते शिर्डी मार्गावर पाथरे वनराई हॉटेलजवळ , श्री चक्रधर स्वामी महानूभाव मंदिर, दुशिंगवाडी जिल्हा परिषद शाळेमध्ये, मलढोन फाटा श्री. पवार यांचे जागेमध्ये, झगडे फाटा, येथे मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | २५,३२३.५० चौ. फुट | दि.२८/०३/२०२० ते दि.०१/०४/२०२० अखेर ०५ दिवस. | ०.८६ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,०८,८९१.०५ |
| | | | | एकूण – (ब) | ६,५८,०२७.९५ |
| | | | | एकूण रक्कम रु. (अ+ब) | **९,३१,१३६.५५** |

०४) सन २०२० मधिल उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः- (ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे. | ५५,९३५.०० चौ. फुट | दि.०१/०३/२०२० ते दि.१५/०६/२०२०अखेरएकूण१०७दिवस | ०.१६ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ९,५७,६०७.२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब) | समाधि मंदिर उत्तपर बाजू चावडीगेट ते नगरद्वार गेटपर्यंत एम.एस.पाईप व कैच्यांरचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप उभारणे. (१८’ उंचीचा) | ६५६७.०० चौ. फुट | | ०.१६५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,१५,९४०.३८ |
| | | | | एकूण रक्कम रु. - | १०,७३,५४७.५८ |

०५) श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२०निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | १०६०८.०० चौ. फुट | दि.०४/०७/२०२०ते दि.०६/०७/२०२० अखेर ३ दिवस | २.५७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८१,७८७.६८ |
| २. | पाईप/ बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | ६७८३.०० चौ. फुट | | २.५७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ५२,२९६.९३ |
| ३. | पालखी पदयात्री साईभक्तांचे निवासस्थानी ताडतत्रीछत, कनात व बिछाईत इ. व्यवस्थेसह शिंगवे नाईक, गुहा ता. राहुरी, निर्मळ पिंप्री ता. राहाता येथे मंडप उभारणी करणे. | ७२००.०० चौ. फुट | | ३.३० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ७१,२८०.०० |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणेः | ६३५ रनिंग फुट | | ८.८० प्र.र. फुट प्र. दिवस | १६७६४.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. | २,२२,१२८.६१ |

०६) सन २०२० मधिल पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-

| अ.नं | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडपउभारणे.<br>(बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले) | ३१४५३ चौ. फुट | ०१/०७/२०२० ते ३०/०९/२०२० अखेर एकूण ९२दिवस | ०.१९ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ५,४९,७९८.४४ |
| ब) | समाधी मंदिर उत्तर बाजूस गेटनं.३ ते गेटनं.४ पर्यत ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर) | ६३९०.०० चौ. फुट | | ०.१९ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,११,६९७.२० |
| | | | | एकूण रक्कम रु. - | ६,६१,४९५.६४ |

०७) सन २०१९-२०२० मधिल उत्सव व सुटयांचे कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थाः-

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर प्र.चौ.फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| एम.एस.पाईप कैच्या / बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित कापड असलेले मंडप उभारणे. (बिछायत व कनातीसह) | | | | | |
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे 45’ x 325’,साई धर्मशाळा येथे 90’ x 60’ – 2 No.,90’ x 35’ – 1 No. जुने प्रसादालय येथील मैदानावर | ५५५७५ चौ. फुट | ०३ दिवसांकरीता | ७.१५ | ३,९७,३६१.२५ |
| | | | ०५ दिवसांकरीता | ७.१५ | ३,९७,३६१.२५ |
| | | | ०९ दिवसांकरीता | ८.२५ | ४,५८,४९३.७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 150’ x 60’ x 3 Nos. | | | | |
| | | | | एकूण रक्कम रु. - | १२,५३,२१६.२५ |
| | | | | एकूण पुर्णांकीत रक्कम रु. (१ ते ७) | ५४,२३,५१७.०० |

०८) सन २०१९-२० मध्ये उत्सव व सुट्टयांचे कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे ऐनवेळी होणा-या गर्दीत साईभक्तांचे सोईसाठी तसेच इतर विभागाचे मागणीनुसार धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच उदघाटने इ.करीता कापडी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी दर मागविणे.

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | कालावधी | दर प्र.चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१. | एम.एस.पाईप, कैच्या / बांबु बल्यांचे स्ट्रक्चर असलेले सुशोभित कापडी मंडप उभारणे. | ०१ दिवसाकरीता | - |
| | | ०३ दिवसाकरीता | - |
| | | ०७ दिवसाकरीता | - |
| | | १० दिवसाकरीता | - |
| | | १५ दिवसाकरीता | - |
| ०२. | बिछायत (पी.व्ही.सी मॅटीन) | ०१ दिवसाकरीता | - |
| | | ०३ दिवसाकरीता | - |
| | | ०७ दिवसाकरीता | - |
| | | १० दिवसाकरीता | - |
| | | १५ दिवसाकरीता | - |
| ०३. | कनात | ०१ दिवसाकरीता | - |
| | | ०३ दिवसाकरीता | - |
| | | ०७ दिवसाकरीता | - |
| | | १० दिवसाकरीता | - |
| | | १५ दिवसाकरीता | - |

उपरोक्त प्रमाणे संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता उन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी संस्थान परिसरात तसेच पायी पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता तात्पुरते पालखी मार्गावर मंडप व्यवस्थेकरीता रक्कम रु. ५४,२३,५१७/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू अंदाजपत्रकात उत्सवातील तात्पूरत्या निवास व्यवस्थेच्या खर्चाचा समावेश असून सदरहू मंडप व्यवस्था आवश्यकतेनुसार करता येईल.

तसेच वर्षभरात साईभक्तांचे व इतर विभागाचे मागणीनुसार धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच उदघाटने इ. करीता आवश्यकतेनुसार ऐनवेळी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास याकामी दर मागविणेत येत आहे.

प्रस्ताव- संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर व्यवस्था तसेच उत्सव व सुटयांचे कालावधीत तात्पुरते निवास व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.५४,२३,५१७/- मात्रचे खर्चास व सदर व्यवस्थेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई –निविदा मागविणेस मान्यतेकरीता सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत सन २०१९-२० या वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी अंदाजे रक्कम रु.५४,२३,५१७/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच पावसाळयाचे कालावधीत मंडपावर पाणी साचणार नाही याची काळजी घेणेबाबत संबधीत ठेकेदारास सुचित करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणे कामाचे अंतिम देयक मंजुर होऊन सदर अंतिम देयकापैकी निव्वळ देय रक्कम रु.६,४३,८९०/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव-** दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेचे काम ठेकेदार भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर , ता.मानयांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दुसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी सल्लागार बर्वे कन्सल्टंट, मुंबई यांनी केलेली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणे

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर, ता.मान |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/२७८/२०१८ दि.१४/०४/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु.१६,२३,५१०/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र २२५(०३) दि.०४/०४/२०१८ |
| दुसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | **रु.०९,३८,९५१/-** |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.०२,९५,०६१/- |
| **निव्वळ देय्य रक्कम (अ-ब)** | **रु.०६,४३,८९०/-** |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.०६,८४,५५९/- कमी ( ४२.१६% कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.२१/०४/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२०/०८/२०१८ |

दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेचे काम ठेकेदार भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर , ता.मानयांनी दि.२०/०८/२०१८ अखेर विहीत मुदतीत पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.१२/०४/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे दुसरे व अंतिम बिल सादर केले आहे. या कामाचे सल्लागार बर्वे कन्सल्टंट, मुंबई यांनी बिलाची सविस्तर तपासणी केली असून दि.१४/०५/२०१९ रोजीचे पेमेंट सर्टीफिकेट सादर केले आहे.

प्रत्यक्षात काम करतेवेळी विषेशत: Structural repairs by Polymer Mortar, Polymer Grouting, Horizontal net for safety, Providing & fixing G. I. Pipes व Painting या बाबींचे परीमाणात बचत झाली आहे. त्यामुळे निविदा रकमेपेक्षा रु.०६,८४,५५९/- (४२.१६% कमी)मात्रने कामाची रक्कम कमी झालेली आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done रु.०९,३८,९५१/-मात्र होत असून यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी निव्वळ रक्कम रु.०६,**४३**,**८९०**/- मात्र इतकी रक्कम देय आहे. ठेकेदार यांनी विहीत मानकांनुसार काम पुर्ण केलेले असून सल्लागार बर्वे कन्सल्टंट, मुंबई यांनी वेळोवेळी कामाची पहाणी व तपासणी केली आहे. तसेच सल्लागार यांनी ठेकेदार यांचे अंतिम बिल प्रमाणित केले आहे. तरी त्यानुसार अंतिम देयकानुसार झालेल्या कामाची एकून रक्कम रु.९,३८,९५१/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.०६,४३,८९०/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

प्रस्ताव :-दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणेकामाचे ठेकेदार भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर, ता.मान यांचे दुसरे व अंतिम देयकानुसार झालेल्या कामाची एकुण रक्कम रु.०९,३८,९५१/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता निव्वळ देय रक्कम रु.०६,४३,८९०/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs) करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.९,३८,९५१/- मात्र मंजूर करण्यात आली. तसेच झालेल्या कामाची समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन त्यानंतर उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.६,४३,८९०/- मात्र सदर कामाचे ठेकेदार भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर, ता.मान यांना आदा करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्राव्यतीरिक्त संस्थानचे क्षेत्रात नगरपंचायत करीत असलेल्या प्रस्तावीत बांधकामाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

तसेच २१(२)(दोन) मध्ये स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठीची तरतूद आहे.

प्रस्तावना - शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.३ मधील जलकुंभाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१०७ पै. उत्तर-पूर्व कोप-यात व झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता सर्वे नं.१२६ पै. मधील नांदुर्खी रस्त्यालगत (प्रस्तावित विकास योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीचे क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६/४ पै. ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

उपरोक्त सर्वे नं.१२६/४ चे क्षेत्रात नगरपंचायतीने बांधकामासाठी आखणी केलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेवरुन बांधकाम विभागाकडील मुकादम श्री.गिरीश चोळके व मालमत्ता विभागाकडील कं.मोजणीदार श्री.बाळासाहेब जाधव यांना तात्काळ संस्थानचे उक्त क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण करुन येणेबाबत सुचित करणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी उक्त क्षेत्राची समक्ष पाहणी करुन इकडेस अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पैकी नांदुर्खी रस्त्यालगत क्षेत्र १२ आर इतके शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्याझोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्याचवेळेस सदर क्षेत्राचा ताबा घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर क्षेत्रात कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे व कंपांऊंड करणेचे प्रस्तावित केलेले असलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी संस्थानचे निदर्शनास आले असता सदर जागेत समक्ष जावून संस्थान कर्मचारी यांनी पाहणी केली असता सदर जलकुंभाचे परिसरात कर्मचारी निवासस्थानचे चुना फक्कीने लाईनआऊट केलेली असून कॉलमचे खड्डे घेतलेले दिसून आलेले आहे. सदरचे लाईन आऊटचे निरीक्षण केले असता नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे क्षेत्रात उक्त बांधकाम प्रस्तावित असलेचे दिसून आलेले आहे.

यास्तव संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचाच वापर करावा. त्या व्यतिरिक्त संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये अथवा त्यात बांधकाम करु नये,असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये कळविणेत आले.

तद्रुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-८/२/४९१/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ च्या पत्रास अनुसरुन "शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्वे क्रं.१२६/४ पै. मधील १२.७९ आर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.२४ निर्णय क्रं.३०५ नुसार व शासन निर्णय क्रं.सासंवि-२००६/५८०/(७९)/का.सोळा दि.२० डिसेंबर २००६ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस मिळालेली आहे. सदर जागेची महसुल दप्तरी ७/१२ उता-यावर नगरपंचायतची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. सदर जागेची उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन नकाशा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे. सदरची जागा ही सुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग, नासिक यांचे

शिफारशीनुसार सहायक संचालक, नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बां.प/मौ.शिर्डी, ता.राहाता/स.नं.१२६/४ (१२६/१ जुना) ससंअ/२७७५/१८ दि.२०/०८/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार नगरपंचायत मालकीच्या सदर जागेतच बांधकाम चालू आहे. शिर्डी नगरपंचायतने नगरपंचायत मालकीचे जागेतच प्रस्तावित बांधकामाचे लाईन आऊट करुन बांधकाम सुरु केलेले असल्याने श्री साईबाबा संस्थानला पूर्वसुचना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही,''असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत पत्राचे अवलोकन केले असता नगरपंचायतीने शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे. शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक, नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने त्यांना संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. यास्तव सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची मालकीची जागा पूर्ववत करुन देणेत यावी. संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये, असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये पुन:श्च कळविणेत आले.

तत्राप मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर पत्रास कोणताही प्रतिसाद दिला नसलेने प्रस्तुत प्रकरणा संदर्भात दि.०२/०४/२०१९ रोजी तहसिलदार, राहाता, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, उपअधिक्षक, भुमी अभिलेख, राहाता यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांनी "संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै. चे शिर्डी-नांदुर्खी या १८ मी. रस्त्यालगत ०.१२ गुंठे जागा नगरपंचायतीचे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाकरीता सन २००६ मध्ये शासनाच्या मान्यतेने दिलेली आहे. त्याप्रमाणे नगरपंचायतचे नावाने नोंद झालेली आहे व सदर क्षेत्रात सन २०१३ मध्ये जलकुंभाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. संस्थानकडून नगरपंचायतला जलकुंभासाठी मिळालेल्या ०.१२ गुंठे जागेची मोजणी होवून निश्चिती करणेत आलेली नव्हती. त्यामुळे नगरपंचायतीने भुमी अभिलेख विभागाकडून नगरपंचायतीस मिळालेल्या जागेची मोजणी करुन घेतली असता सदर १८ मी. रस्त्यालगतच्या जागेपासून मोजमापानुसार संस्थानच्या जागेत अंदाजे ५ ते ५.५ गुंठयात संस्थानच्या जागेत टाकी सरकलेली आहे. रस्त्याकडील जागेत शिर्डी सुधारीत प्रारुप विकास आराखडयात नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नगररचना विभागाकडून नगरपंचायतीने बांधकामास परवानगी घेतली आहे. त्यासाठी सुमारे २.५ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे टाकीचे दक्षिण बाजूकडील रस्त्यालगतच्या जागेत नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम चालू करणेत आलेले

आहे. सदरचे बांधकाम आता बंद करता येणार नाही. जलकुंभाचे बांधकाम संस्थानच्या जागेत सरकलेले आहे. सदरच्या अग्निशमन केंद्राचा उपयोग सार्वजनिक हितासाठीच होणार आहे. त्यासाठी सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस संस्थानकडून मिळणेकामीचा प्रस्ताव नगरपंचायतीमार्फत अलाहिदा सादर करणेत येईल व सदर जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेन. तरी सदरचे

अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे चालू असलेले बांधकाम बंद करु नये,"असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी विनंती केली.

प्रस्तुत बैठकीत झालेल्या चर्चेत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभासाठी देणेकामी सन २००६ साली शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र त्यावेळेस सदर क्षेत्राचीमोजणी तसेच ताबा देणे-घेणेची कार्यवाही झालेली नसलेचे दिसून आले. तसेच शासन निर्णयामध्ये सदरचे ०.१२ आर क्षेत्र हे प्रस्तावित १८ मी. रुंदीच्या रस्त्यालगत पासून देण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचा रस्तात्यावेळी अस्तित्वात नसल्याकारणाने त्यावेळेस सदर ०.१२ आर क्षेत्राचे हद्दी निशाण्या निश्चित झालेल्या नसलेचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर ०.१२ आर क्षेत्राची मोजणी करणेकामीची हद्द सध्यस्थितीत असलेल्या शिर्डी-नांदुर्खी रोडलगत पासून गृहीत धरुन त्या ठिकाणापासून मोजणी केली असल्याकारणाने नगरपंचायतीमार्फत बांधणेत आलेले जलकुंभ संस्थानच्या जागेत सरकलेले असलेचे दिसून येत आहे. नगरपंचायतने दि.०७/०४/२०१८ रोजीची मोजणी बेस धरुन संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रात अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे प्रस्तावित बांधकाम न करणेबाबत संस्थान प्रशासनाने नगरपंचायतीमार्फत सदर क्षेत्रात बांधकामासंबंधीची आखणी केली त्याचवेळेस लेखी कळविलेले आहे व तदनंतर देखील नगरपंचायतने सुरु केलेले बांधकाम संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राची निश्चिती होईपर्यंत बांधकाम करु नये,असेबाबत देखील नगरपंचायतीस संस्थानने लेखी कळविलेले आहे. तरीदेखील नगरपंचायतीने सदरचे बांधकाम सुरुच ठेवलेले आहे,असे निदर्शनास आलेले आहे.

नगरपंचायतमार्फत सुरु असलेले अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम हे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून होत असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितले असून त्यासाठीचे टेंडर काढून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देखील पारित केला आहे व त्या ठिकाणी बांधकाम सुरु देखील करणेत आलेले आहे. अशा परिस्थितीत बांधकाम बंद करणे सार्वजनिक हिताचे दृष्टिने हितावह ठरणार नाही. सदर क्षेत्राची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला देणेस तयार आहे आणि जागा मागणीचा प्रस्ताव नगरपंचायत संस्थानकडे सादर करणार असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितलेने "नगरपंचायत, शिर्डी यांनी तसा जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी," असे बैठकीत ठरले.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त बैठकीत ठरलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त नगरपंचायतने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या बैठकीत निर्णयास मंजूरी मिळणेकामी सादर.

निर्णय क्र.३१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच नगर-मनमाड रस्ता ते १६ गुंठे पर्यंतचा जुना पिंपळवाडी रोड No Vehicles Zone व No Hawkers Zone म्हणून घोषित करणेसाठीचा प्रस्ताव मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०७** **मौजे रुई, ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी घेणेसंबधात मॅनेजिंग ट्रस्टी, राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडील पत्र जा.नं.आरकेडीसीटी/२३२/२०१९ दि.१ मार्च,२०१९ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- यापूर्वी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी मौजे रुई शिवारामध्ये सुमारे ५४ एकर ११ गुंठे जमीन संस्थानला काही अटी व शर्तींवर दान म्हणून देण्याचे प्रस्तावित केलेले होते. त्यात त्यांचे नावावर प्रत्यक्षात असलेल्या खालील नमूद केलेल्या जमीनी बक्षिसपत्राने देवू केलेल्या होत्या.

परिशिष्ट अ-

| अ.नं. | गट नंबर | दर्यानानी ट्रस्टचे नावावर असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |
| २ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | एकूण | १० हे १० आर ०० चौमी |

तसेच खालील परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई,ता.राहाता येथील जमीनी त्यांचे प्रत्यक्षात नावावर नसलेल्या परंतु त्या जमीनी संबंधात राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांना असलेले कायदेशीर अधिकार संस्थानला देण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे.

परिशिष्ट ब-

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे.आर.चौमी | कब्जेदार सदरी असलेली नावे |
|---|---|---|---|
| १ | २९४ | ०५.९०.०० | राजेंद्र चांदमल भनसाळी/सुभाष चांदमल भनसाळी |
| २ | २७३ | ०१.९२.०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ३ | २७४ | ००.७४.०० | एकनाथ सहादू पठारे/शिवनाथ सहादू पठारे/रेल्वेकडे |
| ४ | २८८ अ | ०३.०६.०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ५ | २८८ ब | ००.५४.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ६ | २८८ क | ००.९७.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | एकूण | १३.१३.०० | |

उपरोक्त परिशिष्ट अ मधील जमीन गट नं.२९३ क्षेत्र ७ हे.३२ आर इतके दर्यानानी ट्रस्टने संस्थानला दि.०१/१२/२००९ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये दिलेले आहे. परिशिष्ट अ मधील उर्वरित जमीनीचे संबंधात न्यायालयात वाद सुरु असल्याने सदर जमीनींचे बक्षिसपत्र होवू शकलेले नाही.

उपरोक्त परिशिष्ट ब मधील जमीनींचे मूळ मालकाशी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी सन १९८७-८८ मध्ये जमीन खरेदीचा करार केलेला होता.

तद्नंतर मुळ मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांचेबरोबर उक्त जमीनीचा व्यवहार ठरवून त्यांना विसार पावती करुन दिली.

सदर व्यवहारासंबंधात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दै.सार्वमत व दै.लोकमत मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली. त्यास अनुसरुन राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी हरकत घेतली. त्यामुळे श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी श्री.भंडारी/भनसाळी व दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेविरुध्द मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.४९/२००८ चा दावा दाखल केला. सदर दाव्यात

दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचे दि.०६/०३/२०१२ रोजी तडजोड होवून दावा निकाली काढण्यात आला.

उपरोक्त दावा चालू असतांना अर्जदार यांनी संस्थानकडे सदर जमीनी खरेदी करणेकामी दि.१७/११/२०११ रोजी अर्ज केलेला होता. त्या अनुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क, वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी,असे ठरले". असे बाबतचा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त स्पे.मु.नं.४९/२००८ मधील दि.०६/०३/२०१२ रोजी झालेल्या तडजोडीप्रमाणे व त्यातील दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार मूळ जमीन मालक यांनी उपरोक्त जमीनी संस्थानला विकत घेण्यास सहकार्य केले नाही व करारनाम्यानुसार कार्यवाही करणेस अडथळे निर्माण केले आणि अॅड.रविराज लालाजी गोतीस यांनी त्यांचे जाहीर न केलेल्या पक्षकारासाठी दावा मिळकत मूळ जमीन मालक यांचेकडून खरेदी घेणेबाबतचे विधान केले व त्यांना त्यापोटी विसार दिल्याचे विधान केले म्हणून श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी,श्री.लखीचंद कचरदास भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी,श्री.सुभाष चंदनमल भनसाळी,श्रीमती राधाबाई कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,श्री.अभिजित जितेंद्र शहा आणि अॅड.रविराज लालाजी गोतीस यांचेविरुध्द दि.२६/०९/२०१२ रोजी स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दावा दाखल केलेला आहे. त्यात श्री साईबाबा संस्थानला प्रतिवादीपणात सामील केलेले आहे.

सदर दाव्याचे कामकाज अद्याप चालू असून त्यात उपरोक्त वादी व प्रतिवादी नं.१ ते ६ यांनी या दाव्यात तडजोड करण्याचे निश्चित करुन दाव्यातील जमीनी संस्थानला कायम खरेदी देण्यास संमती दिली आहे व तडजोडीचा मसुदा तयार करुन तो उपरोक्त वादी,प्रतिवादी यांना मान्य आहे. तडजोडीचे मसुद्याबरोबर संस्थानने प्रत्येकाला किती रक्कम द्यावयाची आहे याचा तक्ता तयार केलेला आहे व या पत्रानुसार वर्तन करण्याची तसेच स्पे.मु.नं.५९/२०१२ यात हुकूमनामा करुन घेण्याची उपरोक्त वादी, प्रतिवादी या सर्वांची जबाबदारी आहे. तरी सदरचा तडजोडीचा मसुदा तपासून त्यास मान्यता द्यावी व तडजोडीवर संस्थानच्या जबाबदार प्रतिनिधीमार्फत सही करावी,असेबाबतचा अर्ज श्री.संग्राम माधवराव देशमुख व इतर ६ यांनी दि.०४/०३/२०१६ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

उपरोक्त निर्णय क्रं.७५९ प्रमाणे कार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेसाठी शासनाकडे अहवाल सादर करणेच्या निर्णयार्थ प्रस्तुतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला.

सदर सभेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "शेती महामंडळाची जमीन खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. त्यामुळे खाजगी जमीनीच्या खरेदीपेक्षा सरकारी जमीन प्राधान्याने खरेदी कराव्यात," अशी माहीती दिली. त्यावर निर्णय क्रं.९९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शेती महामंडळाची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीने मान्य करुन शासन परवानगीसाठी पाठविणेत आलेला आहे. परंतु मौजे रुई,ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र हे येलो झोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या जमीनीलगत आहे व शेती महामंडळाकडून खरेदी करावयाच्या जमीनीपेक्षा

कमी भावाने मिळत आहे. तसेच संस्थानने प्रस्तावित जमीन खरेदी केल्यास राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांची या व्यतिरिक्त तेथे असलेली उर्वरित जमीन संस्थानला विनामुल्य दान देणेची शक्यता आहे. याकरीता सदरहू क्षेत्र शासनाचे मान्यतेने कायम खरेदी करुन घेणेत यावे. यासाठी दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७५९ ची अंमलबजावणीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६२१२/२०१८ दि.१९/०२/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला.

तदनुषंगाने महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/ प्र.क्र.५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ अन्वये काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. शासनाकडील सदर निर्णयाप्रमाणे मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात चालू असलेला स्पे.मु.नं.५९/२०१२ मध्ये संस्थानचे वतीने संस्थान काही अटी व शर्तीस अधीन राहून जमीन खरेदी करणेत तयार असलेबाबत पुरसीस सादर करणेत आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल असलेला स्पे.मु.नं.५९/२०१२ मध्ये राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई हे प्रतिवादी आहेत. उपरोक्त परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई, ता.राहाता येथील जमीनी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचे प्रत्यक्षात नावावर नसलेल्या परंतु त्या जमीनीसंबंधात राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांना असलेले कायदेशीर हक्क संस्थानला देण्यात आलेले आहेत. दर्यानानी ट्रस्ट यांचे नावावर असलेले उपरोक्त परिशिष्ट **अ** मधील जमीन गट नं.२९३ क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर इतके दर्यानानी ट्रस्टने, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.८४२ प्रमाणे खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर दि.०१/१२/२००९ रोजी संस्थानला नोंदणीकृत बक्षिसपत्राने दिलेले आहे.

१) दर्यानानी ट्रस्टने प्रस्तावातील परिच्छेद-१ मधील देऊ केलेली जमीन बक्षिसपत्राने दान म्हणून स्विकारणेत यावी.

२) सदर क्षेत्रापैकी १५ एकर क्षेत्रामध्ये साईभक्तांसाठी निवासस्थाने,कर्मचा-यांसाठी निवासस्थाने बांधणे इ.कामे करणेत यावीत व उर्वरित अंदाजे १० एकर जमीनीमध्ये अध्यात्मिक संस्था उभारण्यात यावी. त्यामध्ये सामाजिक विकास संस्थेचा समावेश करावा.

३) दर्यानानी ट्रस्टने दान देऊ केलेल्या जमीनींच्या पूर्वाश्रमीच्या मालकांच्या कुटूंबातील दोन व्यक्तींना नोकरी देता येणार नाही.

४) सामाजिक विकास साधणा-या अभ्यास केंद्राबाबत कमीत कमी ५ सदस्य असलेली उपसमिती स्थापन करणेत यावी. सदर शैक्षणिक वर्ग सुरु होण्याचे वेळेस जर उपसमिती नेमण्याचे निश्चित झालेतर दर्यानानी ट्रस्टने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती सदस्य म्हणून घेण्याऐवजी निमंत्रित सल्लागार म्हणून घेण्यात यावेत.

५) संस्थानने स्वत:चे खर्चाने अध्यात्मिक अभ्यास केंद्राची उभारणी करावी. प्रस्तावित अभ्यास केंद्राच्या नावात सुरुवातीस श्री साईबाबा यांचे नाव असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या संस्थेचे नाव असावे.

६) अध्यात्मिक शैक्षणिक संकुलामध्ये सुरु होणा-या वर्गांसाठी जर शासनाने व्यवस्थापनाला कोटा मंजूर केला तर त्यावेळेस शासनाचे नियम व अटीप्रमाणे त्यावेळेस ठरेल त्या प्रमाणात उमेदवार घेण्यात यावे. त्यावेळी दर्यानानी ट्रस्टची शिफारस विचारात घेता येईल.

७) ज्येष्ठ वृध्द नागरीकांसाठी वृध्दाश्रम,अनाथ मुलांसाठी अनाथाश्रम व वारक-यांसाठी भक्तनिवासस्थान इ.बांधकाम संस्थान मालकीच्या इतर उपलब्ध जमीनीमध्ये सोयीने करण्यात यावे.

८) अध्यात्मिक संस्थेचे कामकाजास जमीन ताब्यात मिळाल्यापासून १ ते २ वर्षात सुरुवात करण्यात येईल.

उपरोक्त स्पे.मु.नं.५९/२०१२ मधील प्रस्तावित तडजोडीनुसार दर्यानानी ट्रस्ट यांना रक्कम रु.२५,५७,५००/- इतकी मिळणार आहे. सदरची रक्कम उक्त ट्रस्टने श्री साईबाबा संस्थानला दान म्हणून देवू केलेली आहे. तथापि उक्त दर्यानानी ट्रस्टने त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये You may be well aware of the fact that we have legal rights on the above mentioned land to the tune of 60 to 90% of the land. The above matter was settled by the above Consenters at the Kopargaon Court, District Ahmednagar on the 8th of March 2012. We have now learned to understand that you have procured the permission order from the Govt.of Maharashtra to complete the above transaction. According to the previos consent terms our Trust was supposed to receive an amount of Rs.Twenty five lakhs fifty seven thousand and five

hundred only (Rs.25,57,500/-). Previously also in the year 2009 we had donated to the Shirdi Sansthan 17 to 18 acres of land which is touching the above mentioned land. We do not want to take any money from the Shirdi Sansthan just as we had previously done with regard to the earlier gift to the Shirdi Sansthan. The only condition is and as previously agreed to, is that whichever building comes up on the above mentioned land will require to have the name of our Trust, Radha Kaliandas Daryanani Charitable Trust mentioned on a marble plaque. We would appreciate if preference be given to our guests while visiting Shirdi. We would request you to kindly confirm the above so that the process of the Court Consent could be completed, असे नमूद केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१५/११/२००८ मधील निर्णय क्रं.८४२ चे अवलोकन केले असता त्यात अट क्रं.५ मध्ये संस्थानने स्वत:चे खर्चाने अध्यात्मिक अभ्यास केंद्राची उभारणी करावी. प्रस्तावित अध्यात्मिक अभ्यास केंद्राच्या नावात सुरुवातीस श्री साईबाबा यांचे नाव असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या संस्थेचे नाव असावे,असे नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८४२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती, या राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी, जर श्री साईबाबा संस्थानला रुई शिवारामध्ये ५४ एकर जमीन दान केली तरच लागू राहतील असे उपरोक्त निर्णय क्रं.८४२ वरुन अभिप्रेत होत आहे. मात्र राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी संस्थानला फक्त १८ एकर जमीन (७ हेक्टर ३२ आर) दान केलेली आहे. म्हणजेच राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी उपरोक्त निर्णय क्रं.८४२ मधील अटी व शर्तींची सर्वांगीण पुर्तता केलेली असलेचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांची उपरोक्त दि.०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रात नमूद केलेली "उक्त क्षेत्रात बांधल्या जाणा-या इमारतीचे कोनशिलेवर राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई हे नाव लावणेत यावे" ही विनंती मान्य करता येणार नाही.

प्रस्ताव– संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८४२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींची राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी सर्वांगीण पुर्तता केलेली नसलेने,त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.आरकेडीसीटी/२३२/२०१९ दि.०१ मार्च २०१९ रोजीच्या पत्रात नमूद केलेली, "उक्त क्षेत्रात बांधल्या जाणा-या इमारतीचे कोनशिलेवर राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचे नाव लावणे" बाबतची विनंती मान्य अथवा अमान्य करणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८४२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींची राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई हे सर्वांगीण पुर्तता करण्यास तयार असल्यास त्यांनी दि.०१ मार्च,२०१९ रोजीचे पत्रान्वये केलेली सदर क्षेत्रावर बांधल्या जाणाऱ्या इमारतीचे कोनशिलेवर राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचे नाव लावण्याची विनंती मान्य करता येईल, असे त्यांना कळविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.०८ **संस्थान परिसरात BTI PAYMENTS PVT LTD, Bangalore यांना ए.टी.एम.साठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत BTI PAYMENTS PVT LTD, Bangalore यांचेकडील दि.०७.०५.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - BTI PAYMENTS PVT LTD,Bangalore यांनी त्यांचेकडील संदर्भीय पत्रान्वये, "Shirdi is a one of the biggest pilgrimage sites in India, thousands of devotees gather daily at the Sai Baba Temple complex to honor his legacy.In our survey we found that there is requirement of ATMs in Shirdi as there are non branches ATM available.We as a WLA service provider arrange cash locally and our ATM is always loaded with donominations (100-200-500) which will help customer in their day-to day expenses.

Introduction- India1 ATM organization's fundamental purpose is to serve as unifier of sorts, providing access to basic banking services across cultural,geographic and demographic divides. The India1 ATM name and barand mark effectively encapsulate this purpose.Primarily working for the rural customer, India1 ATM will strive to provide freedom from the compromises that Indians have to make when it comes to easy,secure,reliable and efficent accessibility to ATMs across the country.India1ATM aims to become one of the leading fiancial services companies in India. We are proud to announce that BTI payments Pvt. Limited has received a not from the Reserve Bank Of India to deploy white Label ATMs over the next few years.White Label ATMs(WLAs) are not required to have bank branding and can only be operated by companies that have been fully approved by the Reserve Bank of India. There are no additional charges for a cardholder to use a White Label ATM.

Our ATMs are reliable,easy to use and located in safe,high footfall locations.We are already seeking to indentify more and more good, safe locatoins to deploy our white Label ATM (retail chains, shopping centers, business factories etc) and would be happy to discuss the benefits to you of having an ATM on your premises.As debits cards and card based payments continue to grow in India, so will consumer demand for ATMs convenient locations such as supermarkets, retail stores, tourists palace and service staions.

An ATM on your premises will help pilgrimage to get proper and convenient cash which will help them to enjoy the four risk free and also help to flourish the local market.

India1 ATM offers the following benefits.

1. Aceepts all debit cards issued by the banks in india.
2. customers can enjoy services like cash withdrawal, balance inquiry, mini statement and Pin change
3. Multi ligual support with an easy to use the interactive interface
4. customer can make multiple transactions to withdraw more cash as per his/her limit
5. EMV machines to ensure the secure transactions.
6. convenient locations across multiple cities and towns in India.
7. Privacy screen filters, keypad shields, electronic surveilance for completely safe and secured transactions.
8. We arrange cash locally which help us to make 100% cash availability evenon holidays too .

Space Requirement

1. Min 60 sqft for bunker mode (Three side wall, RCC roof and shutter)
2. Min 50 sqft (7*7) for porta cabin Model (only open space required)
3. Min 40sqft (5*8) for shop-in shop (ATM Machine would be placed in Covered space)

All the interior development inside the approved premises would be done by company.

Additional benefits.

Screen Display containing the details of Arti schedule or any other information which Mandir Sanstha would like to share with devotees.

Suggested locations

1.Saibaba Temple premises

2. Sai Ashram 1

3.New Saiprasadalay

4.DwravatiBhaktNiwas

5.Sai chaya Building, Near SBI bank

6.Super Speciality hospital असेबाबत कळविलेले आहे.

उक्त पत्राचे अनुषंगाने मालमत्ता विभागाचे प्र.अधिक्षक श्री.व्ही.एम.बर्गे,कं.सल्लागार श्री.कृष्णा वालझाडे,कं.मोजणीदार श्री.बा.ना.जाधव यांनी संबंधीत विभागांचे प्र.अधिक्षक यांचेसमवेत साईआश्रम भाग-१, साईनाथ रुग्णालय व साईआश्रम भाग-२ या ठिकाणी BTI Payments Pvt Ltd, Bangalore यांना त्यांचे ए.टी.एम.साठी जागा वापरास देणेकामी संस्थान मालकीच्या उपलब्ध जागांची संयुक्तिकरित्या पाहाणी केलेली असून त्यात खालील नमूद केलेल्या जागा BTI Payments Pvt Ltd,Bangalore यांना त्यांचे ए.टी.एम.साठी उपलब्ध होवू शकतील,असे दिसून आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय - BTI Payments Pvt Ltd,Bangalore यांना त्यांचे ए.टी.एम.साठी

१) संस्थानचे साईआश्रम भाग-१ या परिसरात प्रशासकीय इमारतीचे उत्तरेकडील प्रसादालयाचे इन गेटच्या जिन्याजवळ इमारतीच्या आतील बाजूस बांधीव जागा सुमारे १०x ७ फुट इतकी,

२) साईनाथ रुग्णालय या ठिकाणी बांधीव जागा उपलब्ध नाही. तथापि साईनाथ रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचे समोरील दक्षिण बाजूकडे असलेल्या शेडमध्ये आवश्यकतेप्रमाणे मोकळी जागाआणि

३) संस्थानचे साईआश्रम भाग-२ या परिसरात आर ब्लॉकच्या दक्षिणेकडील पूर्वाभिमुख असलेल्या प्रति गाळा १५x१० फुट या आकाराच्या ३ गाळयांपैकी एक गाळा या जागा सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त भाडे असेल त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडेकराराने वापरास देता येईल व त्याप्रमाणे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव - BTI Payments Pvt Ltd,Bangalore यांना त्यांचे ए.टी.एम.साठी संस्थानचे साईआश्रम भाग-१ या परिसरात प्रशासकीय इमारतीचे उत्तरेकडील प्रसादालयाचे इन गेटच्या जिन्याजवळ इमारतीच्या आतील बाजूस बांधीव जागा सुमारे १०x ७ फुट ही जागा तसेच साईनाथ रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचे समोरील दक्षिण बाजूकडील असलेल्या शेडमध्ये आवश्यकतेप्रमाणे मोकळी जागा आणि संस्थानचे साईआश्रम भाग-२ या परिसरात आर ब्लॉकच्या दक्षिणेकडील पूर्वाभिमुख असलेल्या १५x१० फुट या आकाराच्या ३ गाळयांपैकी एक गाळा सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त भाडे असेल त्या भाडेदराने व विद्युत बील वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडेकराराने वापरास देणेकामीच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२०** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०९** **श्री साईंच्या पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची नाणी तयार करुन पुरवठा करणेकामी भारत सरकार,टंकसाळ, मुंबई यांनी दि.१५.०५.२०१९ रोजी सादर केलेल्या दरपत्रकाबाबत.**

**प्रस्ताव-** रक्कम रु.२५०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना श्री साईंच्या पादुकांच्या प्रतिमा असलेली २० ग्रॅम शुध्द चांदीची नाणी प्रसाद रुपाने सप्रेम भेट म्हणून देणेत येत आहे. त्याअनुषंगाने, यापुर्वी सन-२०१७-१८ मध्ये १०००० नग व सन-२०१८-१९ या वर्षात १०००० नग चांदीची नाणी भारत सरकार टंकसाळ,मुंबई यासंस्थेकडून खरेदी केलेली आहेत. सदरची नाणी संपत आल्याने व संस्थानकडे उपलब्ध असलेली चांदी वितळवून नाणी बनविणेकामी कालावधी लागणार असल्याने नव्याने ५००० नग चांदीची नाणी (दोन टप्प्यात २५०० नग नाणी ) तयार करुन घेणेबाबत दि.२१/०१/२०१९ चे पत्रात नमूद तपशिलाप्रमाणे भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडुन सर्वसमावेशक दर मागविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन,भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांनी दि. ०७/०२/२०१९ चे पत्राने प्रति नग रुपये १,५०३ /- + जी एस टी याप्रमाणे दरपत्रक सादर केलेले होते. सदरचे दरपत्रकासह मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजी झालेल्या सभेसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर संदर्भ क्र.०४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त निर्णय क्र.१०३ अन्वये, सध्या चांदीची नाणी तयार करण्याऐवजी सर्व चांदी भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून वितळून बार तयार करुन घेण्यात यावेत. व

श्री साई पादुका/श्री साई प्रतिमा असलेली नाणी बनविणेकामी नामांकित ज्वेलर्स यांना मा. स्थानिक उपसमितीचे सभेसमोर बोलावून चांदीच्या विटापासून श्री साई पादुका/श्री साई प्रतिमा असलेली नाणी संस्थानमध्ये तयार करुन घेण्याबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती द्यावी व त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर, महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी. असे ठरले. तथापि या सर्व प्रक्रियेस कालावधी लागणार असल्याने, सध्या श्री साईबाबांच्या चरणी रक्कम रु.२५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या साईभक्तांना प्रसाद रुपाने चांदीची प्रतिमा सप्रेम भेट देणेकामी साई पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची ५००० नग शुध्द चांदीची नाणी भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून, सन २०१८ मध्ये खरेदी केलेल्या दरामध्ये तयार करुन घेण्यास व त्यासाठी सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र सन २०१८ मध्ये संस्थानने खरेदी केलेल्या नाण्यांच्या दरामध्ये ही नाणी देणेबाबत भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांनी असमर्थता दर्शविल्यास, मा. व्यवस्थापन समितीपुढे तसा सुधारित दरानुसार प्रस्ताव सादर करावा. व दरम्यानच्या काळात २० ग्रॅम वजनाच्या नाण्यांचा साठा संपल्यास पात्र देणगीदार साईभक्तांची पत्ता व मोबाईल नंबर सह सविस्तर नोंद करुन ठेवण्यात यावी, असे ठरले.

यापुर्वी सन २०१८ मध्ये भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून दि.२१/०५/२०१८ चे कार्यादेशान्वये श्री साईंच्या पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम शुध्द चांदीची १०००० नग नाणी, प्रति नग रुपये १,४१३/- + जी एस टी या दराने खरेदी केलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ चे सभेतील उपरोक्त निर्णयास अनुसरुन भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांनासन २०१८ चे दरामध्ये नाणींचा पुरवठा करणेबाबत दि. ११/०४/२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते.

त्यास अनुसरुन, भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांनी प्रति नग रुपये १,४१३/- + जी एस टी या दराने ५००० नग चांदीची नाणींचा पुरवठा करणेबाबत दि.१५/०५/२०१९ रोजी दरपत्रक सादर केले होते. परंतु सदर दर किती कालावधीसाठी राहतील याबाबत स्पष्ट काहीही नमूद केलेले नाही.

तथापि, भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून उपरोक्तप्रमाणे ५००० नग चांदीची नाणींची खरेदी करणे ही बाब दि.०६ ०५/२०१९ चे परिपत्रकानुसार एकल स्त्रोत खरेदी पध्दतीमध्ये मोडत असल्याने शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. शासनाची मंजुरी मिळणेकामी ०३ ते ०४ महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. बाजारात सोने-चांदीचे भावात दररोज चढ-उतार होत असल्याने, शासनाची मंजुरी मिळालेनंतर, भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात येणारी चांदीची नाणी उपरोक्त दरामध्ये उपलब्ध होतीलच याबाबत निश्चित सांगता येणार नाही. करिता किमान ०६ महिने कालावधीसाठी सदर दर बंधनकारक राहतील. याबाबत दि.२७/०५/२०१९ रोजी भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांना पत्र देण्यात आले होते.

त्यास अनुसरुन, भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांनी दि.०४/०६/२०१९ रोजीचे पत्राने चांदी धातूच्या किंमतीच्या चढ-उतारामुळे चांदीचे मुल्य सहा महिने कालावधीसाठी रक्कम रुपये १,४१३/- मात्र + जीएसटी बंधनकारक ठेवणेबाबत आपले म्हणणे योग्य व्यवहार्य नाही. तसेच भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचे नियमात बसत नाही. आपले आदेशाचे वेळी रुपये १,४१३/- + जी एस टी च्या दराबाबत पुन्हा विचार करण्यात येईल. असे कळविले आहे. म्हणजेच सदरचे दर सहा महिने कालावधीसाठी बंधनकारक राहणार नाहीत. एकल स्त्रोत खरेदीकामी महाराष्ट्र शासनाची मान्यता आवश्यक असल्याने, भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून सदरची चांदी नाणी खरेदी करणेकामी तसेच येणा-या खर्चास महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**अ)** भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचेकडून सदरची चांदीची नाणी खरेदी करणे हे एकल स्त्रोत खरेदी पध्दतीमध्ये मोडत असल्याने महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविताना चांदीचे मुल्यामध्ये होणा-या चढउतार मुळे भारत सरकार टंकसाळ, मुंबई हे त्यांनी सादर केलेले प्रति नग रक्कम रुपये १,४१३/- + जी एस टी या दरामध्ये बांधिलकी घेण्यास तयार नसल्याने, त्यांनी सादर केलेल्या प्रति नग रक्कम रुपये १,४१३/-+जी एस टी या दरामध्ये किंवा त्यापेक्षा कमी दरामध्ये भारत सरकार टंकसाळ, मुंबई हे चांदीची नाणी देण्यास तयार असल्यास खरेदी करता येतील. अशा पध्दतीने शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविता येईल.

**ब)** रक्कम रु.२५०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना श्री साईंच्या पादुकांच्या प्रतिमा असलेली २० ग्रॅम शुध्द चांदीची नाणी संपली असल्या कारणाने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६/२/२०१९ निर्णय क्र.१०६ अन्वये सदर देणगीदार साईभक्तांची पत्ता व मोबाईल नंबरसह सविस्तर नोंद करुन ठेवण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६/२/२०१९ निर्णय क्र.१०३ अन्वये संस्थानकडे

उपलब्ध असलेली वितळविणे योग्य चांदी वितळवून त्यापासून तयार होणा-या शुध्द चांदी पासून श्री साईंच्या पादुकांच्या प्रतिमा असलेली २० ग्रॅम शुध्द चांदीची नाणी तयार झालेनंतर कार्यवाही करता येईल.

तरी, उपरोक्त "अ" किंवा "ब"प्रमाणे कार्यवाही करणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.३२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १०३ अन्वये ठरल्याप्रमाणे संस्थानकडील वितळविण्या योग्य असलेली सर्व चांदी भारत सरकार टंकसाळ, मुंबई ( India Governmnet Mint, Mumbai) यांचेकडून वितळून बार तयार करुन घेण्यात यावेत. व या चांदीच्या बार पासुन श्री साईंच्या पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची नाणी संस्थान परिसरात तयार करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

विषय नं.१० **माहे जानेवारी-२०१९ व फेब्रुवारी-२०१९ जमा-खर्च तक्तयाची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जानेवारी-२०१९ व फेब्रुवारी-२०१९ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी-२०१९ | ५६,६८,३२,५११/- | २२,४३,२५,२२७/- |
| ०२ | फेब्रुवारी-२०१९ | ४४,५२,६४,८०४/- | १८,११,२७,४९२/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जानेवारी-२०१९ व फेब्रुवारी-२०१९ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.३२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी-२०१९ व फेब्रुवारी-२०१९ जमा-खर्च तक्तयाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

विषय नं.११ **दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीतून प्राप्त होणाऱ्या सुट्टे नाणी ठेवणेकामी बँकाना संस्थानमार्फत मोफत जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता भक्तांना सहजा सहजी देणगी देता यावी म्हणून संस्थानमार्फत मंदिर व मंदिर परिसरात दक्षिणापेट्या बसविण्यात आलेल्या आहेत. दक्षिणापेटयांतील रकमेची मोजणी आठवडयातून साधारणत: दोन वेळेस (मंगळवार व शुक्रवार) होत असते. यामध्ये प्रत्येक मोजणीमध्ये साधारणत: १.५० ते २ कोटी पर्यंत रक्कम प्राप्त होत असते. दक्षिणापेटी मधून नोटांबरोबरच नाणीही प्राप्त होत असतात. नाण्यांचे प्रमाण प्रत्येक दक्षिणापेटी मोजणी मध्ये साधारणत: ४ ते ४.५० लाख रूपये मात्र एवढे असते. पुढील महिन्यांचे दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीचे नियोजन अगोदरच्या महिन्यामध्ये केले जाते.दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीकामी,अधिनियम २००४ मधील कलम २०(३) अन्वये, शिर्डीतील फक्त राष्ट्रीयकृत बँकानाच, प्रत्येक वेळी, एक असे चक्रीय पध्दतीने उपस्थित राहणेबाबत पत्राव्दारे आगाऊ कळविण्यात येत असते.त्यानुसार संबंधीत बँका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे सकाळी ८:३० वाजता दक्षिणा पेटयातील रक्कम मोजणीचे कामकाजासाठी उपस्थित राहतात. दक्षिणापेटी रक्कम मोजणीचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी रोख रक्कम (नोटा व नाणी) स्विकारून त्याची पोहोच संस्थानला देतात.

परंतु, दिवसेंदिवस दक्षिणापेटीतून प्राप्त होणा-या नाण्यांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत चालले असल्याने, ज्या प्रमाणात बँकाकडे नाणी जमा होतात, त्याप्रमाणात बाजारामध्ये त्यांचा खप होत नाही. त्यामुळे प्रत्येक बँकाकडे सध्या मोठया प्रमाणात नाणी पडून आहेत. बँकाना नाणी ठेवण्यासाठी त्यांचेकडे जागा उपलब्ध नाही. त्यामुळे पर्यायाने बँका कॅश कांऊटिंग (Cash Counting) साठी येण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक वेळेस दक्षिणापेटयांतील रकमेची मोजणी करणेसाठी बँकाना खूप विनंती करावी लागत आहे. संस्थानकडून दक्षिणापेटयातील रक्कम मोजणी(Cash Counting) बाबतचे नियोजनाचे पत्र आगाऊ प्राप्त झाल्यानंतर लगेचच ब-याचशा बँका नाणी साठविण्यासाठी बँकाकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही, असे कारण सांगून दक्षिणापेटयातलि

रक्कम मोजणीसाठी उपस्थित राहणार नसल्याचे पत्राव्दारे कळवितात. त्याअनुषंगाने, उर्वरीत बँकाना कॅश कांऊटिंगसाठी उपस्थित राहणेबाबत दुरध्वनीवरून विनंती केली असता, त्यासुध्दा बँकेकडे नाणी साठविणेसाठी जागा उपलब्ध् नसल्याचे सांगून उपस्थित राहण्यास नकार देतात. बँका उपस्थित राहत नसल्याने पर्यायाने नियोजीत दक्षिणापेटयातील रक्कम (Cash Counting) मोजणीचे कामकाज रद्द करावे लागत आहे. त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान तर होतेच, आणि श्री साईभक्तांचीही कुचंबना होते. एकूणच दक्षिणापेटील रक्कम मोजणीचे कामकाजात सध्या खुप अडचणी निर्माण होत आहेत.

त्याअनुषंगाने, या संदर्भात जा.नं एसएसएस/वशी-लेखा/७००/२०१९, अन्वये दिनांक ३१ मे,२०१९ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,बेलापूर,मुंबई (RBI) , यांना तसेच जा.नं.एसएसएस/ईओ /लेखा ९७८/ २०१९, दि.१७ जून,२०१९ रोजी संबंधीत सर्व राष्ट्रीयकृत बँकाचे मा.अध्यक्ष यांना डी.ओ.पत्र पाठविणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने, संस्थानचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून, तसेच दक्षिणापेटयातील रक्कमेची (Cash Counting) मोजणी नियोजित तारखेप्रमाणे होऊन बँकेत वेळेत रक्कम जमा व्हावी म्हणून, उपरोक्त संदर्भान्वये, बँकाचे प्रतिनिधी व संस्थान प्रतिनिधी सोबत भारतीय रिझर्व बँक ,मुंबई यांनी दिनांक १९/०६/२०१९ रोजी बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी उपस्थित सर्व बँकाचे प्रतिनिधी व संस्थान प्रतिनिधी यांनी पुढील प्रमाणे परस्पर सहमतीने करारनामा करावा असे सुचविले.

Whereas, it was decided the following by the aforesaid parties in this regard.

(A) This strong room will be offered to the bank within premises owned by the temple at free of cost without charging any rent.

(B) The coin will be sorted denomination-wise by the temple and made into bags/pouches having same number of coins and thereafter it will be deposited and credit will be claimed by the temple authorities

(C) The responsibility of providing guarding round the clock (24 Hours) of the strong room will be the responsibility of the temple.

(D) The temple should make arrangements for providing CCTV Coverage.

(E) This arrangement will be enforced till normalcy is restored and the temple is requested to close down the above facility

संस्थानची स्थावर मालमत्ता भाडेपट्टयाने देणेबाबत, अधिनियम -२००४ मधील कलम १७ (३) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

“विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्यशासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.”

तरी, अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतुदीस अधिन राहून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) यांनी सुचविल्यानुसार ,शिर्डीतील राष्ट्रीयकृत बँकाना नाणी साठविणेकामी संस्थानमार्फत ११ महिन्यांचे करारानक खोल्या उपलब्ध करून देता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) यांनी संदर्भीय मिटींगमध्ये केलेल्या सुचनेनुसार शिर्डीतील दक्षिणापेटी रक्कम मोजणीसाठी उपस्थित राहत असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाना नाणी साठविणेकामी संस्थानमार्फत आवश्यकतेनुसार मोफत खोल्या उपलब्ध करून देणे. त्यासाठी २४ तास बंदुकधारी सुरक्षारक्षक देणे, CCTV यंत्रणा कार्यान्वीत करून देणे व बँकाच्या मागणीनुसार त्यांना देण्यात आलेल्या खोल्यांच्या बांधकामातील दुरूस्ती व ग्रील संस्थानमार्फत बसून देणे, इत्यादीसाठी मान्यता व त्यासाठी होणारे अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभे समोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणापेटी रक्कम मोजणीसाठी उपस्थित राहत असलेल्या शिर्डीतील राष्ट्रीयकृत बँकाना नाणी साठविणेकामी संस्थानमार्फत आवश्यकतेनुसार मोफत खोल्या उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या खोल्यांच्या सुरक्षेसाठी २४ तास बंदुकधारी सुरक्षारक्षक व CCTV यंत्रणा कार्यान्वीत करून देण्यास आणि बँकाच्या मागणीनुसार त्यांना देण्यात आलेल्या खोल्यांच्या बांधकामातील दुरूस्ती व ग्रील संस्थानमार्फत बसवुन देण्यास व त्याकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा पालखी सोहळा समिती,शिर्डी यांचा श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळयासाठी संस्थानतर्फे सहकार्य मिळणेबाबतचे विनंती पत्र.**

**प्रस्ताव-** (अ) अध्यक्ष, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांनी दिनांक ३० मे, २०१९ रोजीचे विनंती पत्राने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे -

"‥ ‥ सालाबादप्रमाणे साईबाबा पालखी सोहळा, शिर्डी ( श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर ) आषाढी वारीचे निमित्ताने दिनांक २७ जून, २०१९ ते दिनांक १३ जुलै, २०१९ पर्यन्त आयोजित केलेला आहे. साईबाबा पालखी सोहळयात १००० ते १५०० पर्यन्त वारकरी पायी दिंडीचा लाभ घेत असतात. त्याकरीता खालील प्रमाणे साईबाबा संस्थानचे वतीने सहकार्य मिळावे,ही अपेक्षा आहे. १) पाच दिवसांचे अन्नदान २) पाणी टँकर सहकार्य ३) साईबाबा संस्थानची रुग्णवाहिका. "

(ब) याबाबत विवेचन असे की,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मध्ये कलम २१ मध्ये विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोगया शीर्षाखाली खालीलप्रमाणे तरतूदी आहेत –

(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना आधीन राहून, समितीकडुन पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठीवापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशांसन .

(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(घ) भक्तांना जेवण देणे व अन्नछत्र चालवणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

(च) समितीने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रक्कमांची राज्य शासनाच्या मंजुरीने परतफेड करणे.

(छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय हुकुमनामा किंवा निवाडा याची

पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याहीरकमांचे प्रदान.

(ज) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडुन देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई आकार व इतर

रकमा यांचे प्रदान

(झ) विश्वसतव्यवस्थेच्या मालमतांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

(ञ) भक्तांच्या निवासासाठी व त्यांचा उपयोजनासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे आणि

(ट) कलम १७ च्या पोट- कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडणे.

(१क) पोट-कलम (१) तरतुदींना आधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेलया आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

(२) पोट–कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या

वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपैक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल :-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, एखाद्या नोंदणीकृत सर्वाजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी

नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडुन अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणेसाठी किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी : -

परंतु, राज्य शासन, या पोट – कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यमधुन दिलेल इतर दोन सदस्य अशा एकुण तीन सदस्यांची मिळुन बनलेली एक छाननी समिती स्थापन करील, आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालवधीबरोबरच संपेल, परंतु, आणखी असे की, छाननी समिती आपल्या सभांचे आयोजन करण्यासाठीव कामकाज पाहण्यासाठी आणि, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी विनियम तयार करील तसेच संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडुन वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी या अधिनियमाखाली विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जाची शिफारसकरण्यासाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयान, केवल आर. सेमलानी यांच्या प्रकणामधील रिट विनंती अर्ज क्र. २००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निदेश आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुरुप अशी, मार्गदर्शक तत्वे तयार करुन ती प्रकाशित करील.”

तथापि,यापुर्वी सन २००७ ते २०१८ या कालावधीत शिधा स्वरुपात अनुदान / सहाय्य करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही झालेली आहे –

०१. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सर्वसाधारण सभेत निर्णय क्रमांक ४९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला होता –

“.. ..मा. शासनाने सुचविलेप्रमाणे संस्थानमार्फत शिधा सामुग्री वाटपाबाबत नियम व विनियम तयार करणेबाबत नियुक्त केलेले श्री. सुधाकर वि.जोशी, सेवानिवृत्त आय.ए.एस अधिकारी, यांनी तयार करुन दिलेली शिधाबाबतची नियमावली, अर्जाचा विहीत नमुना व शिधा सामुग्री विनियोगाबाबतचे पत्र इ. माहीती शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली.”

०२. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीची विशेष सभादिनांक२७ जानेवारी, २०१० रोजी मा. मंत्री,विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. त्यामध्ये विषय क्रमांक २८ –शिधा स्वरुपात देण्यात येणा-या मदतीसंबंधातील तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावावर सदर प्रस्ताव बंद करण्यात यावा,असा निर्णय घेणेत आला.

०३. त्यानंतर, सन २०१८ मध्ये अध्यक्ष,श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डीयांनी दिनांक २३ मे, २०१८ रोजीचे विनंतीपत्राव्दारे,माहे जुलै, २०१८ मधील शिर्डी ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळयासाठी शिधास्वरुपात साहित्य / किराणा माल मागणी केलेली होती. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ जून, २०१८ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्रमांक १७ / निर्णय क्रमांक ४०७ अन्वये,आषाढी एकादशीनिमीत्त शिर्डी ते पंढरपुर पायी जाणा-या दिंडीस आवश्यकतेनुसार संस्थानचे प्रसादालयातुन शिधा उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच याबाबतचा प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेने शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असा निर्णय घेणेत आला.

०४. मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णय क्रमांक ४०७ नुसार,मा.छाननी समितीचे दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे सभेत विषय क्रमांक ०४– श्री साईबाबा पालखी सोहळा, शिर्डी यांना श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळयासाठी संस्थानतर्फे सहकार्य मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. या प्रस्तावावर निर्णय क्रमांक ४५ नुसार, यापुर्वी शासनाने व व्यवस्थापन समितीने दि.२७.०१.२०१० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार पालखी सोहळा, पंढरपुर पायी दिंडीसाठी शिधास्वरुपात मदत देणे नियमात बसत नसुन आणि शासनाने शिधा स्वरुपात मदत बंद करावी असा निर्णय घेतल्याने विषय नं. ४ यास छाननी समितीने अमान्य केले असून ही बाब संबधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, असा निर्णय घेतला.

(क) आता,परिच्छेद अमध्ये नमूद केलेप्रमाणे, अध्यक्ष, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांनी दिनांक ३० मे, २०१९ रोजीचे पत्राने,माहे जुलै,२०१९ चे शिर्डी ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळयासाठी, या दिंडीत सहभागी होणारे वारक-यांसाठी ०५ दिवसाचे अन्नदान तसेच पाणी टँकर व रुग्णवाहिकेची व्यवस्था संस्थानमार्फत व्हावी, म्हणून विनंती केलेली आहे. याबाबत, सामान्य प्रशासन

विभागामार्फत शिधा स्वरुपात सहाय्य / अनुदान देणेबाबत सन २००७ ते सन २०१८ चे कालावधीतील वस्तुःस्थितीदर्शक टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांनी, धोरणात्मक बाब आहे, व्यवस्थापन समितीपुढे ठेवा असे निर्देश दिलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय -

(ड) उपरोक्त परिच्देछांत नमुद केलेप्रमाणे,श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांना माहे जुलै, २०१९ मधील नियोजित शिर्डी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळयाकरीता अन्नदान स्वरुपात शिधा उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास,दिनांक२७ जानेवारी २०१० रोजी मा. मंत्री विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेतील विषय क्रमांक २८ नुसार तसेच मा. छाननी समितीचे दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे निर्णयानुसार, विषयांकित दिंडी सोहळयासाठी अन्नदानासाठी शिधा स्वरुपात साहित्य / किराणा माल उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास,पुनःश्च मा. छाननी समितीपुढे प्रस्ताव सादर करुन, त्यांची मान्यता मिळालेनंतर मा. शासनास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल.तसेच, अशी शिधा / साहित्य स्वरुपातील सहाय्य / मदतीची किंमत / रक्कम किती मर्यादेपर्यन्त असावी याबाबतचा निर्णय घ्यावा लागेल.

याव्यतिरिक्त अशा स्वरुपातील मदत सुरु केल्यास,शिर्डी व शिर्डी परिसरातील पंढरपूर अथवा अन्य तीर्थस्थानी जाणारे पायी दिंडी अथवा पदयात्री पालखी आयोजित करणा-या संघटना / संस्था / व्यक्ती वेळोवेळी अशा प्रकारची सुविधा संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानकडे अर्जाव्दारे मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याशिवाय संस्थानमार्फत पाणी टॅंकरची स्वतंत्र व्यवस्था नसल्याने तसेच रुग्णालयाकडील सध्याचे रुग्णांची संख्या पहातां रुग्णवाहिका उपलब्ध करुन देता येणे शक्य होणार नाही, असे मत आहे.

प्रस्ताव

(इ) उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन,अध्यक्ष, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती,शिर्डी यांनी माहे जुलै, २०१९ मध्ये आयोजित केलेल्या शिर्डी ते पंढरपूर यापायी दिंडी यात्रेसाठी अन्नदान म्हणून शिधा स्वरुपात किराणा माल / साहित्य उपलब्ध करुन द्यावे किंवा कसे, तसेच अशा शिधा स्वरुपात किराणा माल/साहित्य उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास त्याची किंमत/रक्कमेची मर्यादा किती असावी, याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी ते पंढरपूर दिंडी ही स्थानिक असल्याने त्यांना अन्नदान स्वरुपात शिधा देणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१३** **श्री साईसच्चरित मराठीतील अध्याय क्र.१५ स्वतंत्रपणे पुस्तक रुपाने प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान अधिनियम तरतुद -**

महाराष्ट्र अधिनियम २००४ कलम नं. १७ (ठ) मधील तरतुद.

“श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार–प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.”

प्रास्तविक:- डॉ.ओमश्रीश गो.श्रीदत्तोपासक (श्री.कुबल) यांनी दि. ०५/०६/१९ चे पत्रामध्ये खालील प्रमाणे कळविले आहे.

आपल्या संस्थानतर्फे साईभक्तांसाठी उपयुक्त प्रकाशने प्रकाशित करण्यात आली आहेत. उदा:-साईनाथ सगुणोपासना , श्री साईनाथ स्तवनमंजरी व श्री साईसुमनांजली त्याबद्दल आपले शतश:आभार !

कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर तथा हेमांडपतकृत ‘श्री साईसच्चरित ‘ या ग्रंथाचे साईभक्त पारायण करीत असतात. परंतु ज्यांना संपुर्ण ग्रंथ वाचता येत नाही. ते भक्त नित्य उपासनेसाठी पंधरावा अध्याय वाचतात. श्री दासगणूंचे किर्तन ,चोळकर या गरीब भक्तांची नवसकथा आणि भिंतीवरील एक य:कश्चित पाल यांना निमित्त करून सर्व भक्तांच्या मनातील दु:ख, चिंता आणि अज्ञान यांचे निरसन श्री साईबाबांनी कसे केले , हे भक्त हेमांडपंत यांनी या अध्यायात सांगितले आहे. अंतर्ज्ञानी नी परमात्मा सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वगत आणि सर्वशक्तिमान असून सृष्टीचा कनवाळू पालन-पोषणकर्ता हा पिता शरणागत भक्तांची सर्व अरिष्ट–संकटे नाहीशी करतो, असे भक्तांना दिलेले वचन स्वत:श्रीबाबाच पुर्ण करतात, असा हा १५ वा अध्याय आपण जर सुटा, स्वतंत्र पॉकेट साईज स्वरूपात प्रकाशित केला तर प्रवासात ने आण करण्यासाठी सोईचे ठरेल. सरस्वती गंगाधरकृत “श्री

गुरूचरित्र" या ग्रंथाचे अध्याय क्र. १४, १८ अवतरणिका हे वरील पध्दतीने भाविकांना उपलब्ध आहेत. याच पार्श्वभूमीवर १५ व्या अध्यायाचे प्रकाशन लवकरात लवकर करून साईभक्तांची सोय करावी, ही विनंती.

**विभागाचा अभिप्राय:-** अर्जदार डॉ.ओमश्रीश गो.श्रीदत्तोपासक (श्री.कुबल) यांनी त्यांचे पत्रात केलेल्या विनंतीस अनुसरुन १५ व्या अध्यायाबाबत श्री साईसच्चरित या ग्रंथात पुढीलप्रमाणे नमुद केले आहे.

***वाचील जो हा अध्याय अदरी / अथवा नेमानें आवर्तन करी / तयाचें संकट गुरूराय निवारी / खूण अतंरी दृढ बांधा //१०५//***

सदर ओवीचा श्री साईंचे सत्यचरित्र या ग्रंथामध्ये पुढीलप्रमाणे भावार्थ दिलेला आहे.

***हा अध्याय जो आदराने वाचेल अथवा नेमाने त्याचे पारायण करील त्याचे संकट गुरूमहाराज दूर करतील, हे मनात पक्के ध्यानात ठेवा.***

श्री साईसच्चरित व श्री साईंचे सत्यचरित्र या दोनीही ग्रंथामध्ये १५ व्या अध्यायातील उपरोक्त ओवींचे जे महात्म्य वर्णन केले आहे ते आणि अर्जदार यांची विनंती विचारात घेता साईचरित्रातील अध्याय क्र. १५ हा स्वतंत्र पुस्तकरूपी (पॉकेट साईज) छापून संस्थानतर्फे प्रकाशित करता येईल. तसेच यापुर्वीही साईसच्चरितातील अध्याय क्र. ११ असाच स्वतंत्रपणे छापण्यात आलेला आहे. सदरहू पुस्तकाचे नांव "श्रीसाईरूद्राध्याय" असून या पुस्तकाची मासिक सरासरी विक्री ही ४५० ते ५०० आहे. अन्य पुस्तकांच्या विक्रीचा विचार करता सदर पुस्तिकेची होणारी विक्रीही कमी आहे . तथापि अर्जदार यांची विनंती व या अध्यायाचे महत्व यांचा विचार करता प्रायोगिक तत्वावर सुरवातीस या पुस्तिकेच्या साधारण ५००० प्रती छापून विक्रीचा अंदाज घेता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- तरी अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे श्री साईसच्चरितातील अध्याय क्र.१५ हा स्वतंत्रपणे छापून प्रकाशित करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन श्री साईसच्चरित मराठीतील अध्याय क्र.१५ प्रायोगीक तत्वावर स्वतंत्रपणे पुस्तक रुपाने ५००० प्रति प्रकाशित करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

विषय नं.१४ **श्री साईसमर्थ सतचरित्र इंग्रजी (लेखक कै.श्रीमती झरीन) हे पुस्तक मल्याळी भाषेत ओवी रुपाने छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम- कलम नं.१७ (२) ठ

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील "

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय – दि.७/८/२०१६ निर्णय क्र. ४५७

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे डॉ. अनिता दिनेश शारजा, संयुक्त अरब अमीरती (UAE) यांनी श्री.साईचरित्र इंग्रजी या ग्रंथावरून मल्याळम भाषेत ओवी टू ओवी केलेला अनुवाद बरोबर असलेबाबत, मल्याळम भाषेचा विभाग असलेल्या विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापकाकडून विद्यापीठाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र घेणेबाबत डॉ.अनिता दिनेश शारजा, संयुक्त अरब अमीरती (UAE) यांना कळविण्यात यावे व विद्यापीठाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते प्रकाशित करणेत यावे, असे ठरले.

प्रास्तविक- डॉ. अनिता दिनेश देवे आबुधाबी यांनी त्यांच्या दि.०८/०३/१९ रोजीच्या पत्रात खालील प्रमाणे कळविले आहे.

As per Santhan's permission and instructions, I had done the translation and printed 300 copies by myself and submitted to the Publication Department. The book was well accepted and appreciated by the Malayali devotees. Some of minor printing mistakes were corrected now and the soft copy of that is being sent to Publications section (publication.sssts@ gmail.com)

I request you to take the necessary steps to countinue the reprinting of the Malayalam Satcharitra (ovi to ovi) translation for the benefit of the devotees.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा संस्थानमार्फत साईबाबांचे जीवन कार्य , त्यांच्या लिला तसेच श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने त्यांचे जीवनावर अधारीत गोविंद रघुनाथ

दाभोळकर यांनी लिहिलेल्या साईचरित्रांचे आधारावर वेगवेगळया १६ भाषेमध्ये साईचरित्र प्रकाशित करून साईभक्तांना कांउटरवरून तसेच ऑनलाईन विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

सध्या विक्री करणेत येत आसलेल्या प्रत्येक संस्थान प्रकाशित पुस्तकांची छपाई करतांना त्याचे प्रुफ रिडींग हे संबधीत भाषेचे संपुर्ण ज्ञान असलेल्या तसेच त्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून मान्यता तज्ञ व्यक्तीकडून पुर्वतपासणी करूनच डाटा तयार करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे प्रेसधारकांकडून छपाई करण्यात येते.

डॉ अनिता दिनेश देवे आबुधावी यांनी उपरोक्त निर्णयात नमुद केलेप्रमाणे संस्थानला सदरहू पुस्तकाबाबत विद्यापिठाचे प्रमाणपत्र व पुस्तकांच्या २७९ प्रती २८.२.१८ रोजी देणगी स्वरुपात दिलेल्या आहेत. त्याची विक्री संस्थानचे बुकस्टॉलवर चालू असून आतापर्यंत १७१ प्रतीची विक्री झाली असून १०८ प्रती शिल्लक आहेत, म्हणजेच महिन्यास साधारणतः ११ प्रतींची विक्री झाली आहे. सदरच्या पुस्तकाची सरासरी विक्री पाहाता ती अतिशय अत्यल्प आहे. त्यामुळे सदरहू पुस्तकाच्या प्रती छापून विक्री करणे व्यवहार्य होणार नाही.

सबब सदरहू पुस्तक संस्थानचे वेबसाईटवर साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देता येईल. परंतु सदरहू देणगी आलेल्या पुस्तकाची सरासरी विक्री पाहता पूर्वी सदरहू पुस्तक छपाईबाबतचा झालेला निर्णय पुर्नविचारार्थ मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर ठेवता येईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद केलेप्रमाणे पुस्तकाच्या विक्रीची वस्तूस्थिती विचाराता घेता पुर्वी झालेला निर्णय पुर्नविचारार्थ सादर .

निर्णय क्र.३२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मल्याळम भाषेचा विभाग असलेल्या विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापकाकडून तपासुण त्यांचा अभिप्राय घेऊन श्री साईसमर्थ सतचरित्र इंग्रजी (लेखक कै.श्रीमती झरीन) हे पुस्तक मल्याळी भाषेत ओवी रुपाने छपाई करणेस मान्यता देण्याता आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१५ मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मध्ये मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

“श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील”

व्यवस्थापन समितीचा ठरावः- दि. ३०.०६.२०१८ निर्णय क्रं.४३०.

प्रास्तविकः- संस्थानचे मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सदस्य व मा. कार्यकारी अधिकारी यांना व वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तींना त्यांच्या शिर्डी भेटीत, जनसंपर्क कार्यालयामार्फत आयोजीत पत्रकार दिन, संतकवी दासगणु महाराज पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम, शैक्षणिक संकुलात होणारे कार्यक्रम व सेवानिवृत्त कर्मचारी निरोप समारंभ, देणगीदार साईभक्त इत्यादीना भेट म्हणुन देण्यात येत असतात.सदरचे प्रकाशने साहित्य सन २०१८-२०१९ साठी विभागांचे मागणीनुसार निःशुल्क देण्यात आले असून सदरचा तपशील खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

| अ.नं | पी यु बी कोड नं. | पुस्तकांचे नाव | भाषा | प्रतीX देणगी मूल्य | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं १ | श्री साईचरित्र पोथी | मराठी | ८६६X१००/- | ८६६००/- |
| २. | पी यु बी नं २ | श्री साईचरित्र | हिंदी | २८६१ X५०/- | १४३०५०/- |
| ३. | पी यु बी नं ३ | श्री साईचरित्र | इंग्रजी | २९८८ X४०/- | ११९५२०/- |
| ४. | पी यु बी नं ४ | श्री साईचरित्र | गुजराथी | १५६ X४५/- | ७०२०/- |
| ५. | पी यु बी नं ४ | श्री साईचरित्र | गुजराथी | २८४ X५०/- | १४२००/- |
| ६. | पी यु बी नं ५ | श्री साईचरित्र | कन्नड | ४८५ X६०/- | २९१००/- |
| ७. | पी यु बी नं ६ | श्री साईचरित्र | तेलुगु | ३१९८ X६०/- | १९१८८०/- |
| ८. | पी यु बी नं ७ | श्री साईचरित्र | तामीळ | ११४३ X६०/- | ६८५८०/- |
| ९. | पी यु बी नं ३७ | साईबाबा ऑफ द प्रधान | इंग्रजी | ३ X१०/- | ३०/- |
| १०. | पी यु बी नं ३९ | खापर्डे डायरी | इंग्रजी | १ X९/- | ९/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | पी यु बी नं ७४ | श्री साईसमर्थ सतचरित्र झरिन | इंग्रजी | ३ X१३५/- | ४०५/- |
| १२. | पी यु बी नं १०० | डिलक्स पोथी | मराठी | ५३ X२००/- | १०६००/- |
| | | | | एकुण रुपये | ६७०९९४/- |
| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **सीडीचे नाव** | **भाषा** | **प्रती Xदेणगी मुल्य** | **एकुण रुपये** |
| १३. | पी यु बी नं २०९ | शिर्डी दर्शन | हिंदी | १X५० | ५०/- |
| | | | | एकुण रुपये | ५०/- |
| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **श्री साई डायरी व कॅलेंडर्स २०१७** | **वर्ष** | **प्रती Xदेणगी मुल्य** | **एकुण रुपये** |
| १४. | पी यु बी नं ३१५ | श्री साई डायरी (डिलक्स | २०१८ | ७६X८६/- | ६५३६/- |
| १५. | पी यु बी नं ४६२ | श्री साई कॅलेंडर्स (डिलक्स)२०१८ | २०१८ | १२८८X२०२/- | २६०१७६/- |
| १६. | पी यु बी नं ४६४ | श्री साई कॅलेंडर्स (3D Wall)२०१८ | २०१८ | ७७९X२३७/- | १८४६२३/- |
| | | | | एकुण रुपये | ४५१३३५/- |

| अ.नं | पी यु बी कोड नं. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स २०१८ | वर्ष | प्रतीX देणगी मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७. | पी यु बी नं ३१७ | श्री साई डायरी (डिलक्स)-२०१९ | २०१९ | २२९३X९०/- | २०६३७०/- |
| १८. | पी यु बी नं ४६७ | श्री साई कॅलेंडर्स (डिलक्स)२०१९ | २०१९ | २११०X१५/- | ३१६५०/- |
| १९. | पी यु बी नं ४६८ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०१९ | २०१९ | ३२X२१०/- | ६७२०/- |
| २०. | पी यु बी नं ४७० | श्री साई 3D वॉल कॅलेंडर्स २०१९ | २०१९ | १५X२४०/- | ३६००/- |
| २१. | पी यु बी नं ४७१ | श्री साई डेस्क कॅलेंडर्स२०१९ | २०१९ | ५०X१२०/- | ६०००/- |
| २२. | पी यु बी नं ४७2 | श्री साई 3D डेस्क कॅलेंडर्स२०१९ | २०१९ | ५X५५/- | २७५/- |
| २३. | पी यु बी नं ४७3 | श्री साई वॉलकॅलेंडर्स(ऑफिस)२०१९ | २०१९ | १५१९X३०/- | ४५५७०/- |
| | | | | एकुण रुपये | ३००१८५/- |

| अ.नं | पी यु बी कोड नं. | फोटोंचा तपशील | प्रतीX देणगी मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| २४. | पी यु बी नं ७३५ | 3D साईबाबा फोटो (अॅक्रेलिक स्टॅंड) | ५X१७५/- | ८७५/- |
| २५. | पी यु बी नं ७३६ | 3D साईबाबा फोटो (फायबर फ्रेम) | ६५६X१७५/- | ११४८००/- |
| २६. | पी यु बी नं ७३७ | 3D साईबाबा फोटो (फायबर फ्रेम) | ६X२४५/- | १४७०/- |
| २७. | पी यु बी नं ७३८ | 3D साईबाबा फोटो (फायबर फ्रेम) | ३४३X४००/- | १३७२००/- |
| २८. | पी यु बी नं ७४१ | 3D फोटो स्टोन POKET | ११८००X५/- | ५९०००/- |
| २९. | पी यु बी नं ७५६ | 3D साईबाबा फोटो वॉल | १९७X२२०/- | ४३३४०/- |
| | | | एकुण रुपये | ३५६६८५/- |

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | पुस्तके | ६७०९९४/- |
| ०२. | सीडी | ५०/- |
| ०३. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स | ७५१५२०/- |
| ०४. | फोटो | ३५६६८५/- |
| | **एकुण रुपये** | **१७,७९,२४९/-** |

(अक्षरी रु.सतरा लाख, एकोणऐंशी हजार, दोनशे एकोणपन्नास मात्र)

विभागाचा अभिप्राय-अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून आर्थिक वर्ष २०१८-२०१९ करिता संस्थानमार्फत भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकता येतील,असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी दि.०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ अखेर मोफत देण्यात आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स व याकामी एकूण रक्कम रुपये. १७,७९,२४९,/- झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेस मंजुरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीत मान्यवरांना देण्यात आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स याकामी झालेल्या एकुण रक्कम रु. १७,७९,२४९,/-मात्रचे खर्चास तसेच सदरची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१९ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१)

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) -रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे.

प्रस्तावना:- उपरोक्त अधिनियमातील तरतुदी व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

मंदिर विभागाकडील दिनांक ०२/०१/२०१९ रोजीचे प्रस्तावानुसार श्री पुण्यतिथी उत्सव सोमवार, दि.०७ /१०/२०१९ ते गुरुवार, दि.१० /१०/२०१९ (अश्विन शु ९|| शके १९४१ ते अश्विन शु १२ || शके १९४१) असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सन-२०१९ मध्ये साजरा करावयाचे श्री पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं. | तपशिल | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १. | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्त मंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री पुण्यतिथी उत्सवात भक्तमंडळाचे सभासद, प्रतिष्ठीत व्यक्ति व ग्रामस्थ यांना पाठविण्यासाठी १,८०,००० निमंत्रणपत्रिका पाकीटांसह छपाई करुन घेण्यात येतील तसेच नेहमीप्रमाणे प्रेसनोट (न्यूज ॲटम) वर्तमानपत्रातून प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ ) कलाकार कार्यक्रम** – उत्सवाचे चार दिवसांकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करावयाचे आहेत. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल.<br>निमंत्रीत कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल. निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपाचे स्टेजवर आयोजित करता येईल |
| | सोमवार<br>दि.०७/१०/२०१९<br>(प्रारंभ दिवस ) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.१५ पर्यंत. |
| | मंगळवार<br>दि.०८/१०/२०१९<br>(मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत.<br>२. कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम नेहमीच्या प्रथेप्रमाणे रात्री ११.०० ते पहाटे ५.०० या वेळेत श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (सोळा गुंठे) येथे आयोजित करता येईल.समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | बुधवार<br>दि.०९/१०/२०१९.<br>(तिसरा दिवस ) | १) सायंकाळी ७.३० ते १०.१५ पर्यंत . |

| | | |
|---|---|---|
| | गुरुवार<br>दि. १०/१०/२०१९.<br>(सांगता दिवस ) | २) सायंकाळी ७.३० ते ९.०० पर्यंत . |
| | सोमवार<br>दि.०७/१०/२०१९<br>(सायं. ४ ते ६)<br>मंगळवार<br>दि.०८.१०.२०१९<br>(सायं. १० ते १२)<br>बुधवार<br>दि.०९/१०/२०१९<br>(सकाळी ४ ते ६)<br>गुरुवार<br>दि.१०/१०/२०१९<br>(सकाळी १० ते १२) | **ब) कीर्तन कार्यक्रम-** उत्सवाचे चार दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल.<br>नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. |
| | सोमवार<br>दि.०७/१०/२०१९<br>ते गुरुवार<br>दि.१०/१०/२०१९ | **क) विविध मिरवणूका** - पोथी, फोटो, वीणा, अध्याय वाचन, पालखी, रथ, भिक्षा झोळी, सिमोल्लंघन मिरवणूक रुद्राभिषेक, पाद्यपुजा प्रथेप्रमाणे करण्यात येतील व त्यातील सदस्यांच्या सहभागाविषयीचा प्रस्ताव स्वतंत्र सादर करण्यात येईल.<br>उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.०७/१०/२०१९ रोजी श्रींचे पालखीची गावांतून रात्री.९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या दिवशी दि.०८.१०.२०१९ रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. |
| | | **ड) आराधना विधी** - आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) टिव्हीवर व इतर माध्यमामार्फत करण्यात येईल. यामुळे समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदिराच्या वास्तुस (बुटी वाडयास ) १०० वर्ष झाली असल्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ मंदिराच्यावर बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत येईल. आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये करणेत येईल, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश दिला जाणार नाही. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते. तेच शाहीभोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी. हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉलमध्ये ठराविक वेळेत देण्यात येण्याची व्यवस्था करण्यात येईल. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात सोमवार,दि.०७/१०/२०१९ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०८/१०/२०१९ रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व उर्वरित राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.०६/१०/२०१९ रोजी देणगी काऊंटर येथे नोंदविली जातील त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. |
| ४. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात सोमवार, दि.०७/१०/२०१९ ते गुरुवार, दि.१०/१०/२०१९ अखेर मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेवून बंद किंवा चालू ठेवणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निर्णय घेण्यात येईल. |
| ५. | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई हे विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा- नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - |

| | | |
|---|---|---|
| | | येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना कळविण्यात येईल ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ६. | गाव जेवण | उत्सवाच्या सांगता दिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ७. | प्रसाद- भोजन, चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करण्यात येईल.<br>सन २०१९ चे पुण्यतिथी उत्सवात चारही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्ठांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| ८. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतीक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| | **उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे** | |
| ९. | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर तीन शिप्टमध्ये चालू ठेवण्यात येतील. |
| १०. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने इ.व्यवस्था केली जाईल. |
| ११. | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल. |
| १२. | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साई धर्मशाळा,व्दारावती, साईबाबा भक्त निवासस्थान इ. इमारतीमधून पालखी पदयात्री व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल |
| १३. | प्रथमोपचार केंद्र | संस्थानमार्फत नेहमीप्रमाणे प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय परिसर या ठिकाणी ठेवण्यात येईल. |
| १४. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था मागील उत्सवाप्रमाणे यंदाही करण्यात येईल नेहमीप्रमाणे पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १५ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणेबाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १६ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१८ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,४९,१५,०००/- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु.९८,२८,९५८/- मात्र इतका खर्च झालेला आहे.<br>श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१९ करीता अंदाजपत्रकीय रु.७५,५८,८९८/- मात्रचा खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे. |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता झालेला खर्च व अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | विभाग | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | अंदाजे खर्च |
| १. | मंडप, कमानी, स्टेज व इतर खर्च | बांधकाम | ६०,००,००० | १८,२९,४७२.४५ | १४,८२,१७६ |
| २. | कलाकार बिदागी – कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रम, आराधन विधी पुजा साहित्य व इतर | मंदीर | १०,००,००० | २०,८८,०३६.०० | १०,००००० |
| ३. | भक्तांना मिष्टान्न खर्च (गावजेवण व मजूरी) | प्रसादालय | ८,९०,००० | १३,००,९२४.०० | ११,०७,८८० |
| ४. | विद्युत रोषणाई, (जनरेटर भाडे, इंधन इ. खर्च) | विद्युत | २७,००,००० | १४,८९,२९७.०० | १५,००,००० |
| ५ | साऊंड सिस्टीम भाडेतत्वावर | ध्वनिक्षेपण | ५,००,००० | - | - |
| ६ | व्हीडीओ शुटींग संबंधीत कामांकरीता फोटो प्रिंटींग, फोटो अल्बम, सी.डी/डी.व्ही.डी. मेमरी कार्ड खरेदी. | सी.सी.टीव्ही | ३०,००० | - | |
| ७ | निमंत्रण पत्रिका, पोष्टेज खर्च, स्टिकर ,उदीप्रसाद भरणे मजूरीसह खर्च | सामान्य प्रशासन | २३,४५,००० | २३,२९,४८५.०० | १३,९५,००० |
| ८. | जादा कंत्राटी कर्मचारी,स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन खर्च | साईप्रसादालय कॅन्टीन, संरक्षण | ८,००,००० | ५,४३,८५२.८८ | ७,०८,८४२ |
| ९. | पालख्याचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च | पाणी पुरवठा | ३,५०,००० | - | ३,५०,००० |
| १०. | इतर खर्च – फर्निचर व भांडी, क्रेन खर्च भाडोत्री | प्रसादालय, वाहन विभाग | ३,००,००० | २,४७,८९१.०० | १५,००० |
| | | **एकूण रुपये -** | **१,४९,१५,०००** | **९८,२८,९५८.३३** | **७५,५८,८९८** |

विभागाचा अभिप्राय– श्री पुण्यतिथी उत्सव २०१९ साजरा करणेसाठी व याकामी संस्थानचे विविध विभागांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव – तरी श्री पुण्यतिथी उत्सव २०१९ साजरा करणेकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.७५,५८,८९८ (रुपये पंच्याहत्तर लाख आठ्ठावन्न हजार आठशे अठ्ठ्यान्नव) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.३२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ साजरा करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ७५,५८,८९८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.१७** **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या शिर्डी येथील 'द पिलीग्रम्स इन' या हॉटेलमध्ये राहणाऱ्या पर्यटकांना ऑनलाईन दर्शनपास मिळणेकामी संस्थान ची लिंक उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक सोयी व सुविधा उपलब्धल करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:-दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील नि.क्रं.६६७.

प्रास्ताविक :-जगभरातून शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना त्यांचे दर्शन व निवासाची आगाऊ व्यवस्था करणेच्या दृष्टीने ऑनलाईन आरती/दर्शनपास व रुम बुकींग करता यावी, याकरीता संस्थानमार्फत

राबविणेत आलेल्या साईटेक प्रकल्पाअंतर्गत online.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदरचे वेबसाईटला साईभक्तांकडून लक्षणीय प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. सद्यस्थितीत सदर वेबसाईटवर निर्धारीत तारखेपर्यंत ऑनलाईन आरती/दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा (कोटा शिल्लक असल्यास) उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे त्यांचे शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये राहणा-या साईभक्तांना ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचे संदर्भीयपत्र इकडील विभागास प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी पुढील प्रमाणे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये ५३ खोल्या असून, शिर्डीला येणारे भाविक हे खोल्यांची ऑनलाईन पद्धतीने आरक्षण करीत आहेत. भाविकांना श्री साईबाबांच्या समाधी दर्शनासाठी सध्या वेगळा दर्शन पास घ्यावा लागतो. तरी सदरचा दर्शनपास ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध झाला तर, भाविकांना शिर्डीवारीचे नियोजन करणे सोपे होईल, असे नमुद केले आहे. सदरचे पत्रामध्ये त्यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" या हॉटेलमध्ये राहणा-या पर्यटकांना ऑनलाईन दर्शनपास मिळणेकामी महामंडळाच्या www.maharastratourism.gov.in या संकेतस्थळावर शिर्डी संस्थानच्या दर्शनपासची लिंक उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

सद्यस्थितीत रेल्वेने श्रींचे दर्शनासाठी शिर्डी, कोपरगाव, नगरसुल, मनमाड व नाशिक या रेल्वेस्टेशन वर उतरणा-या साईभक्तांसाठी IRCTC यांचे तिकीट आरक्षण वेबसाईटवर ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ अन्वये, संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईट द्वारे दि.२६.०१.२०१९ पासून उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदर सुविधे अंतर्गत आजपावेतो ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत केलेल्या साईभक्तांची माहिती पुढील प्रमाणे.

| Sr.No. | Month | No of Passes | No of Devotees |
|---|---|---|---|
| 01 | January-2019 | 47 | 127 |
| 02 | February-2019 | 104 | 266 |
| 03 | March-2019 | 63 | 162 |
| 04 | April-2019 | 89 | 266 |
| 05 | May-2019 | 129 | 368 |
| 06 | June-2019 | 96 | 266 |

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी त्यांचे पत्रामध्ये त्यांना त्यांचे हॉटेलमध्ये राहणा-या साईभक्तांसाठी ऑनलाईन दर्शनपासची सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करुन पाहिजे? याबाबत स्वयं स्पष्ट मागणी केलेली नाही. पत्रामध्ये त्यांनी ऑनलाईन दर्शनपास मिळणेकामी त्यांच्या www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर संस्थानच्या ऑनलाईन दर्शन पासची लिंक उपलब्ध करुन द्यावी, जेणे करुन महामंडळाच्या हॉटेलच्या खोल्यांचे आरक्षण करतांना पर्यटक/भाविकांना ऑनलाईन दर्शनपास घेता येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ हे राज्य शासनाचा उपक्रम आहे, त्यामुळे याबाबत शिर्डी संस्थानने महामंडळाला सहकार्य करावे, अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी मागणी केले प्रमाणे त्यांचे शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये ऑनलाईन रुम आरक्षीत करणा-या साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येईल व दिलेल्या निर्देशानुसार मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे तंत्रज्ञ यांचे समन्वयाने पुढील कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:-प्रास्ताविके मध्ये नमुद केले प्रमाणे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये ऑनलाईन रुम आरक्षीत करणा-या साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत व मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे तंत्रज्ञ यांचे समन्वयाने सदरची सुविधा कार्यान्वीत करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुनअनुमान : -तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे शिर्डी येथील "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये ऑनलाईन रुम आरक्षीत करणा-या साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत व मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे तंत्रज्ञ यांचे समन्वयाने सदरची सुविधा कार्यान्वीत करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, "द पिल्ग्रिम्स इन" ह्या हॉटेलमध्ये ऑनलाईन रुम आरक्षीत करणा-या साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शनपास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१८** **शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून ई.७ वी व ई.९ वी ची प्रत्येकी १ वाढीव तुकडी सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ ( भाग ४) कर्तव्ये व अधिकार १७ (२-ढ) :- मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहायय करील. तसेच, शिर्डी व अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी येथील शै. २०१९-२० मध्ये दि.०३/०४/२०१९ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये, इ.५वी करीता नवीन प्रवेश दि.०७ मे २०१९ पासून सुरू करण्यात आलेले आहेत. तसेच इ. ६ वी ते ८ वी पर्यंतच्या वर्गामध्ये जागेच्या उपलब्धते नुसारनविन प्रवेश देता येतील असे मंजुर टिपणीमध्ये नमुद करण्यात आले होते.

मा. गटशिक्षणाधिकारी साहेब यांची दि.११/०६/२०१९ रोजीचे मिटींगमध्ये जि.प. प्राथमिक शाळेतील शै.वर्ष २०१८-१९ मधील शाळेतील उत्तीर्ण झालेल्या इ. ८वी च्या ३०विद्यार्थिनींना कन्या शाळेत इ. ९वी मध्ये नवीन प्रवेश दयावा असे मौखिक सूचना देण्यात आलेल्या असून सोबत शै.वर्ष २०१८-१९ ची इ.८ वी च्या विद्यार्थिनींची यादी देण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी येथील शै.वर्ष २०१९-२० करीता आवक टपालाव्दारे आलेल्या पालकांचे अर्जात त्यांच्या मुलींना इ.७ वी व इ.९वी च्या वर्गात कन्या शाळेत नवीन प्रवेश मिळावा असे ०२ विनंती अर्ज आलेले आहेत .तसेचशै.वर्ष २०१९-२० करीताइ. ७ वी च्या वर्गासाठी ३० विद्यार्थिनी व इ.९ वी च्या वर्गासाठी २२ विद्यार्थिनींना कन्या शाळेत प्रवेश मिळावा अशी पालकांनी विनंती केलेली असून शाळेकडील रजिस्टरला नांव नोंदणी केलेली आहे.

आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसार विद्यार्थिनींना नवीन प्रवेश द्यावा लागत असल्यामुळे या सर्व विद्यार्थिनींना प्रवेश दयावयाचा झाल्यास नैसर्गिक तुकडी वाढ करावी लागणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२०दि. १७/०६/२०१९ अखेरची विद्यर्थिनींची नवीन प्रवेश विद्यारर्थिनी संख्या व नवीन प्रवेश घेणेकरीता वेटींग रजिस्टरला नांव नोंदणी संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. न. | इयत्ता व तुकडी | शै. वर्ष २०१९-२० मध्यील विद्यार्थिनीं संख्या | शै. वर्ष २०१९-२० आजची एकूण व नवीन प्रवेश विद्यार्थिनी पट संख्या | शै. वर्ष २०१९-२० ची नवीन विद्यार्थिनीं संख्या ( वाढीव) | शै.वर्ष २०१९-२० ची एकूण विद्यार्थिनीं संख्या (वाढीव) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५वी अ | ६० | नवीन प्रवेश-**१२०** | - | १२० |
| २ | ५ वी ब | ६० | | | |
| ३ | ६ वी अ | ४९ | १०४ +<br>नवीन प्रवेश-२०<br>एकूण-**१२४** | - | १२४ |
| ४ | ६ वी ब | ५५ | | | |
| ५ | ७ वी अ | ७२ | १३९ | **प्रतीक्षा -३०** | १६९ |
| ६ | ७ वी ब | ६७ | | | |
| ७ | ८ वी अ | ५८ | ११२ +<br>नवीन प्रवेश-२३<br>एकूण- **१३५** | - | १३५ |
| ८ | ८ वी ब | ५४ | | | |
| ९ | ९ वी अ | ७६ | **१३९** | **प्रतीक्षा** -२२ + | १९१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | ९ वी ब | ६३ | | जि.प.प्राथ. शाळा- ३०<br>एकुण–५२ | |
| ११ | १० व अ | ६० | १२६ | - | १२६ |
| १२ | १० व ब | ६६ | | | |
| | एकूण | | ७८३ | ८२ | ८६५ |

विभागाची मागणी :-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी येथील शै.वर्ष २०१९-२० पासून इ. ७ वी व इ. ९ वी या वर्गासाठी प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी करावयाची झाल्यास सदर वाढीव तुकडीला अध्यापन करणेकामी ०३ वाढीव शिक्षकांची आवश्यकता भासणार आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे आजमितीस कार्यभार कमी असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक यांचा प्रस्तावीत वाढीव तुकडीला अध्यापन करणेसाठी उपयोग करता येईल असे नम्र मत आहे

संस्थान अधिनियम /टराव यानुसार अनुमान :- शालेय प्रशासनाचे दृष्टीने धोरणात्मक विषय आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी येथील शै.वर्ष २०१९-२० मध्ये आजमितीस इ. ७ वी च्या एकूण ०२ वर्ग तुकडी असून एकूण १३९ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. पालकांचे विनंती विचारात घेता आणखी ३० नवीन प्रवेश द्यावयाचे झाल्यास एकूण विद्यार्थी संख्या १६९ होणार आहे. तसेच इयत्ता ९ वी च्या एकूण ०२ वर्ग तुकडी असून एकूण १३९ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. पालकांचे विनंती विचारात घेता आणखी ५२ नवीन प्रवेश द्यावयाचे झाल्यास एकूण विद्यार्थी संख्या १९१ होणार आहे.

तरी उपरोक्त परिस्थिती विचारात घेता इ.७ वी व ९ वी च्या प्रस्तावीत दोन तुकडयामध्ये एक तुकडी वाढ करणेस ,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय विभागाकडे कार्यभार कमी असलेने ०३ शिक्षक कन्या विद्या मंदीर विभागाकडे वर्ग करणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.३३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इयत्ता ७ वी व इयत्ता ९ वी ची प्रत्येकी १ वाढीव तुकडी सुरु करणेस तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार कमी असलेले ०३ शिक्षक कन्या विद्या मंदीर विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.१९** **साईबाबा भक्तनिवास इमारतीतील नविन A,B,C व D विंग प्रणाली अमंलात आणणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमातील विनियम २१ मधील पोटकलम (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव:- निरंक

प्रस्तावना:- साईबाबा भक्तनिवास्थान विभागात एकुण ४९६ रुम तसेच १९८ लॉकर साईभक्तांचे वापरात आहेत. त्यात प्रतिदिनी एकुण ३७२० ते ३८०० पर्यंत साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते.

श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची साईबाबा भक्तनिवास विभागात निवासाची सोय करण्यात येते. सदर साईभक्त हे रुम कांऊटर बुकींगव्दारे किंवा ऑन लाईन पध्दतीने खोल्या आरक्षित करतात.

१) संदर्भ क्र. २ अन्वये संरक्षण विभागाने साईबाबा भक्तनिवास विभागात वाढत्या चोरीचे प्रमाणामुळे इमारतीमध्ये काही आवश्यक ते बदल खालील प्रमाणे सुचविलेले आहेत.

| अ.नं. | संरक्षण विभागाचा सुचविलेले उपाय योजणाचा तपशिल |
|---|---|
| ०१ | आपले विभागाकडील असणा-या सर्व विंगपैकी A,B,C व D,असे फक्त ४ विंग सुरु ठेवावेत इतर विंग कमी करण्यात याव्यात. |
| ०२ | वरील सर्व विंगचे जिने व बाजुच्या लिप्ट ठेवून इतर जिने आपात्कालीन मार्ग म्हणुन ठेवावेत. |
| ०३ | सदर जिना व लिप्ट जवळच मदतनिसाचा पॉईन्ट ठेवावा. |
| ०४ | सर्व इमारतींचे कॉर्नरच्या रुम स्टोअर रुम म्हणुन वापरण्यात याव्यात. |
| ०५ | A,B,C व D, विंगचे शेवटी ग्रीलचे शटर बसवावेत व त्याची चावी संबंधित विंग मदतनिस यांचेकडे ठेवावी. |
| ०६ | प्रत्येक विंगचे माळयावर एक सीसीटीव्ही कॅमेरा बसवावा. |
| ०७ | प्रत्येक विंग मदतनीस यांनी डयुटी वेळी पुर्ण ब्लॉकडे लक्ष दयावे. |

संदर्भ क्र. ०३ अन्वये दि. २९/०४/२०१९ रोजीचे  टिपणी मध्ये मा. प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमुद केलेल्या निर्देशान्वये ‘ त्यांनी पुढील प्रमाणे सुचीत केलेले होते. ‘ संरक्षण विभागाचे नजरेस सदर बाब अणावी व तयांच्या माणीप्रमाणे व संरक्षणाचे दृष्टी कोनातुन सदर बाब तपसुन संरक्षण विभागाचे अभिप्राय घ्यावे ‘ असे निर्देश दिलेल होते.

सदर्भ क्र.०४ नुसार साईबाबा भक्तनिवास विभागाने जा.नं. २३/२४० दि. ०१/०५/२०१९ रोजीचे पत्राने A,B,C व D, विंग प्रणाली आमलात आणणे बाबत संरक्षण विभागास अभिप्राय इकडिल विभागास पत्राने कळविण्यात आले आहे.

२) त्याप्रमाणे संदर्भ क्र. ०५ अन्वेय संरक्षण विभागाणे जा.नं.-१९७/२०१९ दि.०३/०६/२०१९ रोजीचे  पत्राने खालील प्रमाणे उपाय योजणा सुचविण्यात आलेल्या आहे.

| अ.नं. | संरक्षण विभागाचा अभिप्राय तपशिल |
|---|---|
| ०१ | साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन A,B,C व D,असे ०४ विंग तयार करण्यात यावेत. |
| ०२ | माळयावरील  मदतनीसाचा टेबल प्रत्येक विंगचे लिप्टशेजारी ठेवावा. |
| ०३ | नव्याने तयार करण्यात येणा-या A,B,C व D,या ०४ विंग करीता एका विंगमधुन दुस-या विंगमध्ये ये-जा करता येवु नये याकरीता प्रत्येक विंगच्या कॉर्नरवर लोखंडी ग्रील बसवुन, मज्जाव करण्यात यावा. |
| ०४ | माळयांवरील मदतनीस कर्मचा-यांना सतर्क राहणेबाबात योग्य त्या सुचना देण्यात याव्यात . |

प्रस्ताव :-

अ) इमारतीमधील जुने विंगचे नविन विंग मध्ये करण्यात आलेले बदल खालील प्रमाणे .

| अ.नं. | जुने विंग | | | | अ.नं. | नविन विंग | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन १९९४ मध्ये विभाग चालु झालेपासुन पुढील  प्रमाणे विंग करण्यात आलेल्या होत्या. A,  AB,  BC, CD,  DA- ५ विंग | | | | १ | आता नविन  विंग  करण्यात आलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे. A , B, C  व  D – ४ विंग | | | |
| | रुम नंबर प्रणाली | | | | | रुम नंबर प्रणाली | | | |
| | विंग | रुम नंबर | | एकुण रुम | | विंग | रुम नंबर | | एकुण रुम |
| | A, | तळमजला | २ ते १८ व A-1 AC,B-1 AC | १९ | | A | तळमजला | ०२ ते १८ व A-1 AC | १८ |
| | | पहीला मजला | १०६ ते १३३ | २८ | | | पहीला मजला | १०१ ते १४१ , A-2 VIP,A-2 HALL | ४३ |
| | | दुसरा मजला | २०६ ते २३५ | ३० | | | दुसरा मजला | २०१ , २०६ ते २४३ =३९,A-9, C, N/AC-18, A-3 VIP, A-3 HALL | ४३ |
| | | तिसरा मजला | ३०३ ते ३३० =२८ A-301,A-302 HALL | ३० | | | तिसरा मजला | ३०१ते३३८=३८ A-4 VIP,A-4 HALL | ४० |
| | AB | तळमजला | १९ ते ५०=३२ ,C-1,B-5 VIP | ३४ | | B | तळमजला | १९ ते ५० = ३२ B-1 AC | ३३ |
| | | पहीला मजला | १३४ ते १४१ =०८, १०१ ते १२६ =२६, A-2,B-2 VIP,A-2 HALL | ३७ | | | पहीला मजला | १०१ते१३२=३२ B-2 ,B-6 VIP,B-2 HALL | ३५ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दुसरा मजला | २३६ते२४३=०८, २०१ ते २२६=२६, A-3,B-3 VIP,A-3 HALL | ३७ | | | दुसरा मजला | २०१ ते२३२=३२ B-3,B-7 VIP, B-3 HALL | ३५ |
| | | तिसरा मजला | ३३१ ते ३३८ =०८, ३०१ ते ३२४ =२४, A-4,B-4 VIP,A-4 HALL | ३५ | | | तिसरा मजला | ३०१ ते ३३२=३२ B-4,B-8 VIP, B-4 HALL | ३५ |
| | BC, | तळमजला BC (लॉकर) | १ ते १२६= १२६ | हॉल | | | **Bc लॉकर तळमजला** | B-5,C-1 VIP= ०२ रुम १ ते १२६ = १२६ लॉकर | |
| | | तळमजला C (लॉकर) C तळमजला रुम | १२७ ते १९८=७२<br>५१ ते ६१=११ | हॉल<br>११ | | C | तळमजला | रुम नं.५१ ते ६१= ११ रुम १२७ ते १९८= ७२ लॉकर | |
| | | पहीला मजला | १२७ ते १३२=०६, १०१ ते १२२=२२ C-2 ,B-6 VIP,B-2 HALL | ३१ | | | पहीला मजला | १०१ ते १४१, C-2 VIP | ४२ |
| | | दुसरा मजला | २२७ ते २३२=०६, २०१ ते २२२=२२ C-3,B-7 VIP,B-3 HALL | ३१ | | | दुसरा मजला | २०१ ते २४३, C-3 VIP | ४४ |
| | | तिसरा मजला | ३२५ ते ३३२=०८ ३०१ ते ३२२=२२ C-4,B-8 VIP,B-4 HALL | ३३ | | | तिसरा मजला | ३०१ते३४३=४३ C-4 ,C-7 VIP, | ४५ |
| | | | | | | D | तळमजला | गाळे/शॉप | ०० |
| | CD | पहीला मजला | १२३ ते १४१=१९ १०१ ते १०७=०७ C-5,D-1 VIP,C-1 HALL | २९ | | | पहीला मजला | १०१ ते १२९ , D-1VIP,C-5 VIP,C-1 HALL | ३२ |
| | | दुसरा मजला | २२३ ते २४३=२१ २०१ ते २०९=०९ C-6,D-2 VIP,C-2 HALL | ३३ | | | दुसरा मजला | २०१ ते २१९ व २३२= २० AC-1 TO 8=08 T-SUIT,C-6 VIP,D-1 VIP, C-2 HALL | ३२ |
| | | तिसरा मजला | ३२३ ते ३४३ =२१ ३०१ ते ३०९=०९ C-7,D-3 VIP,C-3 HALL | ३३ | | | तिसरा मजला | ३०१ ते ३३४=३३ D-3 VIP,A-6 VVIP, D-5 VVIP,C-3 HALL | ३७ |
| | DA | पहीला मजला | १०८ ते १२९=२२ १०१ ते १०५=०५ | २७ | | | | | |
| | | दुसरा मजला | २१० ते २१९=१०, | २३ | | | | | |
| | | दुसरा मजला | A/C-०१ ते | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ०९=०९ T-SUIT, NAC-18, 232,201 | | | | | | |
| | | तिसरा मजला | ३१० ते ३३४=२५ D-5,A-6 VVIP | २६ | | | | | |
| एकुण | | | | ५२७ | | एकुण | | | ५२७ |

ब) जुने विंग व नविन विंग नुसार कर्मचारी संख्या तक्ता.

| अ.नं. | जुने विंग | | | | | | अ.नं. | नविन विंग | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | मजल्यावरील मदतनिस डयुटी पॉईन्ट | | | | | | २ | मजल्यावरील मदतनिस डयुटी पॉईन्ट | | | | | |
| | विंग | शिप्ट | | | | एकुण | | विंग | शिप्ट | | | | एकूण |
| | A, | मजला | ०४ ते १२ | १२ ते २० | २० ते ०४ | संख्या | | A | मजला | ०४ ते १२ | १२ ते २० | २० ते ०४ | संख्या |
| | | तळमजला | १ | १ | १ | ३ | | | तळमजला | १ | १ | १ | ३ |
| | | पहीला मजला | १ | १ | १ | ३ | | | पहीला मजला | २ | २ | १ | ५ |
| | | दुसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | दुसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | | तिसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | तिसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | | | | | | | | | | | | | |
| | B | तळमजला | १ | १ | १ | ३ | | | तळमजला | २ | २ | १ | ५ |
| | AB, | पहीला मजला | १ | १ | १ | ३ | | | पहीला मजला | २ | २ | १ | ५ |
| | | दुसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | दुसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | | तिसरा मजला | १ | १ | १ | ३ | | B | तिसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | C | तळमजला | १ | १ | १ | ३ | | | तळमजला लॉकर | १ | १ | १ | ३ |
| | BC, | पहीला मजला | १ | १ | १ | ३ | | C | तळमजला | १ | १ | १ | ३ |
| | | दुसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | पहीला मजला | २ | २ | १ | ५ |
| | | तिसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | दुसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | BC, | लॉकर तळमजला | १ | १ | १ | ३ | | | तिसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | CD, | पहीला मजला | १ | १ | १ | ३ | | | | | | | |
| | | दुसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | तळमजला | ० | ० | ० | ० |
| | | तिसरा मजला | १ | १ | १ | ३ | | D | पहीला मजला | २ | २ | १ | ५ |
| | DA | पहीला मजला | १ | १ | १ | ३ | | | दुसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | | दुसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | तिसरा मजला | २ | २ | १ | ५ |
| | | तिसरा मजला | १ | १ | १ | ३ | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| एकुण कर्मचारी शिप्टनिहाय | | | १९ | १९ | १९ | ५७ | | एकुण कर्मचारी शिप्टनिहाय | | २९ | २९ | १६ | ७४ |
| ३ | एका मदतनिसास २७ रुम देखरेख करता येत होती. | | | | | | ३ | दोन मदतनिसास प्रत्येकी साधारण १८ ते २५ रुम देखरेख करता येते. | | | | | |

क) सध्या कार्यरत असलेल्या मदतनिस कर्मचा-यांचे कामाचे स्वरुप, जबाबदारी व वर्कलोड बाबतचा तपशिलवार माहिती तक्ता.

| अ.नं | पदनाम | कामाचे स्वरुप / जबाबदारी | कामाची वेळ/शिफ्ट | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मदतनिस | ०१) खोली खाली झालेनंतर बेडशिट, उशिकव्हर , बदलुन देणे तसेच आरसा, टी पॉय, खुर्ची, सफाई करणे.<br>०२) साईभक्तांना जादा गादी, चादर, बेडशिट, देवाण घेवाण करणे.<br>०३) खोली खाली करतेवेळी साईभक्तांचे खोली तपासून घेणे.<br>०४) स्वच्छता कर्मचारी यांचेकडुन खोली साफसफाई करुन घेणे.<br>०५)नोदणी केलेले खोल्याची मुदत संपलेबाबत भक्तांना महिती देणे.<br>०६)प्रत्येक शिप्ट मधील खाली झालेल्या खोल्याची जमा झालेले बेडशीट,उशीकव्हर स्टोअर मधुन बदलुन आणणे.<br>०७) साईभक्तांना देण्यात आलेल्या खोल्यांवरती नियंत्रण ठेवणे.<br>०८) पावतीवर नमुद असलेल्या व्यक्तींचे ओळखपत्राची व भक्तांची संख्याची पहाणी करुनच खोलीमध्ये प्रवेश देणे.<br>०९) जादा व्यक्ती आढळल्यास काऊंटरला येऊन जादा सेवाआकर पावती करुन घेणे.<br>१०) प्रत्येक शिप्टमध्ये खाली झालेल्या खोल्यांची साफसफाई करुन घेऊन चावी काउंटरला जमा करणे. | ४ ते १२ , १२ ते २०, २० ते ०४ तीनही शिप्ट . | साईभक्तांसाठी २४ तास सेवा पुरविण्याचे काम प्रत्येक शिप्टमध्ये चालते. त्यामुळे पुर्णपणे ०८ तास कामाचा वर्कलोड आहे |

ड) तिनही शिप्ट नुसार दैनंदिन खोली देण्याचे व खाली होण्याचे सरासरी प्रमाण पुढीलप्रमाणे.

<table>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td colspan="6">एकूण ४८४ खोल्यांपैकी</td><td rowspan="2">शेरा</td></tr>
<tr><td colspan="3">खोली आरक्षीत होण्याची संख्या शिप्टनिहाय सरासरी टक्केवारी</td><td colspan="3">खोल्या खाली होण्याची संख्या शिप्टनिहाय सरासरी टक्केवारी</td></tr>
<tr><td rowspan="2">दैनंदिन</td><td>०४ ते १२</td><td>१२ ते २०</td><td>२० ते ०४</td><td>०४ ते १२</td><td>१२ ते २०</td><td>२० ते ०४</td><td rowspan="3">खोली आरक्षीत व खाली होण्याचे सरासरी प्रमाण ४ ते १२ शिप्ट मध्ये जादा व इतर दोन शिप्ट मध्ये मध्यम स्वरुपाचे असते. परंतु साईभकतांची शक्यतो ऑनलाईन बुकिंग दोन दिवसाची असल्याने दैनंदीन सरासरी ४८ तासाप्रमाणे आहे.व सद्यस्थिती विंग ०५ आहे.</td></tr>
<tr><td>४५% ते ५५ %</td><td>४०% ते ४५ %</td><td>१५ % ते २०%</td><td>४५% ते ५०%</td><td>४०% ते ४५%</td><td>१०%ते १५%</td></tr>
<tr><td>खोली खाली होण्याचे प्रमाण २४ ते ४८ तासामध्ये (संख्या /२/५=)</td><td>२४० ते २५०</td><td>१७० ते १७५</td><td>५५ ते ४०</td><td>२६० ते २६५</td><td>१८० ते १८५</td><td>३५ ते ४०</td></tr>
</table>

विभागाची मागणी:- साईबाबा भक्तनिवास इमारतीतील नविन विंग प्रणाली " ए, बी, सी व डी" अशा चार विंग आमलांत आणणे बाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-

०१) सध्या ए, एबी, बीसी, सीडी, व डिए अशा पाच विंग कार्यरत आहेत. संरक्षण विभागाकडील दि.१८.०२.२०१९ रोजीचे व दि. ०३/०६/२०१९ रोजीचे अभिप्राय पत्रानुसार उपरोक्त नमुद ०१ व ०२ प्रमाणे "ए,बी,सी व डी" अशा चार विंग करता येतील असे नम्र मत आहे.

०२) नविन विंग ए,बी,सी, डी करणेकामी साईटेक संगणक प्रणालीत आवश्यक ते बदलाबाबत कार्यवाही माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेस.

०३) नविन कार्यपध्दतीमध्ये A,B,C,D, विंग प्रणाली आमलांत आणली तर प्रत्येक ४ ते १२ व १२ ते २० प्रत्येकी शिप्टप्रमाणे २९ - २९ कर्मचारी तसेच २० ते ०४ या शिप्टला १६ कर्मचारी डयुटी करतील व त्यांचे नियंत्रणाखाली अंदाजे १८ ते २५ खोल्या व २० ते ०४ शिप्ट मध्ये ३५ ते ४५ खोल्या येत आहेत.

०४) नविन विंग A,B,C,D, करणे कामी दोन विंगमधील कॉर्नरला व आपतकालीन जिन्याला जाळी गेट बसविणेकामी मॅकेनिकल विभागास कळविणेस मान्यता असावी.

०५) एका कर्मचा-यांस पुर्ण मजल्यावरील भौगोलिक परिस्थिती व विंग तसेच रुम संख्येनुसार त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. म्हणुन लिप्टचे मध्यावर दोन भाग तयार करण्यात येऊन सुरवातीचे रुम नंबर लगत एक कर्मचारी आणि लिप्ट जवळ एक कर्मचारी नेमण्यात आल्यास सर्व खोल्यावर नियंत्रण ठेवणे अगदी सहज शक्य होईल असे नम्र आहे.

०६) जनरल शिप्ट मध्ये कर्मचारी रजा कालावधीत कामाची व्यवस्था आपआपसात करता येईल. परंतु २४ x ७ कालावधीत (तिन शिप्ट)
मध्ये भक्तांना सुविधा देताना रजा/सुट्टी कालावधीत त्या पॉईन्टवर बदली कर्मचारी असणे अत्यावश्यक आहे.

७) नविन विंग प्रणाली A,B,C,D, नुसार मजल्यावरील मदतनिसाचे ०४ ते १२, १२ ते २०, २० ते ४ या शिप्ट मध्ये डयुटी लावणेस मान्यता असावी.

०८) सि सि टि.व्ही कंट्रोल सेल मार्फत कॅमेरे बसवीणेबाबत सर्व्हे करण्यात आलेला असुन तातडीने सिसिटिव्ही विभागामार्फत कार्यवाही करणेस मान्यता असावी.

०९) नव्याने नविन विंग प्रणाली " ए, बी, सी व डी" अशा चार विंग तयार करुन त्याची अमंलबजावणी करणेस मान्यता असावी.

सदर नविन विंग प्रणाली " ए, बी, सी व डी"आमलांत आणणे तसेच ०१ ते ०९ मुद्यांचे मान्यतेकरीता सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास इमारतीतील नविन A,B,C व D विंग प्रणाली अमंलात आणणेस व प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/मेकॅनिकल विभाग/सीसीटीव्ही कक्ष)**

---

**विषय नं.२०** **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१)घ नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रस्तावना– लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीनुसार दररोज सरासरी अंदाजे ४० ते ५० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटे तसेच सरासरी २५ ते ३० हजार लाडु प्रसाद पाकीटांची निर्मिती विक्री केली जाते. श्रींचे उत्सवामध्ये ही संख्या वाढुन अंदाजे ६५ ते ७० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप केले जाते व अंदाजे ४० ते ५० हजार लाडु प्रसाद पाकीटांची विक्री केली जाते. याकामी लागणारे कडधान्य (हरभरा दाळ) मशिनव्दारे व मनुष्यबळाव्दारे दाळीमध्ये निघणा-या काडया ,खडे काढुन स्वच्छ करण्यात येते व त्यानंतर सदरची हरभरा दाळ गिरणीवर दळुन पीठ तयार करून घ्यावी लागते, यामध्ये दाळीचे प्रत्यक्ष वजन व दाळ दळल्यानंतरचे वजन यात तफावत( घट-तुट) येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) अन्वये, सन २००७-०८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आली होती. मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना अंतर्गत लेखापरीक्षक - मा.श्री ए.जी.लोंगाणी व मुख्यलेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी

खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती त्यास मा.व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-०८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असुन इतरांचे तुलनेने कमी असल्याने प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट जमा-नांवे टाकणेत यावी.

२. दर ६ महिन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.

३. दर ६ महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा, मात्र प्रस्तावित सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीनुसार दरवर्षी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली आहे.

त्यास अनुसरून सन २०१८-१९ मध्ये कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल

(कालावधी दिनांक -०१/०४/२०१८ ते दिनांक -३१/०३/२०१९)

| दिनांक | किराणा मालाचा तपशिल | आवक किराणा माल | खर्च झालेला किराणा माल | प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण (प्रती क्विंटल) | मान्य घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम |
| दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ | हरभरा दाळ | ७००७१७.५०० | ६९४६७५.५०० | २४७६.०० | ०.३५३ ग्रॅम | ०२ .०० |
| दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ | हिरवी विलायची | ३०००.७९८ | २९६४.७९८ | २५.०० | ०.८३३ ग्रॅम | ०१.०० |

मागणी- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये विभागाकडे प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची पुर्व व अंतर्गत लेखापरिक्षक यांचे कडुन तपासणी करण्यात आली होती.

उपरोक्त तक्त्यातील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत– लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेली घट-तुट ही मा.मुख्यलेखाधिकारी तसेच अंतर्गत लेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या सुचनांना (नियमावली) अधीन राहुन आहे, तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मान्य घट-तुटीचे प्रमाणापेक्षा लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाची प्रत्यक्ष घट-तुट कमी आहे. त्यास अनुसरून सदरच्या अहवालाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेली घट-तुट अहवालाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.२१** **महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी शिर्डी येथे नियुक्त केलेल्या कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांना वैद्यकीय सेवा पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सीआयएसएफ कर्मचारी व एमएडीसी कर्मचारी व त्यांचे अवलंबितांना सीजीएचएसच्या दरानुसार उपचार करणे सोपे व सोईस्कर होणेकरीता श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालये व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेमध्ये करार करणेबाबत विनंती केलेली आहे.

संदर्भीय पत्र क्र.०२ अन्वये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी यांचेमध्ये करार करता येणार नाही या संदर्भात टिपणी सादर केलेली होती त्यावर मा.उप जिल्हाधिकारी सो यांनी कॅशलेससाठी आवश्यक ती प्रक्रिया त्वरीत सुरु करावी असे आदेश केलेले आहे.

परंतु संदर्भीय पत्र.क्र.३ व ४ अन्वये पुन्हा सीआयएसएफ कर्मचारी व एमएडीसी कर्मचारी व त्यांचे अवलंबितांना सीजीएचएसच्या दरानुसार उपचार करणे सोपे व सोईस्कर होणेकरीता श्री साईबाबा संस्थान रुग्णालये व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचे मध्ये करार करणेबाबत विनंती केलेली आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय .

१. जे कर्मचारी किंवा कर्मचा-यांवर अवलंबीत रुग्ण उपचार/तपासणी साठी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात येणार आहे त्यांचे हमीपत्र (Including I Card No , कर्मचा-याचे नाव , अवलंबिताचे नाव ) देणे गरजेचे राहील.

२. ज्या कर्मचा-यांचे किंवा अवलंबितांचे हमी पत्र आले अशा रुग्णांचे उपचार/तपासण्या हया एमएडीसी यांनी सीजीएचएच च्या नियमानुसार पाठविलेले दर व श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील दर यांचेमध्ये तफावत असल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलच्या Accounting/Billing च्या दृष्टीने मा. व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या दराप्रमाणे बील आकारणेत येईल तसेच ज्या तपासण्या /उपचार श्री साईनाथ रुग्णालयात होणार आहेत त्यावर मा.व्यवस्थापन समितींच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार कुठलेही बिल (रजिस्ट्रेशन फि वगळुन) आकारणेत येणार नाही

३. जे कर्मचारी किंवा अवलंबित रुग्ण उपचार/तपासणी साठी येणार आहेत त्यांना एमएडीसी Authority letter /क्रेडीट नोट देणेस तयार असलेमुळे व नंतर बीलाची संपुर्ण रक्कम मिळणार असलेमुळे रुग्णाचे तपासण्या /उपचाराचे बील एमएडीसीला वित्त विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांचेमार्फत सादर केल्यावर ३० दिवसाचे आत श्री साईबाबा संस्थानचे खाती जमा करावे लागतील.

४. तसेच जे उपचार श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात होत नाही त्यासाठी दुसरे रुग्णालयात उपचारासाठी जावे लागेल.

५. जी औषधे/इंजेक्शन श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात उपलब्ध असतील ते एमएडीसी/सीजीएसचएस च्या कर्मचा-यांना देणेत येतील व जी औषधे /इंजेक्शन उपलब्ध नसतील ती एमएडीसी/सीजीएचएस च्या कर्मचा-यांना किंवा अवलंबितांना बाहेरुन स्व खर्चाने आणावी लागतील

वरील नमुद केलेल्या अटीच्या अधिन राहुन वैद्यकीय सेवा देणेसाठी महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी यांचेमध्ये सामंजस्य करार करता येईल .सदरची बाब संबंधीत एअरपोर्ट संचालक ,महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांना पत्रादवारे कळविणेत येणार आहे.

तरी सदरच्या विषयाबाबत कार्योत्तर मान्यता मिळणेकरीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अटीनुसार महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी शिर्डी येथे नियुक्त केलेले कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांना संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत त्यांचेशी करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल / श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२२** **आपत्कालीन स्थितीत १० बेड आरक्षीत करणेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विमानतळाच्या प्रवाशांसाठी आपत्कालीन हॉस्पिटलायझेशनसाठी कमीत कमी १० बेडचे आरक्षण नियम व अटीसह नुतनीकरण करणे आवश्यक आहे असे सुचविलेले आहे म्हणुन सामंजस्य करारातील मसुदयातील क्लॉज क्र.०१ आणि ०४ मधील सामंजस्य कराराचे नुतनीकरण करण्याची विनंती केलेली होती.

संदर्भीय पत्र क्र.०२ अन्वये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेमध्ये झालेला सामंजस्य करार हा यापुर्वीच संपलेला आहे शिर्डी विमानतळ काकडी येथे पुरविणेत आलेल्या रुग्णवाहिकेचे सेवेबाबत आकारणेत आलेले भाडे रक्कम रु २७,०१,९३५/- अद्याप पर्यंत श्री साईबाबा संस्थान खाती जमा झालेले नाहीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित श्री साईबाबा

हॉस्पिटलची कार्यान्वीत बेड संख्या ही २५० आहे त्यात आयसीसीयु बेड संख्या ६१ असुन ती पुर्ण क्षमतेने भरलेली असते. आपत्कालीन स्थितीत १० बेड आरक्षीत करणे शक्य होणार नाही त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेमध्ये १० बेड आरक्षीत ठेवणेबाबत सामंजस्य करार करता येणार नाही असे जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/वै.प्र/३२३५/२०१९ दि.२३/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे स्वाक्षरीने श्री .सी.एस गुप्ता, कार्यकारी संचालक, शिर्डी विमानतळ काकडी यांना कळविलेले आहे.

आता संदर्भीय पत्र क्र.०३ अन्वये श्री दिपक शास्त्री एअरपोर्टसंचालक ,शिर्डी इंटरनॅशनल एअरपोर्ट शिर्डी यांचा ईमेल इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे आपत्कालीन स्थितीत १० बेड आरक्षीत करणेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत विनंती केलेली आहे.

यामागील पार्श्वभुमी –

१. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये ऑगस्ट २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या सहा महिन्याच्या कालावधीसाठी रुग्णवाहिका व १० बेड आपत्कालीन काळात आरक्षीत ठेवणेबाबतचा सामंजस्य करार करणेत आलेला होता.

२. सदर सामंजस्य करार हा फेब्रुवारी मध्ये मध्ये संपलेनंतर महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीचे विनंतीवरुन दि.१०/०४/२०१८ पर्यंत रुग्णवाहिकेची सेवा देण्यात आलेली होती.

३. दि.०७/०३/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे आयत्या वेळेचा विषय नं-०७ निर्णय क्र .२०६ नुसार मनुष्यबळ व वाहन चालक यांचे कमतरतेमुळे एअरपोर्ट प्राधिकरण यांना शिर्डी विमानतळावर पुरविणेत येणारे रुग्णवाहिकेची सेवा बंद करणेत यावी असे ठरले होते.

४. दि.०५ एप्रिल २०१८ रोजी सदरचा निर्णय मा.पी.व्ही.पाडालकर सह.व्यवस्थापक (विमानतळ) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी,मुंबई यांना कळविणेत आलेली होते.

५. दि.२६ ऑक्टोबर २०१८ रोजी सीएस गुप्ता कार्यकारी संचालक, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचे १० बेड राखीव ठेवणेसाठी सामंजस्य कराराचे नुतनीकरण करावयाचे पत्र आलेले आहे.

६. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये झालेला सामंजस्य करार हा यापुर्वीच संपलेला आहे. शिर्डी विमानतळ काकडी येथे पुरविणेत आलेल्या रुग्णवाहिकेच्या सेवेबाबत आकारणेत आलेले भाडे रक्कम रु २७,०१,९३५/- पैकी रु २४,००,०००/- इतकी रक्कम श्री साईबाबा संस्थान खाती जमा केलेले आहेत व उर्वरीत रक्कम येणे बाकी आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीसंचलित श्री साईबाबा हॉस्पिटलची कार्यान्वीत बेडसंख्या ही २५० आहे त्यात आयसीसीयुची बेडसंख्या ६१ असुन ती पुर्ण क्षमतेने भरलेली असते अशास्थितीत१० बेड आरक्षीत करणे शक्य होणार नाही त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचे मध्ये १० बेड आरक्षीत ठेवणेबाबत सामंजस्य करार करता येणार नाही असे जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ वै.प्र/ ३२३५/२०१९ दि.२३/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने श्री सी.एस.गुप्ता, कार्यकारी संचालक, शिर्डी विमानतळ काकडी यांना कळविलेले आहे.

७. शिर्डी विमानतळ काकडी येथे पुरविणेत आलेल्या रुग्णवाहिकेचे सेवेबाबत आकारणेत आलेल्या भाडेपैकी काही रक्कम श्री साईबाबा संस्थानचे खाती जमा करणेत आलेली आहे.

८. दि.०४ एप्रिल २०१९ रोजीचे ईमेल व्दारे श्री दिपक शास्त्री एअरपोर्ट संचालक, शिर्डी इंटरनॅशनल एअरपोर्ट यांनी १० बेड राखीव ठेवणेसाठी व त्या अनुषंगाने सामंजस्य करार करणेसंबधी विनंती केलेली आहे.

विभागाचे स्पष्ट मत-

१. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये झालेला सामंजस्य करार हा यापुर्वीच संपलेला आहे.

२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटलची कार्यान्वीत बेडसंख्या ही २५० आहे त्यात आयसीसीयुची बेडसंख्या ६१ असुन ती पुर्ण क्षमतेने भरलेली असते. त्यामुळे शिर्डी इंटरनेशनल एअरपोर्टसाठी यांनी १० बेड राखीव ठेवता येणार नाही.

३. परंतु आपत्कालीन परिस्थीती निर्माण झाल्यास १० बेडची उपलब्धता करुन देता येईल.

४. आपत्कालीन स्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १० बेड आरक्षीत करावे याऐवजी आपत्कालीन स्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलने उपचाराकरीता १० बेड उपलब्ध करुन दयावे असे एमओयुमध्ये बदल करुन सामंजस्य करार करता येईल व त्यानुसार परिस्थीतीनुसार बेड उपलब्ध करता येईल असे मत आहे.

मागणी- तरी आपत्कालीन स्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १० बेड आरक्षीत करावे याऐवजी आपत्कालीन स्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलने उपचाराकरीता १० बेड उपलब्ध करुन दयावे असे एमओयुमध्ये बदल करुन महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १० बेड आरक्षीत न ठेवता आपत्कालीन स्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १० बेड उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेशी सामंजस्य करार करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२३** **ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेले परिचारीकांचा इनसोर्स कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेऊन इनसोर्स कंत्राटी परिचारीका यांचे वेतनाप्रमाणे मासिक वेतन मिळणे बाबत दि.०२.०५.२०१९ व दि.०४.०५.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.- १. मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६.

श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.

२. मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४.

महाराष्ट्र दुकाने व व्यपारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना-११ महिने कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत आऊटसोर्स पध्दतीने कार्यरत स्टाफनर्स ऋषिकेश कोते व इ. यांचे कंत्राटी पध्दतीने इनसोर्समध्ये संस्थान सेवेत घेणेबाबतचे दि. ०२/०५/२०१९ व दि.०४/०५/२०१९ रोजीचे अर्ज प्राप्त झाले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"आम्ही खालील सह्या करणा-या सर्व परिचारीका साईनाथ रूग्णालय व साईबाबा हॉस्पीटल मध्ये सन २०१८ पासुन कंत्राटी आऊटसोर्स पध्दतीने परिचारीका म्हणुन ११ महिने करारावर काम करीत आहोत आम्हाला मासिक रू. ७०००/- ते रू.८०००/- इतके वेतन मिळते. मिळणारे वेतन अत्यंत कमी असुन, कमी पगारावर घरखर्च भागविणे अडचणिचे होत आहे. तसेच साईनाथ रूग्णालय व साईबाबा हॉस्पिटल मध्य इनसोर्स कंत्राटी पध्दतीने काम करणा-या परिचारीका यांना मासिक साधारणता रू. १४,०००/- ते १५०००/- पर्यंत वेतन मिळते. तसेच इनसोर्स कंत्राटी व आऊटसोर्स कंत्राटी या दोन्ही परिचारीका करित असलेल्या कामाचे स्वरूप एकच आहे. कामाचे स्वरूप एकसारखेच असुनही दोन्ही परिचारीका यांना मिळणा-या मासिक पगारात मोठ्या प्रमाणात (रू. ७००० ते ८०००) इतकी तफावत आहे. तरी आम्ही सर्व आऊटसोर्स कंत्राटी पध्दतीने काम करीत असणा-या परिचारीका (स्टाफनर्स) आपणास विनंती करतो की, आम्हाला इनसोर्स कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेऊन, इनसोर्स कंत्राटी परिचारीका यांचे वेतनाप्रमाणे मासिक वेतन देण्यात यावे, ही नम्र विनंती."

मा व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १७३ नुसार, श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रूग्णालयांकरिता फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, ज्यु पीएमटी टेक्निशियन, ज्यु बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर व फार्मासिस्ट या पॅरामेडीकल पदांवर कंत्राटदारांमार्फत नेमणूकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या होत्या सदर मुलाखतीतुन निवड केलेल्या

उमेदवारांना प्रत्येकी मासिक रू.११,०००/- मेहनताना देणेबाबत ठरले. तसेच मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६६/४ नुसार सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/परिचारीका यांना प्रतिमहा रू.११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त कर्मचा-यांव्यतिरीक्त बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या इतर (कुशल व अकुशल) कर्मचा-यांचा कामगार विभागामार्फत किमान वेतन दराने एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ नुसार, संस्थानमध्ये बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रतीदिन वेतनावर ४०% वाढ देण्यात आली. तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.

मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ नुसार दिलेली वेतनवाढ किमान वेतन दरानुसार देणेत येत असलेल्या वेतनावर दिलेली आहे. तर मा व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार दिलेली वेतनवाढ रू. ११,०००/- या मासिक एकत्रित वेतनावर दिलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार ज्या कर्मचा-यांना ११,०००/- मासिक एकत्रित वेतन देण्यात येत होते त्यांचे वेतन १५,४००/- इतके झाले आहे.

दि. २०/०२/२०१८ रोजीचे टिपणीत नमुद केलेले अर्जदार यांची कुशलची मंजुरी असुन त्यानुसार बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत असल्याने त्यांना दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ नुसार त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ कामगार विभागामार्फत देण्यात आलेली असुन सध्या त्यांना सर्वसमावेशक एकत्रित किमान वेतन रू. ४५५.३४ प्रती दिवस या दराने महिन्यातील ड्युटीनुसार ( प्रतिमहिना जास्तीत जास्त २६ दिवस) वेतन अदा करणेत येत होते.

आता, मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४ नुसार, महाराष्ट्र दुकाने व व्यपारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यास मान्यता देण्यात आली.

सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात खालीलप्रमाणे परीचारीकांच्या नेमणूका आहेत.

| नेमणूकीचा प्रकार | शैक्षणिक पात्रता | सध्याचे देय वेतन |
|---|---|---|
| कायम / स्थायी | जीएनएम / बीएसस्सी नर्सिंग | पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० नुसार वेतन रू. ३२६७०/- |
| संस्थान आस्थापनेवर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने | जीएनएम / बीएसस्सी नर्सिंग | रू. १५,४००/- |
| लेबर ठेकेदारामार्फत कंत्राटी स्टाफनर्स | जीएनएम / बीएसस्सी नर्सिंग | प्रति दिन ५९२.३१ |
| शासन मंजुरीनुसार श्री साईनाथ रूग्णालयात लेबर ठेकेदारामार्फत ११ महिने कालावधीसाठी आऊटसोर्स पध्दतीने २५+१० स्टाफनर्स | जीएनएम / बीएसस्सी नर्सिंग | प्रति दिन ३३७.०७ |
| श्री साईबाबा रूग्णालयात लेबर ठेकेदारामार्फत ११ महिने कालावधीसाठी आऊटसोर्स पध्दतीने ६ स्टाफनर्स | जीएनएम / बीएसस्सी नर्सिंग | प्रति दिन ३२५.२४ |

सन २००९ चे मंजुर आकृतीबंधात परिचारीकांची पदसंख्या सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| हॉस्पिटल | मंजुर पदसंख्या | | भरलेली पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आकृतीबंधतील मंजुरी | शासन मंजुरी | स्थायी | संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी | ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने | बाह्ययंत्रणेमार्फत ११ महिने कालावधीसाठी |
| श्री साईबाबा | २०० | ०० | १०१ | ०८ | ७७ | ०६ |
| श्री साईनाथ | १२७ | २५ | ६० | ०२ | ५८ | ३५ |
| एकुण | ३२७ | २५ | १६१ | १० | १३५ | ४१ |

शासन निर्णय क्र.सासवि १०१७/६२५/प्र.क्र.६७/का.१६ दि. १८/१२/२०१७ अन्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी श्री साईनाथ रूग्णालयात बाह्ययंत्रणेद्वारे परिचारिकांची नियुक्ती करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनेवर परिचारिका संवर्गातील (रू.९३००-३४८००+४२००) २५ काल्पनिक पदे निर्माण करून त्यावर पात्र परिचारीकांची नियुक्ती व्यवस्थापन समितीला करता येईल असे कळविले होते. त्यास अनुसरून दि. ११/०१/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये २५ काल्पनिक परिचारीका पदांवर व श्री साईनाथ रूग्णालयाचे आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या परिचारीकांचे १० पदांवर अशा एकुण ३५ पात्र परिचारीकांची सेवा बाह्ययंत्रणेमार्फत ११ महिने कालावधीसाठी घेणेत आलेले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या ०६ परिचारीकांचे पदावर ११ महिने कालावधीसाठी बाह्यएजन्सीमार्फत (आऊटसोर्सिंद्वारे) घेणेत आलेल्या आहेत.

हॉस्पिटलसाठी मंजुर असलेला आकृतीबंध सन २००९ चा असुन त्यानंतर हॉस्पिटलमध्ये नव्याने वॉर्डसंख्या, बेडसंख्या वाढविलेली असुन रूग्णसंख्याही वाढलेली आहे. त्याकरीता आणखी परिचारीकांची / स्टाफनर्सची आवश्यकता असल्याने दि. १८/१२/२०१७ रोजीचे शासननिर्णयानुसार २५ परिचारीका व त्यावेळी श्री साईनाथ रूग्णालाचे मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या पदावर १० परिचारीका अशा एकुण ३५ परिचारीकांची सेवा बाह्ययंत्रणेद्वारे ११ महिने कालावधीसाठी घेणेत येत आहे.

दि. २९/०१/२०१६ रोजी मा सर्वोच्च न्यायालय येथे रिट पिटीशन (सी) नं ५२७/२०११ ट्रेन नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इ. मध्ये खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

3. Upon hearing the learned counsel and going through the petition, we feel that the nurses who are working in private hospitals and nursing homes are not being treated fairly in the matter of their service conditions and pay.

4. We expect that the central government will look into the grievances ventilated in this petition, by forming a committee within four months from today. We are sure that after examining the faotual situation, if the committee is of the view that the grievances ventilated in the petition are correct, the committee will make its recommendations, so as to do the needful for improvement of working conditions and pay of the nurses working in private hospitals and nursing homes within six months from its constition, which can ultimately be given a form of legislation by the respondent-states or by the central government itself.

5. We are sure that the recommendations of the committee shall be duly considered by the central government and it shall do the needful.

6. We do not propose to give any guidelines, as prayed for in this petition, as the grievances are to be looked into by the committee consisting of experts.

7. So far as the grievance, with regard to system of execution of bonds by private hospitals and nursing homes, is concerned, the learned counsel appearing on behalf of

Indian Nursing Council has submitted that the said system has now been abolished. Therefore, the said grievance does not survive.

8. With the aforesaid directions, the writ petition stands disposed of.

सदर निर्णयास अनुसरून दि. २४/०२/२०१६ रोजी आरोग्य व परिवार कल्याण मंत्रालय, केंद्र शासन यांनी मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयास अनुसरून समिती स्थापन केली. सदर समितीने खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

Recommendations of the committee constituted in compliance of Hon'ble Apex Court Judgement dated 29.01.2016 in W.P.(C)527/2011, vide Ministry's order No. Z-29011/15/2013-N dated 24.02.2016.

Committee examined all the information collected from various states AIGNF and TNAI and felt that adequate salary and basic facilities are not provided to nurses employed in private hospitals/ nursing homes. Their pay and working condition is really pathetic and some steps are required to be taken to uplift the standard of working conditions in respect of nurses. After deliberations and discussions, the committee has made following recommendations:

1. Salary:

a. In case of >200 bedded hospitals, salary given to private nurses should be at par with the salary of State Govt. nurses given in the concerned State/ UT for the similar corresponding grade.

b. In case of >100 bedded hospitals, salary given to private nurses should not be more than 10% less in comparison of the salary of State Govt. nurses given in the concerned State/ UT for the similar corresponding grade.

c. In case of 50-100 bedded hosptials, salary given to private nurses should not be more than 25% less in comparison of the salary of State Govt nurses given in the concerned State ? UT for the similar corresponding grade.

d. Salary given to private nurses should not be less than Rs.20000/- pm in any case even for <50 bedded hospitals.

2. Working conditions:

a. Working conditions viz. leaves, working hours, medical facilities, transporration, accommodateion etc. given to nurses should be at per with the benefits granted to State Govt. nurses woring in the concerned State/UTs.

3. Steps should be taken by all States/ UTs for formulating legislation, guidelines to be adopted for implementation of the above recommendations in case of Nurses working in private hospitals/ institutions.

उपरोक्त शिफारसी आरोग्य व परिवार कल्याण मंत्रालय, केंद्र शासन यांनी दि. २०/०९/२०१६ रोजी स्विकारल्या असुन महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांनी दि. २४/११/२०१७ रोजी खालीलप्रमाणे नोटीफिकेशन काढलेले आहे.

This is to bring to kind notice of all head of institution / management regarding the judgement passed by Hon'ble Supreme Court dated 29/01/2016 in W.P©No. 527/2011 regarding the minimum salary to be paid to nurses working in private hosptials / institutions. The ministry of health & family welfare (Nursing Section), government of india have also issued notification dated 20th September 2016 for implementation of above said order in all private hosptials / clinical establishments across india. So kindly refer to the notification annexed herewith and implement the same with a view to safeguard the interest of Nurses.

सध्या उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे परिचारीकांच्या नेमणूका करणेत आलेल्या आहेत. साईबाबा संस्थान आस्थापनेवर ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या १० परिचारीका यांनी समान काम समान वेतन प्रथम नेमणूकीपासून फरकासहीत अदा करणेबाबत व कायम करणेबाबत मा औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (युएलपी) क्र ४१-५०/२०१८ दाखल केलेली आहे. सदर तक्रारीत दि. ३०/०३/२०१९ रोजी एक्झीबीट यु२ वर आदेश दिले असुन त्यात त्यांना ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देऊन कराराचे नुतनीकरण करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान -

१) प्रति दिन ३३७.०७ (३५ परिचारीकांचा सध्याचा वेतनदर)

२) प्रति दिन ३२५.२४ (०६ परिचारीकांचा सध्याचा वेतनदर)

३) प्रति दिन ३५७.८४ कुशल कर्मचा-यांचे सध्याचे वेतनदर

प्रस्तावातील (२५+१०)३५ (साईनाथ रूग्णालय) + ०६ (साईबाबा हॉस्पिटल) परीचारीकांना सध्याचे कुशल कर्मचा-यांचे वेतनदरावर (३५७.८४) ४०% वेतनवाढ दिल्यास खालीलप्रमाणे आर्थिक भार राहील.

| हॉस्पिटल | संख्या | सध्याचा प्रतिदीन वेतन दर देण्यात येत आहे | सध्याचे मासिक वेतन | सध्याचे कुशल कर्मचा-यांचे वेतन | ४०% वेतनवाढ दिल्यास प्रतिदीन होणारी वेतनवाढ | ४०% वेतनवाढ दिल्यास मासिक होणारी वेतनवाढ | प्रति दिन आर्थीक भार | प्रति महा आर्थीक भार | प्रति दिन एकुण परीचारीकांचा आर्थीक भार | प्रति महा एकुण परीचारीकांचा आर्थीक भार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (५ x ४०%) | ७ (६ x ४०%) | ८ (६ - ३) | ९ (७-४) | १० (२ x ८) | ११ (२ x ९) |
| साईनाथ रूग्णालय | ३५ | ३३७.०७ | १०११२ | ३५७.८४ | ५००.९७ | १५०२९ | १६३.९ | ४९१७ | ५७३६.५ | १७२०९५ |
| साईबाबा हॉस्पिटल | ०६ | ३२५.२४ | ९७५७ | ३५७.८४ | ५००.९७ | १५०२९ | १७५.७३ | ५२७२ | १०५४.३८ | ३१६३१.४ |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- प्रस्तावातील अर्जदार यांचा ११ महिनेचा कालावधी संपुष्टात आल्याने त्यांना पुन्हा ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत परीचारीकांची वेगवेगळी मंजुरी असुन २५ परिचारीकांची दि. १८/१२/२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार बाह्ययंत्रणेद्वारे काल्पनीक पदावर बाह्ययंत्रणेद्वारे ११ महिनेसाठी नेमणूक केलेली आहे. त्यानुसार वेगवेगळे वेतन रू.३३७.०७ व रू.३२५.२४ प्रतिदीन देण्यात येत आहे. सदर परिचारीकांना एकच सध्याचे कुशल कर्मचा-याचे वेतनदर रू.३५७.८४ प्रतिदिन निश्चीत करून मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, प्रस्तावातील ११ महिने कालावधीसाठी दि. २५/२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून तसेच ज्या परिचारीकांची गैरहजेरी १५ टक्केपेक्षा कमी आहे अशा परिचारीकांना प्रतिदिन निश्चित केलेल्या वेतनावर ४०% वेतनवाढ देता येईल व मा व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय ७२८(४) नुसार पगारी आठवडा सुट्टी देता येईल, असे नम्र मत आहे.

तरी, उपरोक्त ११ महिने कालावधीसाठी आऊटसोर्स पध्दतीने कार्यरत असलेले परीचारीकांचे दि.०२/०५/२०१९ व दि. ०४/०५/२०१९ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी कायदेशीर बाबींची तपासणी करुन११ महिने कालावधीसाठी आऊटसोर्स पध्दतीने कार्यरत असलेले परीचारीकांना सध्या प्रतिदिनी देण्यात येत असलेल्या वेतनावर ४०% वेतनवाढ व व्यवस्थापन समितीचे दि.१३.१२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७२८(४) नुसार पगारी सुट्टी देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२४** **मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर यांचे दि.३०.०३.२०१९ रोजीचे आदेशास अनुसरुन ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून नव्याने करारनामा करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम कलम २००४ तरतुद – कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

मंजुर आकृतीबंधामध्ये, कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिन्यांच्या कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९.

याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८.

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९.

दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(१) निर्णय क्र. १२८-

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५).

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या परिचारक / परिचारीकांचा नेमणूक कालावधी डिसेंबर २०१७ ते जुन २०१८ या कालावधीत टप्पा-टप्प्याने संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नव्याने ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देणेबाबत निर्णय घेणेकरीता प्रस्ताव दि. ०८/१२/२०१७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १०४९ नुसार, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम

यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावातील नमुद ११ महिने कालावधीकरीता कार्यरत परिचारीका यांनी दि. १९/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये, आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही आमची कोर्ट केस मागे घेतलेली असुन केस withdrawal copy सोबत जोडत आहोत. तरी आम्हाला ११ महिने ब्रेकनंतर पुन्हा duty Rejoin करून घेण्यात यावे, असे कळविले होते.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९ अन्वये, दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(१) निर्णय क्र. १२८- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरून खालील परीचारीकांच्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूका करणेत आलेल्या आहेत. नेमणूक देतेवेळी त्यांचेकडून ॲफीडेव्हीट भरून घेतलेले आहे.

| अ नं | नाव | नेमणूक तारीख | हजर तारीख | ११ महिने नेमणूक संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| २ | कु आशुमती संपत सदाफुले | ०१/०५/२०१८ | -------- | -------- |
| ३ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ४ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ५ | सौ आशा रमेश जगताप | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ६ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ७ | श्री राहुल प्रकाश आहोळ | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ८ | कु प्राजक्ता दिपक जाधव | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| १० | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | ०१/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ | ०२/०४/२०१९ |
| ११ | कु कविता योसेफ पंडीत | ०१/०५/२०१८ | ०५/०५/२०१८ | ०४/०४/२०१९ |

उपरोक्त परिचारीकांपैकी कु आशुमती संपत सदाफुले ह्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती नुसार १५ दिवसाचे आत कामावर हजर न झाल्याने त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेला आहे. तदनंतर त्यांनी कामावर

हजर करून घेणेसाठी संस्थानविरोधात औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे कोर्टकेस दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील हे पहात आहे.

उपरोक्त परीचारक / परीचारीका यांचा ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचे कामकाजाबाबतचा अहवाल प्र वैद्यकीय संचालक व प्र वैद्यकीय अधिक्षीका यांनी दि. ०४/०१/२०१९ व दि. ०७/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

| अ.नं | नाव | अहवाल |
|---|---|---|
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| २ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ३ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ४ | सौ आशा रमेश जगताप | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ५ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ६ | श्री राहुल प्रकाश आहोळ | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ७ | कु प्राजक्ता दिपक जाधव | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ८ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ९ | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| १० | कु कविता योसेफ पंडीत | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयाकरीता सन २००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार परिचारक / परिचारीका ची मंजुर पदसंख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | रूग्णालय | मंजुर पदे | | | एकुण | भरलेली पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | काल्पनिक पदे (११ महिनेसाठी) | | स्थायी | अस्थायी (११ महिने) | काल्पनिक पदे ११ महिनेसाठी | आऊटसोर्सिंग/ बाह्ययंत्रणेद्वारे | एकुण |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ |
| १ | साईबाबा | १६० | ४० | ०० | २०० | १०१ | ०८ | ०० | ८४ | १९३ |
| २ | साईनाथ | १०२ | २५ | २५ | १५२ | ५२ | ०२ | २५ | ५८ | १३७ |
| | एकूण | २६२ | ६५ | २५ | ३५२ | १५३ | १० | २५ | १४२ | ३३० |

उपरोक्त १० अस्थायी (११ महिने कालावधीसाठी) परिचारक / परिचारीका यांनी संस्थानविरोधात तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्यागिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील, अहमदनगर हे पहात आहेत.

सदर कोर्ट केसमध्ये परिचारक/परिचारीका यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

मा. न्यायालयास तक्रारदारातर्फे नम्र प्रार्थना की,

अ) जाब देणार यांनी तक्रादाराबाबत तक्रारीत नमुद केलेल्या अनुचीत कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे जाहीर करुन त्या बेकायदेशीर अयोग्य असुन त्या रद्द करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने प्रथम नेमणूकीपासुन दिलेले वेतन व देय वेतन व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारदारास प्रथम नेमणुकीपासुन किंवा २४० दिवस सेवेपासुन किंवा योग्य त्या काळापासुन परिचारीका म्हणून कायम करुन सर्व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ड) तक्रारदारास सध्याचे नेमणुकपत्र देताना घेण्यात आलेला करार हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर करावे.

इ) सोबतच्या अंतरीम आदेश अर्जातील बाबी कायम व्हाव्यात.

ई) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

तसेच त्यांनी अंतरीम आदेशास्तव अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

अ) तक्रारीच्या सुनावणीच्या काळात तक्रारदारास सेवेतून कमी न करण्याविषयक आदेश, सेवेत ठेवण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने कायम परिचारिका प्रमाणे मुळ वेतन, ग्रेड पे आणि इतर वेतन देण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारीचे कामकाज तक्रारीचे स्वरुप पाहाता त्वरीत पुर्ण करण्याविषयक आदेश व्हावेत.

ड) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

यावर मा. औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि. १८/०६/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

Perused the applications for dispensing with the notice Under Rule 115 and other papers. Heard Mr. Modgekar Advocate. The Complainants are stated to be in the employment for years and were services are likely to be terminated. Issue show cause notice returnable on 22-06-2018. Till then only the services of the complainants was not be terminated except by following due process of law.

उपरोक्त प्रस्तावातील परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारखेअखेर संपुष्टात येत आहे. तथापि त्यांनी संस्थानविरोधात तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्यागिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील, अहमदनगर हे पहात असल्याने उपरोक्त परिचारीकांची पुन्हा ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करावी किंवा कसे ? याबाबत ॲड अशोक पाटील यांचे जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३६९२/२०१९ दि. १९/०३/२०१९ पत्रान्वये कायदेशिर अभिप्राय मागविणेत आले आहे. मात्र अद्यापपावेतो अभिप्राय प्राप्त झालेले नाही.

तदनंतर, उपरोक्त परिचारीका यांनी मा औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्र ४१/२०१८ ते क्र ५०/२०१८ यावर मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ रोजी EXH U2 वर खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

1. Application Exh.U-2 is partly allowed.

2. Respondent is directed not to terminate service of complainant without following due process of law till disposal of complaint.

3. Respondent is directed to Renew contractual agreement of complainant strictly as per rules and regularations of Government Resolution dated 7 August 2009 till disposal of main complaint.

प्राजक्ता जाधव व इ. ९ यांनी दि. २३/०४/२०१९ रोजीचे अर्जान्वये, मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ च्या अंतरीम आदेशाने आमच्या सेवा कमी करू नये आमचे सेवा करार नुतनीकरण करावे असे आदेश दिनांक ३०/०३/२०१९ चे केले. आम्हास दि. ३/४/२०१९ ते ०६/०४/२०१९ या काळात वारंवार विनंत्या करूनही काम दिलेले नाही. मा न्यायालयाचे आदेश पाहाता आमच्या सेवा सलग धराव्यात आम्हास वरील काळाचे वेतन माहे एप्रिल २०१९ च्या वेतनातुन अदा व्हावेत ही विनंती. असे कळविले आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान- प्रति कर्मचारी एकत्रित मासिक वेतन रू. १५,४००/- याप्रमाणे रू. १,५४,०००/-.

विभागाचा अभिप्राय- शासन निर्णय क्र सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा दि. ०७/०८/२००९ मध्ये कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिनेचे कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

तरी, प्रस्तावातील नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी (स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारखेअखेर) संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन मा औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासननिर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन मा औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि.३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि.०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.२५ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे-२०१९ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९४,५९,१६२/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे मे २०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १६,३६० व १,०८५ आयपीडी रुग्णांपैकी ३,९०९ओपीडी व ५७६ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.८८,८५,४१२/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३८९** रुग्णाना रक्कम **रु.५,७३,७५०/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १९३ | १८,३३,३६०/- | - | १८,३३,३६०/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४४४ | ३०,११,५३९/- | १३,१२,१५६/- | १६,९९,३८३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६ | १४,१५०/- | - | १४,१५०/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई | ७४९ | ४६,९५,१९६/- | ३०,१७,९२३/- | १६,७७,२७३/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | | | | |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २५४ | १,२१,२२,७०१/- | १,०४,५६,८७०/- | १६,६५,८३१/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,८३९ | १९,९५,४१५/- | - | १९,९५,४१५/- |
| | एकुण | ४,४८५ | २,३६,७२,३६१/- | १,४७,८६,९४९/- | ८८,८५,४१२/- |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४६ | ५९,६००/- | - | ५९,६००/- |
| २ | हिमोफिलीया | १ | २,४००/- | - | २,४००/- |
| ३ | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ५ | ८,८००/- | - | ८,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ४९ | ५,४००/- | - | ५,४००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४२ | ३,०६,१५०/- | - | ३,०६,१५०/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ६ | ९,२००/- | - | ९,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | १,८००/- | - | १,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १३८ | १,८०,४००/- | - | १,८०,४००/- |
| | एकुण | ३८९ | ५,७३,७५०/- | - | ५,७३,७५०/- |
| | एकुण अ+ब | ४,८७४ | २,४२,४६,१११/- | १,४७,८६,९४९/- | ९४,५९,१६२/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्येमे २०१९मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९४,५९,१६२/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मे-२०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९४,५९,१६२/- मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२६** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,७२,४६१/- मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| क्र.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | | |
| १ | डांगे राजेंद्र साहेबराव<br>विभाग- विदयुत<br>हुददा-तारतंत्री | मुलगा | Noonas Syndromeजन्मजात विसंगती | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १५०१५.०० | १५०१५.०० | ००.०० |
| | अ एकुण रक्कम रु. | | | | | ५०१५.०० | १५०१५.०० | |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीत रेफर केलेले-** | | | | | | | |
| २ | वाल्मीक बाबुराव धरम<br>विभाग- सी.सी.टिव्ही<br>हुददा-मदतनीस | स्वत: | Cardiac MRI,SOS,CRT PTCD/CABG हदयशस्त्रक्रिया | डॉ.संदिप देवरे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | २३३७३१.०० | २३३०३१.०० | ००.०० |
| ३ | सुरेखा राजू गायकवाड<br>विभाग-साईनाथ रुग्णालय<br>हुददा-परिचारिका | सासु | ARI, PneumonitisLung malignancy किडनी संदर्भात तसेच फुफुसाचा कर्करोग उपचार | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ३५१९७६.०० | ३३५४८३.०० | ००.०० |
| | ब एकुण रक्कम रु. | | | | | ५८५७०७.०० | ५६८५१४.०० | |
| | **क. संस्थान मान्य यादीत बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेले परंतु रेफर न केलेले निकडीच्या प्रसंगी उपचार घेतलेले** | | | | | | | |
| ४ | ज्योती पौलस येवले<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा-परिचारिका | स्वत: | Pain in abdomen pricking pain & severeDysmenorrhoeaतिव्र उदर वेदना | डॉ.नितिन पै | बॉम्बे हॉस्पिटल मुंबई | ६७०८५.०० | ६७०८५.०० | ००.०० |
| | **क एकुण रक्कम रु.** | | | | | ६७०८५.०० | ६७०८५.०० | |
| | **ड. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले, रेफर न केलेले निकडीच्या प्रसंगी, खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| ५ | परदेशी निता हिरामण<br>विभाग-इंग्लिश मिडीयम स्कुल<br>हुददा-स.शिक्षिका | सासु | HTN /MI Angioplasty उच्च रक्तदाब हदयशस्त्रक्रिया | डॉ.मनोज चोपडा | मॅग्नम हर्ट इंस्टिट्युट नासिक | २८२६४९.०० | २२१८४७.०० | ००.०० |
| | **ड एकुण रक्कम रु.** | | | | | **२८२६४९.००** | **२२१८४७.००** | |
| | **अ +ब +क +ड एकुण रक्कम रु.** | | | | | **९५०४५६.००** | **८७२४६१.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.८,७२,४६१/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.तसेच काही निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ०५ कर्मचारी/कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,७२,४६१/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे उपरोक्त ०५ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.८,७२,४६१/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२७** **डॉ.किरण रामकृष्ण गोरे, जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत चौकशी अधिकारी यांनी दि.०१.०५.२०१९ रोजी सादर केलेल्या निष्कर्ष अहवाल व निलंबन भत्याबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. किरण रामकृष्ण गोरे हे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे सहाय्यक सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. डॉ. गोरे यांचे विरुध्द खालीलप्रमाणे तक्रारी आल्याने त्यांची खातेनिहाय चौकशी कामी दि. २३/१२/२०१३ रोजीचे आरोपपत्र देणेत आले आहे.

१. डॉ. गोरे यांचे विरुध्द डॉ. अनिल विठ्ठलराव घरटे, अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी यांचा दि. २७/०६/२०१३ रोजीचा तक्रार अर्ज इकडील कार्यालयात दाखल झाला आहे.

२. श्री. शेख अकबर कालुभाई, मु. पो. ता. राहाता जि. अहमदनगर यांचा दि. ११/१०/२०१३ रोजीचा तक्रार अर्ज इकडील कार्यालयात दाखल केलेला आहे.

३. वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी व वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये यांनी दि. १०/१०/२०१३ रोजीचे संयुक्त निवेदन सादर केलेले आहे. त्यात असे म्हटले आहे की, माहे जूलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ या कालावधीत डॉ. गोरे, जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल खाजगी प्रॅक्टीस करत असल्याचे रुग्णाचे नातेवाईकांकडून तोंडी स्वरुपात माहिती देण्यात आलेली आहे.

४. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये यांचे दि. २०/११/२०१३ रोजीचे निवेदन आले आहे की, दि. २०/११/२०१३ रोजीचे पुण्यनगरी दैनिक वर्तमान पत्रामधील बातमी वरुन असे निदर्शनास येते की, डॉ. गोरे, जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल हे राहाता येथे खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस करत आहेत.

अशाप्रकारे वरिष्ठांच्या कायदेशीर व वाजवी हुकुमांचे जाणून-बुजून उद्दामपणा करणे किंवा पालन न करणे, संस्थान सेवेशी अप्रामाणिकपणा करणे, अस्थापनेत लागू असलेल्या नियमांचा नेहमी-नेहमी भंग करणे, संस्थानने दिलेल्या सुचनांचे व नियमांचे भंग करणे, व्यवसाय रोध भत्ता मिळणेसाठी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांची दिशाभूल करुन, फसवणूक करणे ही डॉ. गोरे यांची कृत्ये स्थायी आदेशाचे कलम 24 (ए), (डी), (एच), (एन) नुसार गंभीर स्वरुपाची गैरवर्तने ठरतात. ती गैरकृत्ये डॉ. गोरे यांनी केलेली असलेमुळे त्यांचेवर दी इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट 1946 नुसार बॉम्बे इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) रुल्स, 1959 नुसार संदर्भ क्र. 01 नुसार आरोपपत्र देण्यात आले आहे. सदरची चौकशी करणेकामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची दि. २३/१२/२०१३ चे आदेशाने नेमणूक करण्यात आली आहे.

दरम्यानच्या काळात दि. १७/१२/२०१४ रोजीचे आदेशान्वये डॉ. गोरे यांचा व्यवसाय रोध भत्ता बंद करण्यात आला आहे. त्यानंतर डॉ. किरण रामकृष्ण गोरे यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले आहे. डॉ. गोरे यांना संस्थान सेवेतून दि. १४/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये दि. १४/०६/२०१६ पासुन संस्थान सेवेतून सेवानिलंबीत करण्यात आले. डॉ. गोरे यांना सेवानिलंबीत करुन बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स 1959 चे कलम 25(5-ए) अन्वये, (1) पहिल्या 90 दिवसांसाठी पगाराचे 1/2 (निम्मा), (2) नव्वद दिवसांहून अधिक ते 180 दिवसांसाठी पगाराच्या 3/4 (पाऊणपट) व (3) 180 दिवसांहून अधिक ते खातेचौकशी पुर्ण होऊन निर्णय होईपर्यंत पगाराचे 100 टक्के (पुर्ण) इतका निर्वाह भत्ता (गुजराण भत्ता) देणेबाबत आदेश पारीत करण्यात आला. सदरचे गैरशिस्त वर्तनाबाबत डॉ. गोरे यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केल्याने त्यांना दि. ०६/०८/२०१६ रोजीचे पुरवणी आरोपपत्र देणेत आले.

१. डॉ. गोरे हे दि. १८/१२/२०१५ ते २१/१२/२०१५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय गैरहजर राहीलेत. त्यामुळे रुग्णालयात रुग्णांची गैरसोय व रुग्णांचे हाल झाले. तसेच या कालावधीत डॉ. गोरे यांनी हजेरी मस्टरवर स्वाक्षरी केलेली आहे.

२. डॉ. गोरे यांचेविरुध्द श्री गोंगे उत्तम मारोतराव रा.पोहे टाकळी, ता.पाथरी, जि.परभणी यांनी दि. ०१/०२/२०१६ रोजी त्यांचे विषयी तक्रार अर्ज दिलेला आहे.

३. दि. ०८/०२/२०१६ या दिवशी वैद्यकीय संचालक व वैद्यकीय प्रशासक यांनी राऊंड घेतला असता असे निदर्शनास आले की, ते OPD मध्ये उशिरा आल्याने रुग्णांची तपासणी वेळेवर झालेली नाही व रुग्णांना त्यांची वाट पहावी लागली.

४. दि. ०४/०३/२०१६, दि. ११/०३/२०१६, १८/०३/२०१६, २५/०३/२०१६, ०१/०४/२०१६ व दि. ०८/०४/२०१६ या तारखेस वेळेत डयुटीवर आलेले नाहीत. असे निदर्शनास आले आहे की, ते OPD मध्ये न आल्याने रुग्णांची तपासणी वेळेवर झालेली नाही व रुग्णांना त्यांची वाट पहावी लागली, रुग्णांना बराच वेळ ताटकळत उभे राहावे लागले.

५. डॉ. गोरे हे दि. ०१/०३/२०१६ ते दि. ०३/०३/२०१६, दि. ०५/०३/२०१६ ते दि. ०९/०३/२०१६, दि. १०/०३/२०१६, दि. १२/०३/२०१६ ते दि. १७/०३/२०१६, दि. १९/०३/२०१६, दि. २१/०३/२०१६ ते दि. २४/०३/२०१६, दि. २६/०३/२०१६, दि. ३०/०३/२०१६ व दि. ३१/०३/२०१६ असे एकूण २३ दिवस डयुटीवर आले नाहीत परंतू त्यांनी हजेरी मस्टरवर वरील दिवशी सुध्दा हजर असलेबाबत स्वाक्षरी केलेली आहे.

अ) डॉ. किरण रामकृष्ण गोरे यांचे खातेनिहाय चौकशीमध्ये चौकशी अधिकारी यांनी दि. ०१/०५/२०१९ रोजीचे चौकशी अहवालात मुळ आरोपपत्राबाबत खालीलप्रमाणे निष्कर्ष दिलेला आहे -

१) डॉ. श्री. किरण रामकृष्ण गोरे दोषी नाहीत.

२) डॉ. किरण रामकृष्ण गोरे यांनी इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑर्डर) ॲक्ट १९४६ स्थायी आदेशाचे कलम २४ (ए), २४ (डी), २४ (एच), २४ (एन) चा भंग केलेला नाही.

पुरवणी आरोपपत्राबाबत चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष दिले आहे.

१) मुद्दा नं. ०१ वगळता मुद्दा नं. ०२ ते ०५ यातील डॉ. गोरे यांचेविरुद्धचे आरोप नि:संशयपणे शाबीत झालेले आहे. सबब, डॉ. किरण रामकृष्ण गोरे दोषी आहेत.

बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) रुल्स 1959 चे कलम २५ (१) जो कामगार गैरवर्तनाबाबत दोषी असेल

(अ) त्याला ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

(ब) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ यांच्या तरतुदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा.

(क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

(ड) नोटीशीशिवाय बडतर्फ करावे.

(२) कामगारावर कोणत्या गैरवर्तनाचा आरोप आहे हे त्याला लेखी कळविल्याशिवाय किंवा त्याबाबतीत खुलासा करण्याची त्याला संधी दिल्याशिवाय त्याच्याविरुद्ध कलम (१) च्या पोट कलम (ब) खाली आदेश काढता कामा नये.

(३) कामगाराविरुद्ध अरोपित गैरवर्तनाच्याबाबतीत कल (४) खालीलप्रमाणे चौकशी केल्याशिवाय कल (१) च्या पोटकल (ड) खाली बडतर्फीचा आदेश काढता कामा नये असे नमुद आहे.

तरी, डॉ गोरे हे पुरवणी आरोपपत्रात नमुद आरोपात दोषी असल्याने त्यांना द्यावयाचे शिक्षेबाबत निर्णय होणेस विनंती.

ब) डॉ. गोरे यांना संस्थान सेवेतून दि. १४/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतून सेवानिलंबीत करण्यात आले.

डॉ. गोरे, खाजगी प्रॅक्टीस करत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने रुग्णालयाचे वतीने एच.आर.मॅनेजर यांनी दिनांक ०४/०५/२०१९ रोजी सायं. ५ चे सुमारास राहाता येथे जाऊन डॉ. शिंदे यांचे हॉस्पिटल शेजारी डॉ. गोरे यांचे हॉस्पिटल असल्याची खात्री केली आहे व तेथील फोटो मोबाईलमध्ये काढले असुन त्याची प्रिंट सोबत जोडली आहे. त्यांचे हॉस्पिटलकडे जाताना लहान मुलांचे हॉस्पिटल, डॉ. पाटील ॲक्सिडेंट हॉस्पिटल, डॉ. कुलकर्णी आयुर्वेद पंचकर्म हॉस्पिटल व त्याचे शेजारी डॉ. गोरे हॉस्पिटल, मुळव्याध विकार, पोट-विकार, कॅन्सर सेंटर असे बोर्ड लावलेले आहेत. डॉ. गोरे यांचे हॉस्पिटल वरती डॉ. गोरे हॉस्पिटलअसे पिवळ्या अक्षरात नाव आहे. तसेच बिल्डींगच्या समोरुन उजव्या बाजुला मुळव्याध,पाईल्स इंजेक्शन पोटविकार इंडोस्कोपी कॅन्सर सेंटर असाही बोर्ड लावलेला आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी यांनी दि. २३/०४/२०१९ रोजी डॉ. गोरे यांचे राहाता येथे हॉस्पिटल असलेबाबत फोटो प्रिंट दिलेल्या आहेत. यावरुन असे निदर्शनास येते की, डॉ. गोरे यांचे राहाता येथे स्वतःचे हॉस्पिटल असुन ते खाजगी व्यवसाय करतात.

दिनांक १७/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये सिव्हील सर्जन, अहमदनगर, व वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, राहाता यांचेकडे डॉ. गोरे यांचे हॉस्पिटलबाबत बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ नुसार नोंदणी केलेबाबतची सर्व तसेच सदर नोंदणीचे वेळोवळी रिनीव्हल केलेबाबतचे प्रमाणपत्रांची मागणी करण्यात आली होती . तसेच मुख्याधिकारी, राहाता नगरपंचायत, राहाता यांना डॉ. गोरे यांचे रुग्णालयाचे रजिस्ट्रेशनबाबत नोंदणी केलेबाबतची सर्व प्रमाणपत्रांची व त्यांनी भरलेल्या पाणी पट्टी बाबतच्या पावत्यांबाबत मागणी करण्यात आली होती.

नगरपंचायत, राहाता यांनी डॉ. गोरे हॉस्पिटल राहाता यांचे हॉस्पिटल रजिस्ट्रेशन नोंदणीबाबत काहीही एक रेकॉर्ड या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. यासोबत राहाता नगरपरिषदेने डॉ. गोरे यांच्या सन २०१६-२०१७ ची १ (व्याज खास पाणीपट्टी), सन २०१७-२०१८ खास पाणीपट्टी, सन २०१७-२०१८ ची खास पाणीपट्टी, आणि सन २०१८-२०१९ ची खास पाणीपट्टी अशा चार पाणीपट्टीच्या पावत्या आणि विविध करांद्वारे मिळालेल्या करनिर्धारण विभागाच्या पावत्या जोडून दिलेल्या आहेत. वैद्यकीय अधिक्षक, राहाता यांनी डॉ. गोरे यांचे साई अभिनव मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ रजिस्ट्रशन सर्टिफिकेट दिलेले असुन त्याचा रजिस्ट्रेशन नंबर २७५ असा असुन सदर दवाखान्याची नोंदणी दिनांक १८/१०/२०१६ रोजी करण्यात आलेली असुन दिनांक ३१/०३/२०१९पर्यंत सदर रजिस्ट्रेशनची मुदत नमुद आहे.

दिनांक २१/०५/२०१९ रोजीचे डॉ. गोरे यांनी पत्र दिले असुन त्यांनी मला आपल्या आदेशानुसार जा.नं.एसएसएस/वशी-७ए/९८३/२०१६ नुसारदेण्यात येणारा निर्वाह भत्ता (गुजराण भत्ता) आजपासुन बंद करण्यात यावा,ही विनंती. मला जा.क्र.एसएसएस/वशी–७बी/ ९६८/२०१४ नुसार व्यवसाय रोध भत्ता बंद केलेला आहे. माझ्यावरील खातेनिहाय चौकशीत घेलेल्या निकालास मी बांधील राहील. त्यानुसार पुढील निर्णय घेईल. महोदय, मी माझा खाजगी व्यवसाय राहाता येथे चालु केला असुन, त्यामुळे इथुन पुढे मला देण्यात येणारा गुजराण भत्ता बंद कराण्यात यावा, ही विनंती. असे पत्र डॉ. किरण गोरे यांनी दिलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, डॉ. गोरे हे सेवानिलंबीत असताना खाजगी व्यवसाय केलेला असुन त्यांनी सदर माहिती दडवून आणि संस्थानची दिशाभुल करुन निर्वाह भत्ता घेतलेला आहे.

तरी, डॉ. गोरे यांना दिनांक १४/०३/२०१६ ते दि. ३०/०४/२०१९ या कालावधीत रु. २३,८०,१३३/- देण्यात आलेला निर्वाह भत्ता व त्यावरील ०८ % दराने व्याजासहित एकूण रक्कम ही नोटीस मिळालेपासून १०दिवसाचे आत श्री साईबाबा हॉस्पिटल वित्त विभाग येथे जमा करावी अन्यथा तुमचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे दि. २९/०५/२०१९ रोजीची नोटीस देणेत आली होती.

सदर नोटीसीस अनुसरुन, डॉ. गोरे यांनी दि.०६/०६/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे लेखी खुलासा सादर केलेला आहे "विनंतीपूर्वक खुलासा करतो की, आपण विषयांकित नोटीस मला मिळालेली आहे. सदरील नोटीसीमधील आरोप मला मान्य व कबुल नाही. महोदय, आपण माझी विभागीय चौकशीचे आदेश दि. २३/१२/२०१३ रोजी आरोपपत्र देवून दिलेले आहेत. तसेच आपण दि. १४/०६/२०१६ पासुन निर्वाहभत्ता माझी कोणतीही मागणी नसताना चालु केला आहे.

महोदय, माझेवर दिनांक २३/१२/२०१३ रोजी आरोपपत्र ठेवण्यात आले होते. परंतु आपण सदरची चौकशी मला त्रास देण्याचे हेतुने आजपर्यंत पुर्ण केलेली नाही. याबाबत मी आपणाकडे वेळोवेळी विनंती केली असता, आपण ऑफिसमधुन मला कळविण्यात आले की, आता संस्थान आपणास कधीही सेवेत घेणार नाही.

महोदय, आपणास विनंतीपूर्वक कळवितो की, मला २०१३ ते २०१६ या कालावधीत आपण सदरची चौकशी पुर्ण केली नाही व त्यामुळे माझे शारिरीक, मानसिक व आर्थिक खच्चीकरण झाले.

सदरचे काळात मला आरोग्यविषयक काम करता न आल्यामुळे त्याचा माझे ज्ञानावर प्रभाव पडला व त्यामुळे माझे मानसिक खच्चीकरण झाले. या आपल्या कृत्यामुळे माझी खात्री झाली होती की, आपण मला परत सेवेत घेणार नाही त्यामुळे मी माझे भविष्याचा विचार करुन व माझे कुटूंबाची पालनपोषणाची जबाबदारी माझेवर असल्यामुळे व आपण कदाचित मला सेवेतून काढून टाकल्यास माझेवर उपासमारीची वेळ येवू नये म्हणून सदरचे हॉस्पिटलची नोंदणी केली होती, परंतु मी सदरचे हॉस्पिटलमध्ये कधीही वैद्यकीय व्यवसाय केलेला नाही व त्यामुळे माझेवरील आरोप निराधार आहे.

महोदय, माझी श्री साईबाबांवर नितांत श्रद्धा असल्यामुळे मी साईबाबा संचलीत हॉस्पिटल येथे सेवेत आलो. आलेल्या रुग्णांवर मी प्रामाणिकपणे उपचार केलेले आहेत. त्यामुळे सदरील हॉस्पिटलमध्ये माझे नावावर रुग्ण येत होते. त्यामुळे वैद्यकीय व्यवसायातुन माझेवर खोटे आरोप करण्यात आले होते व होत आहेत.

महोदय, माझे कुठल्याही अधिकारास व कुठलेही आरोप मान्य न करता मी दिनांक २१/०५/२०१९ रोजी स्वतःहून निर्वाहभत्ता बंद करणेबाबत अर्ज केला होता. तसेच श्री साईबाबा संस्थान हे सार्वजनिक विश्वस्त संस्था असुन भाविकांची त्यावर अपार श्रद्धा आहे. संस्थानमधील सेवकांवरील आरोपांमुळे संस्थानची बदनामी होते. त्यामुळे माझे कुठल्याही हक्कास बाधा न येवू देता मी आपण नोटीस मधील दिलेली रक्कम १२ (बारा) महिन्यांमध्ये भरण्यास तयार आहे.

तरी आपणास नम्र विनंती की, आपण माझे अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार करावा व मला सदरची रक्कम पुढील काळात भरण्याची मुभा द्यावी व सदरचे रक्कमेवर आपण नोटीसीमध्ये नमुद केलेप्रमाणे कोणतेही व्याज आकारु नये.” अशा प्रकारचा खुलासा डॉ. गोरे यांनी केलेला आहे.

यानंतर डॉ गोरे यांनी दि. १२/०६/२०१९ रोजी खालीलप्रमाणे पत्र दिले असुन त्यात त्यांनी “आपले दि. २९/०५/२०१९ रोजीचे नोटीसीस अनुसरून मी माझा दि. ०६/०६/२०१९ रोजीचा खुलासा आपणास सादर करून मला संस्थानकडून प्राप्त झालेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम मी समान १२ हप्त्यात भरणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

निलंबित कालावधीत माझ्या खात्यामध्ये प्रत्यक्षात मला प्राप्त झालेली रक्कम आयकर वगळता बारा समान हप्त्यात जमा करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानचे नाव १२ अकाऊंट पे क्रॉस चेक सोबत जोडून देत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांचे नावे देत आहे.

| अ नं | बॅंकेचे नाव | चेक नंबर | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७१ | १७६८४० | ११/०७/२०१९ |
| २ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७२ | १७६८४० | ११/०८/२०१९ |
| ३ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७३ | १७६८४० | ११/०९/२०१९ |
| ४ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७४ | १७६८४० | ११/१०/२०१९ |
| ५ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७५ | १७६८४० | ११/११/२०१९ |
| ६ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७६ | १७६८४० | ११/१२/२०१९ |
| ७ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७७ | १७६८४० | ११/०१/२०२० |
| ८ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७८ | १७६८४० | ११/०२/२०२० |
| ९ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७७९ | १७६८४० | ११/०३/२०२० |
| १० | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७८० | १७६८४० | ११/०४/२०२० |
| ११ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७८१ | १७६८४० | ११/०५/२०२० |
| १२ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ०४७७८२ | १७६८४० | ११/०६/२०२० |
| एकुण रक्कम<br>(अक्षरी- एकवीस लाख बावीस हजार चौ-यात्तर मात्र) | | | २१,२२०,७४ | |

सदर अर्जाचा व चेकचा स्विकार करून मला त्याची पोहोच मिळावी ही विनंती.

त्याचबरोबर मी विनंतीपूर्वक अर्ज करतो की, सदर अर्जाचा व चेकचा स्विकार करून मला असोसिएट कन्सल्टंट (जनरल सर्जरी), श्री साईबाबा हॉस्पिटल या पदावरून कार्यमुक्त करून राजीनामा मंजूर करावा, ही विनंती. माझे खातेनिहाय चौकशी समाप्त करून मला कायमुक्त करावे ही विनंती व त्या आशयाचे पत्र मला दिले जावे ही विनंती.

भविष्यातही श्री साईबाबा संस्थनला कधीही माझ्या वैद्यकीय ज्ञानाची व अनुभवाची आवश्यकता असेल त्या-त्या वेळी मी श्री साईबाबांच्या चरणी सेवा देणेस तत्पर राहील.” असे कळविले आहे. व उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सोबत १२ चेक दिलेले आहे.

डॉ. गोरे यांना दि. १४/०६/२०१६ ते दि. ३१/०४/२०१९ पर्यंत निलंबन भत्ता अदा करणेत आलेला आहे. सदर कालावधीत डॉ गोरे यांना अदा करणेत आलेला सानुग्रह अनुदान व महागाई भत्याचा फरक असे एकत्रित २४,१३,९१९/- रूपये अदा करणेत आले असुन त्यातुन २,९१,८४५/- रूपये आयकर कपात करणेत आलेला आहे. डॉ. गोरे यांना देण्यात आलेल्या एकूण निर्वाह भत्त्याची रक्कम रु.२४,१३,९१९/- वर आयकरापोटी कपात केलेली एकूण रक्कम २,९१,८४५/- ही संस्थानने त्यांचेवतीने वतीने आयकर विभागाला भरणा केलेली आहे. ही रक्कम त्यांच्या नावावर आयकर विभागात जमा आहे. त्यामुळे सदर आयकर रक्कम रु. २,९१,८४५/- ही नोटीस मिळालेपासून ०७ दिवसांचे आत वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल येथे जमा

करावी अन्यथा तुमचे विरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल असे दि. २४/०६/२०१९ रोजीचे नोटीसीद्वारे कळविण्यात आलेले आहे.

तरी अ) डॉ गोरे हे पुरवणी आरोपपत्रात नमुद आरोपात दोषी असल्याने त्यांना द्यावयाचे शिक्षेबाबत निर्णय होणेस ब) दि. १६/०६/२०१९ रोजी रक्कम रु. २१,२२,०७४/- चे दिलेल्या १२ महिन्याचे समान हप्त्यामध्ये १२ ॲडव्हान्स चेक जमा करून घेणेबाबत निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.किरण रामकृष्ण गोरे, जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना निलंबन कालावधीत आदा करणेत आलेल्या एकुण रक्कम रु.२४,१३,९१९/- मात्र पैकी आयकराची रक्कम रु.२,९१,८४५/-वगळता उर्वरीत रक्कम रु. २१,२२,०७४/- मात्र त्यांचेकडून वसुल करुन त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात यावा, व त्यांना संस्थान सेवेतुन कार्यमुक्त करण्यात यावे, तसेच आयकर रक्कम रु.२,९१,८४५/-मात्र माफ करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८** **श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत,परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विषयी घेण्यात आलेल्या ॲड अशोक पाटील, अहमदनगर व ॲड नितिन भवर,ॲडव्होकेट औरंगाबाद यांचे कायदेशीर अभिप्रायबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती पंडीत वेरोनिका काशिनाथ या दि. ०२/०५/२००६ पासून परिचारीका या पदावर संस्थान सेवेत होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५१ नुसार दि. ०९/०६/२०११ रोजीच्या आदेशान्वये कु. पंडीत यांचे नांव दि. १३/०६/२०११ पासून संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुद्ध श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, बडतर्फ परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध मा. कामगार न्यायालय अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ दि. ०८/०४/२०१५ रोजी दाखल केलेली होती. त्यात दि. २६/०६/२०१८ रोजी न्यायनिवाडा केला आहे.

मा. कामगार न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाड्या विरुद्ध मा. उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांचे विरुद्ध रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दाखल करण्यात आली होती. त्यात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यानी दि. १६/१०/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

12. When the Labour Court delivered the impugned judgment, the respondent was said to have undertaken fresh employment with another organization. No litigant is expected to starve during the period of unemployment. If an alternate employment is taken up, the law is settled that backwages can be deprived. If the respondent does not desire to join duties pursuant to the judgment and award of the Labour Court, it would be a different situation which can be dealt with by the petitioner / Management on its own merits. Refusing continuity of service merely because a terminated employee undertakes an alternate employment for keeping his or her mind, body and soul together, would not disentitle her from continuity in service.

13. In view of the above, I do not find that the impugned judgment and award could be termed as being perverse or erroneous. This petition, being devoid of merit is, therefore, dismissed.

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. १५/०६/२०१८ रोजी १. आरोग्य शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २. एम.यु.एच.एस., नाशिक, ३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई, ४. शिवा ट्रस्ट, औरंगाबाद, ५. सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर, ६. साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपुर यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ६३३२/२०१८ दाखल केली असुन रीट मेमोतील परिच्छेद क्र. ०९ मध्ये एका ठिकाणी Petitioner has completed her B.S.C. Nursing in the year 2007 and joined as a Tutor / Clinical Instructor from academic year 2007 with respondent No. 5. She was there till the year 2010 and thereafter petitioner joined the post Graduate course in the yar education year 2010 for M.S.C. Nursing. For ready reference hereto annexed and marked as ANNEXURE – B is the copy of experience certificate dated 30.07.2010 issued by respondent No. 5. असे नमुद

केले आहे. श्रीमती पंडीत यांनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध दाखल केलेल्या रीट पिटीशन मध्ये त्या सन २००७ पासुन सन २०१० पर्यंत ट्युटर / क्लिनीकल इंस्ट्रक्टर या पदावर सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर येथे कार्यरत होत्या, हे त्यांनी मान्य केलेले आहे. याचा अर्थ त्यांनी संस्थान रुग्णालयात नोकरीत असताना संस्थानची फसवणुक करुन दुस-या संस्थेत नोकरी केलेली आहे.

श्रीमती पंडीत यांना दि. १३/०६/२०११ रोजी वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/-, ग्रेड पे रु. ४,२०० नुसार वेतन देण्यात येत होते. मा. कामगार न्यायालय अहमदनगर रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ मधील दि. २६/०६/२०१८ रोजीचा न्यायनिवाडा व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि.१३/०६/२०११ पासून पुढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/-+ ग्रेड वेतन रु.४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत तसेच सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना, दुस-या संस्थेत नोकरी केल्याबाबत विचारात घेऊन निर्णय घेणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर विषय नं. ४०, निर्णय क्र. ७६७ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रिट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासुन पेढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेले शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पुर्ववत कामावर हजर करुन घेण्यात यावे", असे ठरले.

तसेच श्रीमती पंडीत यानी सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना दुस-या संस्थेत नोकरी केलेबद्दल त्यांचेविरुद्ध करावयाच्या कायदेशीर कारवाईबाबत संस्थानचे वकीलांचा सल्ला घेऊन सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन सभेसमोर सादर करावा." असा निर्णय पारीत करण्यात आला आहे.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्रीमती वेरोनिका पंडीत यांना दि. १०/०१/२०१९ पासुन कामावर हजर करुन घेणेत आलेले आहे. अॅड. नितीन भवर यांना दि. ०७/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर सल्ला देणेबाबत कळविणेत आले होते. सदर पत्रास अनुसरुन, अॅड. नितीन भवर, सिनीयर अॅडव्होकेट, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. २३/०१/२०१९ चे प्रमाणे कायदेशीर सल्ला दिलेला आहे–

With reference to the subject cited above, I have to state that, I have gone through the Writ Petition No 11463/2018 filed by Shri Saibaba Sansthan Trust, Writ Petition No. 6332/2018 and Reference (IDA) No. 61/2014 filed by Smt. Veronika Pandit and the judgement and order dated 26.02.2018 passed by the Labour Court at Ahmednagar etc. carefully and on understanding the same, I giving my legal opinion as follows –

1. As you know that, Smt. Veronika Kashinath Pandit was working as staff nurse in the Hospital run by Shri Saibaba Sansthan Trsut for the period from 02.05.2006. On 09.06.2011 the managing committee of Shri Saibaba Sansthan Trust adopted a Resolution No. 09.06.2011 for terminating the services of Smt. Veronika Kashinath Pandit and in pursuance of the said Resolution Smt. Veronika Kashinath Pandit was terminated w.e.f. 13.06.2011. The said termination order was challenged by Smt. Veronika Kashinath Pandit by filing Refernece (IDA) No. 61/2014 before the Labour Court at Ahmednagar. However, the Learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar pass his judgment and award on 26.06.2018 partly answering the reference (I.D.A.) No. 61/2014 in affirmative holding the termination of Smt. Veronika Kashinath Pandit is illegal, improper. The learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar also directed Shri Saibaba Sansthan Trust to reinstate Smt. Veronika Kashinath Pandit in services with continuity of services w.e.f. 13.06.2011, but without back wages. Thereafter, Shri Saibaba Sansthan Trust filed Writ Petition No. 11463/2018 in Hon'ble High Court, challenging the

judgment and order dated 26.06.2018. During course of hearing on Writ Petition No. 11463/2018 it was came to the knowledge that, Smt. Veronika Kashinath Pandit filed writ Petition No. 6332/2018 before the Division Bench of the Hon'ble High Court specifically contending that she was working with Seva Nursing College, Shrirampur for the period from 01.08.2007 to 04.08.2010 and to that effect a Certificate of Experience is also issued to her by Seva Nursing College, Shrirampur on 30.07.2010. The said fact is observed by Hon'ble High Court in paragraph No. 10 of its judgment and order passed in Writ Petition No. 11463/2018. In view of this position, it is very much clear that from 02.05.2006 to 13.06.2011 Smt. Veronika Kashinath Pandit was working with Seva Nursing collegege, Shrirampur and she drawn salary for the said period from the said college. Hence, it means that Smt. Veronika Kashinath Pandit was simultaneously worked with two institutions viz. Shri Saibaba Sansthan Trust & Seva Nursing College, Shrirampur.

2. Therefore, as per my view and legal opinin stringent action should be taken against Smt. Veronika Kashinath Pandit by way of initiating Departmental Enquiry against her. Simultaneiously, Shri Saibaba Sansthan may also initiate Criminal Proceedings against Smt. Veronika Kashinath Pandit for cmommitting breach of trust and fraud. These two proceedins are permissible in law.

तसेच ॲड. अशोक पाटील, कामगार कायदे सल्लागार, अहमदनगर यांना दि. ०७/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर सल्ला देणेबाबत कळविणेत आले होते. सदर पत्रास अनुसरुन, त्यांनी दि. ३०/०४/२०१९ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे सल्ला दिलेला आहे –

I have perused your letter dt. 07/01/2019 and reply thereto. I would like to furnish my opinion as below :

1. It has been bought to my notice that Smt. Veronika Kashinath Pandit, Staff Nurse was working as a tutor / Clinical Instructor during a period from 2007 to 2010 at Seva Nursing College,

Shrirampur. However this act of her double employment was intentionally suppressed by her which appears on the face of record.

2. It has also been brought to my notice that Smt. Veronica Pandit has filed Writ Petition No. 6332/2018 before Hon High Court bench Aurangabad and in the said writ petition also she has stated her grade of employment with Seva Nursing College, Shrirampur. Meaning thereby she was working else where though she was in employment of Saibaba Hospital during the period from 2007 to 2010.

3. This conduct of Smt. Veronica Pandit amounts to a serious misconduct in the eye of law and therefore in my opinion we should initiate a disciplinary action against her. It is also advisable to follow the proper procedure of enquiry by giving her full and fare opportunity of hearing.

तरी उपरोक्त विषयावर निर्णय होणेस्तव विनंती.

**निर्णय क्र.३४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत,परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. त्यांचेकडून खुलास आल्यानंतर भविष्यात असा प्रकार होणार नाही याबाबत त्यांना ताकीद देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९** **श्री साईनाथ रुग्णालयात मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजन करणेस व येणाऱ्या रक्कम रु.९०,०००/- अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक – श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांची सेवा करणेच्या अनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालय विभागाने मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर आयोजन करणेचा मानस व्यक्त केला आहे. तरी या निमित्त दि. ०९ ते १० ऑगस्ट २०१९ या कालावधीत शिरडी येथे सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. मोफत श्रवणयंत्र शिबीरासाठी New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या वतीने मोफत २०० नग पॉकेट साईज हिंअरींग मशिन व १०० नग बलु टुथ हिअरींग मशिन असे एकुण ३०० नग हिअरींग ऍंड मशिन मोफत कर्नबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी करण्यात येवुन योग्य रित्या Frequency सेट करुन देण्यात येणार आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांची ऑडीओमेट्री तपासणी करणेकामी New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या वतीने दोन कुशल तज्ञ ऑडीओलॉजिस्ट सदर कंपनीमार्फत मोफत येणार आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयातील कान, नाक, घसा विभागातील वैद्यकिय अधिकारी डॉ. शोभना कोल्हे, डॉ. अमोल जोशी, डॉ. योगेश गेठे, डॉ. गौरव रॉय व डॉ. शिरीष शेळके सदर शिबीरात सहभाग नोंदविणार आहेत.

तसेच अशा प्रकारचे पॉकेट मॉडेल ऑडीओमेट्री मशिन ही सुमारे २,५००/- व ब्लु टुथ हिअरींग ऑडीओमेट्री मशिन ही सुमारे ६,०००/- रुपये किमतीचे खाजगी रुग्णालयात अंदाजे आकारणी करण्यात येते. तसेच कर्णबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी करणेकामी खाजगी रुग्णालयात सुमारे रु. ५००/- इतका दर आकारला जातो.

New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या देणेत येणा-या हिअरींग मशिन करीता सदर कंपनीकडुन खालीलप्रमाणे खर्च करणेत येईल.

१) पॉकेट साईज हिंअरींग मशिन २०० नग X रु. २,५००/- = रु. ५,००,०००/-

२) बलु टुथ हिअरींग मशिन १०० नग X रु. ६,०००/- = रु. ६,००,०००/-

३) कर्णबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी ३०० X रु. ५००/- = रु. १,५०,०००/-

---

**एकुण** = रु. १२,५०,०००/-

सदर मशिन खरेदीकामी खाजगी रुग्णालयात अतिरिक्त दर लागत असलेमुळे ग्रामीण भागातील रुग्ण अशा प्रकारच्या हिअरींग एड मशिन घेण्यापासुन वंचित राहतात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारचे मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजीत करणे बाबत मानस व्यक्त केलेला आहे. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल. New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या वतीने श्री साईबाबा संस्थान बरोबर यापुर्वी देखील श्री साईबाबा शताब्दी काळात मोफत हिअरींग ऍंड मशिन वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात एकुण २०० रुग्णांना श्रवणयंत्र वाटप करणेत आले होते. मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीरामध्ये किमान ३०० रुग्णांना लाभ देण्याचा मानस सदर कंपनीने दर्शविलेला आहे. सदर शिबीराकरीता संस्थानच्या इतर विभागाकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगीक बाबींची देखील पुर्तता होणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - दि. ०९ ते १० ऑगस्ट २०१९ रोजी मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच येणारे तज्ञ ऑडीओलॉजिस्ट यांच्या राहण्याची, जेवणाची, दर्शन, आरतीची व इतर अनुषंगीक गोष्टींची व्यवस्था शिबीरच्या एक दिवस आगोदर व एक दिवस नंतर असे दि. ०८ ते ११ ऑगस्ट २०१९ अखेर कालावधीत करण्याची आवश्यकता आहे.

| अ.नं | विभाग | करावयाचे कामाचे तपशिल | अंदाजे खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | शिबीराकरीता श्री साईनाथ रुग्णालयाच्या उत्तर बाजुस असलेल्या इमारतीस शेडला चारही बाजुने कनात लावुन मिळणे. | ८,०००/- |
| ०२ | प्रकाशने विभाग | तंत्रज्ञ तथा मान्यवर यांच्याकरीता मोफत श्रींचे ३ डी फोटो फ्रेम (१० नग) | ५,०००/- |
| ०३ | जनसंपर्क विभाग, श्री साईबाबा हॉसपीटल | वृत्तपत्र व वृत्तवाहिणीवर मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराची प्रसिद्धी करुन गरजु रुग्णांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. | ३,०००/- |
| ०४ | विद्युत विभाग | शिबीरस्थळी इलेक्ट्रीक पॉईंट, लाईटची व्यवस्था करणे. | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | कॅंटीन विभाग | शिबीर काळात मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्याकरीता मोफत चहा, कॉफी, बिस्कीट व मिनीरल वाटर बॉटल ची व्यवस्था करण्यात यावी. | ५,०००/- |
| ०६ | सि.सि.टी.व्ही. विभाग | उद्घाटन कार्यक्रमासाठी फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगची व्यवस्था | २,०००/- |
| ०७ | वाहन विभाग | मान्यवर तथा तंत्रज्ञ यांच्यामागणीप्रमाणे रुग्णालय मंदीर, प्रसादालय व बाहेरील हॉटेलमध्ये ये - जा करण्यासाठी वातानुकुलीत गाडीची व्यवस्था करणे. | २,०००/- |
| ०८ | व्दारावती भक्तनिवास | एकुण ०५ तंत्रज्ञ व मान्यवर इतर स्टाफ यांच्याकरीता ०३ वातानुकुलीत रुमची व्यवस्था शिबीर काळात मोफत करण्यात यावी, तसेच शिबीर काळाच्या एक दिवस पुर्व व शिबीर समाप्ती नंतर एक दिवस अतिरीक्त रुमची मोफत व्यवस्था (दि. ०८ ते ११ ऑगस्ट २०१९) करण्यात यावी. | १०,०००/- |
| ०९ | श्री साईप्रसादालय | १) शिबीर काळात मान्यवर तथा तंत्रज्ञ यांच्यासाठी १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा पुरविणे.<br>२) शिबीरकाळात तंत्रज्ञ व मान्यवर करीता भोजनाची व्यवस्था व्हि.आय.पी. कक्षात अथवा बाहेरील हॉटेलमध्ये व्यवस्था (दि. ०८ ते ११ ऑगस्ट २०१९) करण्यात यावी. | २०,०००/- |
| १० | जनसंपर्क विभाग | आवश्यकते प्रमाणे मान्यवर यांच्यासाठी मोफत श्रींच्या दर्शनाची व्हि.आय.पी. दर्शन व आरतीची व्यवस्था करण्यात यावी | ३,०००/- |
| ११ | कामगार विभाग | शिबीरकाळात सकाळ, दुपार, रात्री अतिरिक्त ०२ सुरक्षारक्षक प्रत्येक शिफ्टकामी श्री साईनाथ रुग्णायलात मिळावे. | २,०००/- |
| १२ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी लागणारे अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळणे बाबत. (रांगोळी, फ्लेक्स, फ्लॉवर डेकोरेशन, हॉटेल बिल, पाणी जार, सोफा, टेबल, खुर्ची, इत्यादी) | ३०,०००/- |
| | | **एकुण खर्च** | ९०,०००/- |

तरी उपरोक्त रक्कम शिबीर अंदाज पत्रकामधुन रक्कम रु. १०,००,०००/- खर्चातुन खर्ची टाकण्यात येवुन करणेत येईल. तरी श्री साईनाथ रुग्णालयात दि. ०९ ते १० ऑगस्ट २०१९ या कालावधीत मोफत श्रवण यंत्रवाटप शिबीर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व येणा-या ९०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व व सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात दि. ०९ ते १० ऑगस्ट २०१९ या कालावधीत मोफत श्रवण यंत्रवाटप शिबीर New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३०** **श्री साईनाथ रुग्णालयात मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेस व येणाऱ्या रक्कम रु.४,७०,०००/- अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक – श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांची सेवा करणेच्या अनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालय विभागाने मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीर आयोजन करणेचा मानस व्यक्त केला आहे. तरी या निमित्त दि. ०९ ते ११ डिसेंबर २०१९ या कालावधीत शिरडी येथे सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. प्लॅस्टीक सर्जरी शिबीरासाठी विविध आठ देशातुन दहा प्लॅस्टीक सर्जन सहभाग नोंदविणार आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात जनरल ओ.टी असुन त्यामध्ये तीन ऑपरेशन थिएटर कार्यान्वीत आहेत. प्लॅस्टीक सर्जरी वेळी (गायनिक इमर्जन्सी सोडुन) इतर सर्व सर्जरी बंद ठेवुन प्लॅस्टीक सर्जरीसाठी जनरल ऑपरेशन थिएटरमधील तीनही टेबल सुसज्ज ठेवण्यात येतील.

दि. ०९ ते ११ डिसेंबर २०१९ अखेर मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीरासाठी उपरोक्त संदर्भान्वये डॉ. राम चिलगर, प्लॅस्टीक सर्जन, Give Me 5 Foundation, औरंगाबाद यांचे दि. ०६ मे २०१९ रोजीचे पत्राने शिबीर घेण्याकामी परवानगी मागितलेली आहे.

डॉ. राम चिलगर यांच्या मार्फत शिबीरासाठी प्रसिद्धी, नाव नोंदणी, नाकाची प्लॅस्टीक सर्जरी, जळीत रुग्णांवर शस्त्रक्रिया, हत्ती रोगावर शस्त्रक्रिया असे विविध आजारांवर शस्त्रक्रिया व्दारे उपचार करणार आहेत. तसेच अशा प्रकारचे शस्त्रक्रियासाठी खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया नुसार जास्तीचा खर्च आकारणी करण्यात येतो. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्ण अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यापासुन वंचित राहतात त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत आयोजीत करणे आवश्यक वाटते. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल. डॉ. राम चिलगर यांच्या Give Me 5 Foundation च्या वतीने श्री साईबाबा संस्थान बरोबर यापुर्वी देखील श्री साईबाबा शताब्दी काळात प्लॅस्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात एकुण १०१ रुग्णांवर नाकाची प्लॅस्टीक सर्जरी, जळीत रुग्णांवर शस्त्रक्रिया, हत्ती रोगावर शस्त्रक्रिया असे विविध आजारांवर यशस्वी रित्या शस्त्रक्रिया करणेत आल्या होत्या.

मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीरामध्ये किमान ५० रुग्णांना लाभ देण्याचा मानस डॉ. चिलगर यांनी दर्शविलेला आहे. सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य ती चाचणी स्वतः डॉ. राम चिलगर यांचेकडुन करण्यात येणार असुन त्यानंतर निवड करण्यात आलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेत येणार आहेत.

सदर प्लॅस्टीक सर्जरी शिबीरामध्ये खुर्च्या, जाहिरातीसाठी फ्लेक्स बोर्ड, वृत्तवाहीनीवरील बातम्या, वृत्तपत्रात जाहीराती व येणा-या मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी वाहन व्यवस्था, व्हि.आय.पी. भोजन व्यवस्था, दर्शन व्यवस्था, निवास व्यवस्था, औषध व्यवस्था इत्यादींची संस्थान मार्फत मोफत व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच शिबीरासाठी येणारे डॉक्टर्स हे परदेशी (अमेरिका, इटली, ग्रीस, पेरु, सिंगापुर, तैवान, फिलीपीन्स) असलेमुळे त्यांची जेवणाची व नाष्ट्याची सोय बाहेरील हॉटेलमध्ये करणे गरजेचे आहे.

तसेच संस्थानच्या इतर विभागाकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगीक बाबींची देखील पुर्तता होणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - दि. ०९ ते ११ डिसेंबर रोजी मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच डॉ. चिलगर व परदेशीय डॉक्टर्स यांच्या राहण्याची, जेवणाची, दर्शन, आरतीची व इतर अनुषंगीक गोष्टींची व्यवस्था प्लॅस्टीक सर्जरी शिबीर कालावधीच्या एक दिवस आगोदर व एक दिवस नंतर (दि. ०८ ते १२ डिसेंबर २०१९) करण्याची आवश्यकता आहे.

| अ.नं | विभाग | करावयाचे कामाचे तपशिल | अंदाजे खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | १) शिबीर उद्घाटन व समाप्ती कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था (२५'X४०' साईज)<br>२) मान्यवर बैठक व्यवस्थेसाठी सोफासेट ०७ नग व ०३ टी पॉय<br>३) ३०० रुग्णांना बैठक व्यवस्थेकामी ३०० खुर्च्या | ६०,०००/- |
| ०२ | जनसंपर्क विभाग, श्री साईबाबा हॉसपीटल | वृत्तपत्र व वृत्तवाहिणीवर प्लॅस्टीक सर्जरी शिबीराची प्रसिद्धी करुन गरजु रुग्णांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. | ३,०००/- |
| ०३ | विद्युत विभाग | शिबीरस्थळी इलेक्ट्रीक पॉईंट, लाईटची व्यवस्था करणे. | - |
| ०४ | कॅंटीन विभाग | शिबीर काळात मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्याकरीता मोफत चहा, कॉफी, बिस्कीट व मिनीरल वाटर बॉटल ची व्यवस्था करण्यात यावी. | ५,०००/- |
| ०५ | ध्वनीक्षेपण विभाग | शिबीरस्थळी उद्घाटनासाठी साऊंड सिस्टीमची व्यवस्था करणे | - |
| ०६ | सि.सि.टी.व्ही. विभाग | उद्घाटन कार्यक्रमासाठी फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगची व्यवस्था | २,०००/- |
| ०७ | वाहन विभाग | १) शिबीर काळात मान्यवर तथा डॉक्टर्स यांना मुंबई, पुणे, औरंगाबाद, | ५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नाशिक, व शिरडी विमानतळ येथुन आणणे व सोडणेकामी वातानुकुलीत गाडीची व्यवस्था करण्यात यावी.<br>२) मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यामागणीप्रमाणे रुग्णालय मंदीर, प्रसादालय व बाहेरील हॉटेलमध्ये ये-जा करण्यासाठी वातानुकुलीत गाडीची व्यवस्था करणे. | |
| ०८ | व्दारावती भक्तनिवास | एकुण २० डॉक्टर्स व मान्यवर इतर स्टाफ यांच्याकरीता १० वातानुकुलीत रुमची व्यवस्था शिबीर काळात मोफत करण्यात यावी, तसेच शिबीर काळाच्या एक दिवस पुर्व व शिबीर समाप्ती नंतर एक दिवस अतिरीक्त रुमची मोफत व्यवस्था (दि. ०८ ते १२ डिसेंबर २०१९) करण्यात यावी. | ३०,०००/- |
| ०९ | श्री साईप्रसादालय | १) शिबीर काळात मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा पुरविणे.<br>२) शिबीरकाळात २० परदेशी डॉक्टरांकरीता भोजनाची व्यवस्था व्हि.आय.पी. कक्षात अथवा बाहेरील हॉटेलमध्ये व्यवस्था (दि. ०८ ते १२ डिसेंबर २०१९) करण्यात यावी. | ५०,०००/- |
| १० | जनसंपर्क विभाग | आवश्यकते प्रमाणे मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी मोफत श्रींच्या दर्शनाची व्हि.आय.पी. दर्शन व आरतीची व्यवस्था करण्यात यावी | ३,०००/- |
| ११ | कामगार विभाग | शिबीरकाळात सकाळ, दुपार, रात्री अतिरिक्त ०२ सुरक्षारक्षक प्रत्येक शिफ्टकामी श्री साईनाथ रुग्णायलात मिळावे. | २,०००/- |
| १२ | औषध भांडार, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीरकामी मागणीप्रमाणे लागणारे औषध, गोळया व इतर अनुषंगीक साहित्याची उपलब्धता करणे. | २,००,०००/- |
| १३ | प्रकाशने विभाग | डॉक्टर्स तथा मान्यवर यांच्याकरीता श्रींचे ३ डी फोटो फ्रेम (१० नग) व श्री साई चरित्र (मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा आवृती) (१० नग) | १०,०००/- |
| १४ | मंदीर विभाग | शिबीर उद्घाटनकामी पुजेच्या साहीत्यासह पुजा-याची व्यवस्था करणे. तसेच डॉक्टर्स तथा मान्यवर यांच्याकरीता ०५ नग श्री साईबाबांची मुर्ती मोफत देण्याची व्यवस्था करण्यात यावी. | - |
| १५ | मेकॅनिकल विभाग | शिबीर उद्घाटन प्रसंगी फॅन ०६ नग, कुलर ०४ नगची व्यवस्था करण्यात यावी. | - |
| १६ | बगीचा विभाग | शिबीर उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाच्या ठिकाणी शुषोभनासाठी ५० कुंडयांची व्यवस्था करण्यात यावी. | - |
| १७ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी लागणारे अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळणे बाबत. (रांगोळी, फ्लेक्स, फ्लॉवर डेकोरेशन, हॉटेल बिल, पाणी जार, सोफा, टेबल, खुर्ची, इत्यादी) | १,००,०००/- |
| | | एकुण खर्च | ४,७०,०००/- |
| | | (रक्कम रुपये चार लाख सत्तर हजार मात्र) | |

तरी उपरोक्त रक्कम शिबीर अंदाज पत्रकामधुन रक्कम रु. १०,००,०००/- खर्चातुन खर्ची टाकण्यात येवुन करणेत येईल. तरी श्री साईनाथ रुग्णालयात दि. ०९ ते ११ डिसेंबर २०१९ या कालावधीत मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व गिव्ह मी फाई फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व येणा-या ४,७०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात दि.०९ ते ११ डिसेंबर २०१९ या कालावधीत मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीर गिव्ह मी फाई फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,७०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१** **श्री गणपती नेत्रालय, जालना यांचे संस्थान हॉस्पिटलबरोबर Affiliation (संलग्नीकरण) करणेसंबधी आलेल्या पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.- नवीन प्रस्ताव.

प्रास्ताविक- समाजातील सर्व तळा-गाळातील गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभुत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.दि.०१ जानेवारी २०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयात होणारे उपचार हे केवळ १० रुपये रुग्णतपासणी फी घेऊन मोफत करणेत आलेले आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथी, होमिओपॅथी, व आयुर्वेदिक अशा विविध वैद्यकीय उपचार पध्दतीने उपचार घेण्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांचेमार्फत टी.बी.रुग्णांसाठी डॉट सेंटर, एड्स विषयी समुपदेशन व एच.आय.व्ही ची मोफत वैद्यकीय तपासणी करण्याची सुविधा श्री साईनाथ रुग्णालयात सुरु करणेत आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णलयात दोन सुसज्ज शस्त्रक्रीया संकुल कार्यान्वीत आहेत. यात जनरल सर्जरी, ऑर्थो. सर्जरी, स्त्रीरोगतज्ञ व प्रसुती विभाग संबंधीत शस्त्रक्रीया केल्या जातात, तसेच कान, नाक,घसा सर्जरी व नेत्ररोग विभाग याकरीता स्वतंत्रपणे शस्त्रक्रीयागृहे कार्यरत आहेत. याशिवाय ०८ कॉटचे अतिदक्षता विभाग असुन या विभागात गंभीर, अत्यवस्थ रुग्णांवर उपचार केले जातात. याशिवाय सुसज्ज अशी रक्तपेढी देखील कार्यरत आहे.
उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये श्री गणपती नेत्रालय ,जालना यांनी असे नमुद केले आले आहे की, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट हे गरजु व्यक्तींना सर्व प्रकारे योग्य त्या सेवा पुरवत आहे. त्यापैकी रुग्णसेवा ही एक महत्वाची सेवा ट्रस्टकडुन पुरविली जात आहे.याबरोबरच श्रीगणपती नेत्रालय,जालना यांचेकडुनही नेत्र रुग्णांना सेवा पुरविली जात आहे. श्री गणपती नेत्रालय,जालना हे स्पेशालिटी आय इन्सीटयुट आहे जे १९९२ पासुन गरजु रुग्णांवर उपचार करत आहे. आजपर्यत ७,५०,००० रुग्णांवर उपचार करुन २,००,००० रुग्णांवर शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. परंतु याच्याही पुढे जाऊन अधिकाधिक सेवा गरजु रुग्णांपर्यत पोहचण्याकरिता आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

गणपती नेत्रालय हे ९५ बेडचे आय हॉस्पीटल असुन यामध्ये १० ऑपरेशन थिएटर्स व १४ कन्सलटन्टस डॉक्टर्स कार्यरत आहेत. यारुग्णालयामध्ये विशेषताह मोतीबिंदु,ग्लॉकोमा.कॉर्निया,आय बॅक, लहान मुलांच्या डोळयासंबंधीचे आजार यांवर तसेच अजुन अनेक गुंतागुंतीच्या आजारांवर उपचार केले जातात.

सदर हॉस्पीटलमध्ये शासनाची MJPJAY व PMJAY या योजना स्कीमस लागु असुन दारिद्रयरेषेखालील रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. तसेच रुग्णालयामध्ये राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना,सर्व शिक्षा अभियान,मोतीबिंदु फ्री महाराष्ट्र ,स्कुल आय कॅम्प यासारख्या योजनाव्दारे रुग्णांना उपचार पुरविले जातात.

रुग्णालयात IPF स्कीमच्या अंतर्गत २५ % शस्त्रक्रिया हया संपुर्णपणे मोफत केल्या जातात. त्यांनी शेवटी असेही नमूद केले आहे की, श्री गणपती नेत्रालय हे आपल्या सारख्या ट्रस्ट हॉस्पीटलमध्ये येणा-या रुग्णांना अजूनही आवश्यक त्या नेत्रसंबंधी सेवा देणेस इच्छुक आहे.

विभागाचे मत – श्री साईनाथ रुग्णालयांत नेत्ररोग विभागात मुख्यत्वे करुन रुग्णांचे डोळयांविषयीचे सर्व रुटीन तपासणी तसेच मोतीबिंदु सारख्या शस्त्रक्रिया विविध प्रकारे करणेत येतात.

श्री साईनाथ रुग्णालयाची नेत्ररोग विभागांतील ओपीडी,आयपीडी व शस्त्रक्रिया यांची आकडेवारी खालीलप्रमाणे.

| अ.नं. | वर्ष | ओपीडी | आयपीडी | शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ | ४९,३५६ | ४९०२ | ४२२१ |
| २ | जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८ | ४४,९८८ | ४३८६ | ३८६९ |
| ३ | जानेवारी २०१९ ते मे २०१९ | १९,१४१ | १८९४ | १८१३ |

रुग्णालयात असणारा रुग्णांचा वाढता ओघ लक्षात घेता व काही आवश्यक व आपलेकडे उपलब्ध नसणा-या उपचारांकरिता प्रसंगी काही रुग्णांना पुढील उपचारांकरिता बाहेरील रुग्णालयांत रेफर करावे लागते. श्री गणपती नेत्रालयाचा पुर्वीपासुनच श्री साईबाबा संस्था रुग्णालयाच्या रेफरल यादीत समावेश आहे.त्यामुळे

डोळयासंबंधीचे जे उपचार श्री साईनाथ रुग्णालयांत होत नाहीत,अशा रुग्णांना श्री गणपती नेत्रालय,जालना येथे पाठविले जात आहे.परंतु आवश्यक ती सुपरस्पेशालिटी दर्जाची सेवा श्री साईनाथ रुग्णालयात गणपती नेत्रालयाकडुन उपलब्ध होत असेल तर रुग्णांना इतरत्र जाणेची आवश्यकता राहणार नाही.

परंतु आजपर्यंत संस्थान रुग्णालयाने इतर कोणत्याही रुग्णालयाशी रुग्णसेवेबाबत संलग्नीकरण केलेले नाही.श्री गणपती नेत्रालयातील नेत्रविभागांतील तज्ञ डॉक्टरांची श्री साईनाथ रुग्णालयात व्हिजीटींग म्हणुन आवश्यक ती कागदपत्रे घेवुन संस्थान नियमानुसार अटी व शर्तीवर नेमणुक देता येईल,असे मत आहे. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४३** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ हॉस्पिटल)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.०३.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.३४४** **दिनांक ०३.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१. **लाडू निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदी कामी ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे लाडु निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | लाडु निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदी |
| ०२ | मागणी | स्टेनलेस स्टील भांडी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. २७.०२.२०१९ ते दि. १८.०३.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०८ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०८ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – २७.०२.२०१९<br>टेक्निकल बीड – ३०.०५.२०१९<br>कमर्शियल बीड – २८.०६.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०८ (आठ) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०६ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. तर ०२ निविदाधारकांना MSME अंतर्गत सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | दर प्रती किलो |

| Sl.No | Description of Item(s)/ Supplier Name | स्टेनलेस स्टील पातेले (मध्यम) | स्टेनलेस स्टील कढई (मोठी) | स्टेनलेस स्टील पातेले (मोठे) | स्टेनलेस स्टील पातेले (लहान) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | GorakhRasane | 422.10 | 417.60 | 422.10 | 422.10 |
| 02 | NAVNITLAL AND BROS | 437 | 433 | 437 | 437 |
| 03 | OM SAI ENTERPRISES | 451.50 | 477 | 451.50 | 451.50 |
| 04 | SWARAJ INDUSTRIES | 470 | 475 | 476 | 476 |
| 05 | SUPER SEALS | 483.80 | 477.90 | 483.80 | 483.80 |
| 06 | Mahalaxmi Steel | 525 | 530 | 525 | 525 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 07 | GANDHI BROTHERS | 580 | 575 | 580 | 580 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – ---- | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | -- |
| १७ | मागील पुरवठादार | -- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| | ---- --- ---- ---- | |

२३. संक्षिप्त टीप – (प्रस्ताव)- संस्थानचे लाडु निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. १८.०३.२०१९ रोजी संपलेली होती. तथापी दि. १०.०३.२०१९ रोजी लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता सुरु झालेने सदर निविदांबाबतची पुढील कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे आचार संहिता संपल्यानंतर दि. ३०.०५.२०१९ रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. तसेच तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०७ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २८.०६.२०१९ रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर चारही items साठी न्युनतम आहेत.

तरी संस्थानचे लाडु निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदीसाठी न्युनतम निविदाधारक मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.**

**मे.सोमनाथ गंगाधर रासने,संगमनेर**

| SR. NO | Sl.No | Description of Work / Item(s) | Qty In Nos. | निविदेतील L1 दर रुपये प्रती किलो | चर्चावाटाघाटी नंतरचे दर रुपये प्रती किलो |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1.00 | **स्टेनलेस स्टील पातेले (मध्यम)<br>साईज -वरचा व्यास - ११४३ mm,<br>तळाचा व्यास - ११०४.९ mm, उंची-५३३ mm,<br>तळाची जाडी- ६ mm बाजुंची जाडी- ४ mm<br>स्टील ३०४ ग्रेड, ८ % निकेल** | 12 | 422.1 | 421/- |
| 2 | 2.00 | **स्टेनलेस स्टीलकढई (मोठी)<br>साईज -वरचा व्यास - १३८४.३ mm, उंची - ३८१mm, जाडी - ५ mm<br>स्टील ३०४ ग्रेड ८% निकेल** | 15 | 417.6 | 416/- |
| 3 | 3.00 | **स्टेनलेस स्टीलपातेले (मोठे)<br>साईज–वरचा व्यास - १२३१.९ mm, तळाचा** | 25 | 422.1 | 421/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | व्यास-११६८.४ mm, उंची-४८२.६ mm, तळाची जाडी-६ mm, बाजुंची जाडी- ४ mm स्टील ३०४ ग्रेड, ८ % निकेल | | | |
| 4 | 4.00 | स्टेनलेस स्टीलपातेले (लहान) साईज –वरचा व्यास - १००३.३ mm, तळाचा व्यास-९२७.१ mm, उंची-४८२.६ mm, तळाची जाडी - ६ mm, बाजुंची जाडी- ४ mm स्टील ३०४ ग्रेड, ८ % निकेल | 30 | 422.1 | 421/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू निर्मिती विभागासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदी कामी ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम दर स्विकारणे येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

२. **वाहन विभागाकडील नवीन १५ बसेसचा दि.१४.०८.२०१९ ते दि.३१.०३.२०२० अखेर विमा नुतनीकरण करणेकामी निम्नतम दर देणारे विमा कंपनीचे प्रतिनिधीसोबत चर्चा वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करणेबाबत.**

वाहन विभागाकडील नवीन १५ बसेसचा दि.१४/०८/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधी करीता झिरो डेप विमा नुतनीकरण करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ४ राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद लिफाप्यामध्ये दरपत्रके मागविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | वाहन विभागाकडील नवीन १५ बसेसचा दि.१४/०८/२०१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर विमा नुतणीकरण करणे. |
| ०२ | मागणी | वाहन विभागाकडील नवीन १५ बसेसचा दि.१४/०८/२०१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर विमा नुतणीकरण करणे कामी निम्नतर दर देणारे विमा कंपनीचे प्रतिनिधीसोबत चर्चा वाटाघाटी करून अंतिम दर निश्चित करणे बाबत. |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी / दरपत्रके | जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/ ७७८ /२०१९ दि.०४.०६.२०१९ |
| ०४ | वृतपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | दुरध्वनीद्वारे व समक्ष दिले |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | सर्व राष्ट्रीयकृत विमाकंपनीचे प्रतिनीधीना समक्ष दिले. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.०४/०६/२०१९ ते दि.१५/०६/२०१९ अखेर |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का? | - |
| १० | सर्व निविदाकारांनीबयाणा रक्कम आदा केली आहे का | दरपत्रके असलेने बयाना रक्कम नाही. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | - |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर— | |

| **अ.न** | **तपशिल** | **IDV** | **दरपत्रकात दिलेले दर** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दि.न्यु. इंडिया अॅश्युरन्स कं.लि. शाखा श्रीरामपुर | **युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कं.लि. - नाशिक रोड** | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कं.लि. शिर्डी | दि.ओरीएन्टल इंश्योरेंन्स क. लि. शाखा-कोपरगाव | नेशनल इंन्श्योरेन्स क. लि. शाखा -कोपरगांव |
| १ | १५ बसचा झिरो डेप विमा | २५६५०००० | १०६६५०० | **१११७०६५** | ११३९९७० | ११३३८३५ | ११२५००० |
| **पात्र / अपात्र** | | | अपात्र | **पात्र** | पात्र | पात्र | पात्र |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शेरा | - | L1 | L4 | L3 | L2 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या नुतनीकरणचा तपशिल आणि नुतनीकरण दर- | |
| | अ.नं. \| वर्ष \| परिमाण \| एकुण दर हप्ता रक्कम | |
| | सदर १५ बसेस नवीन असलेने प्रथम विमा नुतनीकरण करण्यात येत आहे. | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिलः- | |
| | अ.नं. \| वर्ष \| खर्च परिमाण | |
| | सदर १५ बसेस नवीन असलेने प्रथम विमा नुतनीकरण करण्यात येत आहे. | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | लागु नाही. |
| १६ | मागील नुतनीकरण दर | लागु नाही. |
| १७ | मागील नुतनीकरण विमा कंपनी | लागु नाही. |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | नवीन १५ बसेसचा दि.१४/०८/२०१९ ते ३१/०३/२०२० अखेर विमा नुतणीकरणासाठी दिलेले दर रु.११,१७,०६५/- (सदरचे दर सर्व GST व करासहीत आहेत.) |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नांव | युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का? | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे | प्र.अधिक्षक वाहन विभाग, मा. प्रशासकीय अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रु. | अंदाजे अपेक्षीत खर्च रू १०,५०,०००/- |
| २३ | १५ बसेस नविन खरेदी केलेल्या असल्याने त्यांची विमा रक्कम वाहनाच्या किमती मध्ये समाविष्ट होती. आता प्रथमच दि.१४/०८/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीचा झिरो डेप विमा नुतणीकरण करण्यात येत आहे. | |

**२४ संक्षिप्त टिपः-** दि.२६.०२.२०१९ रोजीच्या मा. व्यवस्थापन सभेतील निर्णय क्रमांक १४० नुसार "११० वाहनांचा दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीतील वार्षीक विमा नुतणीकरण करणेकामी निम्नतम दर धारक युनायटेड इंडिया इन्शुरेन्स कं. लि.शिर्डी यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रू.२०,००,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, व उर्वरीत २५ वाहनांचा वर्षापेक्षा कमी कालावधी करीता झिरो डेप विमा नुतणीकरण करणे कामी फेर दरपत्रके मागविण्यात यावेत, अशी दि.१८/०२/२०१९ रोजीचे उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

यानुसार सन २०१९-२० या वर्षाकरीता ११० वाहनांचे विमा नुतणीकरण करणे कामी युनायटेड इंडिया इन्शुरेन्स कं. लि.शाखा-शिर्डी यांना कार्यादेश व रू.२० लाख मात्र अग्रीम रक्कम देवुन सदर वाहनांचे विमा नुतणीकरण करुन घेण्यात आलेले आहे.

उर्वरीत २५ वाहनापैकी ५ वाहनांचा विमा नुतणीकरण दि.ओरीएन्टल इंश्योरेंन्स कं.लि. शिर्डी यांचेकडून तसेच ४ वाहनांचा विमा नुतणीकरण नेशनल इंन्श्योरेन्स कं लि.शाखा-कोपरगाव यांचेकडून करुन घेण्यात आलेला आहे.

तसेच उर्वरीत वाहनांपैकी (नविन बसचे) १५ वाहनांचे दि.१४/०८/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधी विमा नुतणीकरण करणे कामी दरपत्रके मागवून प्राप्त ५ दरपत्रके मा.खरेदी समितीच्या सभेपुढे दि.२८/०६/२०१९ रोजी उघडण्यात आली होती.

यावेळी १५ बसेसचे झिरो डेप विमा नुतणीकरण करणे करीता विमा कंपन्यांनी दिलेल्या दराचा विचार करता युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु.११,१७,०६५/- मात्र आहेत.

सबब, १५ बसेसचे विमा नुतणीकरणाकरीता निम्नतर दर देणारी विमा कंपनी युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांचे प्रतीनिधीना मा.उपसमितीच्या सभेपुढे बोलावुन चर्चा वाटाघाटी करुन अंतीम दर निश्चीत करता येतील.

मागणीः- तरी नवीन १५ बसेसचा दि.१४/०८/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधी करीता झिरो डेप विमा नुतणीकरण करणे करीता न्युनतम दर देणारे युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांना मा.उप समितीच्या सभेपुढे बोलावुन चर्चा वाटाघाटी करून अंतीम दर निश्चीत करून मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणे कामी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक हे चर्चेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील नवीन १५ बसेसचा दि.१४.०८.२०१९ ते दि.३१.०३.२०२० अखेर विमा नुतनीकरण करणेकामी निम्नतम दरधारक युनायटेड इंडीया इंन्शुरेन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

३. **जिल्हा परिषद,अहमदनगर यांचे प्रस्तावानुसार शाळा खोल्या बांधकामासाठी १५९ खोल्यामधून तालुकानिहाय १२४ खोल्यांची निवड होऊन मिळणेबाबत.**

अहमदनगर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांनी दि. २४.०५.२०१७ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रस्ताव सादर करून जिल्हा परिषद शाळांना ५०० वर्ग खोल्यांची आवश्यकता असून सन २०१६-१७ च्या डीएसआर नुसार एका खोलीला रक्कम रु.७,२०,०००/- मात्र एवढा, अशी एकूण रु.३६ कोटीची मागणी केली होती.

मा. मुख्यमंत्री महोदय, यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्देश:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या कामकाजासंदर्भात वर्षा, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शासकीय निवासस्थान येथे दि. ०१ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीतील मुद्दा क्रं. १ नुसार नविन वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांची तालुका निहाय यादी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर करावी. असे निर्देश दिलेले होते.

उपरोक्त निर्देशास अनुसरून जिल्हा परिषद अहमदनगर च्या प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी रु.३६ कोटी अनुदान देणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे, दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीचे पत्र जा. क्रं. कार्या४/बांध/४२१/२०१८ दि. ०३.०४.२०१८ नुसार पाठविलेल्या इतिवृत्ताच्या प्रती मा. स्थानिक उपसमितीच्या सदस्यांना वाटप करण्यात आल्या. सदर इतिवृतात १०९२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी एकूण रु. ६८,१६,४०,०००/- मात्र इतका निधी मिळणेबाबतची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच इतिवृत्तात शाळांची नावे व नवीन बांधावयाच्या खोल्यांची संख्याही नमूद केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०४.०४.२०१८ रोजीच्या सभेतील इतिवृत्त कायम करतांना उपरोक्त विषयासंदर्भांत मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

दि. ०२.०५.२०१८ चे सभेतील विषय क्रं. १ निर्णय क्रं. २८७ (७) अन्वये चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांकडील बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी, अहमदनगर व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जिल्हयातील १०९२ वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी रक्कम रु. ६८,१६,४०,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना वर्ग खोल्या बांधकामासाठी रक्कम रु. ३० कोटी अनुदान देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. सदरहू अनुदान टप्प्याटप्याने देण्यात यावे, पहिल्या टप्प्यासाठी रु. १० कोटी मात्र अनुदान देण्यात यावे. याकरिता जिल्हाधिका-यांच्या यादीतून शाळांची निवड स्थानिक उपसमितीने करावे, असे ठरले.

मा.स्थानिक उपसमितीचा निर्णय:- मा. स्थानिक उपसमितीचे इतिवृत्त कायम करतांना दि.०६.०९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५५७ (२०) नुसार सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

१) उपरोक्त मंजूर निधी जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे वर्ग करणेत यावा व वर्ग खोल्यांचे बांधकाम शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

२) सबंधीत तालुक्याचे उपअभियंता व गट शिक्षणाधिकारी यांनी मा. स्थानिक विश्वस्तांशी विचार विनिमय करून भुमिपुजनाचे कार्यक्रम आयोजित करावे.

३) वर्ग खोलीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे सन २०१८-१९ मध्ये प्राप्त निधीतून बांधण्यात आलेली वर्ग खोली असे नमूद करावे. अशा उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेच्या १५९ खोल्यांसाठी सदर रु. १० कोटी इतके अनुदान देण्यात येत आहे, सदर खोल्यासांठी अनुदान कमी पडल्यास जास्तीची रक्कम जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांनी त्यांचेकडील उपलब्ध अनुदानातून खर्च करावी, तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या समितीने विहीत केलेल्या मानांकानुसार अनुदान खर्च करावे, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार शासन निर्णय क्रं. सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि. २६ जुन २०१८ पारीत झालेला आहे तो खालीलप्रमाणे

शासन निर्णय :-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळेच्या नविन खोल्या बांधकामासाठी पहिल्या टप्यांत रुपये १० कोटी इतके अनुदान श्री साईबाबा संस्थानद्वारे देण्यास खालील अटींच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

१) उपरोक्त मंजूर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

२) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या अखत्यारीतील शाळांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावे.

३) जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत कामाच्या प्रगतीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडे निधी वर्ग करण्यात यावा.

४) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सादर केलेल्या यादीतील शाळांची निवड श्री साईबाबा संस्थानच्या स्थानिक समितीमार्फत करण्यात यावी. असा शासन निर्णय झालेला आहे.

14. Tenderer’s lumpsum contract price as arrived at from schedule ‘A’ shall be deemed toinclude full & entire completion of all works as described here-in-before and in accordancewith good engineering practice andrecognized principles. The tender specifications,drawings, MPWD & CPWD specifications & BIS provisions are to complement each other. Incase of any missing or incomplete detail, these documents shall supplement the drawbacks.Details of construction which may not have been inadvertently specified or shown on thedrawing but are apparently and obviously required for making the building trades andservices functional and are essential for completion of work shall be deemed to be includedin the lumpsum contract signed by the contractor. The details of such work shall haveappropriate quality and specifications and shall match the quality and

specifications of thisContract. Decision of the Chief Executive Officer, ShriSaibabaSansthan Trust Shirdi shallbe final and binding in this regard.

4) सदर कामाचे करारनाम्यातील शर्त क्रं.०५अन्वये ठेकेदार यांनी बिल्टअप एरियाचे आधारे वाढीव रकमेची मागणी संस्थानकडे केलेली आहे. तथापी, निविदेमध्ये अथवा करारनाम्यामध्ये बिल्टअप एरियाचा प्रती चौरस मीटरचा दर कुठेही नमूद केलेला नाही.

सदर कामाचे निविदेतील स्कोपमध्ये ठेकेदार यांनी खालील कामे करावयाची आहेत.

- Civil Work - Main Building Civil Work, Connecting Bridge Civil Work, Electric Substation Civil Work, UG Tank, OH Tank, STP etc.
- Electrification - Internal and External Electrification with Substation, Transformer, DG Sets, Cabling, ESS Equipments etc.
- Internal & External Fire Fighting System, Lifts Installation and Commissioning, STP Eqiupments Installation and Commissioning, CCTV, PA System, TV, Internal & External Plumbing, Internal & External Drainage and Sewerage System, Internal & External Water Supply, Water Pumps, Fire Pumps, False Ceiling, Signages, HVAC System, Furniture, Interior Work, Lockers, Security Systems etc.
- External Development - Roads, Pathways, Parking Bays, Boundary Wall, Landscaping etc.

तथापी Builtup Area मध्ये ठेकेदार यांनी एकूण रू.१०९.५० कोटी ÷ एरीया २२,२१४ चौ. मी. = रू.४९,२९३/- प्र. चौ. मी. हा दर + २५%SSR 2017-18 to SSR 2018-19 मधील वाढगृहीत धरून एकूण रक्कम रू.२१,६८,२७,५८४/- मात्र इतक्या वाढीव रकमेची मागणी केली आहे.

आर्किटेक्ट यांनी प्रत्यक्षातील बिल्टअप एरीया २४,३४२ चौ.मी. इतका होत असलेचे कळविले आहे. निविदेतील Scope of Work मध्ये २२,२१४ चौ.मी. इतका बिल्टअप एरीया नमूद करणेत आलेला आहे. म्हणजेच एकूण २,१२८चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रात वाढ होतअसलेचे कळविले आहे.सदर वाढीव क्षेत्राकरीता रु.४९,२९३/- प्रती चौ.मी. दराने एकूण रक्कम रु.१०,४८,९५,५०४/- मात्र ठेकेदार यांना देय होत असल्याचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी त्यांचे दि.२१/०६/२०१९ रोजी दिलेल्याअभिप्रायानुसार कळविले आहे.

5) निविदेतील पृष्ठ क्रं. ४९ वरील शर्त क्रं.१५ (वर नमूद केली आहे) अन्वये ठेकेदार यांनी निविदा भरतेवेळी ड्रॉईंग व स्पेसिफिकेशन वरुन डिटेल्स कॅलक्युलेट करणे आवश्यक होते व त्यानूसार ई-निविदा भरणे आवश्यक होते.

6) निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील डाटा शिट तसेच पृष्ठ क्रं.३१ वरील Scope of Work मध्ये एकूण २२,२१४ चौ. मी. बांधकाम क्षेत्र नमूद केले आहे. निविदेसोबत पुरविणेत आलेल्या टेंडर ड्रॉईंगनुसार २४,३४२चौ. मी. इतका builtup area आहे.ठेकेदार यांनी निविदा भरतेवेळी ड्रॉईंग वरुन एरीया कॅलक्युलेट करणे आवश्यक होते व त्यानूसार ई-निविदा भरणे आवश्यक होते.

7) दि.१२/०६/२०१८ रोजी झालेल्या Pre-bid meeting चे Common Set of Deviations (CSD) मधिल अ.नं.१२ अन्वये Quantity Variation चे उपस्थित करण्यातआलेल्या मुद्दयाबाबत,"The bidder is advised to follow his own calculations. Please read the Disclaimer on Page no.34 of tender document." याप्रमाणे स्पष्टीकरण करणेत आलेले आहे.

सदर कॉन्ट्रॅक्ट हे एक Lumpsum स्वरूपाचे Contract असून वरील शर्तींचा अभ्यास होऊन ठेकेदारयांनी ई-निविदा भरणे अपेक्षित होते.

प्रस्ताव-तरी श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत बांधकामाचे ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी वाढीव बिल्टअप एरीयापोटी केलेल्या अतिरिक्त रकमेच्या मागणीबाबतनिर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.३४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत बांधकामाचे Contract हे Drawing मध्ये बदल झाला नसल्यास त्यानुसार Lumpsum स्वरुपाचे दिलेले असल्याने भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना ई-निविदेतील मंजूर रकमेपेक्षा अतिरिक्त रक्कम देण्याची आवश्यकता नाही, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०५** **नियोजित दर्शन रांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजुने जोडणेसाठी तेथील Pavilion चा Sloping Slab तोडून त्या ठिकाणी फ्लॅट स्लॅब करणे व तेथील कॉरीडॉरचे बांधकामात इतर अनुषंगीक बदल करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.२६,०४,७८०/- इतक्या अपेक्षीत वाढीव खर्चास मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

प्रस्तावना:- सदर प्रकल्पाचे बांधकामास दि.१९/१०/२०१८ पासून सुरुवात करणेत आली आहे. ठेकेदार यांचे समवेत दि.२२/१०/२०१८ रोजी करारानामा करण्यात आलेला आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| ठेकेदार | भानू कन्ट्रक्शन, मुंबई. |
| कार्यादेश | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.१०९.५० कोटी. |
| करारनामा दिनांक | दि.२२/१०/२०१८. |
| कामाचा कालावधी | १२ महिने. (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९) |
| कामाचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ – २२,२१४ चौ. मी. (FSI Area). |
| कामाची सद्यस्थिती | • सदर प्रकल्पातील मुख्य इमारतीचे फुटींग व आर.सी.सी कॉलमचे तळमजला व पहिला मजला स्लॅबपर्यंतचे १०० % काम पूर्ण झाले आहे.<br>• मेझॅनाईन स्लॅबचे १०० % काम पूर्ण झाले आहे.<br>• प्लिंथ लेव्हल ग्रेड स्लॅबचे ९० % काम पूर्ण झाले आहे.<br>• तळ मजला स्लॅबचे सुमारे ८० % काम पूर्ण झाले आहे.<br>• पहिला मजला स्लॅबचे ६० % काम पूर्ण झाले आहे.<br>• कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आरसीसी फुटींग, प्लिंथ बीम, स्लॅब लेव्हलपर्यंत कॉलम, बॅकफिलींग व प्लिंथ लेव्हल ग्रेड स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. |

याप्रकल्पाचे मंजूर रेखांकन नकाशा व बांधकाम नकाशे तसेच निविदे सोबत अपलोड केलेल्या नकाशांनूसार विषयांकित Connecting Corridor हा शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यास गेट नं.०२ समोर टॉयलेट एरीयाच्या ठिकाणी जोडणे प्रस्तावित आहे. परंतू सदर Connecting Corridor हा पहिल्या मजल्यास ज्याठिकाणी जोडला जाणार आहे, त्याठिकाणी टॉयलेट एरीया आहे. सदर ठिकाणी दुस-या व तिस-या मजल्यावरील टॉयलेटचे डाऊनटेक पाईप आलेले आहेत. तसेच सदर ठिकाणी ०३ आर.सी.सी. कॉलम येत आहेत. तसेच सदर Connecting Corridor मुळे एक संपूर्ण जेन्टस टॉयलेट एरीया तोडावा लागेल व त्यामूळे पहिल्या माळयावरील भक्तांची गैरसोय होईल. सदर ठिकाणी Connecting Corridor जोडणे उचित होणार नाही.

सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.२२/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*".. .. Please fine attached two drawings giving the proposal of the connection to Shanti Niwas of the connecting corridor, (coming from Darshan Q complex), with minimum no of columns in the court in front of Dwar No 2.*

*The connection to Shanti Niwas has also been shown. Earlier the connection had been shown as a direct connection into Shanti Niwas which, in essence means that it will have to go through the pipe shafts for toilets at the connecting level of first floor as well as the above two floors of toilets. Keeping this option will not only render the toilets useless but also the space available for passage for the Queue is restricted.*

*Secondly, the structural connection is posing a problem at foundation level. Thirdly, the segregation of the VIP traffic coming from the Darshan Q complex is a problem.*

*The enclosed proposal takes care of all three problems by making an entry connection over the existing Pavilion connecting to the Shanti Niwas. The regular devotees can continue moving on the First floor level of the Shanti and Bhakta Niwas upto the temple via existing first floor route. While the VIP devotees can be segregated by sending them down to the ground floor of Shanti Niwas and further to the temple via existing ground floor route.*

*This proposal will involve the breaking of the current sloping roof of the pavilion adjacent to the Shanti Niwas and constructing a slab connecting to the Shanti Niwas at first floor level and over this a roof similar to the earlier pavilion roof will be constructed. In all there will be no extra area construction at the Ground Floor level while at the first floor level and extra area of 60 sqm needs to be added.*

*As per Annexure-B with our letter no. 4069/2019/UK/51 dated 4th Jun 2019 the rate for construction for extra areas is Rs.43,413/sqm.*

*Hence the cost of excess areas works out to 60 sqm X Rs.43,413/- = Rs 26,04,780/-.*

*We will go ahead with the detailing upon receiving approval from your end."*

सदर Connecting Corridor साठी पर्यायी जागा शांतीनिवास इमारतीचे प्रशासकीय कार्यालयाचे प्रवेशव्दाराचे पश्चिमेस असलेल्या पोर्चचा Trapezoidal Slab काढून त्याठिकाणी नवीन प्लेन स्लॅब टाकून पहिल्या माळयास जीन्याजवळ सदर Connecting Corridor जोडणे उचित होईल असे कळविले आहे. तसेच सदर कामामध्ये ६० चौ. मीटर इतके बांधकाम क्षेत्रफळात वाढ होत असून त्यामध्ये रु.४३,४१३ प्र.चौ.मीटर या दराने एकूण रक्कम रु.२६,०४,७८०/- मात्र इतक्या रकमेत वाढ होत असल्याचे कळविले आहे. याबाबत आर्किटेक्ट यांचेकडून वाढीव क्षेत्रफळाकरीता सविस्तर अंदाजपत्रक तयार करून घेता येईल.

प्रस्ताव:- तरी नियोजित श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शन रांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी तेथिल Pavilion चा Sloping Slab तोडून त्या ठिकाणी फ्लॅट स्लॅब करणे व तेथिल कॉरीडॉरचे बांधकामात इतर अनुषंगिक बदल करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२६,०४,७८०/- इतक्या अपेक्षित वाढीव खर्चास मान्यता देणे तसेच मंजूर बांधकाम नकाशांमध्ये बदल होत असल्याने याकामी सुधारीत बांधकाम परवानगी घेणेसाठी शिर्डी नगरपंचायत यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शन रांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २६,०४,७८०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साई प्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्पालॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र क्र.श्रीसासंएक्रेसो/३३५/२०१९ दि.११.०३.२०१९.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना –मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/३३५/२०१९ दि.११/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये "संस्थानमार्फत नव्याने श्री साईप्रसादालयासाठी पश्चिम बाजूस आऊट गेट सुरु करण्यात आले असून सदर गेटलगत साईभक्तांना मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद मिळण्याची सोय व्हावी यासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी ही श्री साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालवू इच्छित आहे. तरी साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थेस श्री साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालविणेस परवानगी मिळावी,"असेबाबत विनंती केलेली आहे.

साईप्रसादालयाचे गर्दीचे नियोजनाचे दृष्टिकोनातून व जागेच्या आवश्यकतेच्या व उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना त्यांचे विनंतीप्रमाणे साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूस असलेल्या आऊट गेटजवळ मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअरसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे? याबाबतचे प्र.अधिक्षक,साईप्रसादालय विभाग व संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांचेकडून इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३९०/२०१९ दि.१८/०५/२०१९ अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविणेत आले.

त्यास अनुसरुन प्र.अधिक्षक,साईप्रसादालय विभाग यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएस/वशी-प्रसाद/३८/२०१९ दि.२०/०५/२०१९ अन्वये "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साईप्रसादालयाच्या पश्चिम बाजूस असलेल्या आऊट गेटजवळ मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद स्टोअरसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल," असेबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील जा.नं.१५८/२०१९ दि.२२/०५/२०१९ अन्वये "साईभक्तांचे सोयीचे दृष्टिने सदर नमूद ठिकपणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान नियमाप्रमाणे श्री साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटजवळ मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करण्यास परवानगी देणेस हरकत नाही," असेबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.११/०३/२०१९ रोजीच्या पत्रात साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालविण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि त्यात सदर विक्री केंद्राचा स्टॉल ठेवण्यासाठी किती जागेची आवश्यकता आहे याबाबतचे मोजमाप सदर पत्रात नमूद केलेले नसलेने आज दि.२२/०६/२०१९ रोजी उक्त सोसायटीस दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/५४/२०१९ दि.२२/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उक्त ठिकाणच्या मोकळ्या जागेत १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट इतकी जागा वापरास मिळावी असेबाबत इकडेस कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना,त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या विनंतीप्रमाणे संस्थान मालकीच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० पै. व ८५ पै. चे क्षेत्रातील साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मोकळ्या जागेत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करणेकामी १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट या आकाराची जागा,शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करीत

त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडे कराराने वापरास देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना,त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या विनंतीप्रमाणे संस्थान मालकीच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० पै. व ८५ पै. चे क्षेत्रातील साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मोकळया जागेत मिनरल वॅाटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करणेकामी १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट या आकाराची जागा,शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करीत त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडे कराराने वापरास देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४९** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **शिर्डी येथे संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणीकामी २ एकर क्षेत्राची जागा निश्चीत करणे/खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद –१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चित करण्याबाबतचे महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८.

प्रस्तावना- संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणीकामी शिर्डी बसस्थानकासमोरील सर्वे नं.१२५/७ मधील १ हेक्टर १९ आर, १२५/८ मधील १ हेक्टर २१ आर पैकी २ एकर जागा उपलब्ध झाल्यास शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारता येईल किंवा साईप्रसादालयाच्या मागील बाजूस मिलीटरी कॅम्पकडे जाणा-या रस्त्यावर गट नं.८७ पैकी १ हेक्टर ५४ आर व गट नं.८८ पैकी १ हेक्टर ४६ आर पैकी २ एकर जागा उपलब्ध होवू शकेल यासाठी उपरोक्त दोन जागांपैकी एका जागेवर मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणीकामी निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.२० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"शिर्डी बसस्थानकासमोरील सर्वे नं.१२५/७ मधील १ हेक्टर १९ आर, १२५/८ मधील १ हेक्टर २१ आर पैकी २ एकर जागेमध्ये संस्थानकरीता अग्निशमन केंद्र उभारणेत यावे,"असे ठरले.

तथापि सदरचे २ एकर क्षेत्र शिर्डी विकास आराखडयामध्ये आरक्षण क्रं.३४ नुसार संस्थानचे रुग्णालय विस्तारीकरणासाठी आरक्षित असल्याने सदरचे क्षेत्र ज्या कारणासाठी आरक्षित केलेले आहे त्याच कारणासाठी त्याचा वापर करणे विधीग्राहय असल्याने तसेच सदर क्षेत्रावरील संस्थानचे रुग्णालय विस्तारीकरणासाठीचे आरक्षण शासनाकडून रद्द करुन आणणेकामी वेळ जास्त लागणार असल्याने तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेसमवेत चर्चा करणेत आली असता, सदरचे क्षेत्राचे आरक्षण रद्द करणेऐवजी अग्निशमन केंद्रासाठी विनाआरक्षण असलेली संस्थान मालकीची अन्य जागा उपलब्ध होवू शकेल किंवा कसे याबाबत फायर ॲण्ड सेफटी विभाग व मालमत्ता विभाग यांनी संयुक्त पाहणी करावी,अशा सुचना केलेल्या होत्या.

त्यानुसार फायर ॲण्ड सेफटी विभाग व मालमत्ता विभागाने संयुक्त पाहणी केली असता संस्थानच्या शिर्डी शहरा नजीकच्या सर्व जागा वेगवेगळया कारणांसाठी आरक्षित असलेमुळे फायर ॲण्ड सेफटी विभागास मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणेकामी क्षेत्र उपलब्ध होवू शकले नाही.

तदनंतर दि.२६/०१/२०१९ रोजी तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेसमवेत उपजिल्हाधिकारी, प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग,प्र.अधिक्षक,फायर ॲण्ड सेफटी विभाग यांची एकत्रित चर्चा

झाली असता त्यात संस्थानचे रुग्णालये अन्य ठिकाणी होणार असलेमुळे शिर्डी बस डेपो पार्कींग ते रिंग रोड दरम्यानचे अंदाजे ९ एकर जागेवरील सध्याचे हॉस्पिटल विस्तारीकरणाचे आरक्षण मालमत्ता विभागामार्फत रद्द करुन संस्थान उपयोगी विविध कारणांसाठी (फायर स्टेशन, निवासस्थाने,पार्कींग व इतर) वापर करणेकामी फेरप्रस्ताव सादर करावा. त्याबाबतची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांची सुचित केलेले होते.

त्यानुसार संस्थानचे मालमत्ता विभागामार्फत शिर्डी विकास आराखडयामध्ये आरक्षण क्रं.३४ नुसार संस्थानचे रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.१२५ पै., १२६ पै. व १२४ पै. मधील आरक्षित क्षेत्र ६ हेक्टरचा विनियोग संस्थानचे रुग्णालय विस्तारीकरणा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी करणेकामी सदरचे आरक्षण क्रं.३४ रद्द करणे व त्यासाठीचा प्रस्ताव नगरपंचायत, शिर्डी मार्फत शासनाकडे सादर करणेकामीच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१३० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

शिर्डी विकास आराखडयामधील आरक्षण क्रं.३४ नुसार संस्थानचे रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.१२५ पै.,१२६ पै.व १२४ पै.मधील आरक्षित क्षेत्र ६ हेक्टरचा विनियोग संस्थानचे रुग्णालय विस्तारीकरणासाठी करण्यात यावा. तसेच संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणीकामी इतर ठिकाणी जागेची निवड करण्यात यावी,असे ठरले.

सध्यस्थितीत शिर्डी येथे संस्थान मालकीचे मध्यवर्ती ठिकाणी विनाआरक्षित कोणतेही क्षेत्र उपलब्ध होवू शकत नाही. संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्राची निकड लक्षात घेता शिर्डी येथे मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच श्रीं चे मंदिरापासून सुमारे १ किमी.अंतराचे आत फायर अॅण्ड सेफटी विभागासाठी मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणेकामी २ एकर क्षेत्र उपलब्ध करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेबाबतच्या शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/ का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जमीन खरेदी करणेकामी संस्थानचे मालमत्ता विभागामार्फत कार्यवाही करता येईल. त्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करता येईल. त्यास मान्यता असावी,असेबाबतची दि.११/०६/२०१९ रोजीची कार्यालयीन टिपणी संस्थानचे फायर अॅण्ड सेफटी विभागाने सादर केलेली आहे.

त्यावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थानच्या अखत्यारीतील सर्वे नं.व आरक्षणनिहाय संस्थान मालकीची जमीनीबाबत अभिलेख सादर करावा जेणेकरुन जमीन खरेदी धोरणानुसार कार्यवाहीबाबत निर्णय घेता येईल, असेबाबत सुचित केलेले आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी संस्थानची जागा नाही काय? खुलासा करावा, असेबाबत निर्देशित केलेले आहे. तदनुषंगाने सदरच्या विषयाबाबतची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत करणेकामी, संस्थानचे फायर अॅण्ड सेफटी विभागाने दि.१८/०६/२०१९ रोजी त्यांचेकडील दि.११/०६/२०१९ रोजीचे कार्यालयीन टिपणीची प्रत मालमत्ता विभागाकडे पाठविलेली आहे.

तदनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती सादर करणेत येत आहे.

अ) संस्थान मालकीचे शिर्डी शहरालगत मध्यवर्ती ठिकाणी असलेले क्षेत्र व त्यावरील आरक्षणाबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता.

| अ.नं. | सर्वे नं. | क्षेत्र हे.आर | ठिकाण | आरक्षणाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | ५४,५५ | ०१.८९ | शिर्डी गावठाण हद्द लगत पूर्व बाजूस. | आरक्षण क्रं.२३ बेघरांसाठी घरे आरक्षित. |
| २ | २०७/२ | ००.८० | साईश्रध्दा हौ.सोसायटी शेजारी | आरक्षण क्रं.१ (सुधारीत शिर्डी विकास आराखडा) वाहनतळासाठी आरक्षित. |
| ३ | १२५/६,<br>१२५/७,<br>१२५/८ | ०१.२०<br>०१.१९<br>०१.२१ | साईनगर शेजारी. | आरक्षण क्रं.३४ संस्थानचे रुग्णालय विस्तारीकरणासाठी. |
| ४ | ८७/८८ | ०३.०० | निमगाव-को-हाळे शिवारात सैनिक आरामगृह,एम.एस.ई.बी. जलसंपदा विभाग,वाहनतळ | आरक्षण नाही. तथापि सदर जागेवर संस्थानचे लाडू काऊंटर प्रस्तावित आहे. |
| ५ | १२४/११<br>१२४/१२ | ००.६०<br>००.६० | पानमळा रोडचे पूर्व बाजूस. | आरक्षण क्रं.३७ व ३८ प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षित. |

ब) उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त विनाआरक्षणाचे संस्थान मालकीचे शिर्डी शहरालगत व मध्यवर्ती ठिकाणी अन्य क्षेत्र उपलब्ध नाही.

विभागाचा अभिप्राय - संस्थान मालकीचे शिर्डी शहरालगत मध्यवर्ती ठिकाणी विनाआरक्षणाचे क्षेत्र उपलब्ध नाही.संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्राची निकड लक्षात घेता शिर्डी येथे मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच श्रीं चे मंदिरापासून सुमारे १ किमी.अंतराचे आत फायर ॲण्ड सेफटी विभागासाठी मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणेकामी विनाआरक्षित सुमारे २ एकर क्षेत्र उपलब्ध करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेबाबतच्या शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/ का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या निर्णयातील तरतुदीनुसार जमीन खरेदी करता येईल.

प्रस्ताव- संस्थान मालकीचे शिर्डी शहरालगत मध्यवर्ती ठिकाणी विनाआरक्षणाचे क्षेत्र उपलब्ध नाही.संस्थानचे मध्यवर्ती अग्निशमन केंद्राची निकड लक्षात घेता शिर्डी येथे मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच श्रीं चे मंदिरापासून सुमारे १ किमी.अंतराचे आत फायर ॲण्ड सेफटी विभागासाठी मध्यवर्ती अग्निशमन केंद्र उभारणेकामी विनाआरक्षित सुमारे २ एकर क्षेत्र उपलब्ध करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेबाबतच्या शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/ का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या निर्णयातील तरतुदीनुसार जमीन खरेदी करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अग्निशमन केंद्र उभारणीकामी २ एकर क्षेत्राची आवश्यकता नाही यासाठी आवश्यक असणाऱ्या जागेसाठीचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग/फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **ऐतिहासिक वस्तु, शस्त्रात्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव- को-हाळे, ता.राहाता येथील साई प्रसादालय इमारतीतील जागा वापराचे मुदतवाढी सबंधात करारनामा करणेबाबत श्री.अभिजीत देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांचा दि.१४.०६.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- उपरोक्त विषयाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपुर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून उक्त कालावधीसाठीची रक्कम रु.१,१०,०००/- इतकी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दि.२५/१०/२०१७ रोजी संस्थानकडे जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधुन वजा करुन उर्वरित रक्कम पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त जागा वापराची मुदत दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्याच्या कालावधीसाठी पुर्वीच्या भाडेदराची रक्कम रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.११,०००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेस व करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी यापुर्वीचे भाडे रक्कम रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.१२,१००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील जा.नं.सासंवि-१०१६ /८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्रातील अटी व शर्तीस अधीन राहुन मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयाप्रमाणे करारनामा करुन देणेकामी श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना इकडील पत्र क्रं. एसएसएसटी/मालमत्ता/६६८/२०१९ दि.३०/०५/२०१९ अन्वये अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील दि.१४/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये
१) उक्त करारनाम्याच्या मसुद्यामध्ये शासनाकडील दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्रात नमूद केलेप्रमाणे सदर जागा वापराची मुदत ११ वेळा वाढवून देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे,याबाबतचा उल्लेख केलेला नाही. त्याबाबत करारनाम्यात उल्लेख करणेत यावा,ही विनंती.
२) संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ मध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे सदर प्रदर्शनाचा पूर्ण सेटअपची उभारणी झाल्यानंतर भाडे सुरु करण्यात यावे,असे नमूद केलेले आहे. मात्र सदर जागेचे भाडे दि.३१/०१/२०१७ पासून म्हणजेच प्रथम करारनामा झालेपासून लगेच आकारणी करणेत आलेली असलेचे दिसून येते. तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीच्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं.२१ निर्णय क्रं.९६६ प्रमाणे मासिक भाडे रु.१०,०००/- प्रमाणे प्रदर्शन सुरु झालेल्या तारखेपासून म्हणजेच दि.०१/१०/२०१७ पासून आकारणी करणेत यावी व त्याप्रमाणे भाडेदराची आकारणी करुन मी संस्थानकडे जमा केलेल्या रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेत यावी,ही विनंती.
३) त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं.१८ निर्णय क्रं.१०७८ प्रमाणे माझ्या मंजूर झालेल्या मागण्यांबाबत कार्यवाही करणेत आलेली नाही. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी,ही विनंती,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

श्री.अभिजित देविदास शिंदे यांना संस्थान मालकीची मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील जागा ऐतिहासिक वस्तू,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी वापरास दिलेल्या जागेच्या भाडे संदर्भात वेळोवेळी खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.
१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ प्रमाणे"आजचे सभेत अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना बोलविण्यात आले होते. सभेने त्यांचेबरोबर या विषयावर चर्चा केली व त्यांचा आशय समजून घेतला. श्री.शिंदे यांनी सभेसमोर सांगितले की,शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी आवश्यक फर्निचर व इतर अनुषंगिक बाबी तयार करणे खर्चिक आहे.त्यामुळे कमीत कमी ५ वर्षासाठी जागा मिळावी. यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेल्या अटी/शर्तीवर श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या
वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तुर्त ११ महिने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.तसेच त्यांच्या पूर्ण सेटअपची उभारणी झाल्यानंतर भाडे सुरु करण्यात यावे. श्री.शिंदे यांच्या मागणीनुसार त्यांना ११-११ महिन्यांच्या कराराने पाच वर्षासाठी जागा उपलब्ध करुन देणेकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा व संस्थानच्या नियोजित साईसृष्टी प्रकल्पामध्ये शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेबाबतचा समावेश करणेत यावा,"असे ठरले.
२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.९६६ प्रमाणे"मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या.त्या मान्यत करण्यात आल्या. (०२) श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तुर्त ११ महिने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेमध्ये निर्णय संमत झालेला आहे. श्री.अभिजित शिंदे,श्रीरामपूर यांनी आजचे सभेत येवून ते करत असलेल्या कामामुळे देशभरामध्ये छत्रपती महाराजांचा इतिहास पोहोचणार असलेबाबत माहिती दिली व सदरहू ठिकाणचे भाडे कमी करणेबाबत सभेस विनंती केली. सभेने यावर चर्चा करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी श्री.अभिजित शिंदे यांना लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्यात येणा-या हॉलचे रु.१०,०००/- मात्र मासिक भाडे, विद्युत बील वेगळे याप्रमाणे आकारणेत यावे.
३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.४३५ प्रमाणे "यावर सविस्तर चर्चा होऊन शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी श्री.अभिजित देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत

सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८/०४/२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढण्यात यावा. तसेच त्यांना दिलेल्या एकूण ७२०० चौ.फुट जागेचे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करुन घेवून त्याप्रमाणे भाडे आकारणेत यावे, असे ठरले.

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.४५९ प्रमाणे"दि.२३/०५/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येवून सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यास मान्यता देण्यात आली.

(६) निर्णय क्रं.४३५ यावर सविस्तर चर्चा होऊन शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी श्री.अभिजित देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८/०४/२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढण्यात यावा. तसेच त्यांना दिलेल्या एकूण ७२०० चौ.फुट जागेचे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करुन घेवून त्याप्रमाणे भाडे आकारणेत यावे, असे ठरले.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तु व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी श्री.अभिजित देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८/०४/२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढण्यात यावा. तसेच त्यांना दिलेल्या जागेस शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करण्यात येवून त्यांना जागा वापरास दिलेपासून सदरहू भाडे आकारण्यात यावे,असे ठरले.

५) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१०७८ प्रमाणे "श्री साईप्रसादालयावरील शिवसृष्टी संग्रहालयाचे चालक श्री.अभिजित शिंदे यांनी आजचे सभेसमोर येवून खालील मागण्या मान्य करणेबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली. त्यांच्या मागण्या –

१) सदर हॉलमध्ये ज्या काचेच्या आहेत त्यांना लोखंडी ग्रील संस्थानकडून बसवून मिळावे. (कलादालनात अत्यंत मौल्यवान अशी ऐतिहासिक शस्त्र आहेत.)

२) फायबरचा हत्ती बसविणेकामी जागा मिळावी. (सदर जागा ही बुंदी गाळप ठिकाण व बांधकाम विभाग यांचेमध्ये असलेली रिकामी जागा).

३) त्याच शेजारी तिकीट विक्रीसाठी रिकामी खोली आहे. ती मिळाली तर भाविकांच्या सोयीचे होईल.

४) साईभक्तांना शिवसृष्टीबाबत माहीती मिळावी म्हणून जिन्याजवळ किंवा हत्तीजवळ साऊंड रेकॉर्डींग वाजवण्याची परवानगी मिळावी.

५) साईभक्तांना शिवसृष्टी या उपक्रमाबाबत माहीती मिळावी यासाठी २०० रुम व ५०० रुम,१००० रुम श्रीं च्या प्रसादालयात जातानाची प्रतिक्षा रांगेशेजारी तसेच मंदिर परिसरात व प्रसादालय येथे व्ही.आय.पी.प्रसादालयाकडे जाताना ८x१२ च्या मापाची flexboard लावणेची जागा व परवानगी मिळावी. तो खर्च आम्ही स्वत: करु.

६) आता सध्या प्रसादालयामधून बाहेर पडण्यासाठी जो एकच दरवाजा वापरला जात आहे.(प्रसादालयामधून बाहेर पडण्यासाठीचे गेट हे शिवसृष्टीच्या बाजूनेच असावे.) तोच चालू ठेवावा,ही विनंती.

७) शिवसृष्टी या उपक्रमाचे सामाजिक योगदान म्हणून विशेष बाब ग्राहय धरुन व त्यासाठी मोठया प्रमाणात झालेला खर्च लक्षात घेता जागेचे करार हा सध्या ११ महीन्याचा आहे तो ११ वर्षे करावा. तसेच पूर्वी ठरलेल्या ठरावाप्रमाणे जागेच्या भाडयापोटी व वीज बील व इमारत दुरुस्ती खर्चापोटी रु.१०,०००/- दरमहा भाडे घ्यावे. (सध्याच्या कराराची मुदत पुढील महीन्यामध्ये संपत आहे.)

८) दि.१८/०७/२०१७ चे भाडे मागणी पत्र सोबत जोडत आहे. ते भरलेले आहे. पण करारात ठरल्याप्रमाणे शिवसृष्टी चालू झालेवर भाडे आकारले जाईल असे ठरले होते. त्याप्रमाणेच भाडे घ्यावे व आता जे भाडे भरले आहे ते पुढील भाडयापोटी घ्यावे. मागील भाडे माफी करुन मिळावी,ही विनंती.

९) श्री साईबाबा संस्थानच्या संकेतस्थळावर शिवसृष्टी या उपक्रमाची माहीती दिल्यास श्रीं च्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना शिवसृष्टी या उपक्रमाची माहीती मिळेल.

१०) शिवसृष्टी व आय.टी.विभाग यांचेसमोर जी मोकळी जागा आहे त्या जागेत भाविक जावून दुर्घटना होवू शकते. कारण या जागेतील छत डोम कमकुवत झाले आहेत. त्यातून मोठी दुर्घटना होवू नये यासाठी आय.टी.विभागासमोर जो सुरक्षा रक्षक आहे त्यावर जबाबदारी द्यावी.

११) सध्या संस्थानमार्फत वीजपुरवठा भेटत आहे. तो मिळावाच पण इलेक्ट्रीक बोर्ड यांचेकडून वीजेचे नवीन कनेक्शन घेण्यासाठी परवानगी मिळावी. त्याचा दर कमी आहे युनिटचा.

वरील विनंतीनुसार नवीन ज्या जागा संस्थान देणार आहे त्यांचे भाडे आकारण्यात येवू नये.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, "शिवसृष्टी प्रकल्प हा बीओ तत्वावर श्री.अभिजित शिंदे यांना चालविण्यास दिलेला असल्यामुळे श्री.अभिजित शिंदे यांच्या उपरोक्त मागण्या मंजूर करण्यात येवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. श्री.अभिजित शिंदे यांना शिवसृष्टी संग्रहालयासाठी दिलेल्या जागेची मुदत संपुष्टात येत असल्यामुळे त्यांचे मागणीनुसार पुढे ११ वर्षे मुदतवाढ देणेसाठी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा. शिवसृष्टी व आय.टी.विभाग यांच्या समोरील जागेतील डोमची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच त्यांना संस्थानच्या वीज पुरवठयासोबतच महाराष्ट्र शासनाचा वीजपुरवठा घेण्यासाठी एनओसी देणेबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी."

श्री.अभिजित देविदास शिंदे यांना वापरास दिलेल्या उक्त जागेचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा दि.३१/०१/२०१७ रोजी करणेत आला असून सदर करारनामा दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी केलेला असून त्यात अट क्रं.२ वर सदर ११ महिने कालावधीसाठीचे सदर जागेचे भाडे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६६ प्रमाणे रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार मात्र) इतके दरमहाप्रमाणे व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेचे निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणे निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे लायसेन्सी यांनी लायसेन्सॉर यांना प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत द्यावयाचे आहे,असे नमूद केलेले आहे.

त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५२ मध्ये नमूद केलेप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे भाडे प्रतिमहा रक्कम रु.१०,०००/- प्रमाणे रु.१,१०,०००/- इतकी आकारणी करणेत आलेली आहे.

तथापि श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१४/०६/२०१९ रोजीच्या अर्जान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रदर्शन सुरु झालेल्या तारखेपासून म्हणजेच दि.०१/१०/२०१७ पासून भाडे आकारणी करणेत यावी,अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- उक्त वापरास दिलेल्या जागेच्या भाडे संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्णय झालेले आहेत. यास्तव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ व दि.२२/१२/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.९६६ व दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०७८ चे अनुषंगाने ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्याजागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ या ८ महिने कालावधीचे भाडे माफ करता येईल. तसेच दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ३ महिने कालावधीसाठीचे रु.१०,०००/- भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून रक्कम रु.३०,०००/- इतकी त्यांनी संस्थानकडे दि.२५/१०/२०१७ रोजी जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करुन उर्वरित रक्कम रु.१,२०,८४०/- इतकी पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करता येईल.

प्रस्ताव– ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपुर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ या ८ महिने कालावधीचे भाडे आकारणे अथवा माफ करणेच्या निर्णयार्थ तसेच दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ३ महिने कालावधीसाठीचे रु.१०,०००/- भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून रक्कम रु.३०,०००/- इतकी त्यांनी संस्थानकडे दि.२५/१०/२०१७ रोजी जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करुन उर्वरित रक्कम रु.१,२०,८४०/- इतकी पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपुर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ या ८ महिने कालावधीचे भाडे माफ करण्यात यावे, असे ठरले. तसेच दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ३ महिने कालावधीसाठीचे रु.१०,०००/- भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून रक्कम रु.३०,०००/- मात्र त्यांनी संस्थानकडे दि.२५/१०/२०१७ रोजी जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करुन उर्वरीत रक्कम रु.१,२०,८४०/- पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेस मान्यता देण्यात आली.**
**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०९ **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१९ मधील पं.राजा काळे, पुणे यांचे कार्यक्रमाचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत साज-या होणा-या श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ मध्ये (दि.१५,१६,१७ जुलै २०१९ ) कला सादर करण्याची संधी मिळणेबाबत खालील कलाकारांनी विनंती केली होती.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | मो.नंबर | कार्यक्रमाचा प्रकार | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | आर.के.शंकर, बंगलोर | ९८८६३९२७३४ | भजन संध्या | १० | विनामुल्य |
| ०२ | उज्जवल शर्मा, हरिद्वार | ७०४२७०५४०४ | भजनसंध्या | २० | २५,०००/- (प्रवास भाडे) |
| ०३ | अर्पना शंकर , बंगलोर | ९९४५७१९८२२ | भरतनाटयम | १० | विनामुल्य |
| ०४ | अनंत पांचाळ, मुंबई | ९९३०१२६३२७ | अभंग/भक्ती संगीत | १० | ३५,०००/- |
| ०५ | आश्विनी जोशी, नाशिक | ८९९९३६५३०७ | भजन संध्या | १० | विनामुल्य |
| ०६ | अजय मोरे, मुंबई | ९८१९८७२३६४ | साई गीत आणि भक्ती गीत | २५ | २५,०००/- (प्रवास भाडे) |
| ०७ | विजय साखरकर, मुंबई | ९८२०२१५८११ | साई स्वर नृत्योत्सव | ३० | ८०,०००/- |

उपरोक्त तक्त्यातील कलाकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत सादर करण्यात आला असता,त्यावर निर्णय क्र.१९६ खालीलप्रमाणे झाला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत, तसेच पं.जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य पं.राजा काळे यांचे भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन त्यांना शिर्डी येथे येण्या-जाण्याचे प्रवास भाडे आदा करणेत यावे, अथवा वाहन व्यवस्था करण्यात यावी,असे ठरले.

विभागाचा अभिप्राय – श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी पं. राजा काळे यांचा कार्यक्रम आयोजन करणेबाबत दि.०६.०६.२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मा. श्री. जयकर साहेब यांनी शिफारस होती त्याप्रमाणे उपरोक्त निर्णय झालेला आहे. त्यांनतर मा. व्यवस्थापन समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांनी दि.१९.०६.२०१९ रोजी दुरध्वनीवरुन दि.१६.०७.२०१९ रोजी पंडीत राजा काळे यांचा भक्ती संगीत कार्यक्रम ठेवणेबाबत व त्यांना रक्कम रु.२,००,०००/- मानधन देणेबाबत इकडील कार्यालयास कळविले आहे.

तथापि पं.राजा काळे यांना मा.श्री.जयकर यांचे शिफारसीप्रमाणे द्याव्या लागणा-या मानधनाच्या रक्कमेबाबत इतिवृत्तात दुरुस्ती करावी लागेल.

प्रस्ताव- तरी विभागाचे अभिप्रायामध्ये नमूद केलेप्रमाणे पं.राजा काळे यांना मानधन म्हाणून द्याव्या लागणा-या रक्कम रु.२,००,०००/- ची नोंद दि.०६.०६.२०१९ चे इतिवृत्तातील निर्णय क्र.१९६ मध्ये (दुरुस्तीसाठी) होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी दि.१६.०७.२०१९ रोजी पं. राजा काळे यांचा कार्यक्रम आयोजीत करुन त्यांना रक्कम रु.२,००,०००/-मात्र मानधन आदा करणेस तसेच दि.१७.०७.२०१९ रोजी श्री.मदन चव्हाण, रायपुर, छत्तीसगढ यांचा कार्यक्रम आयोजीत करुन त्यांना रक्कम रु.२,००,०००/-मात्र मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक संच,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळयाची जागा निश्चीत होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

मा. व्यवस्थापन समिती सभा

१) दि. ०६.०६.२०१९ रोजीची मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. २७७ - श्री साई सच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन साई आश्रम-१ या ठिकाणी करणेस व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व नाट्य रसिक संच शिर्डी यांचे संयुक्त विद्यामाने २५ वा श्री साईबाबा सच्चरित पारायण सोहळा असा नामोल्लेख करण्यात यावा, असे ठरले.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेत श्री साईसच्चरित पारायण सोहळा संस्थानचे साईआश्रम -१ ठिकाणी आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे.

तथापि आता श्री भाऊ शिरगावकर शिर्डी यांनी दि. १९.०६.२०१९ व दि. २६.०६.२०१९ रोजीचे पत्रान्वये शुक्रवार दि.०२.०८.२०१९ ते शनिवार दि. १०.०८.२०१९ या कालावधीत होणारा श्री साई सच्चरित पारायण सोहळा साई कॉम्लेक्स समोरील १६ गुंठ्याच्या मोकळया जागेत आयोजित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

त्यानंतर शिर्डी ग्रामस्थ यांनी दि. १.०७.२०१९ रोजीचे पत्रान्वये यावर्षी साधारणतः १० हजाराच्या आसपास पारायणार्थी या सोहळयात सहभागी होण्याची शक्यता आहे. या संख्येचा विचार करता प्रवेशव्दार क्र.३ जवळील जागा (१६ गुंठे) यासाठी अपुरी पडेल. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नाही. महिला व पुरुष अशा २ सत्रांमध्ये जरी पारायणाचे आयोजन केले तरी बसायला अतिशय अडचणीचे होते. पारायण सुरु असतांना भक्तांना ये-जा करण्यासाठी अत्यंत अरुंद जागा शिल्लक राहते. तेथून भक्तांच्या वर्दळीचा त्रास होतो.

एखाद्या दिवशी जास्त-गर्दी झाल्यास चेंगराचेंगरी होऊन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच यामुळे संरक्षण व्यवस्थेवरही अतिरिक्त ताण येतो.

या सर्व बाबींचा विचार करता यावर्षीचे श्री साईसच्चरित पारायण साईनगर समोरील मैदानावर आयोजित करण्यात यावे. सदर जागेचा आकार विस्तिर्ण असल्याने महिला व पुरुष ग्रंथवाचकांचे पारायण एकाच सत्रात घेता येईल. त्याठिकाणी स्वच्छतागृहांचीही सोय आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी वसाहतीमधील स्वच्छतागृहांचा वापरही करता येवू शकतो. तेथे वाहनतळाचीही सुविधा आहे.

तरी वरील गोष्टींचा विचार करता यावर्षीचा श्री साईसच्चरित पारायण सोहळा१६ गुंठे येथे आयोजित न करता साईनगर मैदानावर आयोजित करावा अशी विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२७७ ची प्रत पुढील कार्यवाहीसाठी संबंधीतांना पुरविण्यात आलेली होती त्यावर बांधकाम विभागाने दि.०१.०७.२०१९ चे पत्रान्वये साई आश्रम-१ या ठिकाणी असलेल्या टेंसाईल फॅब्रिक मंडपामध्ये साधारणतः २५०० ते २७०० पारायणार्थी बसण्याची क्षमता आहे असे कळविले आहे.

श्री साईसच्चरित पारायणासाठी साधारणतः ३००० ते ४००० पुरुष वाचक व ५००० ते ६००० महिला वाचकांची नोंद होत असते.

उपरोक्त दोन्ही बाबी व ग्रामस्थांचे पत्र विचारात घेता श्री साईसच्चरित पारायणाचे ठिकाण निश्चित व्हावे असे वाटते.

प्रस्ताव:- तरी श्री साई सच्चरित पारायणासाठी ठिकाण निश्चित होणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक संच,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा दि.०२.०८.२०१९ ते दि.१०.०८.२०१९ या कालावधीत साईनगर मैदान येथे आयोजीत करण्यास व मंडप उभारणीकामी अल्पकालावधीतील ई-निविदा (०७ दिवस) प्रक्रिया राबविणेस व निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली तसेच याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष/बांधकाम विभाग/विद्युत विभाग/सीसीटीव्ही विभाग/)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईसच्चरित पारायणासाठी नाटयरसिक संच, शिर्डी यांनी सुचविलेले कार्यक्रम निश्चित करणेस व मानधन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.२७७** श्री साई सच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन साई आश्रम-१ या ठिकाणी करणेस व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व नाट्य रसिक संच शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा " श्री साईबाबा सच्चरित पारायण सोहळा " असा नामोल्लेख करण्यात यावा, असे ठरले.

**प्रस्तावना**:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सौजन्याने व नाट्यरचिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने दि.०२.०८.२०१९ ते दि.१०.०८.२०१९ या कालावधीत २५ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७७ मध्ये श्री साईसच्चरित पारायण कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रम व पारायण समाप्तीनंतर काढावयाच्या शोभायात्रेच्या अंदाजपत्रकास (कलाकार बिदागी रक्कम रू.१४,३५,०००/- ) मान्यता मिळालेली आहे.

आता नाटयरसिक संच,शिर्डी यांनी दि.०३/०७/२०१९ चे पत्रान्वये सदर पारायण सोहळयात खालीलप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम व त्यांचे मानधन व तसेच पारायण समाप्तीनंतर काढावयाच्या शोभायात्रेसाठीचा तपशिल व त्यांचे मानधनाबाबत कळविले आहे.

**अ) सांस्कृतिक कार्यक्रम**

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शुक्रवार, दि. ०२.०८.२०१९ सायं.४.३० ते ६ | पारायणार्थी महिला मंडळ | शिर्डी | | महिलांचा हळदी - कुंकू समारंभ | - | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री.सा.शि.प्र.मं. चे प्राथमिक विद्यामंदिर | शिर्डी | ०२४२३-२५५०८६ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५० | विनामूल्य |
| ०२ | शनिवार दि.०३.०८.२०१९ सायं.४ ते ६.०० | अनंत पांचाळ, | मुंबई | ९९३०१२६३२७ | अभंग/भक्ती संगीत | १० | ४०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री मनहर उधास, | मुंबई | ९८२१०७७५५१ | साई भजन संध्या | १५ | विनामुल्य |
| ०३ | रविवार दि.०४.०८.२०१९ सायं.४ ते ६.०० | नरेंद्र नाशिरकर | नागपूर | ९८५०३५२१३० | संगीतमय साई विचार कथा | ०४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | साई ऋषी | कलकत्ता | ८९६१७५८०४५ | साई जीवन चरित्र (नाटक) | ३५ | ४०,००० |
| ०४ | सोमवार दि.०५.०८.२०१९ रात्रौ ७.३० ते १० | शार्दुल महाडिक | मुंबई | ९८१९२९६६३२ | महाराष्ट्र देश सुंदरा | २० | ८०,०००/- |
| ०५ | मंगळवार दि.०६.०८.२०१९ दु. ४.०० ते ६.०० | ह.भ.प. सौ. अंजली जोशी | मुंबई | ९३२३०१९३५१ | किर्तन | ४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | विजय साखरकर | मुंबई | ९८२०२१५८११ | साई स्वर नृत्योत्सव | ३० | ५०,०००/- |
| ०६ | बुधवार दि. ०७.०८.२०१९ दुपारी ४.०० ते ६.० | हरिश ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | भजन | ०८ | ५०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | राहुल गुप्ता | दिल्ली | ९२१२७३५१५० | राधाकृष्ण शिव तांडव नृत्य | २० | ५०,०००/- |
| ०७ | गुरुवार दि. ०८.०८.२०१९ दु. ४.०० ते ६.०० | प्रसाद भगत | लोणी | ९०७५४०२८३८ | कीर्तन | ५ | ५,०००/- |
| | रात्रौ. ७.३० ते १०.१५ | महेश कुडाळकर | कुडाळ | ९८२००४११८२ | नाटक-दशावतारी | ४० | ६०,०००/- |
| ०८ | शनिवार दि.१०.०८.२०१९ सकाळी ९.३० ते १२ | महेश जोशी | बीड | | काल्याचे किर्तन | ४ | ५,०००/- |
| | | | | | | **एकूण रु.** | **३,९२,०००/-** |

**ब) पारायणानंतरची शोभा यात्रा -** शुक्रवार दि०९.०८.२०१९ सायंकाळी ४.००

| अ.नं. | तपशिल | ठिकाण | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | संबळ, सनई व डफवादन ७ गट | निरनिराळ्या ठिकाणचे | ३५ | ३५,०००/- |
| ०२ | शिंग तुतारी सनई चौघडा (गाडीसह) | कोपरगाव | ०५ | ५,०००/- |
| ०३ | झांजपथक | शिर्डी | ३० | मोफत |
| ०४ | ढोलपथक – १) मोरया | मुंबई | १०० | ६०,०००/- |
| ०५ | टॅक्टरवर जिवंत देखावे – | कुडाळ | ३५ | ७०,०००/- |
| ०६ | दाक्षिणात्य वाद्य | नाशिक | २० | ३५,०००/- |
| ०७ | जिवंत देखावे | पुणे | ६० | ३०,०००/- |
| ०८ | लाऊडस्पीकर ( संपूर्ण सेट ऑपरेटरसह | वेस | ०५ | २०,०००/- |
| ०९ | इतर खर्च – टॅक्टर इंधन, जनरेटर, बोर्ड इ. | - | - | ५०,०००/- |
| | | | **एकूण रुपये -** | **३,०५,०००/-** |

विभागाचा अभिप्राय :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटयरसिक संच यांचे संयुक्त विद्यमाने गेली २४ वर्षे श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात येत आहे.

नाट्य रसिक संच, शिर्डी यांनी सुचविलेनुसार श्री साई सच्चरित पारायण सोहळयात उपरोक्त प्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम व शोभायात्रेचे नियोजन नेहमीचे प्रथेप्रमाणे करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अधिन राहून विभागाच्या अभिप्रायामध्ये सुचविलेप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणेस व शोभायात्रा काढणेस तसेच याकामी करावयाच्या अनुषंगीक सुविधा होणेसाठी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नाटय रसिक संच व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा दि.०२.०८.२०१९ ते दि.१०.०८.२०१९ या कालावधीत खालील प्रमाणे कार्यक्रम श्री साई समाधी शताब्दी मंडप (१६ गुंठे) येथे आयोजित करण्यास तसेच त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**अ) सांस्कृतिक कार्यक्रम**

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शुक्रवार, दि. ०२.०८.२०१९ सायं.४.३० ते ६ | पारायणार्थी महिला मंडळ | शिर्डी | | महिलांचा हळदी - कुंकू समारंभ | - | -- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री.सा.शि.प्र.मं. चे प्राथमिकविद्यामंदिर | शिर्डी | ०२४२३-२५५०८६ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५० | विनामूल्य |
| ०२ | शनिवार दि.०३.०८.२०१९ सायं.४ ते ६.०० | अनंत पांचाळ, | मुंबई | ९९३०१२६३२७ | अभंग/भक्ती संगीत | १० | ४०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | श्री मनहर उधास, | मुंबई | ९८२१०७७५५१ | साई भजन संध्या | १५ | विनामुल्य |
| ०३ | रविवार दि.०४.०८.२०१९ सायं.४ ते ६.०० | नरेंद्र नाशिरकर | नागपूर | ९८५०३५२१३० | संगीतमय साई विचार कथा | ०४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | साई ऋषी | कलकत्ता | ८९६१७५८०४५ | साई जीवन चरित्र (नाटक) | ३५ | ४०,००० |
| ०४ | सोमवार दि.०५.०८.२०१९ रात्रौ ७.३० ते १० | शार्दुल महाडिक | मुंबई | ९८१९२९६६३२ | महाराष्ट्र देश सुंदरा | २० | ८०,०००/- |
| ०५ | मंगळवार दि.०६.०८.२०१९ दु. ४.०० ते ६.०० | ह.भ.प. सौ. अंजली जोशी | मुंबई | ९३२३०१९३५१ | किर्तन | ४ | ५,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | विजय साखरकर | मुंबई | ९८२०२१५८११ | साई स्वर नृत्योत्सव | ३० | ५०,०००/- |
| ०६ | बुधवार दि. ०७.०८.२०१९ दुपारी ४.०० ते ६.० | हरिश ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | भजन | ०८ | ५०,०००/- |
| | रात्रौ ७.३० ते १० | राहुल गुप्ता | दिल्ली | ९२१२७३५१५० | राधाकृष्ण शिव तांडव नृत्य | २० | ५०,०००/- |
| ०७ | गुरुवार दि. ०८.०८.२०१९ दु. ४.०० ते ६.०० | प्रसाद भगत | लोणी | ९०७५४०२८३८ | कीर्तन | ५ | ५,०००/- |
| | रात्रौ. ७.३० ते १०.१५ | महेश कुडाळकर | कुडाळ | ९८२००४११८२ | नाटक-दशावतारी | ४० | ६०,०००/- |
| ०८ | शनिवार दि.१०.०८.२०१९ सकाळी ९.३० ते १२ | महेश जोशी | बीड | | काल्याचे किर्तन | ४ | ५,०००/- |
| | | | | | | एकूण रु. | ३,९२,०००/- |

**तसेच उपरोक्त कार्यक्रमापैकी एखादा कलाकार गैरहजर राहिल्यास त्याऐवजी दुसरा विनामुल्य कार्यक्रम आयोजित करण्यात यावा,असे ठरले.**

**ब) पारायणानंतरची शोभा यात्रा - शुक्रवार दि०९.०८.२०१९ सायंकाळी ४.००**

| अ.नं. | तपशिल | ठिकाण | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | संबळ, सनई व डफवादन ७ गट | निरनिराळया ठिकाणचे | ३५ | ३५,०००/- |
| ०२ | शिंग तुतारी सनई चौघडा (गाडीसह) | कोपरगाव | ०५ | ५,०००/- |
| ०३ | झांजपथक | शिर्डी | ३० | मोफत |
| ०४ | ढोलपथक – १) मोरया | मुंबई | १०० | ६०,०००/- |
| ०५ | टॅक्टरवर जिवंत देखावे – | कुडाळ | ३५ | ७०,०००/- |
| ०६ | दाक्षिणात्य वाद्य | नाशिक | २० | ३५,०००/- |
| ०७ | जिवंत देखावे | पुणे | ६० | ३०,०००/- |
| ०८ | लाऊडस्पीकर ( संपूर्ण सेट ऑपरेटरसह) | वेस | ०५ | २०,०००/- |
| ०९ | इतर खर्च – टॅक्टर इंधन, जनरेटर, बोर्ड इ. | - | - | ५०,०००/- |
| | | | एकूण रुपये - | ३,०५,०००/- |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष/बांधकाम विभाग/विद्युत विभाग/ध्वनिक्षेपन विभाग/)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ **साईलिला व्दैमासिक, कार्यकारी संपादकाचे कामकाजाबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये " श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील," अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.८.१२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१०२३- साईलिला व साई अर्पण सेवा ही द्वैमासिके निर्धारित वेळेत प्रसिध्द व्हावीत, याकरिता सदरहू द्वैमासिकांचे संपादकीय कामकाजासाठी स्वतंत्र दोन संपादकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परंतु संस्थानच्या मंजूर आकृतीबंधामध्ये कार्यकारी संपादकाचे एकच पद असल्यामुळे साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादकपदी श्री विद्याधर ताठे, पुणे यांची व साई अर्पण सेवा द्वैमासिकांचे कामकाजासाठी श्री भगवान दातार, पुणे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी प्रती माह एकत्रित रू.२५,००० मात्र मानधनावर दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी. तसेच सदरहू द्वैमासिक अंक निर्धारित वेळेत प्रसिध्द झाला तरच त्या कालावधीचे मानधन अनुज्ञेय राहील,असे ठरले.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०३.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.१८८- श्री विद्याधर ताठे, कार्य.संपादक व भगवान रामचंद्र दातार, विशेष कार्य अधिकारी यांनी प्रस्तावात मागणी केल्याप्रमाणे प्रवास व निवासाची व्यवस्था न करता (खर्च मंजूर न करता), त्याऐवजी त्यांना मानधनाव्यतिरिक्त प्रवास व निवास खर्चासाठी प्रत्येकी रू.१०,०००/- मात्र प्रतिमहा भत्ता देण्यात यावा. मात्र त्यासाठी श्री ताठे व श्री दातार यांनी दरमहा किमान एक आठवडा शिर्डीमध्ये येऊन, काम करणे बंधनकारक राहील, असे ठरले.

प्रास्तविकः- श्री साईबाबा संस्थानचे साईलिला व श्री साई अर्पणसेवा या द्वैमासिक/नियतकालिकांमधून संस्थानमार्फत साईभक्तांना देण्यात येणा-या सोई-सुविधा, श्री साईबाबांचे जीवन, कार्य, त्यांच्या लिला व शिकवण तसेच साईभक्तांना श्रींचे भक्तीमधून आलेले अनुभव, संस्थान मार्फत घेण्यात आलेल्या नवीन योजना, सुधारणा, संस्थानचे उत्सव आदि माहिती प्रकाशित करणेत येते.

याकामी सध्या साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादकपदी श्री विद्याधर ताठे, पुणे यांची व श्री साई अर्पण सेवा द्वैमासिकाचे संपादकीय कामकाजासाठी श्री भगवान दातार,पुणे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यासाठी जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/५६४० व ५६४१/२०१८, दि.२२.०१.२०१८ चे कार्यादेशान्वये सामान्य प्रशासन विभागामार्फत नेमणूक करण्यात आली होती व त्यानंतर सन-२०१९ या वर्षासाठी जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/५०४०/२०१८, दि.१८.०१.२०१९ व जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/५०४१/२०१९, दि.१८.०१.२०१९ चे कार्यादेशान्वये अनुक्रमे दि.३० जून २०१९ व दि.१५ जुलै २०१९ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्रायः- साई अर्पण सेवा द्वैमासिकाचे विशेष कार्य अधिकारी श्री भगवान दातार यांचे कामकाज चांगले आहे. ते काम पहात असलेल्या साईअर्पण सेवा या नियतकालीकाची मांडणी व संपादकीय कामकाज अतिशय सुबक व निटनेटक्या स्वरुपाचे आहे. त्या अंकातील मजकूराला वाचनियता व बहुविधता आहे.

तथापि, साईलीला व्दैमासिक (मराठी) माहे मार्च – एप्रिल (श्रीरामनवमी विशेषांक) ची मुद्रणपूर्व प्रत श्री ताठे यांनी तपासणीसाठी शिर्डी कार्यालयाकडे पाठविली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दुरुस्त्या (शब्दलेखन/ व्याकरणीयदृष्ट्या चुका) करणे गरजेचे असल्याचे दिसून आल्याने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-प्रकाशने/२४१/२०१९, दि.१७.०४.२०१९ अन्वये पत्र पाठविण्यात आले होते.

तसेच संस्थानचे मुंबई कार्यालयाकडून माहिती घेतली असता,श्री ताठे हे श्री साईलीला हिंदी-इंग्रजी व्दैमासिकाचे काम पाहात नसून हे काम सहाय्यक संपादक श्री सुनिल राणे, मुंबई कार्यालय हेच करत असल्याचे निर्दशनास आलेले आहे. मात्र श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) च्या अंकावर कार्यकारी संपादक म्हणून श्री. ताठे यांचे नाव निर्देशीत केलेले असते, ही बाब योग्य वाटत नाही असे वाटते.

त्याचप्रमाणे दि.०७.०३.२०१८ चे सभेत निर्णय क्र.१८८ मध्ये श्री. ताठे व श्री. दातार यांनी दरमहा किमान एक आठवडा शिर्डीमध्ये येऊन काम करणे बंधनकारक आहे असे नमुद आहे. निर्णयाप्रमाणे प्रकाशने विभागाकडून याबाबत दोन्ही संपादकांना दुरध्वनीवरुन कळविण्यात आलेले आहे. मात्र श्री.ताठे यांनी शिर्डीमध्ये येऊन कधीही काम केलेले नाही. या पार्श्वभूमिवर श्री. दातार हे अधूनमधून शिर्डी येथे येऊन साई अर्पणसेवा या नियतकालीकाचे काम पाहात असतात.

उपरोक्त सर्वबाबी विचारात घेता, श्री ताठे यांची श्री साईलीला अंकाच्या कामाबाबत अनास्था असल्याचे निदर्शनास येते.

श्री. दातार यांचेकडे साईअर्पण सोबत साईलिलाच्या संपादनाची जबाबदारी सोपवावयाची झाल्यास त्यांच्या मानधनात वाढ करावी लागेल. साईअर्पण साठी त्यांना दरमहा रु. २५ हजार मानधन दिले जाते. साईलिलाच्या संपादनाची जबाबदारी त्यांच्याकडे दिल्यास त्यांच्या मानधनात वाढ करणे अपेक्षित आहे. श्री.दातार यांचेकडे ही जबाबदारी देण्याचे निश्चित झाल्यास, याबाबत त्यांचेशी चर्चा करून ठरवावे लागेल.

सध्या श्री.भगवान दातार हे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून “साईअर्पण सेवा” या एकाच नियतकालिकाचे संपादकीय काम पाहात आहेत. सदर कामासाठी त्यांच्या मानधनाशिवाय त्यांना निवास व प्रवासभत्ता म्हणून महिन्यातले ७ दिवस शिर्डी येथे येवून काम करण्याच्या अटीवर रक्कम रु १० हजार देण्याचा निर्णय / आदेश आहे. जर साईलिला या द्वैमासिकाचे संपादकीय काम श्री दातार यांचेकडे सोपविले तर त्यांच्यावरची कामाची जबाबदारी वाढणार आहे. त्या अनुषंगाने करावा लागणारा प्रवास व अनुषंगिक खर्च यात वाढ होणे यथान्याय आहे. साईलिलाच्या कामासाठी त्यांना शिर्डी, मुंबई, नाशिक येथे प्रवास करावा लागणार आहे, त्याशिवाय अंकाच्या संपादकीय कामासाठी अन्य ठिकाणीही प्रवास करावा लागू शकतो. (उदा –एखादया साईभक्ताची मुलाखत घेणे, संस्थान आयोजित एखादया कार्यक्रमास उपस्थित राहणे इ.) म्हणून प्रवास खर्चाची तरतूद रु. १० हजारात वाढ करुन २० हजार करावी असे प्रस्तावित केले आहे.

साईलिलेच्या कामासाठी असलेल्या कर्मचारी आकृतीबंधाचे अवलोकन केले असता त्यात कार्यकारी संपादक १ पद आणि सहाय्यक संपादक ५ पदे अशी तरतूद आहे.

सध्या सहाय्यक संपादक म्हणून श्री. सुनिल राणे हे ०५/०६/१९८६ पासून या पदाचे काम पाहात आहेत(परंतू श्री राणे यांनी डिसेंबर १९९४ मध्ये राजीनामा दिला होता, त्यानंतर ते जून १९९५ ते सप्टेंबर १९९९ या कालावधीत संस्थान सेवेत नव्हते.) म्हणजेच त्यांना या कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. श्री.राणे यांचे काम चांगले आहे, तसेच त्यांनी जानेवारी १९९३ ते जुन १९९५, ऑक्टोबर २००७ ते ऑक्टोबर २०११ व ऑक्टोबर २०१२ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत कार्यकारी संपादक म्हणूनही काम पाहिले आहे. म्हणजेच कार्यकारी संपादक या पदाच्या कामाचाही श्री. राणे यांना अनुभव आहे.दि.०९.११.२०११ ते सप्टेंबर २०१२ या कालावधीत श्री राणे यांना निलंबित करण्यात आले होते. त्या कालावधीत साईलिला या अंकाची जबाबदारी श्री.मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेकडे देण्यात आली होती. तथापि त्या कालावधीत श्री यादव यांचेकडे असलेल्या जनसंपर्क या महत्वाच्या विभागाच्या कार्यबाहुल्यामुळे अंकाचे संपूर्ण काम हे श्री. नवेन्दु साईदास मराठे लिपीक- टंकलेखक, लेखाशाखा यांनी केले होते. यासाठी खाली नमुद केलेल्या पर्यायांचा विचार व्हावा, असे नम्र मत आहे.

अ) आता जे पद भरण्यासाठी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे तो कार्यकारी संपादकाचा आहे. या पदाचा आवाका मोठा आहे. दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक आदींचा संपादकीय कामाचा प्रदीर्घ अनुभव तसेच मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंग्रजी या भाषांचे चांगले ज्ञान या पदावर काम करणा-या व्यक्तीस असणे गरजेचे आहे. या बाबींचा विचार करता श्री.दातार हे या पदासाठी योग्य आहेत तसेच त्यांना मदत म्हणून श्री नवेंदू मराठे यांना सहाय्यक संपादक पदाचा कार्यभार सोपविता येईल व त्यासाठी श्री मराठे यांना वरिष्ठ पदाचे कामकाजाचा कार्यभार म्हणून अतिरिक्त मेहनताना दयावा लागेल. किंवा

ब) तसेच पूर्वानुभवाचा विचार केल्यास श्री. राणे यांच्याकडे ही कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी सोपविता येईल परंतु त्यासाठी त्यांना वरिष्ठ पदाचे कामकाजाचा कार्यभार म्हणून अतिरिक्त मेहनताना द्यावा लागेल

प्रस्ताव–श्री साईलीला मराठी व्दैमासिक या अंकाचे संपादकीय कामकाज पाहाणेकामी विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे अथवा मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत प्रकाशित करण्यात येणारे साई अर्पणसेवा या व्दैमासिकाचे प्रकाशन बंद करण्यात यावे, तसेच श्री साईलिला या मराठी व्दैमासिकाचे कार्यकारी संपादक पदासाठी जाहिरात प्रसिध्द करुन नियुक्ती करण्यात यावी. कार्यकारी संपादक पदासाठी नियुक्ती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत श्री.भगवान दातार यांची श्री साईलिला या मराठी व्दैमासिकासाठी कार्यकारी संपादक म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेसंबधी संस्थानचे धोरण व त्याकरीता संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्रपणे लागू करावयाच्या नियमावली / तरतुदीबाबत.**

**प्रस्ताव-** अ) संस्थान सेवेत असतांना कर्मचारी / अधिकारी दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे संस्थान सेवा करण्यास वैद्यकीय दृष्टया कायमचा असमर्थ ठरल्यामुळे सेवा निवृत्त झाल्यास अशा कर्मचा-यांच्या कुटूंबावर ओढावणा-या आर्थिक आपत्तीत कुटूंबियांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने, सदर कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास शैक्षणिक पात्रता व वय यानुसार संस्थान अंतर्गत कोणत्याही गट क व ड श्रेणीच्या सरळसेवा प्रवेशाने भरल्या जाणाऱ्या पदावर अनुकंपा कारणास्तव मा. शासनाचे धोरणानुसार सेवेत समावून घेतले जाते. त्यानुसार यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने अनुकंपा कारणास्तव ज्या–त्या वेळी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या एका पात्र नातेवाईकास दि.०७/०८/२००९ अखेर पर्यंत वेळोवेळी कायम पदावर संस्थान सेवेत कामावर घेणेत आलेले आहे.

ब) मा. शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक - २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये अनुकंपा तत्त्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक आदेश पारित केलेला आहे.

सदरहू शासन निर्णयानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ अन्वये मा.शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील अटी शर्तीसंस्थान व्यवस्थापनाकरीता लागु करणेत आलेल्या आहेत.

क) तथापी, मा. शासनाने पारित केलेल्याअनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा / नगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील, असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे, सदर शासन तरतुदी संस्थान व्यवस्थापनासाठी थेट लागु न करता, त्यासाठी अनुकंपा कारणास्तव नियुक्ती विषयक संस्थानचे धोरण व त्याकरीता संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तरतुदी लागू करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.२०९ खालीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे.

“..., शासनाने लागु केलेल्या दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरणामध्ये / निर्णयात, सदर अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमूद केलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेस व त्याअनुषंगाने संस्थान

प्रशासनामार्फत स्वतंत्ररित्या नियमावली तयार करणेस मान्यता देण्यात आली. सदरचे धोरणात्मक नियमावलीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, मा. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावी,"असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, मा. शासनाचे दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरण / निर्णयाचे धर्तीवर अनुकंपा नियुक्ती संदर्भात संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करावयाच्या स्वतंत्र तरतुदीमध्ये खालील बाबींचा समावेश करता येईल, असे मत आहे.

| अ.क्र. | तरतूदी |
|---|---|
| ०१ | **अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ संस्थानचे स्थायी कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुज्ञेय राहील.** |
| ०२ | **संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना पात्रतेनुसार गट-क व गट-ड संवर्गात अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.** |
| ०३ | **संस्थानांतर्गत कोणत्याही गट-क आणि गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल.** |
| ०४ | **अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबिय -** |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी खालील नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.<br>**०१.पती/पत्नी ०२.मुलगा/मुलगी** (अविवाहीत/विवाहीत), **मृत्यूपर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी**(अविवाहीत/विवाहीत) **०३.दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून ०४.घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण**०५.केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत **त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा बहीण** |
| (आ) | मृत अधिकारी / कर्मचा-यांच्या पति / पत्नीने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी / कर्मचा-यांचे पती / पत्नी हयात नसल्यास त्याच्या / तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे. |
| ०५. | **कुटूंबाची हलाखीची परिस्थिती -** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरीता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही. |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव संस्थान सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. |
| (इ) | दिवंगत संस्थान कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल तथापि तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिका-यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटूंबाचा उदरनिर्वाह करत नाही या नांवाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.<br>यासंदर्भात नियुक्ती प्राधिका-याने मिळणा-या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटूंबातील व्यक्तींची संख्या, त्यांची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कूटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. |
| ०६ | **लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र -** |
| | दिनांक ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. |
| ०७ | **योजनेची माहिती देण्याची जबाबदारी -** |
| (अ) | आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखक प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहीत नमून्यात भरणे इ.माहिती) संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती मिळाल्याबद्दल कुटूंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे. |
| (आ) | दिवंगत संस्थान कर्मचा-याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटूंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटूंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिका-यावर बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| **०८** | **कुटूंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधिताकडून दिवंगत कर्मचा-यावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर तक्रारीची चौकशी संबधित नियुक्ती प्राधिकारी / शिस्तभंगविषयक प्राधिका-याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. |
| **०९** | **कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र -** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटूंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने कुटूंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| (आ) | ज्या संस्थान कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचा-याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/ मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. |
| **१०** | **अर्ज करण्यासाठी मुदत -** |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र नातेवाईकाने संस्थान अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **एक** वर्षाच्या मुदतीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे विहीत नमून्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| (आ) | सेवेत असताना दिवंगत संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| (इ) | पात्र वारसदारास विहीत एक वर्षाच्या मुदतीनंतर दोन वर्ष इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासुन तीन वर्षापर्यंत) तसेच दिवंगत संस्थान कर्मचा-याच्या अज्ञान वारसदाराच्याबाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत एक वर्षानंतर मुदतीनंतर दोन वर्षापर्यंत (संज्ञान झाल्यानंतर तीन वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहे. |
| ई) | जोपर्यंत अनुकंपा नियुक्ती करता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवाराकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्याचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्या दिवशी संपूर्ण कागदपत्रे प्राप्त होतील त्या दिवशीच त्याचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे. |
| **११** | **मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना करावयाच्या कार्यवाहीबाबत -** |
| | मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अकंपा / १२१७ / प्र. क्र. १०२ / आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहीत केलेल्या नियमावलीतील तरतूद क्रमांक २० अन्वये कार्यवाही करणेत यावी. |
| **१२** | **अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा** |
| (अ) | किमान वयोमर्यादा - १८ वर्ष |
| (आ) | कमाल वयोमर्यादा - वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत. |
| (इ) | उपरोक्त (आ) मध्ये नमूद केलेप्रमाणे,अनुकंपा नियुक्ती पात्र उमेदवारास ४५ वर्षापर्यन्त जरी अनुज्ञेय असली तरी, संबंधीत पात्र / नामनिर्देशीत उमेदवारास या विहित केलेल्या वयोमर्यादेपर्यन्त नियुक्ती न मिळाल्यास, संबंधीत पात्र उमेदवाराने संमती दिल्यास त्यांचे कुंटूंबातील इतर पात्र व सज्ञान व्यक्तीस नामनिर्देशीत करता येईल, परंतु ही संधी संबंधीतास फक्त एकदाच मिळेल आणि त्याचे नांव प्रतिक्षासूचीत अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकांस समाविष्ट केले जाईल. |
| **१३** | **अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता** |
| (अ) | पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट क किंवा गट-ड मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील. |
| (आ) | संबधीत पदांसाठी विहित शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकीसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. |
| (इ) | तथापी दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रते व्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करत असल्यास तिच्या |

| | |
|---|---|
| | बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शथील करण्याची अधिकार संबधीत नियुक्ती प्राधिका-याला असतील. |
| १४ | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन निर्णय दि.०६.१२.२०१० अन्वये ०६ महिने असलेली मुदत वाढवून ती ०२ वर्ष इतकी करण्यात येत आहे. |
| (आ) | कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही. हा कालावधी संपताच नियुक्ती संपृष्टात आणावी. |
| १५ | **अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती** |
| | अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर टंकलेखनाची विहीत वेगमर्यादेची परिक्षा पास होऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्या सेवा संपृष्टात आणल्या आहेत, अशा उमेदवारांचा गट-ड मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रीतीने गट-ड मधील पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट-क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी. |
| १६ | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे** |
| (अ) | **अ**)D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर किंवा 'A' किंवा'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतेही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,<br>**ब**)परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| (आ) | संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्याउमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्यादिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिका-यांना सादर करावे, अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्तीच्या देशात नियुक्ती प्राधिका-यांनी नमूद करावी. |
| १७ | **पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती** |
| | गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणा-या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. |
| १८ | **अनुकंपा नियुक्तीकरीता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्याबाबत -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी. |
| १९ | **अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत पदांची मर्यादा -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावी. |
| २० | **अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरीलउमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीत करणे -** |
| | कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटूंबियांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ठ केलेनंतर त्याचे निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटूंबातील अन्य पात्र वारसदाराची नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल, नव्या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे. |

| | |
|---|---|
| **२१** | **अनुकंपा नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा ''वारसा हक्क''नाही -** |
| | मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा ''वारसा हक्क'' होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होत नाही. |
| **२२** | **अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी संस्थान कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतूद राहील.<br>अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांने करुन जर अटी व शर्तींची पूर्तता होत असेल तरच तो प्रस्ताव विचारात घ्यावा अन्यथा ते प्रस्ताव कार्यालयाने त्यांचे स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढावेत.त्याकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्याची आवश्यकता नाही. |

उपरोक्त प्रमाणे अनुकंपा नियुक्ती विषयक संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तरतुदी लागु करावयाच्या झाल्यास, मा. शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक - २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये, यापुर्वी संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करणे आलेल्या तरतुदींसंदर्भातीलमा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ निरस्त करावा लागेल.

तसेच, दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयात अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था (जिल्हा परिषदा/नगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापना) त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमूद केलेले आहे.

त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेसाठी मा. शासनाचे अनुकंपा तरतुदींचा आधार घेऊन, संस्थान प्रशासनामार्फत स्वतंत्र नियमावली तयार करणेत आली आहे. सदर नियमावली मा. शासनाचे अनुकंपा विषयक तरतुदीं विचारात घेऊन तयार करणेत आली असल्याने, सदर नियमावालीसमा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी सादर करता येईल.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २०९ अनुसरुन, अनुकंपा नियुक्तीसंदर्भात (मा. शासनाचे अनुकंपा धोरणानुसार / त्यांचे धर्तीवर) तयार करणेत आलेली उपरोक्त नियमावली स्वतंत्रपणे संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेसंबधीच्या धोरणास मान्यता देण्यात आली. तथापी याबाबतची नियमावली व्यवस्थापन समितीचे पुढील बैठकीत चर्चेसाठी सादर करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ **श्री साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग सेवा निलंबीत कर्मचारी यांचे पुन्हा कामावर रुजु करुन घेणे संदर्भातील दि.११.०३.२०१९ रोजीचे अर्जाबाबत समितीचे दि.०३.०७.२०१९ रोजीचे अहवालावर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.साईदास निवृत्ती शिंदे, वर्ग-४ कर्मचारी, हा संरक्षण विभागात कायम सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे. ते दि.३०/१०/२०१८ पासून विनापरवानगी रजा अर्जाशिवाय गैरहजर आहेत. त्यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊन साईभक्तांना सेवा पुरविणेस अडचण निर्माण झाली आहे. श्री.शिंदे यांचे सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते.

दरम्यान साईदास निवृत्ती शिंदे यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजी नंबर|229|2018 भा.द.वि.कलम ३०४(ब) प्रमाणे दि.२८/१०/२०१८ रोजी दाखल झाला असुन सदर गुन्हयातील मयत नामे वैशाली साईदास शिंदे वय ३३ रा.वेदभक्ती निवास गणेशवाडी, शिर्डी हीस तीचे सासरचे लोकांनी तीचे माहेरुन घराचे कर्ज भरण्यासाठी पैसे आनावे म्हणुन मानसिक व शारीरीक त्रास दिल्याने सदर मयत हीने शिर्डी येथील तीचे राहते घराचे छतावरुन उडी मारुन आत्महत्या केले आहे. तीच्या आत्महतेस तीचे सासरचे लोकांनी प्रवृत केले म्हणुन मयत हीचे आईचे फिर्यादी वरुन गुन्हा राजी दाखल करण्यात आला आहे. श्री.शिंदे यास दि.२८/१०/२०१८ रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असुन त्यास दि.२८/१०/२०१८ ते दि.३१/१०/२०१८ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रीमांड घेण्यात आलेली असुन व्दीतीय पोलीस कस्टडी दि.३१/१०/२०१८ ते दि.०२/११/२०१८

रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली असून दि.०२/११/२०१८ रोजी पासुन तो न्यायालयीन कोठीत आहे,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ – प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-याचे कर्तव्य या शीर्षाखाली उपकलम १ मध्ये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच - (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही, असे नमूद करणेत आलेले आहे.

श्री. साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक (वर्ग-४ कर्मचारी) यांचे वर नमूद केलेले गैरशिस्तवर्तन विचारात घेतां, त्यांनी उपरोक्त सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ मधील कलम ३(१) चे उल्लंघन करुन, शिस्तभंग केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेमध्ये श्री.शिंदे यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्हयाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. निर्णय क्र.७५६ नुसार ''त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त व अपील) विनियम, २०१३ कलम ०४ (२) (अ) अन्वये श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक(वर्ग-४ कर्मचारी) यास सदर गुन्ह्यात अटक झाल्याच्या दि.२८/१०/२०१८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने संस्थान सेवेतून निलंबीत करण्यात यावे, असे ठरले'' आहे.

त्यानुसार श्री.साईदास निवृत्ती शिंदे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३१३४/२०१९ दि.१९.०१.२०१९ रोजीचे आदेशान्वये दि.२८/१०/२०१८ पासून संस्थानचे सेवेतुन**"निलंबीत"** करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक डीआरएस १०८३/सीआर-१५५५/एसईआर-८ मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २७ जुलै १९८७ नुसार कर्मचा-याच्या अपराधसिद्धीच्या कालावधीत निर्वाह भत्त्याच्या प्रदान करणे असल्याने श्री. साईदास शिंदे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७(अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता दि.२८.१०.२०१८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात येत आहे.

आता, त्यांना CRIMINAL BAIL APPLICATION NO.80/2019 अन्वये त्यांना जामीनावर मुक्त करणेत आलेले आहे. सदरचे CRIMINAL BAIL APPLICATION NO.80/2019 मध्ये ORDER BELOW EXH-1 नुसार अतिरिक्त मा.सत्र न्यायालय, कोपरगांव यांनी दि.२१.०२.२०१९ रोजी खालील प्रमाणे आदेश केलेले आहेत.

1) Instant application for grant of bail of the applicant is hereby allowed.

2) The applicant Saidas Nivrutti Shinde age 45 years, be released on bail on furnishing P.R.bond of Rs.15,000/-with one solvent suerty in the like amount in connection with CR No. 229/2018 (RTC No.43/2019) registered with Shirdi Police Station on the following conditions :-

a) Applicant shall not tamper with the prosecution evidence in any manner.

b) Applicant is directed to furnish documents pertaining to his permanent residence.

3) The concerned police station be informed about the order.

4) Bail before Ld.J.M.F.C.

श्री.शिंदे यांनी दि.११.०३.२०१९ रोजीचे अर्जान्वये नोकरीस पुन्हा कामावर रुजु करुन घेणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्यात त्यांनी,"वरील विषयास अनुसरुन मी विनंती पुर्वक अर्ज करतो की, मी श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे संरक्षण विभागात सन २००८ पासून कायम कर्मचारी म्हणुन रुजु आहे.दि.२८.१०.२०१८ रोजी माझेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.२२९/२०१८ भा.द.वी. कलम ३०४ (ब) अन्वये गुन्हा दाखल होवून मला अटक करण्यात आली होती.त्यानंतर माझे वरील भा.द.वी.कलम ३०४ (ब) हा कलम कमी करण्यात आला आहे व आज रोजी माझेवर भा.द.वी.कलम ३०६ वगैरे अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात मला दि.२१.०२.२०१९ रोजी जामीन मंजुर झालेला आहे. सदरच्या गुन्ह्यात संपुर्ण तपास होवुन कोपरगांव येथील

जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल होवून सदरची केस प्रलंबीत आहे.वरील कारणामुळे सुमारे ४ महिने माझेवर सदर गुन्ह्याबाबत चौकशी चालू असल्याने मी न्यायालयीन कस्टडीत होतो.त्यामुळे मी कामावर येवु शकलो नाही अथवा रजेचा अर्ज देवू शकलो नाही.

माझेवर श्री साईबाबा संस्थानने दि.१९.०१.२०१९ रोजी निलंबनाची कारवाई झाल्याचे पत्र मला दि.०९.०३.२०१९ रोजी मिळाले आहे. वास्तविक सदर गुन्ह्यात माझा काहीएक सबंध नाही.अदयाप पावेतो सदरच्या गुन्ह्यात माझेवर आरोप सिध्द झालेला नाही. माझे कुटूंबाची सर्वस्वी जबाबदारी माझेवर असल्याने मला कामाची अत्यंत आवश्यकता असून मला दूसरे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही.तरी मला माझे यापुर्वीचे १० वर्षातील कामाचा व विश्वासूपणाचा विचार होवून पुन्हा कामावर रुजू करण्यात यावे. ही नम्र विनंती." असे म्हटलेले आहे.

श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक,(वर्ग -०४ कर्मचारी), सरंक्षण विभाग यांना सध्या कामावर हजर करुन घ्यावे किंवा त्यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयाच्या निकालानंतर निर्णय घ्यावा किंवा कसे ? याबाबत संस्थान पॅनलवरील कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील,अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/६११३/२०१९ दि.२२.०३.२०१९ प्रमाणे पत्र देण्यात येवुन त्यांचा कायदेशिर अभिप्राय मागविणेत आलेला होता.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे श्री.शिंदे यांचेबाबत कायदेशीर अभिप्राय पत्र दिलेले आहे.त्यात त्यांनी," I have gone through your letter referred above and perused the relevant provisions of service rules relating to suspension of an employee involved in criminal offence. It appears that,the accused Shri.Saidas Shinde is released on bail and therefore,he has moved an application to resume on duty. In view of an offence registered against him and subsequent arrest and detention in Police custoday it is sufficient to place him under suspension. Therefore, in my opinion his request for reemployment did not require any consideration at this stage.असे स्पष्ट मत दिलेले आहे.

श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक,(वर्ग -०४ कर्मचारी),सरंक्षण विभाग यांना कामावर हजर करुन घेवु नये असा स्पष्ट अभिप्राय संस्थान पॅनलवरील ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये दिलेला आहे.तसचे त्यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयांचे स्वरुप पाहता तपासाकामी त्यांना पुन्हा अटक होवु शकते.श्री.शिंदे यांचेवर असलेल्या गुन्हयाचा निकाल लागेपर्यत त्यांना कामावर हजर करुन घेता येणार नाही.तरी.शिंदे यांनी कामावर हजर करुन घेणेबाबत दिलेले दि.११.०३.२०१९ रोजीचे अर्जाचे प्रकरण त्यांचेवर असलेल्या केसेसचा न्यायालयीन निकालानंतर विचार करता येईल.तुर्तास श्री.शिंदे यांचे कामावर हजर/रुजू करुन घेणेचे प्रकरण बंद करणेत येवुन, दप्तरी दाखल करता येईल याबाबत दि.२७.०३.२०१९ रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.श्री.शिंदे यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.७५६ अन्वये सेवा निलंबीत केलेले आहे. त्यामुळे श्री.शिंदे यांना त्यांचे विनंती अर्जानुसार कामावर घ्यावयाचे झाल्यास त्याकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

सबब, श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक,(वर्ग -०४ कर्मचारी),सरंक्षण विभाग यांना कामावर हजर करुन घेवु नये असा स्पष्ट अभिप्राय संस्थान पॅनलवरील ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये दिलेला आहे.तथापी, श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक यांना सेवा निलंबीत ठेवुन निर्वाह भत्ता आदा करणे ऐवजी त्यांचे दि.११.०३.२०१९ रोजीचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार होवुन मा.अतिरिक्त सत्र न्यायालयाचे होणारे पुढील आदेशास अधिन राहुन श्री.शिंदे यांना कामावर हजर करुन घेणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.जिल्हा सत्र न्यायालय,कोपरगांव यांचा जो निकाल लागेल त्या निकालास अधिन राहून श्री. साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग यांना तुर्त संस्थान सेवेत रुजु करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग )**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ **मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांना हरबराडाळ व खाद्यतेल पुरविणेस नकार दिल्यामुळे त्यांचेवर कारवाई करणे,MSME अंतर्गत येणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमातंर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना बयाणा रक्कम व निविदा फी भरणेची सवलत रद्द करणे व दरत्रकाव्दारे खरेदी केलेल्या हरबराडाळ खरेदीसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये खादय तेल व हरबराडाळ इ.चा समावेश होता. खादय तेलाच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या. तसेच हरबराडाळ, गहु, तांदुळ व साखर या ४ आयटेमच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

(अ) खादयतेल- खादय तेल खरेदीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले खादयतेलाचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले होते. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत खादयतेलाचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले होते. यामध्ये मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचे खादय तेल व हरबराडाळ या दोन आयटेमचे त्यांचे दर ४ क्वार्टरमध्ये न्यूनतम आले होते. असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते.

त्यानंतर मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.५/६/२०१९ रोजी सायंकाळी खालीलप्रमाणे ई-मेल पाठविला होता.

We had participated in the captioned tender process. It is learnt that we are L1 in the abovementioned Tender for Edible Oil.

However, after going through the commercial bids of other bidders, we realized that inadvertently while calculathing per Quintal rate, we had considered

" per Litre rate" (instead of per kilogram rate) while quoting per Quintal rate (as per the Standard 15 litre packing rate quoted to us by the manufacturers).

Under such cirucumstances, we request you to kindly reconsider our rate calculating as-per litre rate in proportion to per quintal rate; instead of per kilo rate in proportion to per quintal rate. Otherwise it will not be possible for us to supply the Edible Oil as required by you. This is nothing but a calculation error as per Litre rate is used and prevailing in the market as a standard.

सदर ई-मेलबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दरामध्ये मागितलेली दरवाढ देण्याची निविदा अटी-शर्ती व सुधारित खरेदी नियमावलीत तरतूद नसलेमुळे खादय तेलाचे दरात वाढ देता येणार नाही. तसेच मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी ई-निविदेसोबत एमएसएमई अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम भरलेली नसलेमुळे त्यांना खादय तेल पुरवठयासाठी पुढील ३ वर्षांसाठी काळया यादीत टाकणेबाबत व खादय तेलासाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत व तोपर्यंत संस्थानला आवश्यक असणारे खादय तेल मागील पुरवठादार देणेस तयार असलेस त्यांचेकडून अगर ते तयार नसल्यास तातडीने दरपत्रके मागवून खरेदी करणेचा निर्णय झालेला होता. सदर निर्णयास अनुसरून मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचा काळया यादीत समावेश केला आहे तसे त्यांना लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे व खादयतेलासाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(ब) हरबराडाळ- भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे एकत्रीत ई-निविदेचा समावेश होता. गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले आहेत. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत कमर्शिअल बीड उघडण्यात आले आहेत.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना हरबरा दाळ व खादय तेलामध्ये त्यांचे दर न्यूनतम असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते. तथापि ते चर्चा वाटाघाटीस अनुपस्थित होते.

मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांचे हरभरा दाळीसाठीचे प्रती क्विंटल दर तज्ञांनी निवडलेले हरभरा दाळीचे नमुन्यांमध्ये इतर निविदाधारकांपेक्षा ४ ही क्वार्टरमध्ये न्यूनतम आहेत. त्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/८३४/२०१९ दि.११/६/२०१९ रोजीचा पुरवठा आदेश ई-मेलद्वारे देण्यात आला होता.

तथापि, मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.११ जून, २०१९ रात्रौ ९.४२ वाजता खालीलप्रमाणे ई-मेलद्वारे कळविले आहे.

We have learnt about allotment of Tender to us by going through attached Work Order sent through this email.

However, you are hereby informed that, in view of unexpected unforeseen financial difficulties which our firm is going through at present and considering the terms and conditions mentioned in the Work Order, it would be difficult for us to enter into any agreement.

संस्थानच्या किराणा माल व इतर अनुषंगिक साहित्याचे वार्षिक ई-निविदेमध्ये प्रथमच मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी हरभरा दाळ पुरविणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे हरबराडाळ खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागली आहे. तसेच हरबराडाळ ३०० क्विंटल तातडीने दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून प्रती क्विंटल रू.५,३३९/- दराने खरेदी करावी लागली असून याकामी रू.१६,०१,७००/- खर्च आला आहे. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी हि विनंती. तसेच हरबराडाळ खरेदी साठीची निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत आवश्यक असणारी हरबराडाळ सध्याचे दरपत्रकाद्वारे खरेदी करण्यात येणा-या दराने मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिक हे तयार असल्यास त्यांचेकडून अथवा दरपत्रकाद्वारे खरेदी करावी लागेल.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ व खादयतेलाचा पुरवठा न केलयामुळे संस्थानला ई-निविदा प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाची भरपाई त्यांचेकडून संस्थानला मिळावी म्हणून संस्थान ॲडव्हकेटच्या सल्ल्याने याबाबतीत उचित कारवाई करावी असे मत आहे.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी सुधारित खरेदी नियमावलीतील MSME योजनेचा फायदा घेऊन हरबराडाळ व खादयतेल खरेदीची संस्थानची ई-निविदा भरली होती. त्यामुळे त्यांना निविदा फी व बयाणा रक्कम भरावी लागली नाही. त्यांची बयाणा रक्कम संस्थानकडे जमा नसल्यामुळे हरबराडाळ व खादयतेल पुरविणेस त्यांनी ऐनवेळी नकार दिल्यामुळे संस्थानला फेर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागली तसेच हरबराडाळ खरेदीसाठी दरपत्रके मागवुन खरेदी करावी लागली. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नये व त्यामुळे संस्थानच्या

कामाची अडचण होऊ नये म्हणून MSME म्हणून सुक्ष्म व लघु, मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या उदयोगांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देऊ नये असे मत आहे.

तरी,

१. मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ व खादयतेलाचा पुरवठा न केल्याने संस्थान ॲडव्हकेट यांच्या सल्ल्याने त्यांचेवर कारवाई करणेस,

२. सुक्ष्म व लघु, मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या उदयोगांना यापुढे संस्थानच्या ई-निविदेसाठी आकारण्यात येणारे निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट न देणेस,

३. तातडीचे दरपत्रकाद्वारे केलेल्या ३०० क्विंटल हरबराडाळ खरेदीस व याकामी आलेले रक्कम रू.१६,०१,७००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस,

४. हरबराडाळ खरेदीची ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत आवश्यक असणारी हरबराडाळ सध्याचे दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक हे तयार असल्यास त्यांचेकडून दरपत्रकाद्वारे खरेदी केलेल्या दराने व तयार नसल्यास पुन्हा दरपत्रकाद्वारे हरबराडाळ खरेदी करणेस,

वरील अ.नं.१ ते ४ बाबींबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ पुरवठा करण्यास नकार दिल्याने तातडीने दरपत्रकाव्दारे करण्यात आलेल्या ३०० क्विंटल हरबराडाळ खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु.१६,०१,७००/-मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच तातडीने हरबराडाळ खरेदी कामी आलेल्या वाढीव खर्चाची रक्कम मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांचेकडून वसुल करण्यात येऊन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे, तसेच MSME अंतर्गत निघणाऱ्या त्रुटी बाबत सविस्तर तपासणी करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**हरबराडाळ खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारी हरबराडाळ सध्याचे दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास तसेच ते पुरवठा करण्यास तयार नसल्यास दरपत्रकाव्दारे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी यांनी केलेल्या तपासणी अहवालांचे मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना दिलेले नोटीस व खुलासाबाबत.**

प्रस्ताव- सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर यांनी जा.नं.असुमाका/२७०/१९/३ दि.२७.०५.२०१९ चे पत्रान्वये संस्थानला खालीलप्रमाणे कळविले होते.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगे आपणास कळविण्यात येते की, दि.०१.०४.२०१९ रोजी लाडु निर्मिती विभागातून देशी तूप (सुबाग ब्रॅण्ड-ॲगमार्क) व लाडु या अन्न पदार्थाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला होता. देशी तुपाचा नमुना कमी प्रतीची (भेसळयुक्त) आढळुन आलेला आहे. सदर नमुन्यामध्ये Baudouin test Positive आलेली असुन Reishart value कमीत कमी २८ आवश्यक असताना २५.४ आढळुन आलेली आहे. यावरून सदर देशी तुपात इतर पदार्थाची भेसळ करून देशी तूप तयार केल्याचे प्रथम दर्शनी आढळुन येत आहे.

सदर बाब आरोग्याच्या दृष्टीकोनातून गंभीर असुन संदर्भ क्रमांक २ व्दारे सदर विशलेषण अहवाल आपले संबंधित विभागास पाठविण्यात आलेले आहे. त्याची प्रत या पत्रासोबत आपलेकडे पाठविण्यात येत आहे.

सदर पत्रावर “संबंधितांना नोटीसा काढा” असे निर्देश होते. त्यास अनुसरून शुध्द तूप पुरवठादार मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना खालीलप्रमाणे नोटीस दि.०५.०६.२०१९ रोजी देण्यात आली होती.

Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi has given you the supply orders to supply 2,150 quintal pure cow Ghee per quarter, as referred above for two quarters of the year

2019. You have supplied the ghee from time to time as per our requirement. The supply period of the second quarter will be ending on 30th June, 2019.

The Food Supply Inspector, FDA, Ahmednagar had collected the ghee sample on 01.04.2019 from our Ladu Nirmiti Department.

Now the Assistant Commissioner, FDA, Ahmednagar has informed us vide his letter dtd.27.05.2019 along with Lab Report, stating that the Ghee sample taken from Sansthan has prima facie found of low quality and adulterated.

The Lab Report of the ghee sample for the Baudouin test is Positive and Reishart Value is 25.4 instead of 28. Both the tests were crossed FSSAI Norms and very harmful to the human being.

In this regard, we call your explanation for the reasons thereof within 7 days from the date of receipt of this notice.

सदर नोटीसीस अनुसरून व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी दि.१३.०६.२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे त्यांचा खुलासा सादर केला आहे.

We have also received the letter of Assistant Commissioner, FDA Ahmednagr Dt.31.05.2019 Through email and we have replied promptly on 03.06.2019 a copy of the same attached herewith for your perusal. We are very much sure about our quality of ghee, there might be error in judgment in carrying out Analysis by Food Analyst, so we have challenged the analysis of Food Analyst Aurangabad and deposited the fee of Rs.5750/- for further analysis of said sample at higher laboratory i.e Referral Food Laboratory,CFTRI, Mysore with the permission of Assistant Commissioner, FDa, Ahmednagar. A copy of the same attachend for your kind perusal.

The NABL accredited analysis report of Gujarat laboratory for the said batch no-BPI05310A of the ghee supplied by us is also attached herewith along with test report of our laboratory.

वरीलप्रमाणे मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी लेखी खुलासा सादर केला आहे. त्यासोबत गुजरात लॅबोरेटरी या NABL लॅबचा व त्यांचे इनहाऊस लॅबचा रिपोर्ट जोडला आहे. तसेच फुड इनस्पेक्टरच्या लॅब रिपोर्टच्या विरूध्द त्यांनी अपील दाखल केले आहे. त्या पत्राची प्रत जोडली आहे. तसेच म्हैसुर लॅबचे फिसाठी रू.५,७५०/- डि.डि ची प्रतही सोबत जोडली आहे.

सन २०१९ ची शुध्द तूप खरेदीची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

संस्थानकडून सन २०१९ या वर्षासाठी ४ क्वार्टरचे ४ ई-निविदा स्वतंत्र करून ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यामध्ये ४ क्वार्टरमध्ये न्युनतम असणारे मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, यांना प्रथम जानेवारी २०१९ या एक माहिन्यासाठी ७५० क्विंटल गाईचे तूप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानंतर दि.०३.०१.२०१९ ते ०४.०१.२०१९ या कालावधीत संस्थानचे व्यवस्थापन समितीचे मा.उपाध्यक्ष, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उप कार्यकारी अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभागाचे नाशिक येथील २ अन्न सुरक्षा अधिकारी व प्र.अधिक्षक,खरेदी यांनी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे उमरगांव येथील प्लॅन्टला दि.०४.०१.२०१९ रोजी Vendor Audit साठी भेट दिली होती. सदर भेटीचे दोनही अहवाल सकारात्मक होते. सदर दोनही अहवाल नोंद घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ चे सभेत सादर करण्यात आले होते. त्यावर दि.०८.०१.२०१९ चे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.१९- यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपाध्यक्ष, उपजिल्हाधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी विभाग, तसेच मा.सह आयुक्त (अन्न), मुख्यालय, अन्न औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील अन्न सुरक्षा अधिकारी श्री दिलीप सोनवणे व श्री.प्रमोद पाटील यांनी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे शुध्द तूप प्रोसेसिंग प्लॅन्टची तपासणी व पाहणी करून दिलेल्या अहवालाचे अवलोकन करून त्याची नोंद घेण्यात आली. तसेच मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना निविदेतील अटी शर्तीनुसार पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

वरील निर्णयानुसार फेब्रुवारी ते मार्च-२०१९ या दोन महिन्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानंतर एप्रिल ते जून-२०१९ या तीमाहीकरीता पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी यांना संस्थानच्या लाडु निर्मिती विभागाने VPI05310A या बॅचचे सॅम्पल दिले होते. सदर बॅचचे तूप संस्थानला दि.२७.०२.२०१९ रोजी पुरविले होते. सदर बॅचचे तूप संस्थानकडून चार प्रयोगशाळेत तपासण्यात आले होते. यामध्ये CFTRI, Mysore, अश्वमेध लॅब,नाशिक, संस्थान लॅब व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक या चार लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर चारही प्रयोगशाळेचे रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे आहेत. सदर चारही लॅब रिपोर्टच्या झेरॉक्स प्रती यासोबत आपले अवलोकनार्थ सादर केल्या आहेत.

लाडू निर्मिती विभागाकडे लाडू/शुध्द तूपाच्या संदर्भात काही तक्रारी आहेत का? याची माहिती घेतली असता लाडू विभागाकडे लेखी अथवा तोंडी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. अशी माहिती मिळाली आहे.
वरील वस्तुस्थिती सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांना, त्यांनी पाठविलेले दि.२७.०५.२०१९ चे पत्राचे अनुषंगाने कळविण्यात आल्या आहेत.

तसेच सदर बॅचचे सॅम्पलची पुन्हा तपासणी करण्याचे निर्देश दि.२१/६/२०१९ रोजी मिळाले होते. त्याप्रमाणे सदर शुध्द तूपाचे सॅम्पल रिजनल अॅगमार्क लॅबोरेटरी, मुंबई या केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेला तपासणीसाठी दि.२४/६/२०१९ रोजी पाठविले आहे. याबाबत दि.२७.०६.२०१९ रोजी सदर लॅब रिपोर्टबाबत पाठपुरावा केला असता त्यांनी दि.०५.०७.२०१९ पर्यंत हा रिपोर्ट तयार होईल असे सांगितले आहे.

मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी जानेवारी २०१९ पासून आतापर्यंत संस्थानला पुरविलेल्या शुध्द तूपाचे लॅब रिपार्टचे तपासणीचा गोषवारा खालीलप्रमाणे-

| लॅबला एकुण पाठविलेले सॅम्पल | Conform आलेले एकुण लॅब रिपोर्ट | Conform नसलेले एकुण लॅब रिपोर्ट | येणे बाकी लॅब रिपोर्ट |
|---|---|---|---|
| ५६ | ४८ | १ | ७ |

वरील लॅब रिपोर्टमध्ये CFTRI, Mysore या लॅबचे आतापर्यंत प्राप्त झालेले सर्व रिपोर्टस Conform आलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- वरीलप्रमाणे सदर प्रकरणाची वस्तुस्थिती विचारात घेता ज्या बॅचचे तूपाच्या बाबतीत सहाय्यक आयुक्त,अहमदनगर यांनी अहवाल दिला आहे त्या बॅचचे सॅम्पल संस्थानकडून CFTRI, Mysore, अश्वमेध लॅब,नाशिक, संस्थान लॅब व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक या चार लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर चारही प्रयोगशाळेचे रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे आहेत. तसेच सदर तूपाचा संस्थानच्या लाडू विभागामध्ये वापर होऊन ते संपले आहे. लाडू निर्मिती विभागाकडे याबाबत लेखी अथवा तोंडी कुठल्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. यामध्ये अन्न औषध प्रशासनाच्या लॅब रिपोर्ट विरूध्द संबंधित पुरवठादार मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी अपील दाखल केले आहे व हे सॅम्पल CFTRI, Mysore या लॅबलाच पाठविण्यात येणार असल्याचे कळविले आहे. या सर्व बाबींचा विचार व्हावा असे मत आहे.

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ व पुढील निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रस्तावात नमुद वस्तुस्थितीचे अवलोकन करुन याबाबत मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांना ताकिद देण्यात यावी,असे ठरले.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग )**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्रलंबित बिले व शुध्द तुप उपलब्धतेबाबत.**

**प्रस्ताव-** खरेदी विभागाकडील दि.२९.०५.२०१९ चे टिपणी अन्वये मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीसाठी २,१५० क्विंटल गाईचे शुध्द तूप खरेदीसाठी पुरवठा आदेश सादर करण्यात आला होता.

तथापि दरम्यानचे कालावधीत सहाय्यक आयुक्त, अहमदनगर यांनी मे.व्हीएसपी डेअरी,इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे शुध्द तूप बॅच क्रं. VPI05310A बाबत पत्र व लॅब रिपोर्ट पाठविल्यामुळे तोंडी सुचनेनुसार सदर

पुरवठा आदेश फाईल प्रलंबित ठेवण्यात येऊन मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना नोटीस देण्याचे निर्देश होते. त्यानुसार मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना नोटीस देण्यात आली होती. त्यांनी केलेला खुलासा खरेदी विभागाकडील दि.१८.०६.२०१९ चे टिपणीनुसर सादर करण्यात आला होता. त्यावर मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे शुध्द तूपाचे सॅम्पल पुन्हा तपासण्यासाठी पाठविणेचे निर्देश झाले आहेत. त्याप्रमाणे रिजनल ॲगमार्क लॅब, मुंबई या केंद्र शासनाच्या लॅबचा सदर VPI05310A बॅचचे शुध्द तूपाचे सॅम्पल तपासणी दि.२४.०६.२०१९ रोजी पाठविलेला आहे.

सध्या भांडार विभागाकडे गाईचे शुध्द तूप ३७७ क्विंटल साठा आहे. भांडार विभागाची जुन २०१९ ची मागणी १००० क्विंटल आहे. तर मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचेकडून ३०.०६.२०१९ पर्यंतचे पुरवठा आदेशातील ६५० क्विंटल तूप येणे बाकी आहे. तसेच माहे जुलै २०१९ महिन्याची भांडार विभागाची मागणी ९०० क्विंटल आहे. तथापि जुलै ते सप्टेंबर २०१९ या कालावधीचा पुरवठा आदेश देणेचा प्रस्ताव वरील FDA ची नोटीस आल्यामुळे प्रलंबित आहे.

दि.२५.०६.२०१९ रोजी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना तूपाचे पुढील पुरवठयाबाबत फोन केला असता, त्यांनी संस्थानकडून त्यांचे बीलाची मोठी रक्कम ब-याच दिवसापासून मिळाली नसल्याची सांगितले आहे व सदर रक्कम मिळाल्यास पुढील पुरवठा सुरळीतपणे करता येईल असे कळविले आहे. तसेच पेमेंट मिळणेबाबत त्यांनी मेल केल्याचेही सांगितले होते.

मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी खालीलप्रमाणे मेल केला आहे.

After continued follow up our payment is still pending from invoice u/19-20/060 to 64 GUMG/19-20/072 to 75 dtd.21st May, 2019 onwards against subag agmark cow ghee 15 kg tin supply.

Regarding this, here we are let you know that we have to paid amount to farmers against milk purchase, as on today situation we are facing problems for making payment to farmers, We are managing best from our side and doing continue supply of Sansthan, so here request you to please release due payment on urgent basis, so we can go forward smoothly.

Please find the attached ledger with bill details. Here we request you to please release due payment as earliest.

We hope you will consider our request and looking forward for your kind Co-operation.

लेखाशाखा रोखपाल विभागाकडे मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांची बीले काही प्रलंबित आहेत का याची माहिती घेतली असता त्यांनी खालीलप्रमाणे बीले प्रलंबित असल्याचे सांगितले आहे.

| अ.नं | बील नं | रक्कम रूपये | बॅच नंबर |
|---|---|---|---|
| १ | ६०,६१,६३,६४ | ८१,९०,०००/- | VPI1231OA |
| २ | ७२,७३,७४,७५ | ८१,९०,०००/- | VIP1471OA |
| | एकुण रक्कम- | १,६३,८०,०००/- | |

तसेच खरेदी विभगाकडून दि.२२.०६.२०१९ रोजी बील नं.९३,९४,९५,९६ बॅच नंबर-VPI1621OA दि.१४.०६.२०१९ रू.८१,९०,०००/- ची बीले लेखाशाखेकडे पाठविली आहेत. म्हणजेच मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांची एकुण रक्कम रू.२,४५,७०,०००/- संस्थानकडून आदा होणे बाकी आहे.

लेखाशाखेकडे प्रलंबित असलेल्या बीलातील शुध्द तूपाचा पुर्णत: वापर होऊन तो साठा संपलेला आहे. तसेच सदर दोनही बॅचचे CFTRI लॅब वगळता सर्व रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे Conform आहेत. तर CFTRI लॅबचे वरील दोन बॅचचे लॅब रिपोर्ट येणे बाकी आहेत.

मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी जानेवारी २०१९ पासून आतापर्यंत संस्थानला पुरविलेल्या शुध्द तूपाचे लॅब तपासणीचे रिपोर्टचे गोषवारा खालीलप्रमाणे-

| लॅबला एकुण पाठविलेले सॅम्पल | Conform आलेले एकुण लॅब रिपोर्ट | Conform नसलेले एकुण लॅब रिपोर्ट | येणे बाकी लॅब रिपोर्ट |
|---|---|---|---|
| ५६ | ४९ | १ | ६ |

वरील लॅब रिपोर्टमध्ये CFTRI, Mysore या लॅबला आतापर्यंत १४ सॅम्पल पाठविण्यात आले होते. त्यापैकी प्राप्त झालेले ०९ रिपोर्टस Conform आलेले आहेत व ०५ रिपोर्ट येणे बाकी आहेत. याचा भांडार विभागाकडील तक्ता अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांचे शुध्द तूपाबाबत सहाय्यक आयुक्त,अन्न अहमदनगर यांनी दिलेल्या नोटीस-खुलासाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे स्वतंत्र प्रस्तावही सादर करण्यात आलेला आहे.

सध्या संस्थानकडे असलेला शुध्द तूपाचा साठा अंदाजे १५ दिवस म्हणजेच साधारण दि.१०/०७/२०१९ पर्यंत पुरेल असा अंदाज आहे.

त्यामुळे मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांना जुलै ते सप्टेंबर २०१९ या कालावधीचा पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. पुरवठा आदेश दयावयाचा नसल्यास तातडीने शुध्द तूप उपलब्धतेबाबत पर्यायी व्यवस्था करावी लागेल.

तसेच पुढील कालावधीसाठी पुरवठा आदेश दयावा अगर कसे? याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. पुढील पुरवठा आदेश दयावयाचा नसल्यास दरपत्रकाद्वारे तातडीने शुध्द तूप खरेदीची प्रक्रिया करून तूपाची खरेदी करावी लागेल.

विभागाचा अभिप्राय- वरीलप्रमाणे सदर प्रकरणाची वस्तुस्थिती विचारात घेता ज्या बॅचचे तूपाच्या बाबतीत सहय्यक आयुक्त,अहमदनगर यांनी अहवाल दिला आहे त्या बॅचचे सॅम्पल संस्थानकडून CFTRI, Mysore, अश्वमेध लॅब,नाशिक, संस्थान लॅब व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक या चार लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर चारही प्रयोगशाळेचे रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे आहेत. तसेच सदर तूपाचा संस्थानच्या लाडू विभागामध्ये वापर होऊन ते संपले आहे. लाडू निर्मिती विभागाकडे याबाबत लेखी अथवा तोंडी कुठल्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. यामध्ये अन्न औषध प्रशासनाच्या लॅब रिपोर्ट विरूध्द संबंधित पुरवठादार मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी अपील दाखल केले आहे व हे सॅम्पल CFTRI, Mysore या लॅबलाच पाठविण्यात येणार असल्याचे कळविले आहे. मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी पुरविलेले बॅचचे संस्थानकडे चार लॅबचे Conform रिपोर्ट असताना, पुन्हा शुध्द तूप खरेदीकामी दरपत्रके/ई-निविदा मागविल्यास सध्याच्या दरापेक्षा जास्त दराने संस्थानला शुध्द तूप खरेदी करावे लागण्याची शक्याता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार व्हावा असे मत आहे.

तरी,

१. मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्रलंबित बीलाबाबत (रू.२,४५,७०,०००/-).

२. जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील शुध्द तूपासाठी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांना पुरवठा आदेश दयावा अगर कसे?

वरील १ ते २ बाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्रलंबित बीलाची रक्कम रु.२,४५,७०,०००/-मात्र त्यांना आदा करण्यात येऊन माहे जुलै ते सप्टेंबर-२०१९ या कालावधीतील शुध्द तूपासाठी त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **अतिरिक्त तांदुळ खरेदी अहवाल.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य ॲड.मोहन जयकर यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेत मागील दि.२७.०३.२०१७ रोजीचे सभेत इतिवृत्त वाचून कायम करतांना निर्णय क्रं.२५३ मध्ये दुरूस्ती होऊन यामध्ये अतिरिक्त तांदुळ खरेदी केला किंवा कसे? याबाबत चौकशी करून अहवाल सादर करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य ॲड.श्री.मोहन जयकर, श्री. भाऊसाहेब वाकचौरे व श्री.सचिन तांबे यांची समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार सदर समितीच्या वतीने

समिती सदस्य ॲड.मोहन जयकर यांनी दि.०६.०६.२०१९ च्या व्यवस्थापन समितीच्या सभेत बंद पाकिटात अहवाल सादर केला. सदर अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत निर्णय क्रं.३०८ अन्वये झाला आहे. त्यास अनुसरून सदर अहवालाची प्रत यासोबत सादर केली आहे.

सदरचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **माहे जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्य तेलाचे प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार संस्थानला प्राप्त होणा-या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

वरील नमुद निर्णयाप्रमाणे, गाईचे शुद्ध तुपाचे सध्याचे पुरवठादार व्ही. एस. पी. डेअरी इंडस्ट्रीज, ऊमरगांव, गुजरात, यांचेकडून संस्थानला प्राप्त होणा-या शुद्ध तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक,(एन.ए.बी.एल. प्रयोगशाळा), जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (राज्य शासकीय प्रयोगशाळा) व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, (केंद्र शासन मध्यवर्ती प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह राज्य शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

वरील निर्णयानुसार संस्थानला माहे जानेवारी २०१९ ते मार्च २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत. त्यामध्ये

व्ही.एस.पी. डेअरी इंडस्ट्रीज, ऊमरगांव, यांचे शुद्ध तूपाचे बॅच नं. VPI10381OA/ Dtd.07.02.2019 चे नमुने लॅब तपासणीसाठी १) प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद, २) संस्थानची अंतर्गत प्रयोगशाळा, ३) अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, (NABL Lab) व ४) केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, (केंद्र शासन मध्यवर्ती प्रयोगशाळा) या चार प्रयोगशाळेंकडे पाठविणेत आलेले होते, यापैकी संस्थानची अंतर्गत प्रयोगशाळा, अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, या तिनही प्रयोगशाळेंचे तपासणी अहवालामध्ये उपरोक्त गाईचे शुद्ध तुपाचे नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार खाण्यास योग्य (conform) असल्याचे नमुद केलेले आहे. तर प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद, यांचे तपासणी अहवालामध्ये "The Above Submitted Sample does not conforms to the standards of Ghee as per Food Safety standards (Food Products & Food Additives) Regulations 2011." असे नमूद केलेले आहे.

उर्वरित सर्व प्रयोगशाळेंचे तपासणी अहवालामध्ये शुद्ध तूपाचे सर्व नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार खाण्यास योग्य (conform) असल्याचे नमुद केलेले आहे.

खाद्यतेलाचे सर्व प्रयोगशाळेंकडील तपासणी अहवालांमध्ये ते अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार conform असल्याचे नमुद आहे.

भांडार विभागातून उपरोक्त परिशिष्ठातील नमुद सर्व बॅचचे शुद्ध तुप व खाद्यतेलाचा साठा विनातक्रार संपलेला आहे.

तरी वरील प्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं. १ ते ३७ ) व दि.२५.०६.२०१९ रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ७) यासोबत सादर केलेले आहे, ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्य तेलाचे प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- भांडार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **अखिल भारतीय कुर्मी क्षत्रीय महासभा, मुंबई यांचे दि.१३.१२.२०१९ व दि.१५.१२.२०१९ रोजी होणाऱ्या अधिवेशनासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील खोल्या आरक्षणाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

मा.व्यवस्थापन समिती ठरावः- निरंक.

प्रस्ताविकः- दि.१२/०६/२०१९ व दि.१५/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये राजर्षि छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर, राजे सयाजीराव गायकवाड, देवास-नरेश खासेराव पवार, डॉ पंजाबराव देशमुख, मा.यशवंतराव चव्हाण मा. नरेंद्र तिडके, मा.वसंतदादा पाटील, IGश्री महेंद्रसिंग गंगवार आणि मा.श्रीमती बकुल पटेल इत्यादींनी संपूर्ण देशात कार्यरत असलेल्या कुर्मी, कुणबी, मराठा, पाटील, देशमुख, 96-कुळी व त्यांच्या उपजाती यांना एकत्रित करण्याच्या विशाल दृष्टीकोनातून सामाजिक कार्याची चळवळ सुरु केली आहे.

दरवर्षी देशातील 23 राज्यापैकी प्रत्येक राज्यात अधिवेशन संपन्न होतात. मागील वर्षी माहे सप्टेंबर मध्ये हेच अधिवेशन राजस्थान येथील झालावार येथे संपन्न झाले. त्याप्रसंगी समाजबांधवांनी पुढील अधिवेशन साईनगर शिर्डी येथे घ्यावे अशी आग्रही मागणी केली आहे.

संस्थेच्या वतीने आपल्या साई संस्थानाला तीन वेळा भेटी देऊन दि.27 मे 2019 रोजी मा. राष्ट्रीय अध्यक्ष श्री.एल.पि.पटेल. महासचिव, डॉ व्ही.एस.निरंजन, कोषध्यक्ष मा.बी.एल.वर्मा व स्थानिक राज्य पदाधिकारी यांनी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या व आम्हाला आवश्यक असलेल्या स्थानिक सुविधापैकी प्रथम टप्प्यात निवासासाठी उपलब्ध असलेल्या Non-AC रुम्स, संख्या 1100 (अकराशे) व सामाजिक कार्याच्या अधिवेशनासाठी आपलेकडे उपलब्ध असलेले खुले सभागृह (पेंडोल) दि.13-14-15 डिसेंबर 2019 या कालावधीसाठी आरक्षित करण्यास नम्र विनंती आहे. यासाठी येणारा खर्च आम्ही आपल्या संस्थानाकडे आगाऊ जमा करण्यास तयार आहेत.

प्रस्तावः- उपरोक्त संदर्भीय पत्रात, शुक्रवार दि.१३/१२/२०१९ ते रविवार दि.१५/१२/२०१९ अखेर तीन दिवसांसाठी सदर कार्यक्रमात सहभागी होणा-या व्यक्तींसाठी ११०० नॉनएसी खोल्या सशुल्क देणेबाबत विनंती केली असुन त्यानुसार खोल्या उपलब्ध करुन दिल्यास होणारा सेवा आकाराचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| खोली प्रकार | आरक्षित खोल्या | सेवाआकार (२४ तासांकरीता) (०५ व्यक्तींसाठी) | एक दिवसाचा सेवा आकार | दोन दिवसाचा सेवा आकार |
|---|---|---|---|---|
| NAC | ११०० | ३०० | ३,३०,०००/- | ६,६०,०००/- |
| | | | | **अक्षरी-सहा लाख साठ हजार रुपये मात्र.** |

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः- प्रस्तावित मागणी प्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागात यापुर्वी विविध कार्यक्रमांसाठी खोल्या देण्यात आलेल्या असुन, सदर संघटनेने अधिवेशनासाठी येणा-या व्यक्तींसाठी ११०० खोल्यांसह खुले सभागृह (पेंडोल) म्हणजेच शताब्दीमंडपाची मागणी केली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.५२ निर्णय क्र.२२४ अन्वये साईआश्रम भक्तनिवास विभागातील टेन्साईल फॅब्रीक शेड (शताब्दी मंडप) कोण-कोणत्या कार्यक्रमांसाठी उपलब्ध करुन देता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क याबाबत स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आलेली असुन त्यातील अ.नं १ अन्वये "साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दीमंडप फक्त

धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन देता येईल. तसेच सदरील मंडपामध्ये लग्न समारंभ, सामाजिक, राजकिय व अनुषंगीक कार्यक्रमासाठी परवानगी दिली जाणार नाही." असे नमुद आहे.

दरवर्षी माहे डिसेंबरमध्ये नाताळ उत्सवानिमित्त साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते तसेच, सदरचा कार्यक्रम सामाजिक असल्याने शताब्दी मंडपामध्ये अधिवेशन आयोजनास परवानगी देता येणार नसल्याने, त्यांनी मागणी केल्यानुसार येणा-या व्यक्तींची फक्त निवासव्यवस्था करावयाची झाल्यास,

१) सदर अखिल भारतीय कुर्मी क्षत्रीय महासभा, मुंबई यांचेकडून ११०० खोल्यांचे दोन दिवसांसाठी प्रतिरुम ०५ व्यक्तीं याप्रमाणे रु.६,६०,०००/- (अक्षरी-सहा लाख साठ हजार रुपये मात्र) सेवा आकार घेणेस,

२) माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१३/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९ दोन दिवस ११०० खोल्यांचे ऑनलाईन आरक्षण बंद करुन आरक्षित करणेस,

३) दि.१३/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९ अखेर ११०० खोल्या दिल्यास त्यादरम्यान ऑनलाईन व स्पॉट बुकिंगसाठी खोल्यांची मागणी करणा-या साईभक्तांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होणार असल्याने संस्थानचे इतर निवासस्थानामध्ये निवासव्यवस्था करता येईल.

४) सदर संस्थेस दि.१३/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९ अखेर ११०० नॉनएसीखोल्या आरक्षित करणेत आले असलेबाबत कळविणेस.

उपरोक्त ०१ ते ०४ बाबीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६३** **सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **शिर्डी शहर व संस्थान परिसरातील प्लास्टीक बंदीबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादी वस्तूंपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक यांचे नियमन करण्याकरीता दि.२३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसुचना २०१८ प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरचे अधिसुचनेतील महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम २ (एच) व कलम ४ चे उपकलम १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराअंतर्गत संपुर्ण राज्यात नियमन करण्यात येत आहे. प्लास्टीक पासुन बनविलेल्या पिशव्या (हॅण्डल असलेल्या व नसलेल्या) तसेच थर्माकॉल पासुन बनविलेल्या वस्तु शासनाने वापरासाठी बंदी घालण्यात आलेली आहे.

शासनाचे अधिसुचनेनुसार संस्थानमार्फत प्लास्टीक बंदीबाबत कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन संस्थानमार्फत विक्री करण्यात येणारे प्रसाद पाकीटे, अन्नपाकीटे याकरीता प्लास्टीकचा वापर बंद करण्यात आलेला आहे. श्रींचे दर्शनासाठी येणारे भाविकांकडून मंदिरामध्ये प्लास्टीक पिशव्यांमध्ये आणला जाणारा प्रसाद व इतर साहित्य याकरीता वापरण्यात येणाऱ्या प्लास्टीक पिशव्या वापरास बंदी करुन मंदिराचे व दर्शनरांगेचे प्रवेशद्वारावर प्लास्टीक बंदीबाबत सुचना फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच मंदिराचे प्रवेशद्वारावर तपासणी करुन भाविकांकडील प्लास्टीक पिशव्या काढुन घेण्यात येत आहे.

दि.२१/०६/२०१९ रोजी रात्रौ. मा.श्री रामदास कदम साहेब, पर्यावरण मंत्री हे श्रींचे दर्शनासाठी आले असता, मंदिर परिसराबाहेर तसेच द्वारकामाई मंदिर परिसराचे बाहेर साईभक्तांकडे प्लॅस्टीक पिशव्या आढळल्या, सबब प्लास्टीक बंदीबाबत कटाक्षाणे कार्यवाही होणेकामी मा. मंत्री महोदय यांनी निर्देश दिलेले होते.

तथापी प्लास्टीक बंदी होऊनही काही प्रमाणात प्लास्टीक पिशव्यांचा वापर शिर्डी परिसरातील दुकानदारांकडून प्रसाद पॅकींग व वाहतुककामी करण्यात येत असल्याने, यापूर्वी वेळोवेळी शिर्डी नगरपंचयात यांना पत्राने प्लास्टीक बंदीबाबत प्रभावीपणे कार्यवाही होणेकामी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपरोक्त संदर्भिय क्र. ४ व ५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त सदरचे अधिसुचनेतील महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम २ (एच) व कलम ४ चे उपकलम १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराअंतर्गत संपुर्ण राज्यात नियमन करण्यात येत आहे. प्लास्टीक पासुन बनविलेल्या पिशव्या (हॅण्डल असलेल्या व नसलेल्या) तसेच थर्माकॉल पासुन बनविलेल्या वस्तु शासनाने वापरासाठी बंदी घालण्यात आलेली

असल्याने, उपरोक्त संदर्भिय क्र. ३ चे परिपत्रकान्वये संस्थानचे गेट क्र. ०१,०२, ०३,०४ व द्वारकामाई मुख्य गेट येथे सुरक्षारक्षाकांमार्फत तपासणी करण्यात येऊन भाविकांकडील प्लास्टीक पिशव्या काढुन घेण्यात येतात.

तथापी मा. मंत्री महोदय यांचे निर्देशान्वये व शासन अधिनियमानुसार प्लास्टीक बंदीबाबतची माहिती भाविकांच्या माहितीसाठी संस्थानचे संकेत स्थळावर प्रकाशित करता येईल.

तसेच मंदिर परिसराबाहेरील प्रसाद, फुलहार व इतर दुकानांमध्ये असलेल्या प्लास्टीक पिशव्या प्लास्टीक बंदीबाबतची कार्यवाही कार्यवाही करण्याची बाब संस्थानचे अख्यारित्यात येत नसल्याने, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत कार्यवाही होणेसाठी त्यांना कळविता येईल,असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:-

तरी

१) मा. मंत्री महोदय यांचे निर्देशान्वये व शासन अधिनियमानुसार प्लास्टीक बंदीबाबतची माहिती संस्थानचे संकेत स्थळावर प्रकाशित करणेस.

२) मंदिर परिसराबाहेरील प्रसाद, फुलहार व इतर दुकानांमध्ये असलेल्या प्लास्टीक बंदीबाबतची कार्यवाही करण्याची बाब संस्थानचे अख्यारित्यात येत नसल्याने, मा. जिल्हाधिकारी व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत दुकानदारांवर कार्यवाही होणेसाठी.

सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत कापडी पिशव्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात, संस्थान परिसरात प्लास्टीक बंदीचे फलक सर्व भाषेत लावण्यात यावेत, तसेच संस्थान परिसराबाहेरील प्लास्टीक बंदीबाबत शिर्डी नगरपंचायत यांना कळविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग )**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी/रथ मिरवणूकीसाठी तसेच स्थानिक उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचेरथ / पालखी मिरवणुक बंदोबस्तकामी संरक्षण विभागामार्फत कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्यात येत आहे. तथापी दिवसेंदिवस गुरुवारची पालखी मिरवणुक व प्रमुख तीन उत्सव व इतर स्थानीक उत्सवाचे रथ / पालखी मिरवणुकीचे वेळी शिर्डी ग्रामस्थांबरोबरच शिर्डी पंचक्रोषीतील भाविकांची गर्दी वाढत चालली आहे. सदरची गर्दीवर नियंत्रण ठेवण्याचे काम कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांमार्फत करण्यात येत आहे. तथापी शिर्डीतील तसेच पंचक्रोषीतील काही लोक फोटो व पादुकांची मिरवणुक समाधी मंदिरातून निघालेपासुन फोटो बरोबर जाण्याचा प्रयत्न करतात. तसेच द्वारकामाई मंदिरात गेल्या नंतर आरती मिरवणुकीनंतर पालखी सोबत चावडीपर्यंत जातात. चावडीमध्ये आरती झालेनंतर मिरवणुकी सोबत पुन्हा समाधी मंदिरामध्ये येतात. या सर्व मिरवणुकीमध्ये काही ग्रामस्थ एकदा दर्शन झाल्यानंतर ही पुन्हा-पुन्हा श्रींचे फोटो, पादुका, सटका किंवा रथ/पालखीस हात लावून दर्शन घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पालखी मिरवणूकीचे वेळी गर्दी होऊन पालखी पडण्याची दाट शक्यता असते. सुरक्षा रक्षकांनी ग्रामस्थांना अडविल्यास सुरक्षारक्षकां सोबत ग्रामस्थ वाद घालतात, धमकावतात तसेच काही वेळेस पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल होण्याचे प्रकार झालेले आहेत. तसेच सदर प्रकारामुळे इतर ग्रामस्थांना व साईभक्तांना पालखीचे व्यवस्थीत दर्शन मिळत नसल्याने त्यांनी पालखी भोवतालची गर्दी कमी करणेबाबत मौखीक तक्रारी प्राप्त होतात.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/११/२०१८चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ श्री राजेंद्र सोपानराव जगताप, (विद्युत पर्यवेक्षक, प्र.पाणी पुरवठा विभाग प्रमुख (अतिरीक्त कार्यभार प्र.अधिक्षक मंदिर विभाग) यांचे विरोधात शिर्डी पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या प्रथम माहिती अहवाल व निवेदनाबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७१४ अन्वये श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थवसाईभक्तांसाठीनियमावलीतयारकरुनमा.व्यवस्थापनसमितीचेपुढीलसभेमध्येमान्यतेसाठीसादरकरावी, असेठरले. तसेच पुढील पालखीचे दरम्यान होणाऱ्या गर्दीचे वेळी सुरक्षा व्यवस्था चोख ठेऊन कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींचे गुरुवारचे पालखी व इतर वेळी होणारी गर्दी कमी करण्यासाठी व श्रींचे पादुका, सटका व फोटोचे पावीत्र्य राखण्यासाठी करावयाची नियमावली खालील प्रमाणे तयार करणेत आली आहे.

१. ज्या ग्रामस्थांना पालखीसाठी हजर रहावयाचे असेल त्यांनी ९.०० वाजेपूर्वीच दर्शन घेऊन व्दारकामाईव चावडी परिसरात बॅरीगेटींगचे आत जाऊन बसावे. पालखीपूर्वी १० मिनिटे कोणालाही पालखी मार्गातून समाधी मंदिरात दर्शनासाठी सोडले जाणार नाही. इतर साईभक्तांनी सध्याचे प्रचलीत पध्दतीप्रमाणे बॅरीगेटचे बाहेर पालखी सोहळा पाहणेकामी बसावे.

२. पालखीसाठी येणारे ग्रामस्थांनी दिव्यांग गेटने प्रवेश करुन दर्शन झालेनंतर व्दारकामाईचे किंगगेटने द्वारकामाई व चावडीचे परिसरात पालखीचे वेळी बसून रहावे.

३. पालखीवेळी दर्शन लाईन ऑफीस बाजू दोन लाईनने मागे काढावी. पादुका बाजु दोन लाईन मध्ये ग्रामस्थांना दर्शनासाठी सोडावे, सदर ग्रामस्थांनी नमूद दोन दर्शनरांगमध्ये दर्शनानंतर थांबू नये तसेच गाभा-यातून दर्शनासाठी जावू नये.

४. संस्थानचे पालखी सोहळयासाठी नेमणुक केलेले कर्मचारी व्यतीरीक्त कोणीही कर्मचारी हे स्वत: किंवा त्यांचे कुटूंबीय समाधी मंदीर ते द्वारकामाई या मार्गात पालखीच्या मागे-पुढे चालणार नाहीत. त्यांनी द्वारकामाई व चावडी समोरील जागेत पालखीसाठी बसावे.

५. श्रींच्या गुरुवार पालखी मिरवणूकीचे वेळी पालखी समोर, मागे व समाधी गाभारा ते व्दारकामाई या मार्गात अधिकृत व्यक्ती (कै.तात्या पाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजी पाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणे करीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२, अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी०४, व बंदोबस्त कर्मचारी, भजनीमंडळ) यांचे शिवाय कोणीही चालु नये अथवा उभे राहु नये.

६. ग्रामस्थांनीपालखीसोहळा / मिरवणूक संपलेनंतर बाहेर जाणेकरीता व्दारकामाईचे किंगलहानगेट व दिव्यांगगेट यांचा वापर करावा.

७. रात्रौ. ८.३०वा. चार पैकी पादुका बाजु दोन दर्शन रांगा भक्तांना दर्शनासाठी बंद कराव्यात. फक्त ऑफीस बाजु दोन दर्शन रांगा चालू ठेवाव्यात. गर्दीचा अंदाज घेऊन बायोमेट्रीक पास वितरण बंद करणे बाबत निर्णय घ्यावा.

८. श्रींची पालखी व्दारकामाई व चावडी येथे जातांना व पुन्हा समाधी मंदिराकडे परत येतांना जाळी बाहेरील भाविकांना श्रींचे पालखी मिरवणुक सुलभतेने बघता यावी या करीता ग्रामस्थांनी पालखी मार्गात उभे न राहता चावडी व व्दारकामाई समोरील मोकळया जागेत खाली बसावे.

९. पालखीचे वेळी फोटो धरण्याकरीता कै.तात्यापाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजीपाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणेकरीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२, अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी ०४ हजर राहतील. त्यापैकी कोणी गैरहजर असल्यास किंवा आवश्यकता असल्यास मंदिरातील चोपदारांनी नमूद काम करावे.

१०. श्रींच्या पादुका व सटका एक पुजारी यांचे हातात राहील. त्यांचे बाजूला मंदिर अधिक्षक /पर्यवेक्षक यांचेकडे श्रींचा कोट असेल. श्रींच्या फोटोसमोर दोन पुजारी चौरी हलवतील. त्यांचे दोन्ही बाजूला मंदिर डयुटीचे पुजारी व चोपदार व संरक्षण डयुटीचे गार्ड हजर राहतील.

११. स्थानीक उत्सव / मुख्य उत्सवाचे वेळी देवधिकांचा फोटो (उदा. विठ्ठलाचा फोटो किंवा श्रीराम प्रभुंचा फोटो किंवा श्रीकृष्णाचा फोटो, इत्यादी) पादुकांच्या मागे संस्थान पुजारी धरतील.

१२. भजनी मंडळामध्ये चालण्यासाठी मंदिर विभागाने दिलेले कार्ड सोबत ठेवावेत. भजनी मंडळात ०७ टाळकरी व मंदिर विभागाचे एक मृदुंग वादक हजर राहतील.

१३. भजनी मंडळाचे पुढे स्थानिक झांजपथकाचे जास्तीत जास्त २० सदस्य व त्यापुढे शाळकरी मुले लेझीम पथकाचे २० मुले यांना मागणीनुसार परवानगी देता येईल. सदर इच्छुकांनी आपली नावे पालखीपूर्वी मंदिर व संरक्षण विभागाकडे द्यावीत. पालखी चावडीत गेल्यानंतर चावडीतील आरतीनंतर बाबा चावडीमध्ये विश्रांतीसाठी थांबत असल्यामुळे पालखी चावडीमधून समाधी मंदिरात माघारी येताना कोणतेही वाद्य वाजवू नये. सर्व वाद्य वादक हे चावडी परिसरातच थांबून राहतील. त्यांनी पालखीबरोबर माघारी समाधी मंदिरात येवू नये. बाहेर जाण्यासाठी त्यांनी दिव्यांग गेट किंवा गुरुस्थान गेटचा वापर करावा.

१४. स्थानीक गांवकरी, कर्मचारी यांनी समाधी मंदिर ते द्वारकामाई गेट दरम्यान थांबू नये. ज्यांना पालखीसाठी हजर रहावयाचे आहे त्यांनी द्वारकामाई, मुखदर्शन हॉल, चावडी परिसर येथे पालखीपूर्वीच जावून बसावे. ग्रामस्थांची जास्त गर्दी झाल्यास सदर संख्या बाबत वेगळे आदेश काढण्यात येतील.

१५. चावडीमध्ये श्रींचा फोटो व पादुका नेले नंतर चावडीमध्ये चिलीमसाठी फोटो धरणारे व छत्री धरणारे व्यक्तीं शिवाय कोणीही ग्रामस्थांनी थांबु नये.

१६. सर्व आरतीचे वेळी जाळीचे पुढे, जाळीचे आत महत्वाचे / अतिमहत्वाचे व्यक्ती / देणगीदार यांना जनसंपर्क विभागाचे निर्देशानुसार ठरवून दिलेल्या जागीच उभे करावे. ग्रामस्थांनी आरतीचे वेळी जाळीचे पुढे उभे राहू नये. याकामी जनसंपर्क विभाग, मंदिर विभाग व संरक्षण विभागाचे कर्मचारी संयुक्तीक जबाबदारी पार पडतील.

१७. फोटो/छत्री धरणारे मानकरी यांना सुतक/वृध्दी असल्यास अथवा गैरहजर असल्यास सर्व अधिकार मंदिर अधिक्षक / पर्यवेक्षक यांना राहील.

१८. श्रींचे तिनही मुख्य उत्सव किंवा स्थानीक उत्सवाचे वेळी शिर्डी गावातून पालखी व रथ मीरवणुकीचे वेळी वरीलप्रमाणे सर्व कामकाज चालेल.

१९. पालखी/रथ / आरती / दर्शन व्यवस्था नियमामध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

तरी श्रींची गुरुवारची नित्याची पालखी व इतर वेळी आरती/दर्शनकरीता वरीलप्रमाणे नियमावली तयार करणेत आली असुन, सदर नियमावली अंतिम करणेकामीवरीलप्रमाणे नियमावलीचे अवलोकन होऊन नियमावलीमध्ये काही नियम वाढविणे अथवा कमी करणेबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती. तसेच सदर नियमावली नागरीकांना माहिती होणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर व मंदिर परिसरात बोर्डवर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६५** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **वरिष्ठ महाविद्यालय B.Sc.(Computer Science) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया व शुल्काबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –

०१. मा.व्य.समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१)

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४४

प्रस्ताविकः- श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक – मान्यता – २०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०३ चे आदेशान्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला आहे. शासनाकडून व विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयात तीनही शाखेंच्या प्रथम वर्षाकरिता प्रवेश देण्यात आलेले होते, प्रथम वर्षाकरिता तीन्ही शाखेत एकुण ३१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आली. त्याबाबतचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दाखल करण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४४ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये B.Sc.(Computer Science) व BCA अभ्यासक्रमाचे वर्ग सुरु करणेसाठी महाराष्ट्र

शासनाची तसेच पुणे विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी, व त्यानंतर सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) व बीसीए (विज्ञान) या प्रस्तावित नवीन अभ्यासक्रमास कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली आहे.

बहुतांशी विद्यार्थी व पालकांची बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या अभ्यासक्रमासाठी मागणी आहे. परिसरातील इतर महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) चे प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून, बहुतांशी पालक व विद्यार्थी प्रवेशप्रक्रियेसाठी चौकशी करता महाविद्यालयामध्ये येत आहे. त्यामुळे चालु शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) हा अभ्यासक्रम सुरु करता येईल.

सदर अभ्यासक्रमाकरिता विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शैक्षणिक शुल्काबाबत विद्यापीठ आदेश क्र.५४२ दि.१७.०२.२०११ नुसार शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क घेणेबाबत निर्देश आहेत. शुल्कासंबंधी आदेश पी.जी.एस.७८५२ दि.२३.१२.२००९ हा विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलबध आहे, त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता क्र.०१ - प्रथम वर्ष B.Sc.(Computer Science) विनाअनुदानित**

| अ.क्र. | शुल्काचा तपशिल | प्रथम वर्ष |
|---|---|---|
| 01. | Registration Fee | 25 |
| 02. | Admission Fee | 20 |
| 03. | Tuition Fee | 8400 |
| 04. | Laboratory Fee | 15000 |
| 05. | Library Fee | 100 |
| 06. | Laboratory Deposit | 100 |
| 07.. | Gymkhana Fee | 100 |
| 08. | Library Deposit | 150 |
| 09. | Computerisation Fee | 30 |
| 10. | Student Aid. Fund | 10 |
| 11. | Ashwhamegh Fee | 30 |
| 12. | Disaster Management | 20 |
| 13. | Student Welfare Fund | 50 |
| 14. | Student Insurance | 10 |
| 15. | Medical Fee | 60 |
| 16. | Eligibility Fee | 300 |
| 17. | Development Fee | 125 |
| 18. | Student Activities | 950 |
| 19. | Physical Education | 50 |
| 20. | Vridhi Process | 50 |
| 21. | NSS Fee | 10 |
| 22. | Tutorial/ Seminar / Workshop Test Fee | 100 |
| 23. | Comp.Lab.Dev.Fee | 300 |
| 24. | Magazine Fee | 100 |
| | **Total Fee** | 26090 |

(उपरोक्त नमुद तक्त्यामध्ये अ.क्र.२० Vridhi Process फी ही विद्यापीठाचे फी व्यतिरिक्त नमुद केलेली आहे. कारण सदरची रक्कम ही सबंधीत Software कंपनीस आदा करावी लागणार आहे.)

विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार B.Sc.(Computer Science) हा अभ्यासक्रम सर्व महाविद्यालयांमध्ये कायम विनाअनुदानित तत्वावर कार्यरत आहे. त्यामुळे सदर अभ्यसक्रमासाठी आकारावयाचे शुल्क देखील विनाअनुदानित प्रमाणे आकारण्यात येत असते. त्यानुसार B.Sc.(Computer Science) प्रथम वर्ष या अभ्यासक्रमासाठी रक्कम रु.२६,०९०/- मात्र इतके शुल्क आकारावे लागेल. यापैकी काही रक्कम नियमानुसार

विद्यापीठास अदा करावी लागते. त्याबाबतचे चलन वेळोवेळी विद्यापीठाकडून कळविण्यात येत असते. संस्थानमार्फत सुरु करण्यात येणारे महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येत आहे.

सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना पुर्वीप्रमाणेच वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविता येईल, तसेच विद्यार्थ्यांकडून स्विकारण्यात येणारे शुल्क हे रोख स्वरुपात न घेता, विद्यार्थ्यांना चलनाद्वारे बॅंकेत भरणा करणेबाबत कळविता येईल, तसेच बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) हा अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया तातडीने सुरु करणे गरजेचे असल्याने, दि.२७.०६.२०१९ पासून सदरचे प्रवेश प्रक्रिया सुरु करता येईल, असे नम्र मत आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील सदरचा प्रस्तावास कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करता येईल.

मागणी– तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ चे मान्यतेनुसार श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात B.Sc.(Computer Science) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. तसेच सदरचा अभ्यासक्रम हा विनाअनुदानित असल्याने त्यासाठी विद्यापीठामार्फत निश्चित केलेले तक्ता क्र.०१ मध्ये नमुद केलेले रु.२६,०९०/- मात्र इतके शुल्क आकारणी करुन विद्यार्थ्यांची मागणी विचारात घेता, तातडीने प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तरी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात B.Sc.(Computer Science) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदरचा अभ्यासक्रम हा विनाअनुदानित असल्याने त्यासाठी विद्यापीठामार्फत निश्चित केलेले रक्कम रु.२६,०९०/-मात्र इतके शुल्क आकारणी करुन सुरु करण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय )**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेबाबत तसेच त्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी STATE HEALTH AUSSURANCE SOCIETY (SHAS) व THIRDI PARTY ADMINISTRATOR यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भ-१. दि.०५ मार्च २०१९ रोजीचा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत अंगीकृत असलेली खाजगी रुग्णालये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरीताअंगीकृत करणेबाबतचा शासन निर्णय .

२. डॉ.विश्वजीत माने , मॅनेजर ऑपरेशन्स (Empanelment) यांचा दि.०६ मार्च २०१९ रोजीचा ई मेल.

३. डॉ.मयुर मुथा, District Head, Ahmednagar यांचा दि.१४ मार्च २०१९ रोजीचा ई मेल.

४. दि.१८/०३/२०१९ रोजीची टिपणी व त्यावरील मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे आदेश.

५. जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एमजेपीजेएवाय /९६/२०१९ दि.१२ मार्च २०१९ रोजीचे मॅनेजर ऑपरेशन्स (Empanelment) मेडी.असि.इन्शुरन्स टिपीए प्रायव्हेट लिमिटेड यांना पाठविलेले पत्र.

उपरोक्त संदर्भीय क्र.०१ दि.०५ मार्च २०१९ रोजी खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमीत झालेला आहे.

दि.२१ सप्टेबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत शासकीय रुग्णालयात उपचारांकरीता मान्यता देण्यात आलेली आहे.महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत अंगीकृत ४०५ खाजगी रुग्णालये आहेत. सदर अंगीकृत खाजगी रुग्णालयात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतर्गत सामाजिक, आर्थिक व जाती जनगणनेमधील सर्वेक्षण (SECC Data)च्या आधारे निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना सदर अंगीकृत खाजगी रुग्णालयात ८४० उपचारांकरीता (९७१ उपचारांपैकी शासकीय रुग्णालयांसाठी राखीव १३१ उपचार वगळुन ) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना एकत्रितरीत्या राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच, अन्य राज्यातील रुग्णांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ देण्यासाठी नॅशनल टिएमएस(Portability ) मध्ये एकुण १३९३ उपचारांकरीता अंतर्भाव करण्यात मान्यता देण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी,वरळी, मुंबई यांनी अंगीकृत रुग्णालयांशी करावयाच्या करारामध्ये योगय ते बदल करण्याची कार्यवाही करावी.

संदर्भ क्र.०२ डॉ.विश्वजीत माने , मॅनेजर ऑपरेशन्स यांचा ईमेल इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे त्यात दिनांक ०५ मार्च २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना एकत्रितरीत्या राबविण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री जन

आरोग्य योजनेच्या अंतर्गत पॅनेलच्या पुढील प्रक्रियेसाठी सलंग्न एमओयु (करारसाठी अतिरीक्त करार) सह रु १००/- स्टॅम्प पेपरवर अधिकृत स्टॅम्प आणि स्वाक्षरी करण्यासाठी विनंती केलेली आहे.

संदर्भ क्र.०३ डॉ.मयुर मुथा,District Head,Ahmednagar यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेबाबतचा एमओयु स्वाक्षरीत करुन ०२ दिवसाचे आत शनिवारी संध्याकाळ पर्यंत जिल्हा कार्यालयात पाठवावा अशी विनंती केलेली आहे.

संदर्भ क्र.०४ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेसाठी ०३ ते ०४ महिन्याचा अवधी लागेल सदर बाब संबंधीत डॉ.विश्वजीत माने, मॅनेजर ऑपरेशन्स (Empanelment)यांना पत्राव्दारे तसेच ईमेल व्दारे कळविणेसाठी मान्यतेसाठी टिपणी सादर केलेली होती सदर टिपणीवर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अवलोकनार्थ ठेवा असे आदेशीत केलेले आहे.

संदर्भ क्र.०५ जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एमजेपीजेएवाय /९६/२०१९ दि.१२ मार्च २०१९ रोजीचे पत्रान्वये मॅनेजस ऑपरेशन्स (Empanelment)मेडी.असि.इन्शुरन्स टिपीए प्रायव्हेट लिमीटेड यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेसाठी निर्णय घेणेसाठी किमान ०३ ते ०४ महिन्याचा अवधी दयावा असे कळविलेले आहे. परंतु त्यास त्यांनी अवधी देणेबाबत कोणताही निर्णय आपल्याकडे लेखी किंवा ईमेल व्दारे कळविलेला नाही.

यामागील पार्श्वभुमी- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थासंचलित श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.१४/०२/२०१३ पासुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करणेत आलेली होती सुरुवातीला फक्त ०८ जिल्हयाकरीता ही योजना लागु करणेत आलेली होती. दि.२१/११/२०१३ पासुन संपुर्ण महाराष्ट्रात सुरु करणेत आली.

दि.०१/०६/२०१७ रोजी सदर योजनेचे नाव बदलुन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना करणेत आले. सदर योजनेत ९७२ आजारांचा समावेश असुन परंतु श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १४ विभांगातर्गत असलेल्या उपलब्ध सोईनुसार २१२ आजारांवर उपचार/शस्त्रक्रिया केल्या जातात. उरलेल्या ७६० पैकी १३२ आजार शासकीय रुग्णालयांसाठी आरक्षीत आहे.

सदर योजने अंतर्गत सन २०१३ ते सन-२०१८ पर्यंत सुमारे २३,४१५ रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे व दररोज घेत आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णालयांच्या २५ %खाटा योजनेसाठी आरक्षीत केलेल्या आहेत. परंतु दररोज हॉस्पिटलमधील उपचार घेणारे रुग्णांपैकी ४५ % रुग्ण सदर योजनेचा लाभ घेत आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत येणारे रुग्णांची संख्या जास्त आहे त्यामुळे रुग्णांना ऑपरेशनकरीता ०२ ते ०३ महिन्याची प्रतिक्षा यादीसध्या चालु आहे.

सदर योजनेव्दारे अंतररुग्ण म्हणुन उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या व त्याव्दारे श्री साईबाबा संस्थानला मिळालेली रक्कम तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.नं . | वर्ष | रुग्ण संख्या | संस्थानकडे आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | २०१२-१३ | ३४ | २,४८,१०२ |
| ०२ | २०१३-१४ | २,१०६ | ७,८२,३४,४६५ |
| ०३ | २०१४-१५ | ४,२४५ | ३६,१२,६०,१८३ |
| ०४ | २०१५-१६ | ४,०७६ | २९,२२,१६,८७६ |
| ०५ | २०१६-१७ | ४,४४९ | २७,५५,०९,५०४ |
| ०६ | २०१७-१८ | ४,५६७ | २९,२०,४४,८०३ |
| ०७ | २०१८-१९ | ३,९३८ | २८,८२,७८,२६६ |
| एकुण | | २३,४१५ | १५८,७७,९२,०३९ |

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेसाठी एमओयुचा ड्राफट पाठविलेला असुन त्यानुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यामधील ठळक मुददे पुढीलप्रमाणे .

| अ नं . | लाभार्थीप्रकार | लाभ रुपये | एमजेपीजेएवाय अंतर्गत उपलब्ध उपचारांची संख्या | देण्यात येणा-या रकमेचे विभाजन |
|---|---|---|---|---|
| ०१ | फक्त पीएमजेएवाय | ५ लाख | ८४० | • ५ लाखापर्यंतची उपचाराची रक्कम दर वर्षी दर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (महाराष्ट्र ) | | | कुटुंबासाठी राज्य आरोग्य एशुरन्स सोसायटी (SHAS) महाराष्ट्र मार्फत देणेत येणार आहे |
| ०२ | एमजेपीजेएवाय आणि पीएमजेएवाय दोन्हीचे लाभार्थी (महाराष्ट्र) | ५ लाख | ८४० | ● जे कुटुंब SECC Dataच्या निकषानुसार पात्र आहेत आणि ज्या कुंटुबाकडे एमजेपीजेएवाय साठी पात्र रेशनकार्ड उपलब्ध आहे त्यांना १.५ लाखापर्यंतची उपचाराची रक्कम एमजेपीजेएवाय अंतर्गत दरवर्षी दर कुटुंबासाठी इन्शुरन्स कंपनी मार्फत देणेत येणार आहे.<br>● ज्या कुटुबांचे १.५ लाख एमजेपीजेएवाय अंतर्गत वापरण्यात आलेले असतील अशा रुग्णांना पुढील ३.५ लाख पीएमजेएवाय अंतर्गत महाराष्ट्र राज्य आरोग्य एशुरन्स सोसायटी (SHAS)मार्फत देणेत येणार आहे.<br>१,२ आणि ३ यांची एकत्रित रक्कम ५ लाखापेक्षा जास्त दरवर्षी दर कुटुंबाला देता येणार नाही. |
| ०३ | महाराष्ट्र राज्य सोडुन इतर राज्यातील पीएमजेएवाय लाभार्थी | ५ लाख | ०० | ५ लाखापर्यंत रक्कम दर वर्षीदर कुटुंबासाठी १३९३ आजारासाठी संबंधीत राज्य आरोग्य एशुरन्स सोसायटी (SHAS) मार्फत देणेत येणार आहे. |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसाठी मनुष्यबळ व संगणक प्रणाली सुरु आहे त्यामुळे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेसाठी तुर्त नविन संगणक प्रणाली सुरु करणेची आवश्यकता नाही मात्र आणखी मनुष्यबळाची आवश्यकता लागेल. त्यात तीन डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रीऑथ साठी (परवानगी), तीन डिस्चार्ज साठी व तीन बिलींगसाठी असे एकुण ०९ कर्मचारी लागतील. तसेच राज्य आरोग्य एन्शुरन्स सोसायटी यांचेशी क्लेम मिळविणेकामी पत्रव्यवहार करणेस ०१ लिपीक व सुटटया सोडविणेकामी ०२ कुशल कर्मचारी असे एकुण १२ कुशल कर्मचारी यांची आवश्यकता आहे. एमजेपीजेएवाय व पीएमजेएवाय काम तीन शिफटमध्ये चालते. तसेच सदर योजनेचे अंतर्गत येणारे रुग्णांचे रजिस्ट्रेशनपासुन रक्कम प्राप्त होईपर्यत सर्व कामकाज पुर्ण क्षमतेने पारपाडणेसाठी १२ कुशल कर्मचा-यांचे गरज पडणार आहे. तरी तेवढे कुशल कर्मचारी सदर योजना सुरु होणेपुर्वी कामगार विभागामार्फत मिळावे असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी एकुण ३०० बेडची मान्यता घेणेत आलेली आहे. परंतु जागेची व मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे फक्त २४० बेड सध्या कार्यान्वीत असुन त्यात अतिदक्षता विभागाचे ६१ बेड आहे सध्याची बेड संख्या अपुर्ण पडत आहे त्यामुळे ०२ ते ०३ महिन्याची प्रतिक्षा यादी आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु केल्यानंतर प्रतिक्षा यादी आणखी वाढु शकते त्यामुळे रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचा भावनांचा उद्रेक होवु शकतो त्यामुळे आणखी बेड संख्या वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

एमजेपीजेएवाय अंतर्गत भरती होणा-या रुग्णांची संख्या ही दरमहा ३०० ते ३५० असते या रुग्णाचे साधारण ०२ ते २.५ कोटी दरमहा आपण अगोदर खर्च करीत असतो व हे पैसे दोन ते तीन महिने नंतर आपल्याला भेटतात. पीएमजेएवाय ही योजना संपुर्ण भारतासाठी लागु असल्यामुळे या योजने अंतर्गम अंदाजे ३०० रुग्ण दरमहा भरती होवु शकतात. या रुग्णाची सुदधा पैसे आपल्याला दोन ते तीन महिन्यानंतर रुग्ण ज्या राज्याचा असेल त्या राज्याच्या SHAS (STATE HEALTH ASSURANCE SOCIETY) यांचेकडुन भेटणार आहेत तो पर्यंत दरमहा दोन्ही योजना मिळुन ५ कोटी इतका आर्थिक भार सदरची रक्कम जमा होईपर्यंत पडेल.

एमजेपीजेएवाय प्रमाणेच पीएमजेएवाय साठी सुदधा मोफत केसपेपर ओपीडी तपासण्या( अॅन्जीओग्राफी, २ डी इको, टीएमटी, रक्ताच्या तपासण्या , एमआरआय, सीटी स्कॅन, सोनोग्राफी ) या मोफत कराव्या लागतील. एमजेपीजेएवाय अंतर्गत दरमहा सरासरी १५ लाख रुपयांच्या ओपीडी तपासण्या मोफत कराव्या लागत आहेत. पीएमजेएवाय सुरु केलेनंतर दरमहा सरासरी १५ लाखाच्या रुपायांच्या ओपीडी तपासण्या कराव्या लागतील असे दोन्ही योजना सुरु केलेनंतर ३० लाख रुपयाच्या दरमहा मोफत ओपीडी तपासण्याचा

आर्थिक भार श्री साईबाबा संस्थानवर पडणार आहेत म्हणजेच साधारणपणे ३.६ कोटी इतका आर्थिक बोजा श्री साईबाबा संस्थानवर पडु शकतो.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये रुग्णांवर संपुर्ण उपचार केलेनंतर ऑनलाईन बील सादर केलेनंतर एमजेपीजेएवाय योजनेकडुन सदर उपचाराची रक्कम प्राप्त होत नसेल किंवा संबंधीत पॅकेज रदद झाल्यास जसे बिलावर सवलत देणे गरजेचे आहे तसेच पीएमजेएवाय योजनेसाठी सुदधा ऑनलाईन बीले सादर केलेनंतर पीएमजेएवाय/रुग्णांचे राज्य सरकार SHAS(STATE HEALTH ASSURANCE SOCIETY)यांचेकडुन सदर उपचाराची रक्कम प्राप्त होत नसेल किंवा संबंधीत पॅकेज रदद झाल्यास सदर बीलावर सवलत देणे गरजेचे राहील. एमजेपीजेएवाय अंतर्गत आतापर्यंत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुमारे ३८ रुग्णांचे रु १४,६८,१८९/- इतके रुपयांचे बीले नामंजुर झालेले आहे म्हणजेच आतापर्यंत दरवर्षी २ लाख ५१ हजार इतके बीले नामंजुर झालेले आहे.पीएमजेएवाय ही योजना सुरु केलेनंतर सुदधा अशी बीले नामंजुर होवु शकतात दोन्ही योजनांचे नामंजुर बीलावर पुर्णपणे सवलत देणे गरजेचे राहील. दोन्ही योजनेसाठी मिळुन ०५ ते १० लाख रुपयांचा वार्षिक आर्थिक भार नामंजुर बीलावर देण्यात येणा-या सवलतीवर पडु शकतो.

एमजेपीजेएवाय योजने अंतर्गत रुग्णांचे प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडुन एमजेपीजेएवाय योजनेकडुन कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणुन नावे टाकणेस मान्यता दिलेली आहे.एमजेपीजेएवाय अंतर्गत आतापर्यंत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुमारे ८४२ रुग्णांच्या उपचारापोटी प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा कमी आलेली रक्कम १ कोटी ०७ लाख ३३ हजार ३०९ रु (वार्षिक १५ लाख ) एवढी आलेली असुन दोन्ही योजना एकत्रीत चालु केलेनंतर प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा कमी आलेल्या रकमेत सुमारे ३० लाखापर्यंत दरवर्षी आर्थिक भार श्री साईबाबा संस्थानवर पडु शकतो.

| तपशील | दोन्ही योजने अंतर्गत मोफत ओपीडी पेपर आणि तपासण्या यावर वार्षिक पडणारा आर्थिक भार | दोन्ही योजने अंतर्गत पॅकेज रदद झाल्यास, नामंजुर झाल्यास सवलत देण्यात येणारा वार्षिक आर्थिक भार | दोन्ही योजने अंतर्गत प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा कमी येणारे रकमेस सवलत देण्यात येणारा वार्षिक भार | दोन्ही योजना सुरु केलेनंतर अंदाजे दरवर्षी पडणारा आर्थिक भार |
|---|---|---|---|---|
| पडणारा आर्थिक भार | ३.६ कोटी | ५ ते १० लाख | ३० लाखापर्यंत | ०४ कोटी. |

वरील बाबींचा विचार करता श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेबरोबर प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेसाठी सामंजस्य करार करता येईल.

मागणी- तरी उपरोक्त विभागाच्या अभिप्रायामध्ये नमुद असलेल्या मुद्यावर विचार होवुन सदर योजना सुरु करणेसाठी दरवर्षी संस्थानवर पडणारा आर्थिक भारास, तसेच योजना चालु करणेसाठी कंत्राटदारामार्फत १२ कुशल कर्मचारी उपलब्ध करुन देण्यास योजनेनी पाठविलेल्या एमओयुचे अवलोकन करुन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरु ठेवुन त्याबरोबरच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुरु करणेसाठी व त्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित हॉस्पिटल, STATE HEALTH ASSURANCE SOCIETY (SHAS) व THIRD PARTY ADMINISTRATOR यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरु ठेवुन त्याचबरोबर प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करणेस तसेच त्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी STATE HEALTH AUSSURANCE SOCIETY (SHAS) व THIRDI PARTY ADMINISTRATOR यांचेमध्ये सामंजस्य करार करणेस, कंत्राटदारामार्फत १२ कुशल कंत्राटी कर्मचारी आऊटसोर्स पध्दतीने घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रुग्णालयातील फिजीशियन डॉक्टरांचे सद्यस्थितीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम-२००४ मधील तरतूदः- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.-नवीन प्रस्ताव.

प्रस्ताविकः- समाजातील सर्व स्तरातील गरीब वृद्ध व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करणेत आलेले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तेथे येणा-या प्रत्येक रुग्णास मोफत उपचार पुरविले जात असल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षापासून मोठे वरदान ठरले आहे. श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथी, होमिओपॅथी, व आयुर्वेदिक असे विविध उपचार पध्दतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विविध वॉर्डमध्ये विविध प्रकारचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची रुग्णसंख्या ही साधारण ७०० ते ८०० होती. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ९४४ दि. २२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून, त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि. ०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यक‍िय उपचार सर्व स्तरातील रुग्णांना मोफत करणेत आलेले असून, सदर बाबत रुग्णालयामार्फत कार्यवाही चालू आहे. त्यानुसार रुग्णालयातील केसपेपर विभागातून केसपेपरसाठी रु, १०/- इतके शुल्क आकारुन रुग्णांस मोफत आरोग्य सेवा पुरविणेत येतात. रुग्णालय मोफत केलेमुळे दैनंदिन ओपीडीची संख्या ही १००० ते १२०० इतकी झालेली आहे.त्यामुळे आयपीडी रुग्णांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. रुग्णालयात असणारे बेड (३०० बेड) हे देखील पुर्ण क्षमतेने भरलेले असतात.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील सन २०१६, २०१७,२०१८ अखेर रुग्ण संख्या-

| सन | ओपीडी रुग्ण | आयपीडी रुग्ण | ऑपरेशन रुग्ण |
|---|---|---|---|
| जानेवारी ते डिसेंबर २०१६ | २९४८६४ | १२९५० | ८२३० |
| जानेवारी ते डिसेंबर २०१७ | ३४०४५७ | १५९४५ | १०९३१ |
| जानेवारी ते डिसेंबर २०१८ | ३२९१५० | १४६०२ | १०६४० |
| एकुण | ९६४४७१ | ४३४९७ | २९८०१ |

श्री साईनाथ रुग्णालयात खालील विभाग ०१ ते १० विभाग कार्यरत आहेत.

०१. मेडिसीन ०२.जनरल सर्जरी ०३.आर्थोपेडिक ०४.पेडिअ‍ॅट्रीक ०५.स्त्रीरोग ०६.कान, नाक, घसा, ०७. नेत्ररोग ०८.रेडिओलॉजी ०९.आय.सी.यू. १०.रक्तपेढी,

यापैकी मेडिसीन विभागांतर्गत ओपीडी विभागात रुटीन दैनंदिन औषधोपचार करणेत येतात. व आयपीडी विभागात मेल मेडिकल वॉर्ड व फिमेल मेडिकल वॉर्ड तसेच आय.सी.यू. विभागातील रुग्णांवर उपचार करणेचे कार्य चालू आहे. सदर विभागात एकुण ६० बेड उपलब्ध असून जनरल आजारांपासून (मलेरिया, कावीळ, टायफाईड, पॅरालेसीस, अनेमिया, ह्दयाचे व फुप्पुसाचे आजार ते अत्यवस्थ रुग्णांवर उपचार केले जातात.

सदर उपचाराकामी फिजीशियन (एम.डी.मेडिसीन) या डॉक्टरांची आवश्यकता असते. सदर डॉक्टर रुग्णांवर वरीलप्रमाणे उपचाराची देखभाल करणे बरोबरच शस्त्रक्रीयेकामी व शस्त्रक्रीयेपुर्वी होणारी योग्य त्या फिटनेस ची जबाबदारी देखील पार पाडतात. रुग्ण तपासणी करुन रुग्णास योग्य तो फिटनेस मिळाल्याशिवाय सदरच्या रुग्णांची शस्त्रक्रीया करता येत नाही. तसेच फिजीशियन डॉक्टरांवर आय.सी.सी.यू. विभागातील अत्यवस्थ रुग्णांवर उपचार करणेची जबाबदारी असते. एकुणच कोणत्याही रुग्णालयाला फिजीशियन डॉक्टरांची नितांत गरज असते. त्याशिवाय रुग्णालय चालविणे जिकीरीचे आहे. रुग्णालयातील मेडिसीन ओपीडीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| सन | डॉ. काटे | डॉ. पोरवाल |
|---|---|---|
| | ओपीडी रुग्ण | आयपीडी रुग्ण. |
| २०१६ | ४७६४ | १५६१२ |
| २०१७ | १२०४६ | १८०४९ |
| २०१८ | १४४८३ | १९९३३ |

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयात आकृतीबंधानुसार एकुण दोन पदे फिजीशियन पदासाठी मंजूर आहेत. डॉ.बी.बी.साबळे, हे फिजीशियन म्हणून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये कार्यरत होते. परंतू, दि.३०/०६/२०१७ पासून डॉ.साबळे हे सेवानिवृत्त झालेमुळे सदरचे पद रिक्त आहे. वेळोवेळी वर्तमानपत्रात दि.०५/६/२०१७, दि.१५/०२/२०१८, दि.०८/०८/२०१८, दि.०१/०१/२०१९, रोजी जाहीरात देऊन सदर पद भरणेची कार्यवाही केली असता, सदर पदावर कोणत्याही डॉक्टरांची नेमणूक झालेली नाही. परंतू, फिजीशियन हे पद रुग्णालयाचे दृष्टीकोणातून महत्वाचे असलेमुळे डॉ.सचिन काटे (एम.डी.(चेस्ट) यांची व्हीजीटींग पध्दतीने श्री साईनाथ रुग्णालयात फीजीशियन या पदावर नेमणूक करणेत आली. डॉ. काटे हे आठवडयातून चार किंवा गरजेनूसार पाच दिवस श्री साईनाथ रुग्णालयात सेवा देत होते. परंतू रुग्णालयात कामाचा व्याप बघता एका डॉक्टरला पुर्णवेळ ओपीडी, आयपीडी, तसेच रात्रीचे ऑन कॉल रुग्ण पहाणे, अवघड आहे. त्यामुळे रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार डॉ.पोरवाल हे कॅज्युअल्टी मेडिकल ऑफीसर,एम.बी.बी.एस.असतांना सुध्दा यांचे कामाचे स्वरुप पाहून त्यांना दि. ०३/०६/२००४ च्या मा.कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी याचे आदेशाने श्री साईनाथ रुग्णालयात फिमेल मेडिकल वॉर्डची जबाबदारी सोपविणेत आली. तद्नंतर श्री साईनाथ रुग्णालयात डायबेटीक केअर सेंटर सुरु करणे कामी डॉ.पोरवाल यांना संस्थान प्रशासनाने मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२०११ रोजीचे निर्णय क्र.४२ अन्वये आर्यर्लड येथे सन २०१२ साली प्रशिक्षणास पाठविले होते. सदर प्रशिक्षण पुर्ण करुन आल्यानंतर आजतागायत डॉ.पोरवाल हे पुर्ण क्षमतेने डायबेटीक केअर सेंटर चालवत आहे. परंतू ०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालय पुर्णपणे मोफत झाले असल्यामुळे रुग्णालयातील रुग्णांचा वाढता ओघ लक्षात घेता, डॉ.काटे यांचे बरोबर डॉ.पोरवाल यांचेवर जबाबदारी निश्चीत करणेत आली.

याअनुषंगाने रुग्णालयातील मेल मेडिकल वॉर्ड, फिमेल मेडिकल वॉर्ड, आय सी.यू. या विभागातील संपुर्ण जबाबदारी ही डॉ.पोरवालांकडे सोपविणेत आली. एकुणच मेडिसन विभागात उपचाराकरीता येणा-या ओपीडी रुग्णांची तपासणी भरती रुग्णांची संपुर्ण तपासणी व देखभाल, आयसीयू रुग्णांची देखभाल, शस्त्रक्रीये करीता रुग्णांचा फिटनेस तसेच डायबेटीक रुग्णांचे संपुर्ण उपचार व समुपदेशन करणेचे काम विनातक्रार डॉ.पोरवाल हे करत आहेत. याकरीता डॉ.प्रफुल्ल पोरवाल सी.एम.ओ.एमबीबीएस यांचेवर दि.०१/०१/२०१७ पासून तोंडी आदेशान्वये डॉ. काटे यांचेबरोबर विभागून जबाबदारी टाकणेत आली. त्यामुळे रुग्णालयाची तात्पुरती गरज पुर्ण झाली.

आता, दि.१३/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये डॉ.काटे यांनी फिजीशियन या पदाचा दि.१६/०६/२०१९ पासून राजीनामा देणेकामी अर्ज इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तरी डॉ.काटे यांनी राजीनामा दिला असलेमुळे रुग्णालयात एकही फिजीशियन डॉक्टर राहणार नाही. मेडिसीन विभागाची संपुर्ण जबाबदारी डॉ. पोरवाल यांचेवर आलेली आहे. याकरीता रुग्णालयाची रुग्ण व्यवस्था ढासळणेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच डॉ.पोरवाल यांचे बरोबर चर्चा केली असता, सदरचे पद पुर्णवेळ एक डॉक्टर सांभाळू शकत नसलेमुळे त्यांनी देखील संपुर्ण काम पहाणेस असमर्थता दर्शवीली आहे.

विभागाचे स्पष्ट मतः-आता, दोनही रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरणेकामी दि.०६/०६/२०१९ रोजी मनुष्यबळ विभागामार्फत मा.व्य.समिती सभेमध्ये प्रस्ताव सादर केला असून, त्यास मान्यता देखील मिळाली आहे. परंतू सदरचे कार्यवाही पुर्ण होणेस विलंब लागणार असलेमुळे सद्यस्थितीला फिजीशियन विना रुग्णालयाची मोठी अडचण निर्मान होणार आहे. प्रसंगी रुग्णांना इतर रुग्णालयात रेफर करावे लागू शकते.

सद्यस्थितीला श्री साईबाबा रुग्णालयात देखील पुर्णवेळ फिजीशियन म्हणून डॉ.जाधवर, हे एकटेच काम बघत आहे.

डॉ.जाधवर यांना देणेत येणारे पेमेंट व प्रोत्साहन भत्ता माहे फेब्रुवारी मार्च व एप्रिल-

| | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
|---|---|---|---|
| प्रोत्साहन भत्ता | १,०७,०००/- | १,२२,०००/- | १,३२,०००/- |
| पगार | ६९,०००/- | ६९,०००/- | ६९,०००/- |
| एकुण रक्कम | १,७६,०००/- | १,९१,०००/- | २,०१,०००/- |

तसेच तीन व्हिजीटींग डॉक्टर डॉ.इंगळे, डॉ.ढाकणे, डॉ.काटे, हे प्रत्येकी एक दिवस काम पहात आहेत. पैकी डॉ.काटे यांनी राजीनामा दिलेमुळे श्री साईबाबा रुग्णालयाचे देखील एक दिवस रिकामा राहणार आहे. तसेच इतर दोन डॉक्टरांना श्री साईनाथ रुग्णालयात सेवा देणेकामी विचारणा केली असता, त्यांनी नकार दिलेला आहे.

तसेच मुळातच फिजीशियन या पदाचे डॉक्टर कमी असलेमुळे आसपासचे कोपरगांव, राहाता, संगमनेर, या परिसरातील डॉक्टरांना व्हिजीटींग पध्दतीने सेवा देणेकामी वेळोवेळी विचारणा केली असता ते नकार देतात व इतक्या कमी मानधनास तयार होत नाहीत. एकुणच रुग्णालयाची फिजीशियन शिवाय अडचण निर्मान होणार आहे. व रुग्णव्यवस्थेवर परिनाम होणार आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील फिजिशियन या महत्वाच्या पदावर अकरा महिने अथवा व्हिजीटींग पध्दतीने इच्छुक उमेदवार आलेस सेवाप्रवेश नियम, मानधन व प्रोत्साहन भत्ता बाबतचा नियम शिथील करुन फक्त फिजीशियन या पदाकरीताच डॉक्टर मिळत नसलेमुळे विशेष बाब म्हणून एकुण रक्कम रु.०२,०१,०००/- अक्षरी रु. दोन लाख एक हजार रुपये मात्र. इतके मानधन देऊन नेमणूक देणेस मान्यता असावी. करीता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील फिजिशियन या महत्वाच्या पदावर अकरा महिने अथवा व्हिजीटींग पध्दतीने इच्छुक उमेदवार आल्यास सेवाप्रवेश नियम, मानधन व प्रोत्साहन भत्ता बाबतचा नियम शिथील करुन फक्त फिजीशियन या पदाकरीताच डॉक्टर मिळत नसलेमुळे विशेष बाब म्हणून एकुण रक्कम रु.०२,०१,०००/- अक्षरी रु. दोन लाख एक हजार रुपये मात्र इतके मानधन देऊन नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२६ **डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, अहमदनगर यांना साई आश्रम-१ ऐवजी श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरात रक्तसंकलनाकामी परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव – नवीन प्रस्ताव

प्रस्ताविक– मा.अध्यक्ष साहेब यांनी दि. १२/०२/२०१७ रोजी घेतलेल्या रक्तपेढयांचे चर्चासत्रात समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे, अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी, तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रकारे केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे. त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी अशी चर्चा झाली.

त्यास अनुसरुन रक्तदान चळवळ वाढीस लागणेसाठी श्री साईनाथ रक्तपेढी व महाराष्ट्रातील इतर नामांकीत रक्तपेढी यांचेमध्ये समन्वय साधणेकामी समीती गठीत करण्यात आली. तसेच गठीत समिती सदस्यांनी बाहेरील रक्तपेढयांना रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देणेकरीता रक्तदान शिबीर नियमावली बनविण्यात आलेली आहे. सरहु नियमावली खालील प्रमाणे आहे.

०१) रक्तदान शिबीर घेणेकरीता आठवडयातुन ०१ दिवस ठरवुन परवानगी दिली जाईल.

०२) रक्तदान शिबीराची वेळ ही सकाळी ०९ ते ०५ अशी असेल.

०३) शिबीराची वेळ किंवा दिवस वाढविणे तसेच कमी करणेचे संपुर्ण अधिकार वैद्यकिय अधिक्षीका, वैद्यकिय संचालक यांना राहतील.

०४) श्री साईबाबा संस्थान उत्सव काळात शिबीराची वेळ आवश्यकतेनुसार वाढविणेत येईल.

०५) रक्तदान शिबीरात रक्तदान करणेकरीता येणा-या रक्तदात्यांना आपल्या रक्तपेढीची संपुर्ण माहिती आवश्कयतेनुसार देणेत यावी.

०६) रक्तदान शिबीर घेणेकरीता आलेनंतर व झालेल्या रक्तदात्यांची संख्येची नोंद रक्तपेढीने संस्थान रक्तपेढीत ठेवणे बंधनकारक आहे.

०७) रक्तदान शिबीरात संकलीत होणा-या रक्त पिशव्यांपैकी २५% पिशव्या संस्थानचे श्री साईनाथ रक्तपेढीत जमा करणे बंधनकारक आहे.

०८) श्री साईबाबा संस्थानच्या नाव लौकिकास बाधा पोहोचेल अशा प्रकारचे कोणतेही काम रक्तपेढीकडुन होता कामा नये, याची काळजी घ्यावी.

०९) रक्तदान शिबीराची परवानगी कोणाला द्यावी अथवा देऊ नये याची संपुर्ण जबाबदारी संस्थान प्रशासनाची आहे.

१०) रक्तदान शिबीर घेणेकामी देण्यात येणा-या संस्थानच्या जागेबाबत व मशिनरी बाबतची संपुर्ण जबाबदारी ही शिबीर आयोजक रक्तपेढी यांची राहील.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय–उपरोक्त नियमावली अन्वये रक्तदान शिबीराकरीता येणा-या रक्तपेढयांना नियमावलींचे पालन करण्यात येवुन तथा रक्तपेढयांचे कागदपत्रांची पडताळणी करुन (उदा. अर्ज, एफडीए लायसन्स, एसबीटीसी सर्टिफिकेट, थॅलेसेमिया अहवाल, ऑडीट रिर्पोर्ट, दर आकारणी पत्र) रक्तदान शिबीराकरीता संस्थान परिसरात समाविष्ट करण्याकरीता मान्यता देणेत आलेली आहे. या अनुषंगाने संस्थान परिसरातील दैनंदिन रक्तदान शिबीराकरीता संस्थान मार्फत खालील रक्तपेढयांना दोन टप्पयात परवानगी देण्यात आलेली आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | रक्तपेढीचे नाव | वार | | अ.नं | रक्तपेढीचे नाव | वार |
|---|---|---|---|---|---|---|
| **श्री साईबाबा मंदीर परिसर** | | | | **साईआश्रम - ०१ १००० रुम** | | |
| ०१ | दत्ताजीभाले रक्तपेढी, औरंगाबाद | सोमवार | | ०१ | डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन , अहमदनगर | मंगळवार |
| ०२ | जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर | मंगळवार | | ०२ | जनकल्याण ब्लड बॅंक, जालना | गुरुवार |
| ०३ | मेट्रो रक्तपेढी, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक | बुधवार | | ०३ | पि.एम.टी., लोणी | शुक्रवार |
| ०४ | जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर | शुक्रवार | | ०४ | आनंदऋषिजी ब्लड बॅंक, अहमदनगर | शनिवार |
| | | | | ०५ | हेडगेवार ब्लड बॅंक, अकोला | रविवार |

श्री साईनाथ रक्तपेढी यांना रविवार, गुरुवार, शनिवार असे तीन दिवस राखीव ठेवण्यात आलेले आहेत. पहिल्या टप्पयात चार रक्तपेढयांना श्री साईबाबा मंदीर परिसरामध्ये व दुस-या टप्पयात पाच रक्तपेढयांना साईआश्रम – १ येथे सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ वा. पर्यंत सपुर्ण वेळ रक्तसंकलनकामी परवानगी देण्यात आलेली आहे.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, ज्या रक्तपेढयांना साईआश्रम – १ येथे रक्तसंकलनाकरीता परवानगी दिलेली आहे, अशा रक्तपेढयांचे रक्तसंकलन खुपच कमीप्रमाणात होत असुन समाधी मंदीर परीसरातील रक्तसंकलन केंद्रात रक्तसंकलन चांगले होत आहे. त्यामुळे साईआश्रम – १ (१००० रुम) येथील काही रक्तपेढया समाधी मंदीर परीसरात आवश्यकते नुसार निश्चित केलेल्या वाराच्या दिवशी सायंकाळी ०५ ते रात्री ०९ वा. पर्यंत रक्तसंकलन करत आहेत.

डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर यांना दुस-या टप्पयात दि. २८/०६/२०१८ रोजी पासुन साईआश्रम – १ येथे रक्तसंकलनाकामी परवानगी देण्यात आली असुन त्यांना मंगळवार हा वार ठरवून देणेत आलेला आहे. साईआश्रम - १ येथील इतर रक्तपेढयां मंदीर परिसरातील रक्तपेढयांचे पुरेसे रक्तसंकलन झाल्यानंतर सांयकाळी ०५ ते रात्री ०९ वा. पर्यंत मंदीर परिसरात रक्तसंकलन करीत असतात. परंतु डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर यांना श्री साईनाथ रक्तपेढीचे वार असलेल्या दिवशी मंदीर परिसरात सायंकाळी ०५ ते रात्री ०९ वा. पर्यंत रक्तसंकलन करणेकरीता ०९ ते १० वेळा संधी मिळालेली आहे. तरी डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर यांच्या विनंती पत्रात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा मंदीर परिसरात इतर रक्तपेढयां बरोबर सदर रक्तपेढीस रविवार व गुरुवार असे आठवडयातील दोन दिवस रक्तसंकलनाकरीता संधी मिळावी असे नमुद केले आहे.

तथापि, सद्यास्थितीला श्री साईबाबा मंदीर परिसरात खालीलप्रमाणे रक्तपेढयांचे वार व वेळ निश्चिती करण्यात आलेले आहे.

| अ.नं | वार | वेळ | |
|---|---|---|---|
| | | सकाळी ०९ ते ०५ | सायंकाळी ०५ ते ०९ |
| ०१ | सोमवार | दत्ताजीभाले रक्तपेढी, औरंगाबाद | - |
| ०२ | मंगळवार | जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर | डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन , अहमदनगर |
| ०३ | बुधवार | मेट्रो रक्तपेढी, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक | - |
| ०४ | गुरुवार | श्री साईनाथ रक्तपेढी, शिरडी | जनकल्याण ब्लड बॅक, जालना |
| ०५ | शुक्रवार | जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर | पि.एम.टी., लोणी |
| ०६ | शनिवार | श्री साईनाथ रक्तपेढी, शिरडी | आनंदऋषिजी ब्लड बॅक, अहमदनगर |
| ०७ | रविवार | श्री साईनाथ रक्तपेढी, शिरडी | हेडगेवार ब्लड बॅक, अकोला |

प्रस्ताव- उपरोक्त कोष्टकाप्रमाणे सद्यास्थितीला श्री साईबाबा मंदीर परिसरातील रक्तसंकलनकेंद्रातील सर्व वार इतर रक्तपेढयांना निश्चित केल्यामुळे फक्त सोमवार व बुधवारचे सायंकाळी ०५ ते रात्री ०९ वा. एवढेच टाईम स्लॉट शिल्लक असुन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांना सदर दिवशी बोलविता येईल. तसेच श्री साईनाथ रक्तपेढी करीता रविवार, गुरुवार व शनिवार (सकाळचे टाईम स्लॉट) हे स्वतःसाठी ठेवण्यात आल्यामुळे गुरुवार व रविवार देणे शक्य होणार नाही. तसेच सर्व टाईम स्लॉट इतर रक्तपेढयांना या पुर्वीच निश्चित केले असलेमुळे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांना सदर वार देता येणार नाही. असे मत आहे.

तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर यांचेकडे रक्तसंकलन करणेकरीता मोबाईल व्हॅन उपलब्ध असलेबाबत देखील चौकशी केली असता सदरची व्हॅन उपलब्ध नसलेचे त्यांनी कळविले आहे.

करिता, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर रक्तपेढी यांना सद्यास्थितीला मंगळवार बरोबरच सोमवार अथवा बुधवार या दिवशी मंदीर परीसरात रक्तसंकलनाकरीता परवानगी देता येईल. तसेच इतर दिवशी (गुरुवार व रविवार) पुर्वी परवानगी देणेत आलेल्या रक्तपेढयांना डावलुन परवानगी देणे योग्य होणार नाही, असे मत आहे. त्यास मान्यता असावी.

तरी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदीर परिसरात गुरुवार व रविवार या दिवशी रक्तसंकलनाठी इतर रक्तपेढयांना पुर्वी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर यांचेशी चर्चा करुन गुरुवार व रविवार व्यतिरीक्त त्यांना रक्तसंकलासाठीचे वार ठरविण्यात यावेत, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **व्हॅट सरसकट माफी योजना (Amnesty Scheme) संदर्भात जेष्ठ विधिज्ञ यांचे मार्गदर्शनाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ या वर्षांचे व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन रु.४३.८३ कोटी देय व्हॅटकर जमा करणेबाबत विक्रीकर विभागाने कळविले आहे. बाबत, विक्रीकर विभागाकडे २००९-१० चे अपिल दाखल करण्यात आले असुन २०१०-११ चे अपिल दाखल करणे व देय होणारी १०% व्हॅटकर भरणेबाबत तसेच दरम्यानच्या कालावधीत व्हॅट सरसकट माफी योजना (Amnesty Scheme) सरकारने जाहीर केली आहे. त्यामध्ये योजनेचा लाभ घेऊन रु.६९ कोटी तडजोड व्हॅटकर भरणे या संदर्भात दि.०६.०६.२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र.२७९ अन्वये, "विक्रीकर विभागाचे मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त व विक्रीकर अधिकारी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेकडुन शासनाने जाहीर केलेल्या Amnesty Scheme संबंधी सविस्तर माहिती घेतली. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येऊन समिती सदस्य मा.अ‍ॅड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करावा असे ठरले आहे."

दरम्यानचे कालावधीत Amnesty Scheme चा पहिला टप्पा दि.३०.०६.२०१९ ची मुदत दि.३१.०७.२०१९ पर्यंत वाढली आहे. मा.विश्वस्त श्री.जयकर यांनी व्हॅट करासंबंधीत आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ या कालावधीतील व्हॅट करासंबधीत आलेल्या विक्रीकर विभागाच्या नोटीसा व त्या संबंधीत लेखापुस्तकांमध्ये आलेल्या नोंदी या सर्वांचा विचार करता देय होणारा व्हॅटकर व विक्रीकर विभागाने Amnesty

Scheme चे तरतुदीस अनुसरुन रु.६९ कोटी व्हॅटकर देय दर्शविला आहे. मा.विश्वस्त श्री.जयकर यांचे मार्गदर्शनाने खालीलप्रमाणे :-

१) संस्थानचे कर सल्लागार श्री.श्रेणिक गांधी, पुणे यांना कळविण्यात आले होते. त्यांनी दि.१४.०६.२०१९ रोजी ई-मेलद्वारे सखोल तपासणीअंती Amnesty Scheme चा लाभ घेण्याचा विकल्प स्विकारण्यास हरकत नाही, असे कळविले आहे.

२) मा.सर्वोच्य न्यायालय, दिल्ली येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.एस गणेश, दिल्ली हे संस्थानचे करविषयक न्यायालयीन कामकाज विनामोबदला करतात. त्यांनी दि.०२.०७.२०१९ रोजी सर्व संबंधीत दस्तऐवज घेऊन प्रत्यक्ष भेटीकरिता बोलाविले होते. मा.विश्वस्त श्री.जयकर, त्यांचे सहकारी ॲड.अभय धाडीवाल व लेखाधिकारी श्री.एस.पी. लंके, यांनी दि.०२ व दि.०३.०७.२०१९ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन चर्चा-विनिमय केला. त्यांनी खालीलप्रमाणे सुचविले आहे.

a. नोंदणी करिता Condonation of Delay करिता अर्ज करुन पुर्वीच्या तारखेपासुन नोंदणी क्रमांक दिल्यास व्हॅटकर कायद्यानुसार Input VAT व Output VAT याबाबत माहिती संकलित करुन किती व्हॅटकर देय होईल. त्यावर व्याज व दंड माफी संबंधीत मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, नाशिक यांचे मार्गदर्शन घ्यावे.

b. Amnesty Scheme अनुसार तज्ञ लेखापरिक्षण संस्थेमार्फत व्हॅट ची देय रक्कम निश्चित करावी.

c. उपरोक्त a व b अन्वये येणारी व्हॅट ची देय रक्कम याचे अवलोकन करुन संस्थानचे दृष्टीने हिताचा पर्याय निवडुन कार्यवाही करावी.

d. Amnesty Scheme चा पर्याय निवडल्यास मा.उच्च न्यायालयात असलेली व्हॅट करासंबंधीत याचिका मागे घेण्याची तरतुद असल्याने याचिका मागे घ्यावी लागेल.

e. तसेच व्हॅट संबंधीत सदर कार्यवाही करण्याकरिता प्रथमतः मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.विश्वस्त श्री.जयकर व ॲड.एस. गणेश यांची कॉन्फरन्स कॉल होऊन अंतिमतः येणारी व्हॅट देय रक्कमेबाबत Amnesty Scheme अथवा सरळ व्हॅट करनिर्धारणे करुन देय होणारी रक्कम याबाबत प्रत्यक्ष चर्चा-विचारविनिमयाअंती योग्य तो पर्याय निवडावा लागेल.

f. अशाप्रकारे आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर व्हॅट करासंबंधीत माहिती संकलित करण्याकरिता तज्ञ लेखापरिक्षण संस्थेची तात्काळ नियुक्ती करुन ७ ते १० दिवसांचे आत माहिती संकलित करुन Amnesty Scheme अथवा वार्षिक व्हॅट करनिर्धारण करुन दि.३१.०७.२०१९ पर्यंत संपुर्ण कार्यवाही पुर्ण होणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली व सीए ॲड.श्रेणिक गांधी, पुणे यांनी व्हॅट करासंबंधीत Amnesty Scheme संबंधीत सल्ला दिला असुन व्हॅट संबंधीत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. जेष्ठ विधिज्ञ ॲडव्होकेट एस.गणेश, दिल्ली यांनी सुचविल्याप्रमाणे Administrative relief अंतर्गत व Amnesty Scheme अंतर्गत साधारणत: किती रक्कम देय होत आहे याची माहिती मा.उपायुक्त, सह आयुक्त विक्रीकर विभाग यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावी.**

**२. कामाची निकड लक्षात घेता M/s Suresh D. Daule &Co., Chartered Accountants यांची रक्कम रु.२,००,०००/-मात्र फी वर नियुक्ती करण्याची शिफारस समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी केली, त्यास मान्यता देण्यात आली.**

**३. आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपील करीता देय होणारी १०% रक्कम अदा करण्यास व अपिल कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**४. व्हॅट संबधीत Administrative relief अंतर्गत व Amnesty Scheme अंतर्गत देय होणाऱ्या रकमेबाबत माहिती प्राप्त झाल्यानंतर समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे सल्ल्यानुसार व्हॅट बाबत संपुर्ण कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम,२०१९ सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका - (अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ चे कलम १६ मध्ये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखाली पुढीलप्रमाणे तरतूद आहे -

" .. .. १६. नियत दिवसाच्यालगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेलअशी कोणतीही व्यक्तीही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तींवर, नियत दिवसापासून, समितीच्यानियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल, आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्याव्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. "

याव्यतिरिक्त उपरोक्त अधिनियमातील कलम १७ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखाली पुढीलप्रमाणे तरतूद आहे -

" .. .. १७ (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील."

(ब) तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १५ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) मध्ये, समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देणेत येतील, असे नमूद करणेत आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम २१ मध्ये विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग या शीर्षाखालील पोटकलम (१) (ट) मध्ये, कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडणे असे नमूद करणेत आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम २२ मध्ये व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील पोटकलम (३) (ख) मध्ये, समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे अशी सुस्पष्ट तरतूद आहे.

म्हणजेच अधिनियमातीलउपरोक्त सर्व तरतुदीनुसार कर्मचा-यांना द्यावयाचे वेतन व इतर अनुषंगिक भत्ते आदा करणेबाबतचे अधिकार मा. व्यवस्थापन समितीला आहेत, अशी धारणा आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम २२ मध्ये व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील पोटकलम (२) मध्ये, व्यवस्थापन निधीत, शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या १० टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करणेत येईल एवढी रक्कम, राज्यशासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करणेत येईल. राज्यशासनास, आवश्यक वाटलेतर, कोणत्याही वर्षात विश्वस्त व्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करणेबद्दल कोणत्याही वेळी निदेश देता येईल, असे नमूद करणेत आलेले आहे.

(क) संस्थान आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन अधिसुचना राजपत्र क्रमांक वेपुर २०१९ / प्र. क्र. १ / सेवा – ९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९(म्हणजेच ०७ वा वेतन आयोग) पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. या प्रस्तावावर या सभेत साधक-बाधक चर्चा होऊन, निर्णय क्रमांक १४२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे –

" संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०१९ म्हणजेच ०७ वेतन आयोग त्यातील तरतुदींसह व इतर अनुषंगिक बाबींसह दि. ०१

जानेवारी,२०१६ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने लागु करणेस तसेच दिनांक ०१ जानेवारी,२०१६ पासुनची वेतनातील फरकाची रक्कम रोखीने आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील नियम (२२) नुसार व्यवस्थापन निधीतुन होणारा खर्च सन २०१७-१८ या वर्षातील स्थुल उत्पन्नाच्या १० % पेक्षा अधिक होत असल्याने राज्य शासनाच्या मान्यतेनंतर ०७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी, असे ठरले." त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९/२०१९ दि.३ एप्रिल, २०१९ रोजीचा सातवा वेतन आयोग मान्यता मिळणेबाबत मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

आता, विधी व न्याय विभाग, यांचे क्र.सासंवि- १०१९/ ३७३/ प्र.क्र. ७९/ का.१६, दिनांक ०४/०७/२०१९ रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १५, नियम १७ व नियम २२ नुसार समितीच्या अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून करण्याचे अधिकार समितीस आहेत. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनबाबत समितीने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा", असे कळविलेले आहे.

तरी, संस्थान आस्थापनेवरील (संस्थान खुद्द, शैक्षणीक संकुल व रुग्णालये) कायम (स्थायी) कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ म्हणजेच ०७ वा वेतन आयोग त्यातील सर्व तरतुदींसह व इतर अनुषंगिक बाबींसह दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणेस तसेच दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची वेतनातील फरकाची रक्कम रोखीने आदा करणेच्या मान्यतेस्तव तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील क्र.सासंवि-१०१९/३७३/ प्र.क्र.७९/ का.१६, दिनांक ०४/०७/२०१९ रोजीचे निर्देशानुसार उपरोक्त विषयांकित प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने लागू करणेच्या मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दि.०४ जुलै,२०१९ रोजीचे पत्रान्वये संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ म्हणजेच ०७ वा वेतन आयोग लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे स्थरावर निर्णय घेणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन संस्थानचे आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचाऱ्यांना विषयांकित ०७ वा वेतन आयोग दि.०१ जानेवारी,२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने त्यातील सर्व तरतुदींसह व इतर अनुषंगीक बाबींसह विहित व प्रचलित नियमानुसार माहे जुलै-२०१९ चे वेतनात लागु करणेस तसेच विषयांकित वेतन आयोगातील तरतुदीमध्ये कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी,२०१६ पासून देय होणारी वेतनातील फरकाची रक्कम रोखीने आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच मा.विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दि.०४ जुलै,२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२००४ मधील व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखाली कलम २२(२) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार व्यवस्थापन निधीची मर्यादा वाढवून घेणेकामी यापुर्वी शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/लेखाशाखा)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**
**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९, निर्णय क्र.३७२** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६३ मध्ये दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेत करण्यात आलेल्या दुरुस्त्याबाबत आजचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, सदरचा निर्णय सद्यस्थितीमध्ये रद्द करण्यात यावा, असे ठरले. तसेच मौजे शिर्डी मोफत सर्व्हे नं.१ मधील ३० गुंठेमधील अतिक्रमण धारकांबाबत एस.एल.पी.नं.२८५९६-२८५९७/२०१७ मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२५.०७.२०१८ रोजी आदेश करुन निकाली काढले आहे. याबाबत अध्यक्ष व समिती सदस्य ॲड मोहन जयकर, डॉ. राजेंद्र सिंह यांनी महाराष्ट्र राज्याचे ॲडव्होकेट जनरल मा.श्री.आशुषोत कुंभकोणी यांचे समवेत चर्चा करुन त्यांचा लेखी अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर सदर अभिप्रायासह प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग/बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३०, निर्णय क्र.३७३ आऊटसोर्स कंत्राटी कामगार विनापरवानगी तसेच गर्दीच्या कालावधीत गैरहजर असतात.त्यामुळे ज्या आऊटसोर्स कंत्राटी कामगारांचे हजेरीचे प्रमाणे ८०% पेक्षा कमी आहे अशा कामगारांना कामावर घेण्यात येऊ नये. (कार्यवाही- कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३१, निर्णय क्र.३७४ वृक्षारोपनासाठी विविध सामाजिक संस्थाना संस्थानमार्फत मोफत झाडांची रोपे पुरविण्यात यावीत.

(कार्यवाही- बगीचा विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३२, निर्णय क्र.३७५ संस्थानच्या वाहनांसाठी तात्पुरत्या स्वरुपात शेड उभारणेस तसेच साईनाथ रुग्णालय येथे पेशंटचे नातेवाईकांना थांबण्यासाठी शेड उभारणेस व त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३३, निर्णय क्र.३७६ श्री.रामचंद्र लोळे, पेठ वडगांव,कोल्हापुर यांना २ ते १२ सप्टेंबर,२०१९ या कालावधीत त्यांनी मागणी केल्यानुसार दोन दिवसांसाठी श्रींच्या पादुका नियमावलीचे काटेकोर पणे अनुपालन करुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(कार्यवाही- शताब्दी कक्ष/मंदिर विभाग/संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३४, निर्णय क्र.३७७ मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१,२८४/२८८/६ मधील देणगी स्वरुपात मिळालेल्या इमारतीमध्ये आय.ए.एस.अकॅडमी सुरु करणेबाबतची कार्यवाही नियमानुसार तात्काळ सुरु करण्यात यावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३५, निर्णय क्र.३७८ संस्थानचे प्रशासकिय अधिकारी डॉ.आकाश किसवे यांची संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३६, निर्णय क्र.३७९ मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३०.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२ अन्वये शताब्दी वर्षाचे कालावधीतील मुख्य कार्यकारी अधिकारी व शताब्दी महोत्सवासाठी निर्माण करण्यात आलेल्या शताब्दी कक्षासाठी संस्थान आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात महाराष्ट्र शासनाकडील प्रतिनियुक्तीवर आलेले उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधिक्षक,मुख्यलेखाधिकारी यांचेसह त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन/आरती करीता ओळखपत्र देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे शताब्दी महोत्सवानंतर त्या पुढे शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्त होणारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर शासकीय अधिकारी यांचेसह त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन/आरती करीता ओळखपत्र देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग /जनसंपर्क विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३७, निर्णय क्र.३८० श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीवर, समिती सदस्य म्हणून नव्याने नेमणूक करण्यात आलेल्या नगराध्यक्षा मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते यांचा स्थानिक उपसमिती सभेमध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३८, निर्णय क्र.३८१ संस्थानचे दोन्ही रुग्णालयात असणाऱ्या मशिन्स् काही तांत्रिक कारणास्तव बंद पडल्यास पेशंटची गैरसोय होऊ नये याकरीता तपासणीसाठी तारखा दिलेल्या पेशंटना दुरध्वनी/एसएमएसव्दारे कळविण्यात यावे, व मशिन्स दुरुस्त झाल्यानंतर अशा पेशंटना पुन्हा कळविण्यात यावे. तसेच याबाबत आवश्यकतेनुसार Press Note देण्यात यावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल / श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३९, निर्णय क्र.३८२ मंदिर परिसरातील साई सत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेचे काम सुरु आहे. सदरहु ध्यान मंदिर हॉल साऊंड प्रुफ होण्याचे दृष्टीने त्या ठिकाणी युपीव्हीसी खिडक्या, ॲकॉस्टीक डोअर विन्डो सीलसह बसविणेत यावेत.खिडक्यांना रोलर ब्लाईंड बसविणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे यावेत, अंतर्गत कामात आवश्यक त्या किरकोळ सुधारणा सदर कामाचे ठेकेदार यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरले. तसेच यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये सात लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

वरील निर्णय क्र.३१३ ते ३८२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं.०६.३०वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (दी.म.मुगळीकर,भा.प्र.से) | (सुरेश हावरे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.